31-03-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 1
DGS/ SBT/ MMP/ 12:00

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: नियम 289 अन्वये प्रस्तावासंबंधी

**सभापती** : आज श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी "मराठी शाळांवर कानडीची सक्ती करणे, मराठी माणसांवर बेछूट अत्याचार करणे, इतके करुनही न थांबलेल्या या मंडळींनी अत्याचाराचा कळस गाठून मराठीची कायम गळचेपी करणाऱ्या कानडी मंडळींनी दिनांक 30 मार्च, 2010 रोजी याच व्देषातून मराठीचा गळा घोटून मराठी माणसाकडे बेळगांवचे जाणारे महापौरपद त्यांच्याकडे जाऊ नये म्हणून महापौर पदाची निवडणूक प्रक्रियाच गुंडाळली असून या पदासाठी आलेल्या सात नामनिर्देशनपत्रांपैकी कानडी उमेदवार वगळता मराठी उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे अवैध ठरविणे, त्यामुळे बेळगावमध्ये मराठी माणसांवर आता निवडणुकीत देखील अन्याय होत आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री, राज्यपाल यांजकडे तक्रार करुनही न्याय मिळालेला नाही" या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला आहे. आजच्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये अशाप्रकारचा कोणताही विषय नाही ही वस्तुस्थिती खरी असली तरी मराठी भाषिकांच्या दृष्टीने अत्यंत जीवाभावाचा विषय असल्यामुळे प्रश्नोत्तराच्या तासानंतर माननीय सदस्यांना व इतर एक-दोन माननीय सदस्यांना यासंबंधी आपले विचार मांडण्यास मी परवानगी देईन.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, धन्यवाद.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यातील महागाईला आळा घालण्यासाठी करावयाची उपाययोजना

**(१) * २८६४ श्री.दिवाकर रावते, डॉ.दिपक सावंत, श्री.अनिल परब, श्री.परशुराम उपरकर :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागाईला आळा घालण्यासाठी केंद्र शासनाने दिनांक १३ जानेवारी, २०१० रोजी वा त्यासुमारास ११ सूत्री कार्यक्रम जाहिर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात राज्य शासनालाही काही मार्गदर्शक सूचना करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढत्या महागाईला आळा घालण्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने त्यांचे परिणाम किती दिवसांत प्रत्ययाला येतील ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) केंद्र शासनाने ११ सूत्री कार्यक्रम जाहीर केल्याचे पत्र या विभागास प्राप्त झालेले नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी दिलेल्या छापील उत्तरावरुन या देशातील महागाई कमी व्हावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न झाल्याचे दिसत नाही. महागाईच्या प्रश्नावर या सभागृहामध्ये अडीच तासाची चर्चा व्हावी याकरिता आम्ही प्रस्ताव दिला असून तो ज्यावेळी सभागृहापुढे येईल त्यावेळी सविस्तरपणे त्यावर आम्ही बोलणार आहोत. मी स्पष्टपणे प्रश्न विचारला होता की, "महागाईला आळा घालण्यासाठी केंद्र शासनाने दिनांक १३ जानेवारी, २०१० रोजी वा त्या सुमारास ११ सूत्री कार्यक्रम जाहीर केला, हे खरे आहे काय?" त्याला असे उत्तर देण्यात आले आहे की, "केंद्र शासनाने ११ सूत्री कार्यक्रम जाहीर केल्याचे पत्र या विभागास प्राप्त झालेले नाही". याचा अर्थ देशामध्ये महागाई आहे, महाराष्ट्रामध्ये महागाई नाही काय? महाराष्ट्र हा या देशाचा अविभाज्य भाग नाही काय? केंद्र शासनाने १३ जानेवारीला ११ सूत्री कार्यक्रम जाहीर केला. आणि आज ३१ मार्च रोजी मी या प्रश्नावर बोलण्याकरिता सभागृहामध्ये उभा आहे. या देशातील गोरगरीब जनतेला बसणारी महागाईची झळ कमी करण्यासाठी केंद्र सरकारने जाहीर केलेल्या ११ सूत्री कार्यक्रमाची अंमलबजावणी तातडीने करणे आपले कर्तव्य होते. ते आपल्याला मान्य असेल तर केंद्र सरकारने अंमलात आणलेल्या ११ सूत्री कार्यक्रमाची रुपरेषा उपलब्ध करुन



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

ता.प्र.क्र. २८६४...

श्री. दिवाकर रावते....

घेऊन त्याची अंमलबजावणी करणे हे आपले कर्तव्य नाही काय? जर तो कार्यक्रम आपल्यापर्यंत पोहोचला नाही तरमग आपल्याला या महागाईशी काहीही देणेघेणे नाही. ही महागाई कमी करण्याची आपली इच्छा नाही. आपल्या पक्षाचे व या सरकारचे प्रमुख मार्गदर्शक व केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार साहेबांनी जाहीर केलेला कार्यक्रम आपणापर्यंत पोहोचला नाही हे खरे आहे काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, महागाईला आळा घालण्यासंबंधी प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने "केंद्र सरकारने १३ जानेवारी रोजी ११ सूत्री कार्यक्रम जाहीर केला हे खरे आहे काय?" असा प्रश्न विचारण्यात आला आहे. त्यामुळे केंद्र सरकारने अशाप्रकारे १३ जानेवारी रोजी ११ सूत्री कार्यक्रम जाहीर केलेला नाही असे उत्तर दिले आहे. देशाचे पंतप्रधान माननीय श्री. मनमोहनसिंग यांच्या अध्यक्षतेखाली सर्व राज्याच्या मुख्यमंत्र्यांची व अन्न व नागरी पुरवठा खात्याच्या मंत्र्यांची दिल्ली येथे फेब्रुवारी महिन्यामध्ये एक बैठक घेण्यात आली होती.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:05

ता.प्र.क्र.2864 . . . .

श्री.अनिल देशमुख . . . .

त्याठिकाणी दिवसभर बैठक झाली. या बैठकीस अनेक राज्यांचे माननीय मुख्यमंत्री उपस्थित होत. त्यावेळी माननीय पंतप्रधानसाहेबांनी, माननीय केंद्रीय कृषी मंत्रीसाहेबांनी, माननीय केंद्रीय वित्त मंत्रीसाहेबांनी अनेक सूचना केल्या. पण 11 सूत्री कार्यक्रमाच्या संदर्भातील पत्र आपल्याच राज्याला नाही, तर कोणत्याही राज्याला प्राप्त झालेले नाही.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, याठिकाणी तिसऱ्या क्रमांकाच्या प्रश्नामध्ये असे म्हटलेले आहे की, "असल्यास,वाढत्या महागाईला आळा घाललण्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने त्यांचे परिणाम किती दिवसात प्रत्ययाला येतील ? तर याबाबत पहिला प्रश्न लक्षात घेऊन तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर देण्यात आलेले आहे. तथापि शासन याबाबत काय कार्यवाही करीत आहे ? ए.पी.एल.च्या योजना, बी.पी.एल.च्या अंत्योदय योजना राबविण्यात येतात. माझा प्रश्न असा आहे की, गेल्या चार पंधरवड्याचे निर्देशांक कमी झाले आहेत की जास्त झालेले आहेत? पब्लिक डिस्ट्रीब्युशन सिस्टीम परफेक्ट करण्याच्या बाबतीत कोणती कार्यवाही करणार आहात ? धान्य मिळत नाही म्हणून ग्राहकांना एका विशिष्ट दुकानाचे कार्ड देण्यापेक्षा, मला असे वाटते की, ग्राहकांना फूड कुपन्स् देऊन सांगितले की, तुम्हाला पाहिजे त्या दुकानातून माल घ्यावा आणि त्याची सबसिडी त्या दुकानदाराला मिळेल. तर यापध्दतीने शासन विचार करणार आहे काय? माझ्या माहितीप्रमाणे काही राज्यामध्ये अशा प्रकारे फूड कुपन्स् देण्याची पध्दत सुरु झालेली आहे. तेव्हा याबाबत माननीय मंत्री महोदय माहिती देतील का ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, राज्य शासनाच्या माध्यमातून अनेक योजना राबविल्या जातात. ठीक आहे, महागाईला सर्व राज्य तोंड देत आहेत. भारतामध्ये, अनेक देशामध्ये महागाई आहे ही वस्तुस्थिती आहे.परंतु एक गोष्ट चांगली झाली आहे की, यावर्षी खरीप व रब्बीच्या कृषी उत्पादनात 8 टक्के वाढ झाली असल्यामुळे, आता हळूहळू महागाई कमी होत आहे हे खरे आहे. राज्य शासनातर्फे अनेक योजना राबविल्या जातात. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अंत्योदय योजना, बी.पी.एल., ए.पी.एल. यांच्यासाठी योजना राबविल्या जातात. अंत्योदय योजने अंतर्गत 24 लाख लाभार्थींना 2 रुपये कि.गहू, 3रुपये तांदूळ ही योजना राबवितो. बी.पी.एल.साठी सुध्दा 5 कि.गहू व 6 कि. तांदूळ दिला जातो. या तीन-चार वर्षामध्ये ए.पी.एल.

. . . .बी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मधील लोकांना धान्य मिळत नव्हते.राज्यामध्ये ए.पी.एल.चे लाभार्थी 1 कोटी 45 लाख इतके आहेत. त्यांना कधी धान्य मिळत नव्हते. पण केंद्र शासनाने मोठया प्रमाणात धान्य उपलब्ध करुन दिल्यामुळे आता ए.पी.एल.च्या लाभार्थ्यांना सुध्दा सुध्दा गहू,तांदूळ, साखर, तेल या सर्व जीवनावश्यक वस्तू देत आहोत. जीवनावश्यक वस्तुंच्या यादीमध्ये तेल,साखर,तूरडाळ, तांदूळ, गहू इ.वस्तू आहेत. या सर्व वस्तू कशा प्रकारे सवलतीच्या दरामध्ये देता येतील यासाठी राज्य शासनाने योजना राबविली आहे. त्यानुसार ऑगस्ट ते मार्च या कालावधीमध्ये 532 कोटी रुपये मंजूर करुन, या पाच जीवनावश्यक वस्तू सवलतीच्या दरामध्ये देण्याच्या दृष्टीने अतिशय चांगल्या प्रकारे, प्रभावीपणे अंमलबजावणी सुरु आहे. केंद्र शासनाने आणि खास करुन राज्य शासनाने या योजनेच्या बाबतीत प्रिन्सीपल सेक्रेटरी आणि कमिशनर, इन्व्हेस्टमेंट ॲण्ड प्रोटोकॉल गर्व्हमेंट ऑफ इंडिया यांचे जे पत्र आलेले आहे, त्यामध्ये महाराष्ट्राच्या टारगेट पब्लीक डिस्ट्रीब्युशन सिस्टीम बाबत अभ्यास केला आणि त्याबद्दल "Very Good" असा रिमार्क मिळालेला आहे, म्हणजे महाराष्ट्र राज्याने पुढाकार घेऊन जीवनावश्यक वस्तू सवलतीच्या दरामध्ये कशा देता येतील यादृष्टीने कार्यवाही केली आहे. त्याबाबतीत त्यांनी महाराष्ट्राचा उल्लेख केला आहे. अनेक राज्यांमध्ये ही योजना करीत असताना , महाराष्ट्रामध्ये ज्यापध्दतीने योजना राबविली आहे, त्याबद्दल महाराष्ट्र राज्याला रिमार्क आलेला आहे. त्याचबरोबर मी आणखी सांगू इच्छिते की, मिनिस्ट्री ऑफ कन्झ्युमर्स अफेअर्स, फुड ॲण्ड पब्लीक डिस्ट्रीब्युशन, गव्हर्नमेंट ऑफ इंडीया यांचे कडून श्री. कौशिक जे सेक्रेटरी आहेत, यांचे सुध्दा मधल्या काळामध्ये पत्र आले होते. त्यामध्ये त्यांनी असे म्हटलेले आहे की, "The Central Government is aware that some states like Maharashtra, Kerala, Tamilnadu, Madhya Pradesh,Andhra Pradesh have undertaken market intervention by way of procuring sugar from sugar mills directly and/or imports and are releasing the same at subsidised prices to consumers in their respective States.This measure is very commendable as such measures only add to the efforts of Central Government to make sugar available to household consumers at affordable rates"म्हणजे त्यांनी पाच राज्यामध्ये

. . . .बी-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख . . ..

महाराष्ट्र राज्याला अव्वल क्रमांक दिलेला आहे. या राज्यात साखरेच्या वाटपाच्या बाबतीत सुध्दा चांगले काम सुरु आहे अशा प्रकारचा केंद्र शासनाचा रिमार्क आहे. तेव्हा शासनाच्यावतीने या सर्व वस्तू सवलतीच्या दरामध्ये सर्व लाभार्थींना कशा प्रकारे देता येतील यादृष्टीने आमचा प्रयत्न सुरु आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SMT/ SBT/ MMP/ प्रथम सौ. रणदिवे.... 12:10

ता.प्र.क्र.2864...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये या प्रश्नाला स्पष्टपणे बगल दिलेली आहे. प्रश्नामध्ये कारण सांगितले आहे, तारीख सांगितलेली आहे तसेच अशा प्रकारची बैठक झाली होती, माननीय मुख्यमंत्री त्या बैठकीला आले होते त्या बैठकीमध्ये अशी, अशी चर्चा झाली असे सांगितले आहे. पण माननीय मंत्रिमहोदयांना याठिकाणी जे रेकॉर्डवर आणावयाचे होते ते रेकॉर्डवर आणण्याचा प्रयत्न केला आहे. अंत्योदय, बी.पी.एल.बद्दल या ठिकाणी सांगण्यात आले. या योजना केलेल्या आहेत ती गोष्ट चांगली आहे. या योजनांचे स्वागत आहे पण त्याचबरोबर मुंबईतील आणि महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणूस महागाईत होरपळत आहे त्याविषयी याठिकाणी एकही उद्गार काढलेले नाहीत. सभापती महोदय, सकाळ या वर्तमानपत्रात हे छापून आलेले आहे.

**सभापती** : सन्मानीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय,आठ दिवसात महागाईला लगाम, 11 सुत्री कार्यक्रम जाहीर, अशा प्रकारचे माननीय पवार साहेबांचे स्टेटमेंट वर्तमानपत्रात छापून आलेले आहे. याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना माहिती नसेल तर मी हे वर्तमानपत्र आपल्याकडे पाठवून देते. सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, राज्य शासन केंद्र शासनाची वाट न बघत स्वत: या महागाईला आळा घालण्यासाठी सर्वसामान्य मुंबईकरांना आणि महाराष्ट्रवासियांना भाजीपाल्यासह धान्यासह सर्व गोष्टी योग्य दरात मिळण्याच्या बाबतीत काही कार्यक्रम घेण्यात येईल काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मी थोडयावेळापूर्वीच सांगितले की, केंद्र शासनाकडून 13 जानेवारीला असे कोणतेही पत्र आलेले नाही. केंद्र शासनसुध्दा याबाबतीत आपल्याला फारमोठया प्रमाणात सहकार्य करीत आहे. अंत्योदय, बीपीएल, एपीएल या सर्व लाभार्थ्यांना तेल देतो. या तेलामध्ये आणि तूरडाळीमध्ये केंद्र शासन सबसिडी देते. प्रत्येक राज्यामध्ये महागाई कशा पध्दतीने कमी करता येईल यासाठी केंद्र शासन सुध्दा मोठया प्रमाणात मदत करीत आहे. राज्य शासनसुध्दा स्वत:च्या स्तरावर अनेक योजना राबवून महागाईला कशा पध्दतीने तोंड देता येईल आणि जीवनावश्यक वस्तू सवलतीच्या दरात कशा पध्दतीने देता येतील यासाठी कार्यक्रम राबवित आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2864...

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय,भाववाढ व साठेबाजीवर नियंत्रण ठेवण्यसाठी कायमस्वरुपी उपाययाजना करण्यासाठी राज्य शासन काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, या महागाईच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी साठेबाजांवर कशा पध्दतीने कडक कारवाई करता येईल यादृष्टीने अनेक धडक योजना राबविण्यात आलेल्या आहेत. अनेक व्यापाऱ्यांना यामध्ये अटक केलेली आहे. जे व्यापारी साठेबाजी करतात त्यांच्यावर जीवनावश्य वस्तू कायद्याच्या माध्यमातून कारवाई केलेली आहे 74 व्यापाऱ्यांना आतापर्यंत अटक केलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळयाचा विषय आहे. आपण न्याय देता म्हणून मी याठिकाणी मुद्दाम बोलण्यासाठी उभा आहे. हा प्रश्न किती वेळ चालतो हे बघू नका. सर्व सन्माननीय सदस्यांना त्यावर प्रश्न विचारण्याची संधी द्यावी. सभापती महोदय, प्रश्नामध्ये असे म्हटले आहे की, "महागाईला आळा घालण्यासाठी केंद्र शासनाने दिनांक 13 जानेवारी, 2010 रोजी वा त्यासुमारास 11 सुत्री कार्यक्रम जाहीर केला, हे खरे आहे काय? त्याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितलेले आहे की, 13 तारखेला शासनाकडे कुठलेही पत्र प्राप्त झालेले नाही. मी त्याबाबतीत विचारलेलेच नाही. सभापती महोदय, प्रश्न दोन मध्ये असे विचारण्यात आले होते की,"यासंदर्भात राज्य शासनालाही काही मार्गदर्शक सूचना करण्यात आल्या आहेत काय? सभापती महोदय, संपूर्ण देशामध्ये महागाई होरपळत असताना पत्रकार परिषद घेतली ती कधी घेतली? माननीय पंतप्रधान महोदयांच्या कार्यालयात महागाईच्या संदर्भात जी बैठक झाली होती त्या बैठकीचा वृतांत देतांना श्री. शरद पवार असे म्हणाले होते की,"जीवनावश्यक वस्तुचे दर कमी करण्यासाठी सरकारने उपाययोजना केल्या असून येत्या आठ ते दहा दिवसामध्ये किंमती कमी होण्यास सुरुवात होईल अशी ग्वाही अन्न व नागरीपुरवठा मंत्री श्री. शरद पवार यांनी दिली. महागाई नियंत्रणाखाली आणण्यासाठी केंद्र सरकारने जाहीर केलेल्या 11 सुत्री कार्यक्रमाची माहितीही त्या दिवशी दिली होती. ती कधी दिली तर ती 13 तारखेला दिली आहे. ज्यावेळी दिल्लीमध्ये पत्रकार परिषद घेतली होती त्यावेळी दिली होती. त्यानंतर 27 तारखेला माननीय मुख्यमंत्र्यांची बैठक बोलावण्याचे घोषित केले होते. आता दोन प्रश्न असे आहेत. गेल्या तीन

...3..



SMT/ SBT/ MMP/ 12:10

ता.प्र.क्र.2864...

श्री. दिवाकर रावते

महिन्यामध्ये केंद्र शासनाने महागाई कमी करण्यासाठी काही सूत्र सूचवले काय? माननीय मुख्यमंत्र्यांची बैठक 27 तारखेला होणार होती ती झाली काय? त्यांनी सूचवलेले कार्यक्रम अंमलात आणले आहेत काय? हा एक भाग . आपल्या अर्थसंकल्पामध्ये स्वताईबद्दल, महागाई कमी करण्याबद्दल काहीही उल्लेख केलेला नाही. म्हणून आपल्या राज्याच्या पातळीवर शासन सर्वसाधारण जनतेला भाजीपासून कडधान्यापर्यंतच्या वस्तू स्वस्त मिळण्याकरिता कोणती पावले उचलण्यात येणार आहेत?

यानंतर श्री. बरवड...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 2864 .... श्री. दिवाकर रावते ...

केंद्राचे बाजूला ठेवा आणि हे करणार असे सांगावे. 13 तारखेची पत्रकार परिषद माननीय श्री. शरद पवार साहेबांची होती. आपल्याला एकदा फटका बसला आहे, पुन्हा बसवून घेऊ नका.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मी असे सांगितले की, 13 तारखेला कोणताही 11 सूत्री कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला नाही. पण 6 फेब्रुवारीला माननीय पंतप्रधानांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये माननीय केंद्रीय कृषी मंत्री, माननीय केंद्रीय वित्त मंत्री उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये अनेक विषयांवर चर्चा झाली आणि त्यांनी सर्व राज्यांना सूचना केल्या की, यासाठी प्रत्येक राज्याने पुढाकार घ्यावा. केंद्र शासन मदत करतेच आहे पण सर्व राज्य सरकारांनी पुढाकार घेऊन या सर्व जीवनावश्यक वस्तू कशा पध्दतीने सवलतीच्या दरात देता येतील यासाठी योजना आखावी अशा सूचना दिल्या. त्या सूचनेनुसार आपण महाराष्ट्रामध्ये योजना आखलेली आहे. या सर्व जीवनावश्यक वस्तू सवलतीच्या दरात देण्यासाठी आपण 532 कोटी रुपये मंजूर केले आहेत आणि आपण महाराष्ट्रामध्ये पाच वस्तू सवलतीच्या दरात देत आहोत.

**सभापती** : यानंतर तारांकित प्रश्न क्रमांक 3808 घेण्यात येईल.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तरामुळे आमचे समाधान झालेले नाही. या महागाईच्या विरोधात आम्ही सभात्याग करतो.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभात्याग करतात )

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, 13 जानेवारीला आणि 6 फेब्रुवारीला दिवसभर बैठक चालली आणि त्यामध्ये मार्गदर्शक सूचना केल्या. केंद्र शासनाने केवळ याबाबतच मार्गदर्शक सूचना केल्या नाहीत तर साठेबाजांविरुध्द सुध्दा कडक कारवाई करावी अश सूचना केल्या. त्यादृष्टीने साठेबाजांविरुध्द कडक कारवाई करीत आहोत. सन्माननीय सदस्य 13 जानेवारी हीच तारीख घेऊन बसले आहेत. 13 जानेवारीला कोणतीही सूचना आली नाही.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औरंगाबाद आर.टी.ओ.कार्यालयापासून कर्णपुरा या भागात वाळू वाहतूक करणारे वाळू तस्करांचे ट्रक उभे असल्याप्रकरणी करावयाची कारवाई**

**(२) * ३८०८ श्री.किशनचंद तनवाणी, श्री.दिवाकर रावते :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद आर.टी.ओ.कार्यालयापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या कर्णपुरा या भागात क्षमतेपेक्षाही दुप्पट वाळूची वाहतूक करणारे वाळू तस्करांचे ट्रक रांगेत उभे असतात असे माहे जानेवारी, २०१० मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकडे आर.टी.ओ.चे संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असतात हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनस्तरावर उक्त प्रकरणी काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव देवकर, श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) कर्णपुरा येथील खाजगी जागेत विविध प्रकारची वाहने उभी असतात. सार्वजनिक रस्त्यावर वाहने वाळू वाहतूक करताना त्यांची तपासणी करण्यात येते. दि.०१.०४.२००९ ते दि.२०.०३.२०१० या कालावधीत वाळू वाहतूक करणाऱ्या ३२४ वाहनांची तपासणी करण्यात आली. त्यात क्षमतेपेक्षा जास्त वाळू वाहतूक करताना दोषी आढळून आलेल्या ५८ वाहन मालकांकडून रुपये ३,८८,९५०/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

श्री. किशनचंद तनवाणी : सभापती महोदय, औरंगाबाद शहरामध्ये आर.टी.ओ. कार्यालयापासून जवळच कर्णपुरा म्हणून कॅन्टोनमेंट एरिया आहे. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, त्या ठिकाणी रेतीच्या गाड्या उभ्या राहात नाहीत, त्या ठिकाणी वेगवेगळ्या गाड्या उभ्या असतात. त्या ठिकाणी वेगवेगळ्या गाड्या उभ्या असतात पण त्यामध्ये रेतीच असते हे मी सिध्द करु शकतो. आमच्या जिल्ह्याचे माननीय मंत्रिमहोदय श्री. सत्तार यांना आपण फोन करुन विचारले तर ते सांगतील. योगायोगाने माननीय परिवहन मंत्री हे आमच्या जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. त्यांनी जानेवारी महिन्यामध्ये बैठक घेतली होती. उत्तरात असे म्हटले आहे की, 58 लोकांकडून दंड वसूल केला आहे. 58 पैकी किती लोकांवर फौजदारी गुन्हा दाखल केला आहे ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या ठिकाणी पहिल्या उपप्रश्नाला 'हे खरे नाही' असे उत्तर दिलेले आहे त्याबाबत सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितले. 'हे खरे नाही' असे उत्तर यासाठी दिलेले आहे की, महसूल खात्यातर्फे रॉयल्टीचे परवाने दिले जातात. प्रश्नामध्ये

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क. 3808 ..... श्री. गुलाबराव देवकर ....

तस्कराची वाहने असा उल्लेख केलेला आहे. ती वाहने तस्कराची नसून रेतीची आहेत. रेतीची वाहने त्या ठिकाणी उभी राहतात तसेच सर्व प्रकारची वाहने कर्णपुरा भागातील त्या खाजगी जागेमध्ये उभी राहतात. त्या ठिकाणी काही रेतीची वाहने सुध्दा उभी राहतात. पण ती वाहने तस्कराची नसतात. त्यांना रॉयल्टीचे परवाने महसूल खाते आणि जिल्हाधिकाऱ्यांकडून दिलेले असतात.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, तस्करी म्हणजे वाळूची तस्करी. यासंदर्भात तस्करी हा शब्द वापरलेला आहे. माननीय मंत्रिमहोदयांना माहीत आहे की, चार दिवसांपूर्वी संभाजीनगरमध्ये केंद्र सरकारचे आणि राज्य सरकारचे जिऑलॉजिस्ट अतिरिक्त वाळू कारण नसताना खोदल्याबद्दल पाहणी करण्यासाठी गेले होते. एवढी तस्करी त्या ठिकाणी होते. म्हणून या ठिकाणी जो तस्करी शब्द वापरलेला आहे तो चुकीचा नाही. शासनाचे एक म्हणणे बरोबर आहे की, कर्णपुरा भागामध्ये खाजगी जागेमध्ये गाड्या उभ्या राहतात आणि रस्त्यावर आल्याशिवाय आम्ही बघणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. किशनचंद तनवाणी यांचा मूळ प्रश्न यासंदर्भात आहे की, त्या ठिकाणी अशी वाहने यार्डमध्ये भरलेली आहेत. यार्डमधून ही भरलेली वाहने बाहेर पडणार आहेत. त्यामध्ये वाळू भरलेली नाही की, नाही हे तपासण्याचा अधिकार आर.टी.ओ. ला आहे. तो खाजगी बंगला नसून यार्ड आहे. रस्त्यावर आले तर तपासतो हे म्हणणे जरी खरे असले तरी त्यांच्यावर निर्बंध आणण्याकरिता खाजगी जागेमध्ये सुध्दा जाऊन ही वाहने तपासली पाहिजे अशी जी आपल्या कायद्यामध्ये तरतूद आहे त्याचा अवलंब करणार काय ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3808....

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मोटार वाहन अधिनियम 1988 च्या कलम 113 व 114 मध्ये क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक करणारी जी वाहने असतील त्यांच्यावर गुन्हा दाखल करणे किंवा दंड वसूल करण्याची तरतूद आहे. जादा भार वाहक गाडयांवर शासनाने कारवाई करावी अशा सूचना उच्च न्यायालयाने शासनाला दिलेल्या आहेत. या खाजगी जागेमध्ये वाळूची वाहने उभी असतात त्या वाहनांची वेळोवेळी चौकशी केली जाते, त्यांच्या गाडयांमधील लोडची मोजणी केली जाते. या तपासात जी वाहने जादा लोड करतात असे आढळून आले आहे त्यांच्यावर वेळोवेळी कारवाई केलेली आहे....

श्री.दिवाकर रावते : या यार्डमधील गाडया तपासण्याचे अधिकार शासनाला आहेत त्याची अंमलबजावणी करणार काय असा साधा प्रश्न मी विचारला आहे त्याला मंत्री महोदयांकडून उत्तर मिळालेले नाही.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते म्हणत आहेत तशाप्रकारची कारवाई केली जाते आणि यापुढेही ती केली जाईल.

श्री.किशनचंद तनवाणी : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही. लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, 58 वाहन मालकांकडून दंड वसूल केलेला आहे. या मालकांवर शासनाने फौजदारी गुन्हा दाखल केला आहे काय ? त्यांच्यावर गुन्हा केला नसेल तर त्या लोकांनी जादा भार भरावयाचा आणि शासनाने दंड वसूल करावयाचा असे होत राहील. या प्रकाराला आळा बसण्यासाठी शासन या मालकांवर फौजदारी गुन्हा दाखल करणार आहे काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, आर.टी.ओ.ला दंड वसूल करण्याचे अधिकार आहेत, फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे त्यांना अधिकार नाहीत. दंड वसूल करण्याची बाब त्यांच्या अखत्यारितीत असल्यामुळे त्यांनी दंड वसूल करण्याची कारवाई केलेली आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) अग्निशमन दलाकडे रासायनिक वायुप्रतिबंधक मास्कमध्ये ऑक्सिजनचे पुनर्भरण करण्याची यंत्रणा नसल्याबाबत करावयाची कार्यवाही**

**(३) * ३२३९ श्री.मोहन जोशी, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष चव्हाण, श्री.चरणसिंग सप्रा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील घातक रासायनिक वायुप्रतिबंधक मास्कमध्ये ऑक्सिजनचे पुनर्भरण करण्याची यंत्रणा पिंपरी-चिंचवड अग्निशमन दलाकडे उपलब्ध नसल्याने अग्निशमन कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने पिंपरी-चिंचवड अग्निशमन दलाला लागणारी यंत्रणा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भास्कर जाधव, श्री. अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका ही राज्यातील प्रमुख महानगरपालिकांपैकी एक आहे. या महानगरपालिकेच्या क्षेत्रात मोठमोठे उद्योगधंदे आहेत. या महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकडून उंच इमारतींना 36 मीटरपर्यंत इमारत बांधण्यासाठी परवानगी दिली जाते. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, तेथील अग्निशमन दलाकडे मेकॅनिकल लॅडर उपलब्ध आहे काय ? महाराष्ट्रातील अनेक महानगरपालिका, नगरपरिषदांच्या अग्निशमन दलाची यंत्रणा आहे ती सक्षम करण्यासाठी शासनाकडून विशेष अनुदान दिले जाणार आहे काय ? त्याचप्रमाणे राज्यातील महानगरपालिका व नगरपालिकांच्या अग्निशमन दलाचे जे अधिकारी व जवान आहेत त्यांच्या युनिफॉर्ममध्ये समानता येण्यासाठी काही पावले उचलली जाणार आहेत काय ? काही दिवसांपूर्वी दुर्दैवी घटना घडल्यावर झालेल्या चर्चेच्या वेळी शासनाच्यावतीने यासंदर्भातील धोरण जाहीर केले जाणार आहे असे सांगण्यात आले होते. त्यानुसार शासनाने धोरण आखले आहे काय ? त्याचप्रमाणे राज्यातील सर्व अग्निशमन दलात समानता आणण्यासाठी शासन आवश्यक तो निर्णय घेणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी मूळ प्रश्नाला सोडून राज्यातील अग्निशमन दलाबाबत अनेक प्रश्न विचारले आहेत. पिंपरी-चिंचवड

3....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

ता.प्र.क्र.3239.... श्री.भास्कर जाधव.....

महानगरपालिकेच्या हद्दीत उंच इमारती बांधल्या जात असल्यामुळे तेथील अग्निशमन दलाकडे मेकॅनिकल लॅडर आहे का असा त्यांचा पहिला प्रश्न होता. या क्षणी माझ्याकडे त्याबाबतची माहिती उपलब्ध नाही. ती त्यांना अवगत केली जाईल. राज्यातील अनेक महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अग्निशमन दलाच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे. राज्यातील एकूण 91 नगरपालिका व नगरपंचायतींकडे कोणत्याही प्रकारची सुरक्षा व्यवस्था अंतर्गत अग्निशमन केंद्र नसल्यामुळे अग्निशमन केंद्रासाठी 50 लाख रुपये व एक अग्निशमन वाहन घेण्यासाठी 31 लाख असे 81 लाख रुपये दिले जाणार आहेत. राज्यातील 91 नगरपालिका, नगरपंचायतींना ही सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 12:25

ता.प्र.क्र.3239.... (श्री. भास्कर जाधव...

पुढच्या टप्प्यामध्ये ज्यांच्याकडे फक्त एकच इक्विपमेंट आहे पण दुसरे नाही त्यांना देखील मदत केली जाईल. संपूर्ण महाराष्ट्रातील अग्निशमन दलाचे अधिकारी आणि जवान यांच्यामध्ये शासन समन्वय साधण्याचा प्रयत्न करणार आहे काय, असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. काही घटना नुकत्याच घडलेल्या आहेत. त्या घटनांतून बोध घेऊन त्यासंदर्भातील समन्वय साधण्याच्या दृष्टीने शासन कारवाई करीत आहे.

डॉ. नीलम गो-हे : प्रश्न भाग (1)ला "नाही" असे उत्तर दिलेले आहे. प्रश्न असा आहे की, शासन अशा प्रकारे नकारात्मक उत्तरे देऊन कोणते श्रेय घेत आहे ? पहिल्या प्रशनाला "नाही" असे उत्तर दिलेले आहे. याचा अर्थ अग्निशमन कर्मचा-यांचे आरोग्य धोक्यात आलेले नाही. याचाच अर्थ अग्निशमन दलाकडे संपूर्ण यंत्रणा आहे असे शासनाला म्हणावयाचे आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : अग्निशमन कर्मचा-याचे आरोग्य धोक्यात आले आहे काय ? असा मूळ प्रश्न विचारलेला आहे. त्यास "नाही" असे उत्तर दिलेले आहे. पुनर्भरण यंत्रणा उपलब्ध नसल्यामुळे हा मुद्दा उपस्थित झालेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे आग विझविण्याच्या संदर्भातील 20 सेटस् आहेत. एका सेटमध्ये दोन सिलेंडर्स असतात.

डॉ. नीलम गो-हे : मग 20 सेटस् उपलब्ध आहेत असे छापील उत्तरात का दिले नाही ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, प्रश्न बारकाईने वाचावा. प्रश्न असा आहे की, पुणे जिल्ह्यातील घातक रासायनिक वायुप्रतिबंधक मास्कमध्ये ऑक्सिजनचे पुनर्भरण करण्याची यंत्रणा पिंपरी-चिंचवड अग्निशमन दलाकडे उपलब्ध नसल्याने अग्निशमन कर्मचा-यांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे जानेवारी 2010मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ? या प्रश्नाला "नाही" असे उत्तर दिलेले आहे.

श्री. भाई जगताप : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी योग्य प्रश्न विचारला होता. घातक रासायनिक वायुप्रतिबंधक मास्कमध्ये ऑक्सिजनचे पुनर्भरण करण्याची यंत्रणा आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : नाही.

श्री. भाई जगताप : पिंपरी-चिंचवड हा मोठा औद्योगिक क्षेत्राचा भाग आहे. तेथे अनेक रासायनिक कारखाने आहेत. केवळ मास्क देऊन प्रश्न सुटणार नाही. सिलेंडर संपल्यानंतर त्यांचे पुनर्भरण करण्यासाठी लागणारी यंत्रणा शासन संबंधितांना पुरविणार आहे काय ?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3239....

श्री. भास्कर जाधव : मी सांगितले आहे की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेडे रिफिलिंग स्टेशन नाही ही वस्तुस्थिती आहे. सिलेंडर रिकामे झाल्यानंतर ते दादर येथील ड्रॅग्रर मेक या जर्मन कंपनीकडून रिफिलिंग करुन घेतले जाते. सन 2010-2011च्या अर्थसंकल्पामध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेसाठी अशा प्रकारची ऑक्सिजनचे पुनर्भरण करणारी यंत्रणा बसविण्यासाठी निधीची तरतूद केलेली आहे. येत्या काळात त्यांचे स्वत:चे रिफिलिंग सेंटर तयार होईल.

श्री. संजय दत्त : माझ्या माहिती प्रमाणे मुंबई व्यतिरिक्त नाशिक, नागपूर, औरंगाबाद अशा मोठया शहरामध्ये अशा प्रकारची ऑक्सिजनचे पुनर्भरण करणारी यंत्रणा उपलब्ध नाही. तेव्हा मुंबई व्यतिरिक्त इतर शहरामध्ये ही यंत्रणा नसल्यास, शासनान त्याबाबतीत कोणती पावले उचलणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : इतर महानगरपालिकांकडे ही यंत्रणा उपलब्ध आहे की नाही यासंबंधीची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती मी पटलावर ठेवीन. अशा प्रकारची यंत्रणा सर्व महानगरपालिकांमध्ये उभी करण्याच्या दृष्टीने शासन पुढाकार घेईल.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3239....

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, इतर महानगरपालिकांचा विचार करीत असताना मुंबई महानगरपालिका देखील खूप मोठी आहे. या मुंबई शहरामध्ये अनेक स्कायस्क्रॅपर्स इमारती उभ्या रहात आहेत. मध्यंतरी बोरीवली येथील शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये आग लागल्यानंतर हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या संदर्भात शासन कोणती उपाययोजना करणार आहे?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, बोरीवली शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये लागलेल्या आगीचा विषय वेगळा असून प्रश्नाधीन विषय वेगळा आहे. तरी देखील पुढच्या काळात अशा प्रकारच्या दुर्घटना घडू नयेत यासाठी शासन काळजी घेत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मंत्रीमहोदयांच्या उत्साहाला दाद देतो. पळवाट काढण्यासाठी हा विषय पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेशी संबंधित असल्यामुळे उपप्रश्नाच्या माध्यमातून ते महाराष्ट्रातील अनेक शहरांची माहिती देत आहेत. न मागितलेली माहिती देत आहेत त्याबद्दल कौतुक करतो. मंत्रीमहोदय जर अधिक माहिती देणार असतील तर त्यांना अडचणीत आणता येते. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी उपप्रश्न विचारुन मंत्रीमहोदयांना अडचणीत आणले आहे. नेहमी अशीच अधिक माहिती द्यावी. चार वर्षापूर्वी या सदनामध्ये फायर ब्रिगेड ॲक्ट आणला होता. त्यावेळी सन्माननीय श्री.राजेश टोपे हे नगरविकास राज्यमंत्री होते. सभापती महोदय, आपण पीठासीन अधिकारी म्हणून सभागृहात उपस्थित होतात. 80 पृष्ठे असलेला तो कायदा होता. अधिवेशनाचा शेवटचा दिवस होता. मी विनंती केली होती, या कायद्यासंदर्भात आम्हाला खूप बोलायचे आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी विनंती केली आणि आपला आदर राखून चर्चा न करता तो ॲक्ट मंजूर केला. तो कायदा आणण्यासाठी मी दिल्लीपर्यंत पत्रव्यवहार केला होता, आग्रह धरला होता. तो कायदा अंमलात आला आहे का? नसल्यास का अंमलात आला नाही?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या पहिल्या प्रश्नाबाबत खुलासा करतो. मूळ प्रश्न पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेशी संबंधित असल्यामुळे बगल देण्याचा किंवा वेगळा विषय आहे असे सांगण्याचे कारण नाही. मूळ प्रश्न हा होता की, जानेवारी 2010 मध्ये अशा प्रकारची दुर्घटना घडली आहे का? अशी दुर्घटना घडलेली नाही. संपूर्ण दोन वर्षाचा अहवाल द्यायला मी तयार आहे. जे मास्क किंवा सिलेंडर असतात ते

..2..

31-03-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) G.1
SGB/ MMP/ SBT/ 12:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपलब्ध आहेत का? होय. 20 किट उपलब्ध आहेत. त्यापैकी 3 रिक्त आहेत असे सांगितले. सिलेंडर भरण्याची सोय आहे का? महानगरपालिकेकडे सोय नाही. दादर येथे ती सोय उपलब्ध आहे. आता महानगरपालिका काय करणार? सन 2010-11 साठी महानगरपालिकेने तरतूद केलेली आहे. येत्या काही दिवसात ही व्यवस्था महानगरपालिकेकडून केली जाणार आहे. काहीही लपविण्याचे कारण नाही. सन्माननीय सदस्यांनी कायद्याबाबतचा प्रश्न उपस्थित केला आहे. तो कायदा अंमलात आलेला आहे.

-------

..3..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तळोजा, कल्याण-शिळफाटा,भिवंडी (जि.ठाणे) येथील घनकचऱ्याच्या विल्हेवाटाची समस्या दूर करण्याबाबत**

**(४) * ५१२७ श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अ) तळोजा, ब) कल्याण-शिळफाटा, क) भिवंडी (जि.ठाणे) येथील घनकचऱ्याच्या विल्हेवाटाची समस्या दूर करण्याकरिता तसेच ई-कचऱ्याची समस्या दूर करण्यासाठी सन २००७ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विशेष प्रकल्प कक्षाची स्थापना केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उद्देशाला पुर्णत्वास नेण्यासठी "नॅशनल इन्वर्हेमेंटल रिसर्च इन्स्टीट्युट (निरी) ह्या संस्थेची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ह्या संस्थेने आपला अहवाल सादर केला आहे काय,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.भास्कर जाधव, श्री. अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (१) होय.

(२) होय.

(३) व (४) संस्थेकडून विविध बाबींवर अभ्यास करण्यात येत असून संस्थेचे काम प्रगतीपथावर आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, ज्या बाबींचा या संस्थेकडून अभ्यास करण्यात येणार आहे त्या बाबी कोणत्या आहेत?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, जो अभ्यास करण्यात येणार आहे त्यामध्ये मुंबई आणि मुंबईच्या आसपास व आजूबाजूच्या महानगरपालिकांमध्ये सध्या डंपिंग ग्राऊंड आणि कचऱ्याची विल्हेवाट कशा पध्दतीने लावावयाची ही खूप मोठी समस्या निर्माण झालेली आहे. त्यादृष्टीने सामायिक भराव भूमीसाठी मी खालच्या सभागृहात कालच सांगितले की, एमएमआरडीएच्या माध्यमातून स्पॉट शोधण्यात येत आहेत. तशा प्रकारचे पाच स्पॉट शोधण्यात आले आहेत. या पाच प्लॉटपैकी पहिल्या तीन स्पॉटवर २५ वर्षाकरिता या शहरातील संपूर्ण कचरा टाकला तरी २५ वर्षे अडचण येणार नाही. २५ वर्षानंतर अडचण उद्‌भवली तर पुढच्या २५ वर्षासाठी कोणती जागा असावी यादृष्टीने या पाच जागा निवडण्यात आल्या आहेत. आवश्यक असल्यास त्याची माहिती देण्यास तयार आहे. या संदर्भात नीरी या संस्थेच्या माध्यमातून वेगवेगळया संस्था काम करीत आहेत. त्या अभ्यासामध्ये जागेच्या पर्यावरणाचा अभ्यास करणे, घनकचऱ्याचे भौतिक व रासायनिक विश्लेषण करणे, प्रक्रिया तज्ज्ञांची निवड करणे, परिवहन आराखडा तयार करणे, ज्यामध्ये शहरातील कचरा वाहून नेण्यासाठी ट्रान्स्पोर्टेशनच्या संदर्भातील माहिती घेणे आणि सामायिक भराव भूमीसाठी संस्थात्मक रचना असे वेगवेगळे पाच विषय घेऊन नीरी काम करीत आहे.

(नंतर एच.१....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5127...........

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, घन कचरा व्यवस्थापनाच्या संदर्भात आताच मंत्री महोदयांनी सांगितले. परंतु येणाऱ्या पाच वर्षात ई-कचऱ्याचा प्रश्न मोठ्याप्रमाणात निर्णय होणार असल्यामुळे त्यासंबंधीचा कायदा होणे अत्यंत आवश्यक आहे. तथापि सध्याच्या परिस्थितीत यासंबंधी कुठलेही रुल्स आणि रेग्युलेशन अस्तित्वात नाहीत. म्हणून असा इलेक्ट्रॉनिक कचरा कशा पध्दतीने डिस्पोज-अप करावा याविषयीचा कायदा शासन बनविणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, प्रश्नाच्या उत्तरात सुरुवातीलाच म्हटले आहे त्यानुसार ही जी समिती नेमलेली आहे त्या समितीच्या कार्यकक्षेत ई-कचऱ्याचाही उल्लेख आहे.

डॉ. दीपक सावंत : महोदय, ई-कचऱ्याची विल्ह्येवाट लावण्यासंबंधीचा कायदा अस्तित्वात नसल्याने तसा कायदा शासन करणार काय ? असा मी प्रश्न विचारला आहे. तसेच याच संदर्भात मी एक अशासकीय विधेयक सुध्दा दिलेले आहे.

श्री. भास्कर जाधव : महोदय, सन्माननीय सदस्यांनी अशाप्रकारचे अशासकीय विधेयक दिलेले आहे हे खरे आहे. ज्यावेळी कायद्यात आपण रुपांतर करु त्यावेळेस सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा विचार करुन हे विधेयक कायदा बनविण्यासाठी आणणार त्यात या सूचनांचा सकारात्मक विचार करण्यात येईल.

श्री. संजय केळकर : महोदय, सन 2007 मध्ये एमएमआरडीएने विशेष प्रकल्प कक्ष स्थापन केला असून आता सन 2010 हे वर्ष सुरु आहे. तसेच पाच ठिकाणी डंपिंगची जागा बघितल्याचेही सांगितले. परंतु ज्या ज्या ठिकाणी नागरिकरण मोठ्या प्रमाणात होत आहे त्यात संपूर्ण ठाणे जिल्हाच कव्हर झालेला आहे. त्यामुळे अशा कचऱ्याची विल्ह्येवाट लावणे शक्य झाले नाही तर त्यामुळे रोगराईत वाढ होणार आहे. तसेच मंत्री महोदयांनी 3 ठिकाणी असे डंपिंग सुरु करण्याच्या प्रयत्नात असल्याचीही माहिती दिली. ते कधीपर्यंत सुरु करण्यात येणार आहेत ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, हा कक्ष सन 2007 मध्ये स्थापन झाल्यानंतर निरी या संस्थेची रिलेटेड संस्थांसह सन 2009 मध्ये या कामासाठी नेमणूक करण्यात आली. या संस्थेने सर्व गोष्टींचा अभ्यास करुन दोन वर्षे अहवाल सादर करण्याची मुदत दिलेली आहे व सन 2011 पर्यंत ही समिती अहवाल सादर करणार आहे. आतापर्यंत केलेल्या त्यांच्या कामाचा आढावा घेतला असता त्यांनी केलेल्या कामाची प्रगती चांगली असून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 5127.......

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, एमएमआरडीएच्या सर्व क्षेत्रात विशेषत: नगरपालिका तसेच "अ" वर्गीय ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात देखील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबतची समस्या निर्माण होत आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, निरी ही संस्था या सर्व गोष्टींचा अभ्यासकरीत आहे. हा अभ्यास करीत असताना स्थानिक लोकप्रतिनिधी, सरपंच तसेच नगराध्यक्षांना विश्वासात घेण्याबाबतच्या सूचना शासन देणार आहे काय ? तसेच ज्या ठिकाणी असे डंपिंग ग्राऊंड शासन निर्माण करणार आहे त्या जागा राखीव ठेवण्याबाबतचा निर्णय तातडीने शासन घेणार काय ? कारण अशा जागांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रण होतात म्हणून शासन गांभीर्याने याचा विचार करणार काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, यासाठी मुंबई-नाशिक महामार्गावरील भिवंडी-दापोडे या ठिकाणी 352 हेक्टर जागा आहे. दुसरे ठिकाण म्हणजे कल्याण-शीळ फाटा येथे 239 हेक्टर आणि तिसरी जागा तळोजा येथे औद्योगिक वसाहतीच्या उत्तरेकडिल बाजूला 441 हेक्टर जागा अशी एकूण 1054 हेक्टर जागा शासनाच्या ताब्यात आहे. याची विगतवारी सांगावयाची तर पहिल्या 352 हेक्टरपैकी शासनाची 135 हेक्टर जागा असून 227 हेक्टर जागा संपादित करावयाची आहे. ही जागा शहरापासून खूप दूर असल्याने तेथे कुठलेही अतिक्रमण होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

--------

...3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वाल्मिकी आवास योजनेतून घरकुल वाटप**
**करतांना झालेला गैरव्यवहार**

**(5) * 2706 श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.नितीन गडकरी, श्री.जगदीश गुप्ता** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) वाल्मिकी आवास योजनेतून दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांनाच घरांचे वाटप होते, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, खामगांव नगरपरिषदेचे नगराध्यक्ष दारिद्र्य रेषेंखालील लाभार्थ्यांमध्ये येत नसतांनाही त्यांनी एक नव्हे तर दोन घरकुले घेतली आहेत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, दारिद्र्य रेषेखाली येत नसतांनाही नगराध्यक्षांना दोन घरकुले कशी मंजूर झाली ती कोणी मंजूर केली व मंजूर करणाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(4) अद्याप अशा प्रकारची कारवाई झाली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत व ती केव्हा करण्यात येणार आहे ?

**श्री. सचिन अहिर, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (1) हे खरे आहे.

(2) हे खरे नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, पहिल्या प्रश्नाला "हे खरे आहे" असे उत्तर दिले असून खामगांव नगरपरिषदेच्या नगराध्यक्षांना दारिद्र्यरेषेखाली येत नसतानाही दोन घरकुले मिळाली हे खरे आहे काय, या दुसऱ्या प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर देण्यात आले. परंतु माझ्याकडे नगरपालिकेने प्रसिध्द केलेली घरकुलांची यादी आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 2706......

श्री. पांडुरंग फुंडकर .....

त्या यादीतील 233 व 234 क्रमांकावर माननीय नगराध्यक्षांचे नाव आहे. ज्यावेळेला माहितीच्या अधिकाराखाली यासंदर्भातील माहिती मागविण्यात आली त्यावेळेस नगराध्यक्षांचे नाव दारिद्रय रेषेखालील यादीत होते. माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविल्यानंतर नंतर संबंधित नगराध्यक्षांचे नाव यादीतून काढले गेले हे खरे आहे काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या यादीत "हे खरे नाही" असे म्हटलेले आहे. सन्माननीय सदस्यांकडे कोणती यादी आहे याची माहिती मला नाही. माझ्याकडे जी यादी आहे ती यादी अधिकृतपणे सीईओ यांनी दिलेली आहे. माझ्याकडे जी यादी आहे त्या यादीमध्ये संबंधित नगराध्यक्षांचे नाव दारिद्रयरेषेत नाही एवढेच मी सांगू इच्छितो. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडे जी यादी आहे ती यादी त्यांनी माझ्याकडे दिली तर ती तपासून योग्य ती चौकशी केली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझ्याकडे माहितीच्या अधिकाराखाली दारिद्रय रेषेच्या नावांची यादी असून ही यादी नगरपरिषदेच्या सीईओ यांनीच दिलेली आहे. नगराध्यक्षांना फसविण्याचे काम सीईओ यानी केले तर नाही ना ?म्हणजे एकदा दारिद्रय रेषेच्या यादीत नाव टाकावयाचे आणि नाव आल्यानंतर दुस-या यादीतून ते काढून टाकावयाचे आणि संबंधितांना अडचणीत आणावयाचे असे काम केले जात असेल तर आपण संबंधित सीईओ यांच्यावर काय कारवाई करणार आहात ? माझ्याकडे जी यादी आहे ती यादी माननीय सभापतींमार्फत मंत्रीमहोदयांकडे पाठवितो.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, यादी बघून चौकशी करण्यात येईल व योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, राज्यात वॅम्बी योजना जुनी योजना आहे. या योजनेनंतर एकात्मीक गृह निर्माण योजना, राजीव गांधी निवास योजना अशा अनेक योजना राबविण्यात आल्या आहेत. त्यामुळे सध्या वॅम्बी योजना कार्यान्वीत आहे काय ? वॅम्बी योजना

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 2706......

श्री. गोपीकिसन बाजोरिया....

कार्यान्वीत नसल्यास या योजनेतील 40 टक्क्यापेक्षा अधिक पैसे शासनाकडे प्रलंबित आहेत त्यामुळे केंद्रशासनाने राज्यशासनाला या योजनेतील निधी का खर्च केला नाही याबाबत नोटीस दिलेली आहे काय ? असे माझे दोन प्रश्न आहेत.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, वॅम्बी योजना आता बंद झालेली असून वॅम्बी योजना 2004 मध्ये सुरु होऊन सन 2007 मध्ये बंद पडलेली आहे. वॅम्बी योजनेतील कोणतीही रक्कम परत गेलेली नाही. या योजनेतील राहिलेली रक्कम वेगळया योजनेत डायव्हर्ट करुन आयएसएचडीपी अंतर्गत त्या योजनेतील सबसीडी ग्रँट म्हणून दाखवून आपण हा निधी वापरत आहोत.

--------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईच्या जोगेश्वरी (पूर्व) उपनगरातील अलियावर जंग मार्गावरील छत्रपती राजाराम महाराज उद्यानाची झालेली दुरावस्था**

**(६) * ५४७२ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.सुभाष चव्हाण, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त**
**:** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या जोगेश्वरी (पूर्व) उपनगरातील अलियावर जंग मार्ग (हायवे रोड) शेजारील छत्रपती राजाराम महाराज उद्यानाची सध्या अतिशय दुरावस्था झाल्यामुळे मुलांना, वृध्दांना तसेच महिलांना या उद्यानात बसण्यासाठी वा फिरण्यासाठी गैरसोयीचे होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१० मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर उद्यानाची झालेली दुरावस्था विचारात घेऊन त्वरीत सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भास्कर जाधव, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.

सदर उद्यानात ९० झाडे असून शोभेची झाडे व हिरवळ लावण्यात आलेली आहे. उद्यानाची देखभाल व निगा राखण्यासाठी ४ माळ्यांची तसेच २ पाळ्यांमध्ये १ कर्मचारी सुरक्षारक्षक म्हणून मुंबई महानगरपालिकेकडून नियुक्त करण्यात आला आहे. सदर उद्यानाचे "श्रेणीवर्धन" करण्याची बाब महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, प्रश्न एकच्या उत्तरामध्ये म्हटले आहे की, "हे खरे नाही."जी माहिती देण्यात आलेली आहे ती चुकीची आहे. मुंबईच्या जोगेश्वरी उपनगरातील अलियावर जंग मार्गा शेजारील छत्रपती राजाराम महाराज उद्यानाची अत्यंत दुरावस्था झालेली आहे. या उद्यानाची लोखंडी ग्रील तुटलेली आहे, दरवाजांना खिळेच नाही तर दरवाजे नादुरुस्त झालेले आहेत. या उद्यानात पूर्वी ४-५ मोठी कारंजी होती ती कारंजी सुध्दा नष्ट झालेली आहेत. या उद्यानाला गेट नसल्यामुळे कुत्रे- मांजरे या उद्यानात येत असतात. अशी दुरावस्था झालेली असतांना या ठिकाणी जे उत्तर दिलेले आहे ते सुध्दा चुकीचे दिलेले आहे. या उत्तरात असे म्हटले आहे की, या उद्यानात ९० झाडे असून शोभेची झाडे व हिरवळ लावण्यात आलेली आहे. उद्यानाची देखभाल व निगा राखण्यासाठी ४ माळयांची तसेच २ पाळयांमध्ये १ कर्मचारी सुरक्षारक्षक म्हण्फून मुंबई महानगरपालिकेकडून नियुक्त करण्यात आला आहे. सदर उद्यानाचे श्रेणीवर्धन करण्याची बाब महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे. त्यामुळे मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, या उद्यानात मुलांना महिलांना व वृध्दांना पाण्याची व बसण्याची सोय उपलब्ध करुन दिली जाणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, हे खरे आहे की, या उद्यानात बोअरवेल घेण्यात

...४...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :५४७२......

श्री. भास्कर जाधव.....

आला आहे तसेच चेकर्स टाईल्स सुध्दा बसविण्यात आलेले आहे तसेच खेळाचे साहित्य बसविण्यात आलेले आहे. अशा प्रकारचे काम या उद्यानात वारंवार केले जाते परंतु या उद्यानाच्या शेजारी झोपडपट्टी असल्यामुळे या उद्यानाची जशी सुव्यवस्था राहवयास पाहिजे तशी राहत नाही ही वस्तुस्थिती आहे. यंदा मुंबई महानगरपालिकेने सार्वजनिक उद्यानाच्या अपग्रेडेशनची योजना हाती घेतली असून त्यासाठी तरतूदही केलेली आहे. त्यामुळे या तरतूदीतून या उद्यानाची सुव्यवस्था राखण्यात येईल, महानगरपालिकेची अपग्रेडेशनची तरतूद या उद्यानासाठी वापरण्याबाबत आणि हे उद्यान सुस्थितीत राहण्यासंबंधी महानगरपालिकेला सांगण्यात येईल.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 12.45

ता.प्र.क्र. ..... 5472..

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी लेखी उत्तरात जी माहिती दिली होती त्यापेक्षा आता उत्तर देत असतांना वेगळी माहिती दिलेली आहे.तोंडी उत्तर देत असतांना त्यांनी बरोबर माहिती दिली गेली परंतु लेखी उत्तरामध्ये मात्र तसे म्हटलेले नाही. या प्रकरणात संबंधित अधिका-याविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय अशा प्रकारचा जर आम्ही प्रश्न विचारला तर माननीय मंत्रीमहोदय असे उत्तर देतील की, या बाबतीत चौकशी करण्यात येईल वा ही बाब तपासून पाहण्यात येईल." अर्थात त्याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. या उद्यानाचे नुतनीकरण वा आधुनिकीकरण झाले पाहिजे असाच आमचा उद्देश आहे कोणत्याही अधिका-याविरुध्द कारवाई करण्यामध्ये आमचा उद्देश नाही. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी जी माहिती दिली ती खरी आहे. या प्रश्नाला लेखी उत्तर देत असतांना सबंधित अधिका-यांनी हलगर्जीपणा दाखविला आहे . या उद्यानाची अवस्था खरोखर अत्यंत वाईट आहे. या उद्यानाच्या बाजूला झोपडपट्टी आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. अशा प्रकारे अनेक उद्यानांच्या बाजूला देखील झोपडपट्टया आहेत परंतु त्या उद्यानांचा मेन्टेनन्स करणे हे मुंबई महानगरपालिकेचे काम आहे आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे हे राज्य सरकारचे काम आहे. सध्या या उद्याना जवळ झोपडपट्टी आहे. त्यामुळे या उद्यानाचे श्रेणी वर्धन केल्यानंतर झोपडपट्टी तेथेच राहणार असल्यामुळे श्रेणीवर्धन करुन काय फरक पडणार आहे ? तेव्हा आज या उद्यानाची जी दुरावस्था झाली आहे ती सुधारुन तेथील नागरिकांना या उद्यानाची सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या उद्यानाच्या कामासाठी एकूण 1 कोटी 30 लाख रुपये खर्च येणार आहे. त्या कामाचे एस्टिमेट तयार करण्यात आले आहे आणि हे काम लवकरात लवकर सुरु करण्याच्या दृष्टीने निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप राहतात त्याच्या जवळ हे उद्यान असल्यामुळे त्याची काळजी घेणे हे आपल्या सर्वाचे काम आहे आणि त्याप्रमाणे या उद्यानाची काळजी घेण्यात येणार आहे........

एक सन्माननीय सदस्य : हे काम कोण करणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : मुंबई महानगरपालिका हे काम करणार असून त्यासाठी 1 कोटी रुपयांचा खर्च येणार आहे.या उद्यानाचे अपग्रेडेशन केल्यानंतर पुन्हा त्याची दुरवस्था होणार नाही या दृष्टीने योग्य ती काळजी घेण्याच्या बाबतीत मुंबई महानगरपालिकेला सूचना देण्यात येतील.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईच्या जोगेश्वरी उपनगरातील ऐतिहासिक बौद्धकालीन**
**लेण्यांचे जतन करण्याबाबतची कार्यवाही**

**(७) * ३०६५ श्री.सुभाष चव्हाण, श्री.चरणसिंग सप्रा, श्रीमती मधु जैन, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, प्रा.सुरेश नवले, श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या जोगेश्वरी उपनगरातील इतिहासाच्या पाऊलखुणा जपणाऱ्या बौद्धकालीन लेण्यांची पुरातत्त्व विभागाचे दुर्लक्ष झाल्यामुळे तोडफोड झालेली असून ही लेणी नष्ट होत असल्याचे माहे जानेवारी, २०१० मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू लेण्यांची देखभाल करुन ती जतन करण्याबाबत तसेच पुरातत्त्व विभागावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा फौजिया खान,श्री. अशोक चव्हाण यांच्याकरिता**: (१), (२) व (३) जोगेश्वरी (मुंबई) येथिल बौध्दकालीन लेणी ही केंद्रीय संरक्षित स्मारक असून ती राज्य शासनाशी संबंधित नाही. या राष्ट्रीय स्मारकाचे जतन व देखभाल भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागामार्फत केले जाते.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, बौध्दकालीन लेण्यांचे जतन करण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री राम पंडागळे यांनी काल चांगले भाषण केले होते. भारत रत्न डॉ.बाबासाहेब आबेडकर यांनी बौध्द धर्म स्वीकारला असून महाराष्ट्रात या समाजाची लोकसंख्या ९० लाख एवढी आहे. प्रश्नाच्या उत्तरात असे म्हटलेले आहे की, " जोगेश्वरी मुंबई येथील बौध्दकालीन लेणी ही केन्द्रीय संरक्षित स्मारक असून ती राज्य शासनाशी संबंधित नाही " तेव्हा राज्य सरकारच्या पुरातत्व विभागाने यासंबंधी काही माहिती विचारली आहे काय ? अशा प्रकारची विचारणा करुन त्याची कारणमिंमासा समजावून घेतली आहे काय आणि या संदर्भात शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मुंबई शंहराजवळील जोगेश्वरी येथील बौध्दकालीन लेण्यांचे जतन करण्यासंबंधी सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, ही लेणी केन्द्रीय संरक्षित स्मारक असून केन्द्र सरकारच्या भारतीय पुरातत्व सर्व्हेक्षण विभाग,मुंबई मंडळाच्या अखत्यारीत आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर राज्य सरकारच्या पुरातत्व विभागाने या मंडळाला अवगत केले होते आणि दिनांक १५ मार्च २०१० च्या पत्राव्दारे त्यांनी अशी माहिती दिली आहे की, या लेण्याच्या संरक्षणा साठी

3...



VTG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे

स्थानिक लोकांचा विरोध असल्यामुळे काही अडथळे आले होते परंतु  असे असले तरी सुध्दा हे काम अधिक गतीने करण्यात येईल.

एक सन्माननीय सदस्य : हे काम कोण हाती घेणार आहे ?

प्रा. फौजिया खान : केन्द्र सरकार हे काम हाती घेणार आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की , त्यांनी मला उद्देशून उत्तर द्यावे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, ठीक आहे. केन्द्र सरकारच्या कार्यालयाकडून हे काम केले जाणार आहे.

श्री.राजन तेली : सभापती महोदय,  लेण्यांचा विषय  केन्द्र सरकारच्या पुरातत्व विभागाकडे आहे अशा प्रकारचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिलेले आहे. अशाच प्रकारे राज्य शासनाकडून वेळोवेळी उत्तरे दिली जातात. कोकण आणि मुंबईच्या परिसरात  १०७ गड आणि किल्ले आहेत त्या संदर्भात मला माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे ......

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराला माझी हरकत आहे...

**सभापती** : सान्माननीय सदस्यांच्या प्रश्नानंतर मी आपल्याला उप प्रश्न विचारण्याची संधी देईन

श्री.राजन तेली :सभापती महोदय, राज्यामध्ये अनेक ठिकाणी गड आणि किल्ले आहेत तसेच प्राचीन लेणी आहेत. असे असले तरी राज्य सरकारकडून ठराविक पध्दतीनेच उत्तर दिले जाते. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीत माझा १६ नंबरचा प्रश्न असून तो आज चर्चेला येऊ शकणार नाही याची मला खात्री आहे. त्या प्रश्नाला देखील असे उत्तर देण्यात आले आहे की , " राष्ट्रीय स्मारक घोषित करणे ही बाब केन्द्र शासनाच्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या अखत्यारीत आहे.  त्यामुळे राज्य सरकार काही करु शकत नाही"....

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र. 3065...

श्री.राजन तेली...

माझी शासनाला अशी विनंती आहे की, या प्राचीन लेणी आणि गड किल्ल्यांच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेऊन त्याबाबत उपाय योजना हे राज्य शासन करणार आहे की नाही?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, काही संरक्षित स्मारके ही केंद्र सरकारच्या अखत्यारीत आहेत तर काही संरक्षित स्मारके राज्य सरकारच्या अखत्यारीत आहेत. हे स्मारक केंद्रसरकारच्या अखत्यारीत असल्यामुळे याबाबत आपण केंद्र सरकारला कळविले आहे. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयामध्ये एक जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. त्यासंबंधी मा. उच्च न्यायालयाने या संदर्भात एक समिती स्थापन करण्याबाबत आदेश दिले. त्याप्रमाणे राज्य शासनाने सन 2008 मध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक समिती स्थापन केली आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी काल सभागृहामध्ये भाषण करीत असतांना या लेण्याच्या दुरवस्थेबाबत मुद्दे मांडले आहेत. त्या लेण्यांमध्ये आज लोकांनी दारे लाऊन घरे बांधलेली आहेत. हे स्मारक केंद्र सरकारच्या अखत्यारीत असले तरी केंद्र सरकारच्या पुरातत्व विभागाची कार्यालये मुंबईमध्ये अनेक ठिकाणी आहेत. त्या कार्यालयाकडे मी याबाबत विचारणा केली असता तेथील अधिकाऱ्यांनी मला सांगितले की, राज्य सरकारकडून याबाबत जे जे प्रस्ताव आमच्या विभागाकडे येतात ते आम्ही ताबडतोब पुढे पाठवितो. म्हणून माझा असा प्रश्न आहे की, या संदर्भात आपण किती दिवसात कारवाई करणार आहात? वर्षानुवर्षे त्या लेण्यांवर लोकांचे आक्रमण होत आहे. म्हणून एक महिन्याच्या आत त्या लेण्यांची पाहणी करुन आणि त्याबाबत पुरातत्व विभागाकडे पाठपुरावा करुन हे प्रकार थांबविण्याची कारवाई करणार काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थापन झालेल्या समितीमध्ये प्रधान सचिव, नगर विकास, आयुक्त, मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी, मुंबई, आणि केंद्र शासनाच्या पुरातत्व विभागाचे संचालक या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संरक्षित स्मारकांची देखरेख करुन त्यांची देखभाल केंद्रसरकारच्या पुरातत्व विभागाकडून करुन घेण्याकरिता ही समिती स्थापन करण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 3065...

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, हा प्रश्न केंद्र सरकारच्या अखत्यारीतील असल्यामुळे राज्य सरकारला उत्तर देण्यामध्ये मर्यादा पडत आहेत याची मला कल्पना आहे. परंतु याठिकाणी दिलेल्या चुकीच्या माहितीबाबत आमचा प्रश्न आहे. मी त्या भागामधून विधानसभेची निवडणूक लढविली आहे. त्याठिकाणी आज झोपडपट्टया थाटण्यात आल्या आहेत. त्या लेण्यांचे संरक्षण करणे हे केंद्र सरकारच्या अखत्यारीत आहे हे आपण समजू शकतो.परंतु त्या लेण्यांमध्ये होणारे प्रकार थांबविले पाहिजेत, त्या लेण्यांमध्ये गर्दुल्ल्यांचे वास्तव्य असते. त्यामुळे त्याठिकाणी असामाजिक कृत्ये करण्यात येतात ती थांबवून या संरक्षित स्मारकाचे संरक्षण करणार काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, संरक्षित स्मारकाचे जतन करण्याबाबत प्रश्न विचारण्यात आला आहे. स्मारकाचे जतन करण्याबाबतची कारवाई केंद्र सरकारच्या अखत्यारीतील आहे. तरीसुध्दा त्या लेण्यांमध्ये झोपडपट्टया झाल्या असतील, अतिक्रमण झाले असेल तर माझ्या खात्याच्या माध्यमातून आठ दिवसात त्या लेण्यांना भेट देऊन त्याठिकाणी झालेल्या अतिक्रमणाबाबत शासनाच्या माध्यमातून कारवाई करण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा.अन्न नागरी पुरवठा मंत्री यांनी नवी बी.पी.एल.यादी व शिधापत्रिका लागू करण्याबाबत केलेली घोषणा**

**(8) * 3118 श्री.सय्यद ज़मा, श्री.राजन तेली, श्री.चरणसिंग सप्रा** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री महोदयांनी दिनांक 23 डिसेंबर, 2009 रोजी वा त्या सुमारास नवी बी.पी.एल. यादी व शिधापत्रिका लागु करण्याबाबत घोषणा केली होती व 1997 ची बी.पी.एल. यादी तयार करण्याचीही घोषणा केली होती, या घोषणेवर संबंधीत विभागाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(2) सदर बी.पी.एल.यादीमध्ये खरे लाभार्थी समाविष्ट करुन व गरजु कुटुंबियापर्यंत योजनेचा लाभ पोहोचण्यासाठी काय उपाययोजना करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.अनिल देशमुख** : (1) ग्रामविकास विभागाच्या बीपीएल याद्या तयार आहेत, मात्र अपीलामध्ये मंजूर झालेल्या पात्र लाभार्थ्यांच्या नावाचा समावेश करण्याची कार्यवाही ग्रामविकास विभागामार्फत करण्यात येत असून, नगर विकास विभागाकडून दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांच्या याद्या अद्याप अंतिम झालेल्या नाहीत. त्या लवकरच अंतिम होणे अपेक्षीत आहे. सदर याद्या प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(2) व (3) राज्यातील सर्व प्रकारच्या शिधापत्रिकांची तपासणी करुन, अपात्र शिधापत्रिकांची शोध मोहिम दिनांक 11.9.2009 च्या शासन परिपत्रकान्वये राबविण्यात येत आहे.

तसेच वरीलप्रमाणे ग्रामविकास विभाग व नगर विकास विभाग यांचेकडून याद्या प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री सय्यद ज़मा : सभापति महोदय, यह प्रश्न बहुत गंभीर है और इसीलिए अनेक सम्माननीय सदस्यों ने इसके बारे में प्रश्न उपस्थित किए थे. अन्न व नागरी पुरवठा मंत्री जी ने नई बी.पी.एल. यादी तैयार करने संबंधी घोषणा की थी. मैं यह जानना चाहता हूं कि बी.पी.एल. यादी तैयार करने के लिए केन्द्रीय सरकार की ओर से कितना कोटा दिया गया है और कब दिया गया है ? दूसरा मेरा प्रश्न यह है कि, सारे विधान सभा क्षेत्र में आमदार की अध्यक्षता वाली दक्षता समिति का गठन कब किया जाएगा, तथा मेरा तीसरा प्रश्न यह है कि, अन्न व नागरी पुरवठा विभाग अपना काम दूसरे विभाग के कर्मचारियों से करवाता है, इस स्थिति को दूर करने के लिए क्या अन्न व नागरी पुरवठा विभाग अपनी खुद की मेनपावर पूरी करेगा ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाला मी बीपीएल यादीच्या बाबतीत सविस्तर उत्तर दिले आहे. याबाबतीत सांगावयाचे तर केंद्र शासनाकडून प्रत्येक राज्याला एक टारगेट दिले जाते. त्यानुसार आपल्या राज्याला 65 लाखाचे टारगेट मिळालेले आहेत.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 3118 ........

दक्षता समित्या सर्व ग्राम पंचायत, तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर लवकरात लवकर स्थापन केल्या जातील. ही वस्तुस्थिती आहे की, सध्या अन्न व नागरी पुरवठा विभागातील 90 टक्के कर्मचारी हे महसूल विभागातील आहेत. महसूल विभाग आणि आमचा विभाग यांच्यामध्ये बोलणी सुरु आहेत. महसूल विभागाचे कर्मचारी आमच्याकडे कसे येतील यादृष्टीने बोलणी सुरु आहेत.

श्री.विलासराव शिंदे : सभापती महाराज, हा अत्यंत महत्वाचा आणि गंभीर प्रश्न आहे. माझे एकंदर तीन प्रश्न आहेत. बीपीएल च्या याद्या तयार करण्यात आल्या आहेत. या याद्यांना ग्रामीण भागात ग्राम पंचायत व शहरी भागात नगरपालिका यांनी मान्यता दिलेली नाही, अशा महाराष्ट्रामध्ये किती याद्या आहेत, हा माझा पहिला प्रश्न आहे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या बीपीएलच्या याद्या सदोष असताना सुध्दा, बीपीएलची कार्ड दिली जात आहेत.त्याबाबतीत जी अपिल करण्यात आलेली आहेत, त्याचा निकाल किती दिवसामध्ये लागणार आहे ? कारण याबाबतीत अपिल करुन सुध्दा अनेक दिवस झालेले असूनही त्याचा निकाल अद्यापही लागलेला नाही. माझा तिसरा प्रश्न आहे, याठिकाणी दुसऱ्या व तिसऱ्या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये म्हटलेले आहे की,"राज्यातील सर्व प्रकारच्या शिधापत्रिकांची तपासणी करुन, अपात्र शिधापत्रिकांची शोध मोहीम दिनांक 11-09-2009 च्या या शासन परिपत्रकान्वये राबविण्यात येत आहे." शिधापत्रिकांची जी तपासणी केली जाते, त्याची सध्या असलेली पध्दत बदलली पाहिजे.यामध्ये माझा प्रश्न असा आहे की, . . ..

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.विलासराव शिंदे : सभापती महोदय, शिधापत्रिका देत असताना त्या व्यक्तीचे मतदार यादीमध्ये नाव आहे का, तसेच शिधापत्रिका त्याच्या नावाची आहे काय, हे पाहिले जाते. परंतु सदरहू व्यक्ती तेथे रहात आहे की नाही, हे न पहाता शिधापत्रिका योग्य आहे, असे मान्य केले जाते. हे धोरण बदलले पाहिजे. त्याठिकाणी संबंधित व्यक्तीचे मतदार यादीमध्ये नाव आहे, त्याच्याकडे शिधापत्रिका आहे, हे सर्व कागद त्या दुकानदाराकडे आहेत. परंतु ती व्यक्ती प्रत्यक्षात दुसरीकडे रहात असते, अशी स्थिती असते. तेव्हा माझे असे म्हणणे आहे की, जर ती व्यक्ती प्रत्यक्षपणे तेथे रहात असेल तरच तिला शिधापत्रिका दिली जाणार आहे का ? तशा प्रकारे तपासणी करण्यात येणार आहे काय ?

...3

ता.प्र.क्र. 3118 ........

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, होय.

श्री.विलासराव शिंदे : सभापती महोदय, माझ्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी 4-5 प्रश्न विचारलेले आहेत. मी एकेका प्रश्नाची उत्तरे देतो. या विषयाच्या संबंधात 2002 मध्ये सर्व्हे करण्यात आला होता, त्यावेळी मोठया प्रमाणात तक्रारी आल्या होत्या की, आमचे नाव पात्र असतानाही मतदार यादीमध्ये आलेले नाही. त्यावेळी साडेचार लाख तक्रारी आल्या होत्या. त्याबाबती सुनावणी झालेली आहे आणि याबाबतीत अंतिम निर्णय होणार आहे. त्याचबरोबर बोगस शिधापत्रिका किंवा अपात्र शिधापत्रिकांच्या बाबतीत 1 जानेवारी पासून महाराष्ट्रामध्ये संपूर्णपणे तपासणीची मोहीम राबविली होती. त्यामध्ये अंदाजे 20 लाख शिधापत्रिका अपात्र निघतील अशी अपेक्षा आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3118....

श्री. सुरेश नवले : सभापती महोदय, एका गंभीर विषयाकडे मी सरकारचे लक्ष वेधू इच्छितो. दक्षता समितीचे अध्यक्ष सन्माननीय विधासभेचे सदस्य असतात परंतु विधानपरिषदेच्या सदस्याला या समितीमध्ये कुठलेही स्थान नसते तेव्हा राज्य शासन सह अध्यक्ष म्हणून विधान परिषदेच्या सदस्यांना यामध्ये समाविष्ट करुन घेईल काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, दक्षता समित्या लवकरात लवकर गठीत होणार आहेत. याबाबतीत सन्मानीय सदस्यांनी सूचना केली आहे त्याप्रमाणे ग्रामीण भागात विधानपरिषद सदस्य सहअध्यक्ष म्हणून नाहीत. या दक्षता समित्यांमध्ये विधानपरिषद सदस्यंना सहअध्यक्ष म्हणून नेमण्यात येईल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक एकला दिलेल्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, ग्रामीण भागातील याद्या पुऱ्या झालेल्या आहेत. पण नगर विभागातील याद्या पुऱ्या झ ालेल्या नाहीत. या याद्या केव्हा पूर्ण होणार आहेत? ग्रामीण भाग सोडून शहरातील बीपीएलच्या लोकांना केव्हा धान्य मिळणार आहे?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, ग्रामीण भागातील सर्व्हे झालेला आहे पण शहरी भागातील खास करुन ठाणे आणि मुंबई येथील सर्व्हे बाकी आहे. ग्राम विकास विभागामार्फत हा सर्व्हे लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल आणि याद्या अंतिम करण्यात येतील.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 289 अन्वयेच्या सूचने बाबत**

**सभापती** :सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी नियम 289 अनव्ये सूचना दिली आहे. त्याअनुषंगाने त्यांनी त्याबाबतीत अगदी थोडक्यात आपले विचार मांडावेत.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी अत्यंत दु:खद अंत:करणाने याठिकाणी उभा आहे आज आपण आपल्या महाराष्ट्र राज्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करीत आहोत. बेळगाव, कारवारचा मराठी भाषिक आपला जो भाऊ आहे तो अजूनही कानडीच्या अत्याचारावर जगत आहे.

सभापती माहेदय, काल बेळगावला महापौरांची निवडणूक झाली. त्या निवडणुकीमध्ये 28 नगरसेवक मराठी भाषिक होते. जे उर्दू नगरसेवक आहेत पण ज्यांना मराठीबद्दल आत्मियता आहे अशा बारा नगरसेवकांनी मराठी भाषिक महापौर निवडून आणण्याचा एकमताने निर्णय घेतला. पण त्याठिकाणच्या निवडणूक अधिकाऱ्याने स्वल्पविराम, पूर्णविराम या माध्यमातून निवडणुकीचे फॉर्म रद्द केले आहेत. राज्य शासनाने याबाबतीत गंभीरपणे विचार केला पाहिजे. यासंदर्भात सुप्रिम कोर्टात याचिका दाखल केलेली आहे. सभापती महोदय, मी आज सकाळीच बेळगावला महाराष्ट्र एककीकरण समितीच्या नेत्याबरोबर बोललो आहे. किरण सायनाक ,नेताजी जाधव, रवि धोत्रे यांनी माननीय मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली. माननीय मुख्यमंत्री ती तक्रार सुध्दा घेत नाहीत. एवढा अत्याचार आणि अन्याय त्याठिकाणच्या मराठी भाषिकांवर होत आहे. म्हणून नियम 289 अन्वयेच्या सूचनेद्वारे मी अशी विनंती करतो की, आजचे सभागृहाचे कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा करण्यात यावी. बेळगावच्या मराठी भाषिकांना मराठी जनता त्यांच्या पाठिमागे आहे असा धीर यानिमित्ताने द्यावा आणि सुप्रिम कोर्टाचा निकाल कसा लवकर लागेल या बाबतीत राज्य शासनाने प्रयत्न केले पाहिजेत एवढीच मी यानिमित्ताने विनंती करतो.

डॉ. नीलम गोऱ्हे : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी महाराष्ट्रातील जनतेच्या अंत:करणाला डागण्या देणारी, लोकशाहीचा गळा घोटणारी अशी जी घटना बेळगावमध्ये घडलेली आहे. सभापती महोदय, यापूर्वीही मराठी महापौरांना मारहाण होणे, मराठी भाषिक संमेलन स्थगित करणे आणि अपमान करणे हे सातत्याने घडलेले आहे म्हणून विधान परिषदेने त्याची गंभीर दखल घेऊन त्याबाबत योग्य ती पावले उचलली पाहिजेत अशी माझी मागणी आहे.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, या सदनाचे ज्येष्ठ सदस्य सन्माननीय जयंत प्र.पाटील यांनी एका अतिशय गंभीर विषयाकडे आपल्या सर्वांचे लक्ष वेधलेले आहे. ही गोष्ट अत्यंत

....3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ KTG/ MMP/ KGS/ 13:00

श्री. उल्हास पवार..

खरी आहे. परवाच बेळगाव आणि सीमा भागातील मराठी भाषिक लोक पुण्याला साहित्य संमेलनाला आले होते. त्यांच्याचर सातत्याने होणारा अत्याचार, कन्नड भाषेचे सक्तीकरण आणि मराठी भाषा त्याठिकाणी कशी लुप्त होईल यासंदर्भात विविध मार्गाने प्रयत्न करण्यात येत आहेत.

यानंतर श्री. बरवड...

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .......

विविध मार्गाने अनेक प्रयत्न होत आहे. त्यासंबंधीचे त्यांचे निवेदन त्यांनी सन्माननीय मुख्यमंत्री त्या सम्मेलनाला आलेले असताना माझ्याबरोबरच त्यांना दिले. या घटनेला दोनच दिवस झालेत आणि काल बेळगाव महानगरपालिकेमध्ये महापौराची निवडणूक होत असताना दुर्दैवाने मराठी भाषिकांचे सर्व अर्ज काही ना काही कारणे काढून खारीज करण्यात आले, बाद करण्यात आले आणि त्यांना त्या निवडणुकीपासून, महापौर होण्यापासून वंचित करण्यात आले. मागे एका महापौराला मारहाण करुन त्यांचा अपमान करण्यात आला. या सगळ्या गोष्टी अत्यंत गंभीर आहेत. महाराष्ट्रासारख्या उदारमतवादी राज्यात आपण कन्नड, गुजराती अशा सर्व भाषांमधून पाठ्य पुस्तके छापतो आणि आपण कोणत्याही भाषेवर अन्याय करीत नाही. अशा वेळी आपल्या सीमा भागातील या मराठी भाषिकांवर होणारा अन्याय दुर्लक्षित करुन चालणार नाही. त्यांची गंभीर दखल घेतली पाहिजे. सीमा प्रश्नाच्या संदर्भात जरुर राज्य शासनाच्या वतीने सुप्रीम कोर्टामध्ये केस चालू आहे. त्याचा निकाल योग्य त्या वेळी होईल. त्याबाबत आता आपल्याला काही ठाऊक नाही. परंतु आता त्या परिसरामध्ये 20 लाख मराठी माणसे राहात आहेत आणि त्यांच्यावर सातत्याने अन्याय आणि अत्याचार होत आहेत. त्याकरिता राज्य सरकारचे लक्ष आपल्या माध्यमातून वेधू इच्छितो आणि त्यांची गंभीर दखल घेऊन त्या सगळ्या मराठी भाषिकांवरील अन्याय दूर करावा अशी मी नम्र विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, बेळगाव, कारवार, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे हे या महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी मनातील आक्रंदन आहे. ते वेगवेगळ्या पध्दतीने व्यक्त होत असते. कधी राजकीय पक्ष रस्त्यावर उतरतात, आंदोलने करतात, निदर्शने करतात तर साहित्यिक आपल्या साहित्य सम्मेलनाच्या माध्यमातून प्रत्येक वर्षी ठराव करतात. विविध नगरपालिका असतील, जिल्हा परिषदा असतील, त्या त्या भागामध्ये ज्या पध्दतीने भावना व्यक्त करता येतील त्या पध्दतीने ठरावाच्या माध्यमातून भावना व्यक्त करतात. त्याचा अर्थ एकच आहे की, महाराष्ट्रातील यच्चयावत मराठी माणसांची इच्छा आहे की, बेळगाव कारवार मधील 20 लाख मराठी बांधवांचा तातडीने या महाराष्ट्रामध्ये समावेश व्हावा. या महाराष्ट्राच्या अनेक आंदोलनामध्ये

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

1969 सालचे जे शिवसेनेचे उग्र आंदोलन झाले त्या आंदोलनामध्ये सर्व सामर्थ्यानिशी उतरलेला मी एक शिवसैनिक आहे. 1969 च्या आंदोलनामध्ये बेळगाव, कारवारकरिता शिवसेनेतर्फे जे हुतात्मे झाले त्यातील पाच लोक माझ्या डोळ्यासमोर मारले गेले. आम्ही हुतात्मा होता होता वाचलो. आमच्या छातीवर बंदूक रोखलेली असताना आम्ही वाचलो. त्यावेळी वाचल्यामुळे आज या ठिकाणी आहोत. त्यानंतर मात्र त्या एका आंदोलनामुळे आपल्या बोडक्यावर बसून बेळगावची फाळणी करा अशा प्रकारचा जो अहवाल होता तो गाडला गेला. परंतु या प्रश्नाची जखम मात्र चिघळत राहिली. हा प्रश्न आता सुटणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली असताना 20 लाख मराठी बांधव मात्र महाराष्ट्राच्या सर्व राजकीय पक्षांकडे अपेक्षेने पाहात आहेत की, आमचा आता वाली कोण आणि आम्हाला कधी यातून मुक्त करणार. पण ही बाब इतकी गंभीर झाली आहे की, दिल्ली असो की गल्ली असो, राजकीय पक्ष दोन्हीकडे सत्तेत असोत की नसोत, बेळगाव कारवारकरांना न्याय द्यायला कोणीही तयार नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्याचा परिणाम म्हणून हा सर्व अत्याचार चाललेला आहे. कानडी अत्याचार होतोच पण कानडीकरण चाललेले आहे. कानडी व्यतिरिक्त त्या ठिकाणी कोणतीही भाषा स्वीकारली जाणार नाही, मराठी तर नाहीच नाही, अशा ठाम निर्धाराने बेळगावमध्ये प्रशासन कामाला लागले आहे. विधिमंडळामध्ये हक्क असताना, अधिकार असताना मराठी बोलणाऱ्या आमदाराला ढकलून बाहेर काढण्यात आले इतकी मुजोरी तिकडच्या राज्यकर्त्यांनी दाखवली. त्यांनी विधिमंडळाचे पावित्र्य वगैरे काही ओळखले नाही.

सभापती महोदय, गेल्या वर्षी महापौराच्या तोंडाला काळे फासण्यापर्यंत जेव्हा बाब गेली आणि आता महाराष्ट्रातील सरकार आणि आम्ही सर्व मूग गिळून गप्प बसलो असल्याकारणाने त्यांच्या अत्याचाराची परिसीमा व्हावयास लागली आहे. आम्ही काहीही केले तरी बाजूचे राज्य जे त्यांचे कैवारी आहेत ते काहीच बोलत नाहीत. ते कोर्टाकडे बोट दाखवतात. सुप्रीम कोर्टात बाब आहे असे सांगतात. सुप्रीम कोर्टाचा निकाल लागेल तेव्हा लागेल पण कोर्टाची भाषा आणि कोर्टाची बाब याचे बंधन त्यांना जर कळत नसेल, काय निकाल लागतो याची वाट पाहण्यास ते तयार नसतील आणि त्यांचे अत्याचार जर सुरुच राहणार असतील तर महाराष्ट्राने सुध्दा त्याच पध्दतीने

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. दिवाकर रावते ....

मुहतोड जबाब दिला पाहिजे या मताचे आम्ही आहोत. आज आम्ही ठणकावून सांगतो. सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार बोलले त्यामुळे आम्हाला बरे वाटले. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी बोलणार आहेत. आपणा सर्वांची ही भावना आहे. या ठिकाणी पक्षीय अभिनिवेश नाही तर तर आम्ही या सदनातील सर्व सन्माननीय सदस्य या भावनेशी एकरुप आहोत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

आणि न्यायालयाचा निर्णय लागेपर्यंत आम्ही कायद्याचा सन्मान करण्यासाठी स्वस्थ बसणार असू पण त्याचा अर्थ आम्ही भेकड आहोत, आम्ही त्याची दखल घेत नाही असे होता कामा नये हे दाखविण्यासाठी माझी आग्रहाची भूमिका व आग्रहाचे मांडणे आहे की, सभागृहासमोरील दिवसाचे कामकाज स्थगित करण्यात यावे. यासंदर्भात आपली भावना व व्यथा व्यक्त झाल्याच पाहिजेत. म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या सरकारला जशाच तसे उत्तर देणे आवश्यक आहे. कानडीची सक्ती करण्यासाठी तेथील सरकार सर्व ताकद वापरत आहे. पण राज्यात मराठीचा वापर का केला जात नाही हे सांगण्यासाठी आक्रोश करीत आम्हाला आमच्या सरकारपुढे जावे लागत आहे. हे सुध्दा आमचे दुर्दैव आहे. पण हा विषय आमच्या घरचा आहे. त्या सरकारच्यावतीने सर्व मार्गाने मराठी भाषेचे, मराठी संस्कृतीचे धिंधवडे काढले जात आहेत. मग मराठी आमदाराला बोलण्यापासून वंचित करण्याची बाब असेल, महापौरांच्या तोंडाला काळ फासण्याचा प्रकार असो आणि आता महापौरांच्या निवडणुकीपासून मराठी माणसांना वंचित करुन मराठी माणसांच्या बहुमताचा अवमान केला जात आहे. म्हणून या गोष्टीचा निषेध करण्यासाठी एकमताने ठराव झाला पाहिजे. सभापती महोदय, परवा आपण मराठी भाषेच्या संदर्भातील अशासकीय ठरावाबाबत आपण ठराव मांडला तसा याबाबतही आपण ठराव मांडावा किंवा सरकारने तो मांडावा, परंतु तो आजच मांडला गेला पाहिजे. त्या सरकारला जशाच तसे संयमाने का होईना उत्तर देण्याचे धाडस सरकार दाखविणार आहे काय ? आजचे कामकाज तहकूब करणार नसाल तर हे मात्र जरुर करण्यात यावे. हे सर्व थांबविण्यात यावे. कारण असहय झालेले आहे, आम्ही त्या लोकांचे आक्रंदन ऐकायचे आणि आपण मात्र हात चोळत बसावयाचे हे किती दिवस चालणार आहे ? त्या सरकारला मराठी मनगटाचे जशाच तसे उत्तर गेले पाहिजे. ही भूमिका नम्रपणे मांडतो आणि आपण याबाबत पुढाकार घ्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो, धन्यवाद.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे त्याचे मी समर्थन करणार आहे. त्याचे कारण असे आहे की, बेळगाव कारवारचा प्रश्न या सभागृहात अनेकदा आलेला आहे. त्यावेळी मांडलेला ठरावाला

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.पांडुरंग फुंडकर....

सर्वांनी पाठिंबा दिलेला आहे. मराठीचा स्वाभिमान कायम राखला गेला पाहिजे या मताशी मी 100 टक्के सहमत आहे. परंतु वर्षानुवर्षे न्यायालयाच्या कस्टडीमध्ये हे प्रकरण चालू आहे. न्यायालयाच्या आड राहून त्या भागातील मराठी माणसांवर अन्याय, अत्याचार होणार असतील तर ते योग्य नाही. त्याठिकाणी महापौरांच्या तोंडाला काळे फासले गेले होते त्यावेळी आपल्या दालनात एक बैठक झाली होती. त्या बैठकीला मी उपस्थित होतो. आता लोकशाहीत अत्यंत निंदनीय अशाप्रकारची घटना घडली आहे. राज्य कोणतेही असो, त्या राज्याने राज्याच्या पध्दतीने वागले पाहिजे. या देशात भाषावार प्रांतरचना झाली असली तरी हा देश एक आहे. या भावनेतून प्रत्येक राज्याने वागले पाहिजे. या महाराष्ट्रात परप्रांतियासंबंधी थोडे जरी काही घडले तर देशातील काही राज्ये आवाज उठवितात. महाराष्ट्र इतर राज्यातील लोकांवर अन्याय करतो असे बोलले जाते. मग महाराष्ट्रातील नागरिक परप्रांतात नोकरीच्या निमित्ताने जातात तेथे त्यांच्यावर अन्याय होतो हे समर्थनीय नाही. म्हणून मराठी माणसांच्या हक्कांचे संरक्षण झाले पाहिजे. मराठी माणसांना निवडणूक लढविण्यापासून ते प्रत्येक क्षेत्रात ठेचण्याची भूमिका जर कोणी घेत असेल तर त्याचा निषेधही झाला पाहिजे म्हणून मी या प्रस्तावाचे समर्थन करतो आणि त्यावरील चर्चेला आपण परवानगी द्यावी अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : या सभागृहाचे सन्माननीय सदस्य आणि माझे मित्र श्री. जयंत प्र.पाटील यांनी, काल बेळगावमध्ये महापौरांच्या निवडणुकीच्या निमित्ताने जो काही प्रकार घडला त्यासंदर्भात या सभागृहाने चिंता व्यक्त करावी आणि आवश्यकता वाटली तर निषेध व्यक्त करावा यासाठी नियम 289 अंतर्गत आजचे सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा करावी अशी मागणी केलेली आहे. त्या मागणीचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. आपण सर्वजण राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहोत. महाराष्ट्राच्या सीमेवर असलेल्या बेळगाव, कारवार, निपाणी या भागामध्ये असलेले मराठी भाषिक टाहो फोडत आहेत. वर्षानुवर्षे लोकशाहीच्या माध्यमातून, मग विधानसभेच्या निवडणुका असतील, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असतील त्यामध्ये भाग घेत असताना अल्प भाषिकांवर अन्याय केला जात आहे. बेळगाव या ठिकाणी महानगरपालिकेची निवडणूक लढत असताना आणि जनतेचा कौल त्यांच्या बाजूने असताना सुध्दा मराठी भाषिकांवर दडपण आणून त्यांच्यावर अत्याचार करणारे राजकारण कर्नाटक सरकारच्या माध्यमातून होत आहे. या कर्नाटक सरकारच्या कृत्याचा या ठिकाणी जरुर निषेध करायला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडून आजचे सभागृहापुढील कामकाज बाजूला सारुन या विषयावर चर्चा घेण्याची जी विनंती केलेली आहे त्याचे मी समर्थन करतो.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, बेळगाव, कारवार, भालकी, बिदर, निपाणी हा जो संयुक्त महाराष्ट्राचा भाग आहे त्या भागाचे स्वप्न आपण सुवर्ण महोत्ववी वर्षात सुध्दा पूर्ण करु शकलो नाही. बेळगावमध्ये अनेक वर्षे अत्याचार सुरु आहे. मी माननीय विरोधी पक्षनेत्यांचे अभिनंदन करतो की, कर्नाटक राज्यामध्ये त्यांच्या पक्षाचे सरकार असताना ते संपूर्ण महाराष्ट्राच्या भूमिकेशी समरस होऊन पाठीशी ठामपणे उभे राहिले. बेळगाव महानगरपालिकेच्या महापौराच्या निवडणुकीमध्ये तांत्रिक कारणे देऊन मराठी उमेदवारांचे अर्ज बाद करण्यात आले. हे लोकशाही हक्कावरच अतिक्रमण आहे. भारतीय घटनेने अल्पभाषिकांना जे अधिकार दिलेले आहेत ते अधिकार सुध्दा कर्नाटक सरकारने पायदळी तुडविलेले आहेत. कर्नाटक सरकारने भारतीय घटनेची चौकट मोडलेली आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. यासंदर्भात या सभागृहाने एकमताने ठराव केला पाहिजे. माननीय मुख्यमंत्र्यांनी केन्द्राकडे सर्व पक्षीयांचे एक शिष्टमंडळ नेऊन कर्नाटक सरकार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बरखास्त करण्याची मागणी केली पाहिजे. घटनेची चौकट मोडण्याचे काम कोणत्याही राज्य सरकारला करता येणार नाही. तेथे अल्पभाषिकांवर अन्याय, अत्याचार चालू आहेत. म्हणून कर्नाटक सरकार बरखास्त करण्यासाठी या सभागृहामध्ये ठरावा मांडण्यात यावा. यापूर्वी देखील या सभागृहाने एकमताने ठराव संमत केलेला होता. येथे कोणताही व्यक्तिअभिनिवेश किंवा पक्षाभिनिवेष नाही.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. जयंत पाटील ने नियम 289 के अन्तर्गत जो प्रस्ताव लाया है, मैं उसका समर्थन करता हूँ. मैं महाराष्ट्र में रहता हूँ और यह मेरी कर्मभूमि है. मराठी भाषा से मुझे प्रेम है, मैं मराठी भाषा बोल नहीं पाता, उसका मुझे खेद है. बेलगांव के मराठी भाषिकों के बारे में जो जानकारी आई है, अगर वह सच है तो यह ठीक नहीं है. बेलगांव के बारे में सुप्रिम कोर्ट में केस पेंडिंग है और इस का फैसला जल्दी हो, उसके लिए महाराष्ट्र सरकार को अटॉर्नी जनरल के द्वारा प्रयास करने चाहिए. महापौर के चुनाव में अगर टेक्नीकल रीजन से मराठी भाषिकों के नोमीनेशन रद्द किए गए हैं तो यह कन्सटिट्यूशनल वेलिडिटी का सवाल है. इस प्रश्न को महाराष्ट्र सरकार को पुरजोर तरीके से उठाना चाहिए और केन्द्र सरकार से जांच कराने का आग्रह करना चाहिए. इस प्रस्ताव पर इस सभागृह में चर्चा होनी चाहिए, सभी माननीय सदस्यों के साथ हमारी भी यही भावना है.

प्रा. बी.टी.देशमुख : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी या ठिकाणी नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे. एक अतिशय महत्वाचा प्रश्न या निमित्ताने या सभागृहासमोर आलेला आहे. लोकशाही व्यवस्थेमध्ये बहुमताने निर्णय होतात हे खरे आहे. या बहुमताच्या परिघामध्ये अल्पसंख्यांक असलेले शंभर टक्के लोक एकमताने मागणी करतात त्यावेळी त्यांना निर्णय मिळविण्यासाठी केवढे मोठे आक्रंदन करावे लागते, केवढा मोठा संघर्ष करावा लागतो याचे अतिशय भडक उदाहरण बेळगावच्या निमित्ताने दिसून येते.

...नंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KTG/ 13:20

प्रा.बी.टी.देशमुख..........

आंध्रप्रदेशच्या लोकांनी मागणी केली. पोट्टीश्रीरामलू यांचे उपोषण झाले. दुर्देवाने त्यांचे निधन झाले व त्यानंतर पार्लमेंटने निर्णय केला. संयुक्त महाराष्ट्र होत असताना पार्लमेंट विधेयक पास करणार, परंतु दोन्ही राज्यांच्या लोकांना टोकाची भूमिका घ्यावी लागली. गुजराथ राज्यासाठी इंदूलाल याज्ञिक यांच्या नेतृत्वाखाली लढा सुरु झाला आणि संयुक्त महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेतृत्वाखाली लढा द्यावा लागला. त्यावेळी या अल्पसंख्य भाषिक लोकांसोबत बहुभाषिक लोकांची आज बेळगावमध्ये दारुण परिस्थिती निर्माण झाली आहे. आम्हाला अभिमान वाटतो, सातत्याने गेली 60-70 वर्षे त्यांनी आपल्या भावना टिकवून ठेवल्या आहेत. त्यांचा फॉर्म र्‍हस्व, दीर्घ, काना, मात्रा याच्या चुका काढून रद्द करण्यात आला. अल्पसंख्य लोकांना नामोहरम करण्याचे काम त्या शहरात गेली 30-40 वर्षे सुरु आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेतृत्वाखाली वर्षानुवर्षे लोकप्रतिनिधी पाठवून त्यांनी सिध्द केले. असे असताना र्‍हस्व, दीर्घ, काना, मात्रा याच्या आधारावर फॉर्म रद्द करण्याची पाळी दमन शक्तीवर यावी ही दुर्दैवी घटना आहे. शेजारी हे घडत असताना आपण त्याबद्दल याठिकाणी काही भूमिका मांडावयाची की नाही हा साधा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्या प्रस्तावाच्या निमित्ताने सभागृहासमोर आलेला आहे. याबाबत निश्चितपणे ठराव ड्राफ्ट करुन बेळगावमध्ये असा प्रकार होत असताना महाराष्ट्रातील सरकारची सहानुभूतीची भूमिका आहे, त्या दमन शक्तीचा आम्ही विरोध करीत आहोत हे दाखवून द्यावे. मार्ग कसा काढायचा हे आपण ठरवायचे आहे. याबाबत आपली मते नोंदविली पाहिजेत, असे मत व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, गेली 50 वर्षे सीमा भागातील लोक, विशेषत: बेळगावमधील मराठी भाषिक लोकांवर सातत्याने अन्याय होत आहे. बेळगाव आणि कोकण भागाचा, विशेषत: सिंधुदुर्ग जिल्हयाचा जवळचा संबंध आहे. नियम 289 अन्वये सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जो प्रस्ताव आणला आहे त्या प्रस्तावावर याठिकाणी चर्चा घडवून आणावी अशाप्रकारची मी विनंती करतो. सातत्याने गेली 50 वर्षे तेथील मराठी भाषिकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्याचे पडसाद कोकण भागात उमटतात. म्हणून माझी विनंती आहे की, त्या संपूर्ण भागातील, विशेषत: बेळगावमधील मराठी भाषिकांना न्याय मिळाला पाहिजे यासाठी राज्य सरकारच्या वतीने गेली 50 वर्षे प्रयत्न करण्यात आले. सुप्रीम कोर्टात दावा दाखल केला. त्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली.....

दाव्याच्या कामकाजामध्ये सातत्य नाही. माझी आपल्यामार्फत विनंती आहे की, या प्रस्तावावर याठिकाणी चर्चा घडवून आणावी. मी या प्रस्तावाचे समर्थन करतो आणि मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे बोलणे पूर्ण करतो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे त्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, देशाला स्वातंत्र्य मिळाले, महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि आपण हे वर्ष राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करीत आहोत. मला याठिकाणी सांगावयास अतिशय खेद वाटतो. बेळगाव, कारवार, धारवाड, निपाणीसह 865 मराठी भाषिक गावे आज देखील पारतंत्र्यात दिवस काढत आहेत. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांच्या पाठीवर व्रण असतील. मी देखील बेळगावच्या दृष्टीने वॉन्टेड आहे. आज देखील बेळगाव, कारवार, धारवाड व निपाणीमधील 865 मराठी भाषिक गावे महाराष्ट्राकडे अपेक्षेने पहात आहेत. आम्हाला आपण कधी न्याय देणार आहात याची वाट पहात आहेत. तेथील महापौर पदाच्या निवडणुकीसाठी भरलेला फॉर्म किरकोळ चुकाच्या आधारे रद्द करण्यात आला. त्याठिकाणी लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम तेथील शासनाने केले आहे. खरे तर यापूर्वी ही मागणी केली होती की, जोपर्यंत या प्रश्नाचा निकाल लागत नाही तोपर्यंत ही बेळगाव, कारवार, धारवाड, निपाणीसह 865 गावे केंद्रशासित करण्यात यावीत. सभापती महोदय, आपल्यामार्फत माझी महाराष्ट्र शासनाला विनंती आहे की, आपण सर्वजण मिळून माननीय राष्ट्रपतींची भेट घेऊ आणि किमान जोपर्यंत या संदर्भात निर्णय होत नाही तोपर्यंत ही सगळी गावे केंद्रशासित केली जावीत. हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाच्या अखत्यारित असल्यामुळे आज देखील आपण त्याबाबत अधिकृतपणे काही बोलू शकत नाही. म्हणून जोपर्यंत न्यायालयाचा निकाल लागत नाही तोपर्यंत ही सर्व गावे केंद्रशासित करण्यात यावीत.

(नंतर आर.1....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ........

सुदैवाने कर्नाटकमध्ये काँग्रेस पक्षाचे सरकार आहे तसेच आपल्या राज्यात देखील काँग्रेस-राष्ट्रवादी पक्षाचेच सरकार आहे. म्हणून आपल्या सरकारने तात्काळ ही सर्व गांवे केंद्रशासित व्हावीत असा ठराव सभागृहात पारित करावा व माननीय राष्ट्रपतींना यासंदर्भात भेटून तशी विनंती करावी जेणेकरुन ते जास्त सोईचे होईल अशी मी मागणी करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद. जय हिंद. जय महाराष्ट्र.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, यासंदर्भात सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करुन चर्चा करावी अशी मी विनंती करतो. कारण सभागृहातील सर्वच सन्माननीय सदस्यांच्या भावना अतिशय तीव्र आहेत. तसेच माननीय उप मुख्यमंत्री सुध्दा बेळगांव आंदोलनात तुरुंगात गेले आहेत. म्हणून मी पुन्हा विनंती करतो की, सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करावी व याबाबत चर्चा करावी.

श्री. छगन भुजबळ : महोदय, खरे तर सभागृहात सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्यांच्याशी मी सहमत आहे. तसेच लोकशाहीमध्ये जी निवडणूक प्रक्रिया आहे ती योग्य रितीने पार पाडली पाहिजे ही अपेक्षा सर्वांनीच करणे गैर नाही. कर्नाटक राज्यात असो अथवा कोणत्याही राज्यात हा प्रकार झाला तरी तो योग्य नाही. कारण एकच फॉर्म मंजूर होतो आणि चार फॉर्म्स एकदम नामंजूर होतात. असेही नाही की हे लोक महाराष्ट्र एकीकरण समितीचे होते अथवा नगरपालिका अथवा आमदारांची निवडणूक लढविणारे आहेत, आजच फॉर्म भरतात असेही नाही. अशा सर्व गोष्टी असून सुध्दा अशा प्रकारे शिरीजोरी करणे वगैरे जे प्रकार वर्तमानपत्रातून वाचायला मिळाले ते योग्य नाही. हे लोक संध्याकाळी चार-पाच च्या दरम्यान महाराष्ट्रात आम्हाला भेटण्यासाठी येत असल्याचा त्यांचा निरोप आलेला आहे. मला असे वाटते की, यासंदर्भातील आपल्या भावना वेगळ्या आहेत अशातला भाग नाही तर हा संपूर्ण प्रश्न सुप्रिम कोर्टात आपण घेऊन गेलो आहे, निदान तेथून तरी आपल्याला न्याय मिळावा. यासाठी चांगले वकील वगैरे शोधून शक्य तितक्या लवकर ही केस कशी निकाली काढण्यात येईल असेही आपले प्रयत्न आहेत. तसेच दरवर्षी काही ना काही तरी नवीन प्रकार या भागात होतच असतात. कधी विधानभवन बेळगांवला बांधण्यासंबंधीचा प्रश्न निर्माण होतो आणि त्यावरुन लाठीमार करावयाचा. ज्येष्ठ नेते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ .....

प्रा. एन.डी.पाटील यांच्यासारख्या माजी सदस्यांना अटकाव करण्याची घटना वगैरे गोष्टी होत आहेत. सीमा भागासंबंधीचा प्रश्न सुप्रिम कोर्टात गेलेला असताना तो निकाल जोपर्यंत लागत नाही तोपर्यंत योग्य प्रकारे थोडेसे जबाबदारीने वागणे असे आमच्याकडिल लोकांचे आणि तिकडच्या लोकांचेही काम आहे. आपल्या हद्दीत असलेल्या गावांच्या बाबतीत जेवढे या सरकारला करता येईल तेवढे आपण करीतच आहोत. जेणेकरुन द्वेषाची भावना वाढीस लागणार नाही यासाठी आपले शासन ही काळजी घेत आहे. त्यात अनेक ठिकाणी रिझर्व्हेशन म्हणून असेल किंवा कॉलेजेसच्या बाबतीत जास्तीत जास्त संधी कधी मिळेल यासंबंधी देखील आपल्या शासनाने निर्णय घेतले आहेत व त्याचा फायदा या भागातील लोकांना कसा होईल असाही प्रयत्न असतो. एवढेच नव्हे तर राज्यात कन्नड भाषिकांच्या शाळा आपण निर्माण करतो, त्यांना शाळेसाठी जागा देतो. तसेच उत्तर प्रदेशातील लोकांसाठी सुध्दा अशा सुविधा निर्माण करण्यासाठी जागा व इतर सवलती देत असतो. अशा प्रकारे महाराष्ट्र राज्य अतिशय योग्य प्रकारे लोकशाहीचे पालन करीत आहे. अशीच अपेक्षा इतर राज्यांकडून सुध्दा आहे. पण दुर्दैवाने त्या राज्यांकडून आपल्याला तसा प्रतिसाद मिळत नाही म्हणून अशी आंदोलने होतात.....अडथळा......ते कसे चुकीचे आहे व आम्ही कशा प्रकारे प्रयत्न करतो हे सभागृहाला सांगितले पाहिजे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ....

कानडी भाषिकांना महाराष्ट्रात योग्य प्रकारे वागणूक दिली जाते. महाराष्ट्र शासन कानडी भाषिकांना जशी वागणूक देते तशी वागणूक आमच्या मराठी लोकांना तेथे मिळत नाही. महाराष्ट्र शासन सीमा भागातील कन्नडवासियांना तसेच राज्यातील कन्नड भाषिकांना संरक्षण आणि न्याय देत असतांना आमच्या तिकडच्या मराठी भाषिकांना न्याय आणि संरक्षण दिले जात नाही, तेथील शासन त्यांचे कर्तव्य पार पाडत नाही हे या सभागृहाच्या माध्यमातून देशाच्या समोर मला मांडावयाचे आहे. (अडथळा) सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे या सभागृहाचे ज्येष्ठ नेते आहेत. आपण विरोधी पक्ष नेते म्हणून बसणार आहात असे आम्हाला कळले आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सभागृहाचे नेते सीमा भागातील जनतेसाठी काय करणार आहेत याबाबत कृपया सांगावे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, आपण सभागृहात उपस्थित असतांना मी सन्माननीय दिवाकर रावते यांचे नाव घेतले... हे माझ्या लक्षात आले नाही. आपण जरी विरोधी पक्ष नेते पदी राहिलात तरी उत्तमच राहील.

सभापती महोदय, सीमा भागातील मराठी जनतेच्या संदर्भात जशा सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र आहेत तशा आमच्या भावना देखील तीव्र आहेत. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात सभागृह संपल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांशी बोलून काय करावयास पाहिजे याबाबत योग्य तो निर्णय घेऊ.

(सभागृहाच्या दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य उभे राहून घोषणा देत असतात. )

**सभापती** : कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी नियम 289 अन्वये माझ्याकडे प्रस्ताव दिलेला आहे. या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते,रामदास कदम ,बी.टी.देशमुख, सय्यद जामा, गुरुनाथ कुलकर्णी, डॉ. नीलम गो-हे, उल्हास पवार, राजन तेली, कपिल पाटील तसेच सन्माननीय उपमुख्यमंत्री यांनी विचार मांडलेले आहेत. या प्रस्तावाच्या संदर्भात या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या गेल्या 50 वर्षापासून

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

संपूर्ण महाराष्ट्र सीमा भागातील मराठी भाषिकांच्या पाठीशी सातत्याने उभा आहे यासाठीच व्यक्त केल्या आहेत. बेळगाव, कारवार या भागामधील मराठी भाषिकांवर अन्याय, अत्याचार होत आहेत म्हणून आम्हाला महाराष्ट्रात सामील करुन घ्या असे त्यांचे म्हणणे आहे. सीमा भागातील मराठी लोक अनेक पध्दतीने यासाठी संघर्ष करीत आहेत. काल सीमा भागात जी परिस्थिती निर्माण झाली त्या परिस्थितीच्या अनुषंगाने या सदनात आपण चर्चा केलेली आहे. आपण सर्व सीमा भागातील मराठी भाषिकांच्या पाठीशी आहोत आणि यापूर्वीही त्यांच्या पाठीशी होतो. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ साहेबांनी या विषयाच्या संदर्भात आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत तसेच अनेक सन्माननीय सदस्यांनीही आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. आपल्या सर्वांच्या भावनांच्या अनुषंगाने मी सांगेन की, सीमा भागातील मराठी भाषिकांवर ज्या पध्दतीचा अन्याय झालेला आहे त्याला एकमुखी पाठिंबा देण्याच्या दृष्टीने सभागृहाचे कामकाज मी 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 1 वाजून 34 मिनिटांनी 15 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आली.)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगिती नंतर )

( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )

**पृ.शी.मु.शी.** : हरकतीच्या मुद्यासंबंधी

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सरकारकडून विधान परिषदेची दिशाभूल करण्यात आली आहे असा माझा हरकतीचा मुद्दा आहे......

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देतांना माननीय अर्थमंत्री श्री. सुनील तटकरे यांनी अत्यंत भावनावश होऊन भाषण केले, एक्सटेंपो भाषण केले. भाषण करीत असतांना त्यांच्या हातामध्ये कोणतीही कागदपत्रे नव्हती. जणू काही पाठांतर केल्याप्रमाणे त्यांनी भाषण केले. परंतु चर्चेमध्ये भाग घेत असतांना आम्ही उपस्थित केलेल्या एकाही प्रश्नाला त्यांनी उत्तर दिले नाही. सभागृहामध्ये अर्थसंकल्पावर चर्चा होत असतांना माननीय श्री. तटकरे साहेब याठिकाणी उपस्थित नव्हते.त्यामुळे त्यांनी ती चर्चा ऐकली नसली तरी मंत्री असल्यामुळे ते सर्व प्रश्नांची उत्तरे देत असतात. परंतु हातामध्ये कोणतेही कागदाचे चिटोरे न घेता त्यांनी भाषण केले. हे करीत असतांना आम्ही उपस्थित केलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी ते एक शब्दही बोलले नाहीत. त्यांना भराडी देवीचा शाप लागला काय? वीजेच्या भारनियमनासंबंधी बोलतांना त्यांनी हे राज्य 2012 रोजी भारनियमन मुक्त होईल असे सांगितले. मी सभागृहामधून बाहेर पडल्यानंतर माझ्या मोबाईलवर एक संदेश आला की, माननीय अर्थमंत्र्यांनी विधानसभेमध्ये सन 2014 रोजी हे महाराष्ट्र राज्य वीज भारनियमनमुक्त होईल अशी घोषणा केली. त्यामुळे माझ्या मनामध्ये प्रश्न निर्माण झाला. मी विधानसभेच्या कामकाजाचे कार्यवृत्त पडताळून पाहिले असता, महाराष्ट्र राज्य सन 2014 रोजी वीज भारनियमनमुक्त होणार आहे अशाप्रकारची अधिकृतपणे घोषणा केल्याचे स्पष्ट झाले.

सभापती महोदय, मागील वर्षी झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसने एकत्रितपणे जाहीरनामा प्रसिध्द केला. त्या जाहिरनाम्यामध्ये सुध्दा सन 2012 रोजी हे महाराष्ट्र राज्य वीज भारनियमनमुक्त होईल असे छापण्यात आले आहे. त्यानंतर माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणामध्ये सुध्दा हे राज्य सन 2012 रोजी वीज भारनियमनमुक्त होईल असे सांगण्यात आले. आणि आता या सरकारच्या लक्षात आले आहे की, सन 2012 पर्यंत हे राज्य वीज भारनियमनमुक्त करणे आपल्याला झेपणारे नाही. या सभागृहामध्ये आपण कोणताही प्रश्न विचारल्यानंतर त्याची अंमलबजावणी 5 वर्षात होईल, 3 वर्षात होईल अशाप्रकारची आश्वासने मंत्रिमहोदय देतात आणि त्याची अंमलबजावणी करु म्हणून सांगतात. जणू काही सर्वच मंत्र्यांची खाती या माननीय अर्थमंत्र्यांकडे आहेत काय? बाकीच्या माननीय मंत्र्यांच्या खात्यामध्ये आपण गडबड करता. इतक्या ठामपणे या सभागृहामध्ये बोलणारे अर्थमंत्री या राज्याला लाभले हे आम्ही आमचे भाग्य समजतो. यामधून त्यांनी दोन गोष्टी केल्या आहेत. एक तर त्यांनी या सभागृहाची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. दिवाकर रावते...

दिशाभूल केली आहे. त्यामुळे यापुढील कोणतेही कामकाज सभागृहामध्ये होईल व त्यावेळी शासनाकडून दिल्या जाणाऱ्या प्रत्येक उत्तराच्यावेळी आम्ही त्याकडे शंकेने पाहू. विधानसभेमध्ये काय बोलले गेले आणि या सभागृहामध्ये काय बोलले गेले याबाबत आमच्या मनामध्ये संभ्रम निर्माण होईल. विधानसभेमध्ये हे राज्य सन 2014 रोजी भारनियमनमुक्त होईल अशी घोषणा करण्यात आली. आणि या सभागृहामध्ये सन 2012 रोजी भारनियमनमुक्त होईल अशी घोषणा करण्यात आली. यामुळे ग्रामीण भागामध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. माननीय अर्थमंत्र्यांचे भाषण रेडिओच्या माध्यमातून ऐकत असतांना लोक गोंधळले आहेत. विधानसभेमध्ये सन 2014 रोजीची घोषणा ऐकल्यानंतर विधानपरिषदेमध्ये सन 2012 रोजीची घोषणा करण्यात आल्यामुळे या राज्यातील अंधार जाणार की नाही असा प्रश्न लोकांमध्ये निर्माण झाला आहे. म्हणून याबाबत तातडीने खुलासा होणे आवश्यक आहे. आणि विधानसभेमध्ये करण्यात आलेल्या घोषणेमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. त्याबाबत शासनाने निर्णय घेण्यासंबंधी आपण ताबडतोब शासनाला निदेश द्यावेत अशी विनंती करतो.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे. विधानसभेमध्ये माननीय अर्थमंत्र्यांनी कोणती घोषणा केली आहे याबाबतची माहिती मागवून घेण्यात येईल.परंतु या सभागृहामध्ये सन 2012 पर्यंत हे राज्य वीज भारनियमनमुक्त करण्यासंबंधी घोषणा केली आहे. त्यानुसार सन 2012 रोजी हे राज्य वीज भारनियमनमुक्त होईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, परंतु यामधील विसंगती दूर झाली पाहिजे. विधानसभेमध्ये मंत्रिमहोदयांनी चुकून 2014 असे सांगितले आहे काय?

**उपसभापती** : माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी आता सांगितल्याप्रमाणे सन 2012 पर्यंत हे राज्य वीज भारनियमनमुक्त होईल. आणि त्यांनी सांगितलेले बरोबर आहे. दुसरी गोष्ट अशी की, विधानसभागृहामध्ये माननीय अर्थमंत्र्यांनी सन 2014 पर्यंत हे राज्य वीज भारनियमनमुक्त होईल असे सांगितले असेल तर त्याबाबतचा खुलासा त्या सभागृहामध्ये मंत्रिमहोदय करतील.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी असा हरकतीचा मुद्दा मांडला की, या सभागृहामध्ये माननीय अर्थमंत्री अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देत होते.

(यानंतर सौ. रणदिवे)

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी . . . .

त्यावेळी त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, विजेच्या संबंधात राज्य शासनाचे धोरण आहे. यासंबंधात सांगावयाचे तर महाराष्ट्रामध्ये पूर्णपणे लोडशेडींग रहाणार नाही आणि वीज मुबलक दिली जाईल आणि ही वीज 2012 पर्यंत उपलब्ध करुन दिली जाईल अशी माननीय मंत्री महोदयांनी येथे भूमिका मांडलेली आहे, घोषणा केलेली आहे. या सदनाच्या बाबतीत सांगावयाचे तर ही घोषणा बरोबर आहे. विधानसभेमध्ये जर काही याबाबतीत उल्लेख केला असेल तर त्या संबंधात देखील त्यांनी बाहेर खुलासा करताना म्हटलेले आहे की, स्लीप ऑफ टंक झाल्यामुळे तेथे 2012 च्या ऐवजी 2014 असा उल्लेख झालेला आहे. परंतु प्रत्यक्षात 2012 मध्ये हे राज्य लोड शेडींग मुक्त होणार आहे अशी शासनाची भूमिका आहे. त्यामुळे येथे सदनाचा हक्कभंग होत नाही असे माझे म्हणणे आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विरोधी पक्षाकडून किंवा या सदनातील कोणत्याही सन्माननीय सदस्यांकडून एखादा मुद्दा उपस्थित केला तर त्याचे उत्तर सरकारने द्यावयाचे असते.

**उपसभापती** : तसे त्यांनी दिले.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नाही. पण या सदनामध्ये एक नवीन प्रथा निर्माण झालेली आहे. आमचे सन्माननीय सदस्य श्री.भाई जगतापसाहेब, हे सरकारच्या वतीने "पटलावर ठेवतो" "माहिती देतो" असे माननीय मंत्री महोदयांच्यावतीने तेच उत्तर देत असतात. म्हणून त्यांनी लवकर मंत्री व्हावे असे मी त्यांना सांगत असतो. पण सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णीजी तुमच्याकडून ही अपेक्षा नाही.

**उपसभापती** : खरे म्हणजे मी सन्माननीय सदस्यांना सांगणार होतो की, तुम्ही थांबा. पण मी त्यांना बोलावयास दिले. त्यामुळे आता विषय संपलेला आहे. 2012 मध्ये राज्य लोडशेडींग मुक्त होणार आहे.

----

. . . .व्ही-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शनिवार, दिनांक 27 मार्च 2010 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : शनिवार, दिनांक 27 मार्च 2010 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

. . . .व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माहिती पटलावर ठेवण्यासंबंधी

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला एक बाब सांगावयाची आहे. परवा मी माननीय दुग्धविकासाच्या संबंधात मंत्री महोदयांना प्रश्न विचारला होता.आपण समजून घ्यावे. आता माझ्याकडे ते कागद आहेत. मी असे सांगितले होते की, श्री.मोरे यांच्यावर दूध भेसळीच्या संदर्भात आरोप होते आणि तरी त्यांना तुम्ही बढती दिलेली आहे. खरे म्हणजे श्री.मोरे यांच्यावर फूड ॲण्ड ड्रग कंट्रोल ॲक्टखाली गुन्हा नोंदवावयास हवा होता. असे असताना तुम्ही संबंधितांना कामावर कसे घेतले आणि त्यांना बढती कशी दिली ? असा प्रश्न विचारला होता. तर त्यांनी मला माहिती पटलावर ठेवतो असे सांगितले आणि त्याप्रमाणे त्यांनी पटलावर माहिती ठेवली. ती मला मिळाली. पण त्यांच्याबाबतीत काय केले ? तर त्यांना बढती दिली नाही तर पुन्हा त्याच पदावर आणले. म्हणजे पूर्वी ते परभणी शहरापुरते मर्यादित होते, तेथे प्रमुख होते. पण आता त्यांना पुन्हा त्याच पदावर आणले आणि संपूर्ण मराठवाड्यातील आठ जिह्याचे प्रमुख केले आहे. पण त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे की नाही ? ही माहिती पटलावर ठेवण्यात आलेली नाही.अशा प्रकारे सभागृहाच्या पटलावर अर्धवट माहिती दिली जात आहे.त्यामुळे सभागृहाच्या पटलावर माहिती ठेवत असताना, आम्हाला जी गोष्ट कबूल केली आहे,त्याप्रमाणे पूर्ण माहिती देण्यात आली पाहिजे एवढे मी सांगू इच्छितो आणि सभापती महोदय, आपण याबाबतीत निदेश द्यावेत आणि त्यावेळी आपणच पीठासीन अधिकारी म्हणून येथे उपस्थित होतात. त्यावेळी मी जो आक्षेप घेतला होता, त्या बाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो असे त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते. त्याप्रमाणे माननीय मंत्री महोदयांनी यासंबंधातील पूर्ण माहिती सदनाच्या पटलावर ठेवावी अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो. तसेच श्री.मोरे यांच्याविरुध्द दुधातील भेसळीच्या संदर्भात गुन्हा दाखल का केला नाही ? याची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणार होती, परंतु ती माहिती पटलावर ठेवण्यात आलेली नाही.तेव्हा सभापती महोदय, आपण याबाबतीत निदेश द्यावेत आणि यापुढे सभागृहाच्या पटलावर माहिती ठेवत असताना अर्धी दिली, अर्धी दिली नाही, कधीतरी ती ठेवली जाते, ते बघितले जात नाही असे होता कामा नये.

**उपसभापती** : ठीक आहे. माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाच्या पटलावर कोणत्याही प्रश्नाच्या संदर्भातील माहिती पूर्णपणे ठेवावी. त्या बाबतीत कसूर करु नये एवढेच मी सांगू इच्छितो.

श्री.छगन भुजबळ (खाली बसून) : होय.



**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.विजय वडेट्टीवार (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचे सन 2007-2008 या कालावधीच्या लेख्यावरील लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन 2008-2009 चा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितचा सन 20078-2008 चा तिसरा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : तिसरा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा सन 2004-2005 व 2005-2006 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

श्री. विजय वडेट्टीवार : सभपती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाचा सन 2004-2005 व 2005-2006 चा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माननीय राज्यपालांनी पाटबंधारे विकास क्षेत्रसंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने सन 2010-2011 चे वार्षिक नियोजन आणि सन 2009-2010 मधील वितरीत करण्यात आलेला निधी व जानेवारी,2010 अखेर झालेल्या खर्चाच्या तपशिलासह अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मद्दा आहे. अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी हा अहवाल येथे येणे आवश्यक होते. गेले तीन-चार वर्षे तो येत होता पण यावर्षी तो आला नाही म्हणून त्या दिवशी नियम 289 अनव्ये सभागृहाचे कामकाज थांबवून या संदर्भात चर्चा करावी अशा प्रकारचा आग्रह आम्ही धरला होता. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर यांनीही याबाबतचा आग्रह धरला होता.सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी कलम 371(2) मधील सगळया तरतुदी सांगून या संदर्भातील आमचा या सदनातील संघर्ष सांगितला .सन 2004-2005 साला नंतर यासंबधीचा अहवाल व्यवस्थित यायला लागला अशा प्रकारचे निदर्शनास आले. सभापती महोदय, आम्ही मांडलेल्या नियम 289 च्या प्रस्तावाच्या संदर्भातील आपली विनंती आम्ही मान्य केली. उद्या सकाळपर्यंत हा अहवाल देण्यात येईल असे याठिकाणी सांगण्यात आले होते. उद्या सकाळपर्यत याचा अर्थ अर्थसंकल्पावरील भाषण सुरु होण्यापूर्वी तो देण्यात येणार होता. दुपारी 2.00 अर्थसंकल्पावरील भाषण होते त्यादिवशी सकाळी तो अहवाल देण्यात आला नाही. अर्थसंकल्प आडवणे हे या सभागृहाच्या पध्दतीमध्ये, सौजन्यामध्ये, गरिमामध्ये अयोग्य आहे म्हणून आम्ही त्यावेळी उठून उभे राहून विचारले नाही. परंतु तो अहवाल कधी देण्यात येईल याची शांतपणाने

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

वाट बघत होतो. अर्थसंकल्पाचे भाषण संपले, विनियोजन बिल झाले, पुरवणी मागण्या झाल्या, सगळे काही संपले. आता काही मुद्दे राहिलेले नाहीत. नुसते पोपटपंची करत दिवस काढावयाचे आहेत. सरकारचे अधिकृत अधिवेशन संपलेले आहे. आता आम्ही काय करायचे? विदर्भ-मराठवाडयात डोकयावर घेऊन फिरायचे काय? या तरतुदीच्या संदर्भात या शासनाला आम्ही कधी विचारणार? कुठे विचारणार? सभापती महोदय, हे सरकार आल्यापासून टिंगल-टवाळी चाललेली आहे. आम्ही एकदाचे परत निवडून आलो. आता कोण विचारतय? अशी जी परिस्थिती निर्माण झालेली आहे ती फार गंभीर आहे. परत निवडून आलात, लोकांनी तुम्हाला निवडून दिले. आम्ही येथे विरोधी पक्षात आहोत. तुम्ही तुमचे चांगले काम करा आम्ही आमचे विरोधी पक्षाचे काम करतो पण किमान लोकशाहीचा सन्मान तरी राखाल की नाही? घटनेचा मान ठेवाल की नाही, का सगळेच डोक्याला गुंडाळून ठेवले तर आम्हालाही डोक्यावर घेऊन फिरावे लागेल. बघा हो बघा, हे सरकार. सभापती महोदय, मी आणखीन शब्द वापरत नाही. आम्ही बोलल्यानंतर लोकांना वाईट वाटते. सभापती महोदय, हे आमचे दुर्दैव आहे. अनुशेषग्रस्त भागाला आता पुन्हा एकदा दुय्यम भावाची वागणूक दिली जात आहे. माननीय सभागृहाचे नेते आणि उपमुख्यमंत्री येथे आहेत. त्याबद्दल मला आनंद आहे. मी कामकाज सल्लगार समितीमध्ये प्रश्न विचारला आणि वैधनिक विकास महामंडळावर चर्चा करण्यात यावी अशी मागणी केली होती. त्यावेळी मला असे सांगण्यात आले की, अधिवेशन अजून खूप दिवस चालणार आहे. आपण नंतर यावर चर्चा करु. मी म्हटले असे करता करता 17,18 तारीख येईल. सभापती महोदय, आता अधिवेशनचा जो अर्थसंकल्पीय भाग असतो तो संपलेला आहे.

श्री. छगन भुजबळ (बसून) : एक महिना अधिवेशन आहे.

श्री. दिवाकर रावते : ठीक आहे. एक महिना कसले हाऊस चालविणार.? आता पर्यंतच्या अनुभवाप्रमाणे अधिवेशन कधी गुंडाळण्यात येईल हेच कळत नाही. सभापती महोदय, या प्रस्तावावर चर्चा व्हावयाची आहे पण याचाही कुठे पत्ता नाही. सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय याठिकाणी अहवाल मांडत आहेत, कर्तव्य पार पाडत आहे. पण तो योग्य वेळेला आलेला नाही. "मढी गेली आणि आता माती खाल्ली"अशी परिस्थिती याठिकाणी निर्माण करण्यात येत आहे हे मी याठिकाणी अत्यंत खेदाने नमूद करतो. धन्यवाद.

यानंतर श्री. बरवड..

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील विषय क्रमांक दोन (फ) च्या अंतर्गत जे विवरणपत्र ठेवण्यात आलेले आहे त्यासंदर्भात मला असे म्हणावयाचे आहे की, एक तर राज्यपालांचे जे डायरेक्टीव्हज इश्यू झालेले आहेत ते दरवर्षी होतात. भारतीय राज्य घटनेच्या कलम 371(2) अन्वये या देशाच्या माननीय राष्ट्रपतींनी 9 मार्च, 1994 ला आदेश पारित करुन त्यांच्यावर विशेष जबाबदारी सोपविलेली आहे. या विशेष जबाबदारीच्या अंतर्गत हे डायरेक्टीव्हज दिले जातात. या डायरेक्टीव्हजमध्ये आपण जिल्हानिहाय वाटप कसे करावयाचे याबाबत निदेश दिलेले आहेत. त्यांनी असे म्हटले आहे की, याचे सर्व विवरण विधिमंडळासमोर सादर केले पाहिजे. या डायरेक्टीव्हजमध्ये रत्नागिरीसारख्या जिल्ह्याचा उल्लेख केलेला आहे. रत्नागिरी जिल्हा अजून 1994 च्या सरासरीवर सुध्दा आलेला नाही. माननीय राज्यपालांनी अनेक्श्चर 3 मध्ये विदर्भाच्या 4 जिल्ह्यांबरोबर रत्नागिरीचा सुध्दा उल्लेख केलेला आहे. त्याबाबतीत आम्हाला कळावयास नको काय ? माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने सन 2010-2011 मध्ये आपण जिल्हावार काय नियोजन केलेले आहे याचे विवरण अर्थसंकल्पावरील चर्चा सुरु होण्यापूर्वी सभागृहाला सादर होणे आवश्यक होते की नाही याचा खुलासा माननीय राज्यमंत्र्यांनी केला पाहिजे. मागच्या वर्षी जे नियोजन झाले त्याप्रमाणे खर्च केला की नाही याचे विवरण गेली दोन चार वर्षे आपण सभागृहासमोर ठेवत आहात पण सन 20010-1011 च्या संदर्भात यावेळी पध्दत बदलली. पध्दत बदलल्यानंतर आम्ही नियम 289 अन्वये प्रस्ताव दिल्यानंतर माननीय सभापतींनी निदेश दिले. आम्ही नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिला होता तो अर्थसंकल्पावरील चर्चा सुरु होण्यापूर्वी दिला होता आणि माननीय सभापतींनी आदेश दिल्यानंतर सुध्दा अर्थसंकल्पावरील संपूर्ण चर्चा संपल्यानंतर आज आपण हे विवरणपत्र या ठिकाणी ठेवले आहे त्याबद्दल खेद होतो असे तरी निदान माननीय मंत्रिमहोदयांनी म्हणावे. यामध्ये तीन प्रश्न आहेत. यामध्ये जिल्हानिहाय विवरण दिले आहे काय ? ते अर्थसंकल्पावरील चर्चा सुरु होण्यापूर्वी सभागृहासमोर न ठेवण्याची कारणे काय आहेत ? तिसरी महत्वाची बाब अशी की, यापुढे असे होणार नाही एवढे तरी निदान सांगावे. या तीन बाबींच्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांकडून खुलासा होणे आवश्यक वाटते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT/

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख साहेबांनी जे सांगितले ते खरे आहे. यामध्ये जिल्हानिहाय तरतुदी दाखविलेल्या आहेत. जिल्हा निहाय तरतुदी माननीय राज्यपालांच्या डायरेक्टीव्हजप्रमाणे करावयाच्या होत्या म्हणून थोडा उशीर झालेला आहे. पण यापुढे मात्र याची निश्चितपणे दक्षता घेऊ.

**उपसभापती** : माननीय राज्यपालांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने सन 2020-2011 चे वार्षिक नियोजन आणि सन 2009-2010 मधील वितरित करण्यात आलेला निधी व जानेवारी, 2010 अखेर झालेल्या खर्चाच्या तपशिलासह अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचा सन 2007-2008 चा महालेखापाल, महाराष्ट्र-1 यांचा लेख्यावरील लेखा परीक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : लेखा परीक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

**नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील निवेदनाबाबत**

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, आम्ही नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावासंबंधी निवेदन करावयास सांगितले होते परंतु अद्याप ते निवेदन झालेले नाही.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT/

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उपसभापती** : आज नियम 93 अन्वये ज्या सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. गोपिकिशन बाजोरिया यांनी "अकोला महानगरपालिकेची लोकसंख्या 5 लाखाच्या जवळपास असणे, कापसाचा मुख्य उद्योग असल्याने रोज 100 ते 150 टन ओला व सुका घनकचरा निर्माण होत असून सध्या नायगांव येथील खाजगी जागेवर हा घनकचरा टाकत असल्यामुळे तेथील नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुडकर, जगदीश गुप्ता यांनी " दि. 1 डिसेंबर, 1995 रोजी हजेरी सहाय्यकांना शासन सेवेत सामावून घेण्याचा आदेश काढण्यात आला असून त्या आदेशामध्ये डिसेंबर, 1995 नंतरच्या कालावधीत शासन सेवेत काम करणाऱ्या हजेरी सहाय्यकांना सेवेत सामावून घेण्यात आले नसल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आझाद मैदानात हजेरी सहाय्यक उपोषणाला बसलेले आहेत. त्यामुळे यासंदर्भात शासनाने लवकरात लवकर निवेदन केले तर बरे होईल.

**उपसभापती** : शासनाने यासंदर्भातील निवेदन लवकरात लवकर करावे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या सूचनेवरील निवेदन उद्या करण्यात यावे अशी मी विनंती करतो.

**उपसभापती** : यासंदर्भात उद्या निवेदन करावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कोणीही मंत्री महोदय निवेदन करण्यात येईल असे उभे राहून सांगत नाहीत.

**उपसभापती** : दिनांक 1 डिसेंबर, 1995 पूासन राज्यातील हजेरी सहाय्यकांना शासन सेवेत सामावून घेण्याचा आदेश काढण्यात आला असून त्या आदेशामध्ये डिसेंबर, 1995 नंतरच्या कालावधीत शासन सेवेत काम करणा-या हजेरी सहाय्यकांना सेवेत सामावून घेण्यात आले नसल्याबाबत नियम 93 ची सूचना दिली आहे. याबाबतचे निवेदन उद्या करण्यात यावे असे मी निर्देश देत आहे. त्यामुळे कोणी होय म्हणण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील यांनी "अशासकीय द्विलक्षी कनिष्ठ महाविद्यालयात पदव्युत्तर अर्हता असलेल्या पूर्णवेळ शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगानुसार निश्चित केलेली वेतनश्रेणी मिळत नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवानराव साळुंखे, संजय केळकर यांनी "राज्यातील अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील पायाभूत पदापेक्षा वाढीव पदाचे सन 2005-06 पासूनचे प्रस्ताव मान्यतेसाठी शासन स्तरावर प्रलंबित असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री परशुराम उपरकर, किरण पावसकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडामार्ग तालुक्यातील बहुचर्चित कळणे मायनिंगबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**......

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनवणे यांनी "केंद्र शासनाच्या दि.31डिसेंबर, 2008 च्या आदेशान्वये विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू झालेल्या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या (पेबॅण्ड) उच्च शिक्षण विभागाच्या दि.12 ऑगस्ट, 2009 च्या आदेशान्वये महाराष्ट्रात जशाच्या तश लागू केल्या आहेत व AICTE व केंद्रीय मानव संसाधन मंत्रालय यांच्याकडून सहाव्या वेतन आयोगाबद्दल आदेश प्राप्त झाल्यानंतर अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करण्यासाठी योग्य ती कारवाई विभागाकडून करण्यात येईल असे आश्वासन देण्यात येऊनही अद्याप त्याबाबत कारवाई न केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री परशुराम उपरकर, किरण पावसकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील सावंतवाडी तालुक्यातील उषा इस्पात कंपनीने सुमारे 149 हेक्टर जमीन शेतक-यांशी केलेल्या करारानुसार घेतलेल्या कर्जापोटी आयडीबीआयने केलेला लिलाव" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 29 मार्च, 2010 च्या सुमारास महाराष्ट्र राज्याच्या समुद्र सीमेत 'अल-अलाम' नावाच्या पांढऱ्या रंगाच्या संशयित बोटीने केलेला प्रवेश" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, जयंत प्र.पाटील, कपिल पाटील यांनी आदिवासी नक्षलग्रस्त गडचिरोली, गोंदिया व इतर जिल्हयातील अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, तुकडयांवरील शिक्षक कर्मचा-यांना मे, 2009 तर काही जिल्हयातील शिक्षकांना सप्टेंबर, ऑक्टोबर, 2009 पासून वेतन अदा न करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

3....



NTK/ MMP/ SBT/

**उपसभापती**......

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "उद्योगपती सलील चतुर्वेदी प्रकरणातील पोलीस अधिका-याची चौकशी करणाज्या सी.आय.डी.च्या उपअधिक्षकाने सदर प्रकरणाच्या तपास कामातून माघार घेतल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

उर्वरित सर्व सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

-----

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

**पृ. शी.** :विलेपार्ले (पूर्व) येथील मनोरंजनाचे मैदानासाठी व झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्यासाठी राखून ठेवलेल्या भूखंडांवर व्यावसायिक इमारत बांधण्यास विकासकाला दिलेली परवानगी

**मु. शी.**: विलेपार्ले (पूर्व) येथील मनोरंजनाचे मैदानासाठी व झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्यासाठी राखून ठेवलेल्या भूखंडांवर व्यावसायिक इमारत बांधण्यास विकासकाला दिलेली परवानगी याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदिश गुप्ता वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सचिन अहिर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदिश गुप्ता यांनी "विलेपार्ले (पूर्व) येथील मनोरंजनाचे मैदानासाठी व झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्यासाठी राखून ठेवलेल्या भूखंडांवर व्यावसायिक इमारत बांधण्यास विकासकाला दिलेली परवानगी" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मुंबईतील विलेपार्ले येथील खेळाच्या मैदानाचा हा प्रश्न आहे. त्या भागातील नागरिकांनी माझ्याकडे एक निवेदन दिलेले आहे. भूखंड क्रमांक 108 हा मनोरंजनाचे मैदान म्हणून राखून ठेवला होता. त्या भूखंडावर झोपडपट्टीवासियांचे पुनवर्सन करण्यासाठी तो भूखंड राखीव होता. या निवेदनात असे नमूद केले आहे की, या भूखंडाचे क्षेत्रफळ सुमारे 3179.50 चौ.मी.इतके आहे. त्याचा नकाशा मंजूर करीत असताना व हा भूखंड मनोरंजनाच्या मैदानासाठी राखीव असताना तो भूखंड एका विकासकाला देण्यात आला. त्या विकासकाने त्या भूखंडापैकी फक्त 480 चौ.फूट जागा मैदानासाठी सोडली आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, या निवेदनात नमूद केलेले या भूखंडाचे क्षेत्रफळ बरोबर आहे काय ? हा भूखंड मनोरंजनाच्या मैदानासाठी राखीव असल्यामुळे त्या भूखंडावर अंशत: किती बांधकाम करता होते, नियमाप्रमाणे हा भूखंड बांधकामासाठी घेतला हे खरे आहे काय आणि किती क्षेत्रफळाचा भूखंड घेतला तेही सांगावे आणि उच्चस्तरीय समितीने निर्णय घ्यावा असे उच्च न्यायालयाने म्हटले आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 14:15

(श्री. पांडुरंग फुंडकर...

त्या उच्चस्तरीय समितीचा निर्णय काय आहे ? बिंल्डिगच्या सभोवती नियमानुसार जागा सोडलेली नसताना त्या इमारतीच्या बांधकामास अग्शिमन दलाच्या अधिका-यांनी एनओसी कशी काय दिली ? 86 प्रकरणातील किती प्रकरणी चौकशी पूर्ण झालेली आहे ? तसेच विलेपार्ले येथील 108 क्रमांकाच्या भूखंडाची चौकशी पूर्ण झालेली आहे काय ?

श्री. सचिन अहिर : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे 108 आणि 109 क्रमांकाचे हे दोन भूखंड मनोरंजनासाठी आणि बेघरांसाठी घरे बांधण्यासाठी आरक्षित होते. 1992मध्ये नगर रचना विभागाने सर्व्हे करुन झोपडपट्टीचा कायदा करीत असताना आणि तद्नंतर त्या विभागाने विविध आदेशांच्या माध्यमातून ही तरतूद केलेली आहे की, जे मोकळे भूखंड असतील, मोकळया जमिनी असतील त्यावर झोपडपट्टी असेल तर 1995च्या आधीच्या ज्या झोपड्यांना अधिकृत म्हणून दर्जा दिलेला आहे अशा झोपडपट्टयाच्या त्यासंदर्भातील योजनेला देखील मान्यता द्यायला हरकत नाही. अशा योजनेला मान्यता देत असताना त्यातील 10 टक्के क्षेत्र हे राखीव म्हणून ठेवले पाहिजे, अशी तरतूद आहे आणि त्या दृष्टीकोनातून या योजनेला मान्यता देण्याचे काम झालेले आहे. मैदान आणि मनोरंजनासाठी हे भूखंड आरक्षित आहेत काय, असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. 108 हा भूखंड मनोरंजनाच्या मैदानासाठी आरक्षित असून त्याचे क्षेत्रफळ 3179.50 चौ.मीटर आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय मंत्री महोदयांनी 3179.50 चौ.मीटर क्षेत्रफळ मैदान आणि मनोरंजनासाठी असल्याचे सांगितले. परंतु यामधील 48.65 चौ.मीटर क्षेत्र मोकळे ठेवून बाकीच्या ठिकाणी बांधकाम करण्यास परवानगी देण्यात आली, हे खरे आहे काय ? ही परवानगी कोणत्या नियमाखाली देण्यात आली ?

श्री. सचिन अहिर : त्या ठिकाणी बांधकाम करण्यास परवानगी देण्यात आली हे खरे आहे. महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्र. टीपीबी 4391/4080(ए)/युडी 11/आरडीपी अंतर्गत आपण तरतूद केली आहे. हे रिझर्व्हेशन असले तरी त्यावर अतिक्रमण होते. जर त्या ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन योजना होत असेल तर बांधकामास परवानगी द्यायला हरकत नाही, मात्र आरक्षित क्षेत्रातील 10 टक्के म्हणजे 480 चौ.मीटर क्षेत्र त्याने राखीव ठेवले पाहिजे. हाय पॉवर कमिटीकडे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर...

अशा प्रकारे राखीव असलेल्या भूखंडाच्या संदर्भात तक्रारी होत्या. हाय पॉवर कमिटीने 2008-2009मध्ये निर्णय घेऊन याचिकाकर्त्याची याचिका निकाली काढलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी 86 प्रकरणांच्या संदर्भात प्रश्न विचारला. हा वेगळा प्रश्न असला तरी त्याबाबत माहिती घेऊन त्यांना कळविण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : माझ्या माहिती प्रमाणे इमारत बांधताना सभोवती 6 मीटर जागा सोडणे आवश्यक आहे. असे असताना त्याठिकाणी फक्त तीन किंवा चार फूट जागा सोडलेली आहे. यासंबंधी शासन चौकशी करणार आहे काय ?

श्री. सचिन अहिर : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे तशी तरतूद आहे. परंतु त्यामधील तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या अग्निशमन अधिका-यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. ते नियमानुसार दिलेले आहे किंवा नाही याची चौकशी करणार काय असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. तेव्हा तशी चौकशी करायला हरकत नाही.

**उपसभापती** : 6 मीटर जागा सोडण्याचा नियम असेल तर चिफ ऑफिसरने एनओसी कशी दिली ?

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, नियमाप्रमाणे 6 मीटर जागा सोडावी लागते. ती जागा सोडलेली नसताना चीफ ऑफिसरने परवानगी दिलेली असेल तर ती इमारत तुम्ही पाडणार आहात काय ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 14:20

निवेदन क्रमांक-1.......... ॲड.अनिल परब....

याला काय अर्थ आहे? 10 टक्के जागा रिझर्व्हेशनसाठी सोडली पाहिजे. परंतु त्या प्लॉटवर अद्याप 10 टक्के जागा रिझर्व्हेशनसाठी दाखविण्यात आलेली नाही.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, त्यांनी नियमानुसार एनओसी दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे 6 मीटर जागा सोडण्याची तरतूद त्यामध्ये आहे....(अडथळा)......सभापती महोदय मला संरक्षण द्यावे.

ॲड.अनिल परब : 6 मीटर जागा सोडलेली नाही.

श्री.सचिन अहिर : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या प्रकरणामध्ये आम्ही फेरचौकशी करु. अनियमितता झाली असेल तर कारवाई करु.

डॉ.दीपक सावंत : ज्यांनी अनियमितपणे एनओसी दिलेली आहे त्यांना निलंबित करणार का? कारण याला महापालिकेचे अधिकारी, मुख्य अग्निशमन अधिकारी आणि एसआरएचे अधिकारी जबाबदार आहेत.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, या बांधकामामध्ये बरीच अनियमितता झालेली आहे. किमान 6 मीटर जागा फायर फायटिंगसाठी सोडावी लागते. फायर फायटिंगच्या नियमाप्रमाणे 6 मीटर जागा सोडलेली नाही. असा राखीव भूखंड असेल आणि त्या भूखंडावर एसआरए योजना करावयाची असेल तर 10 टक्के जागा सोडावी लागते असे नियम आहेत. परंतु बांधकाम करताना नियमाचे पालन झाले नाही. चौकशीमध्ये अनियमतता आढळली तर एसआरए आणि फायर ब्रिगेडच्या अधिकाऱ्यांना निलंबित केले जाईल काय?

श्री.सचिन अहिर : मी अगोदरच सांगितल्याप्रमाणे एच.पी.सी.कडे या सर्व गोष्टींबाबत तक्रारी केल्या गेल्या आहेत. राखीव भूखंड कसा दिला गेला? 6 मीटर जागेबाबत काय केले? या सर्व तक्रारी एचपीसीने निकाली काढल्या आहेत.....(अडथळा)...सन्माननीय सदस्यांनी मला माझे उत्तर पूर्ण करु द्यावे. नंतर त्यांना प्रश्न विचारण्याचा पूर्ण अधिकार आहे. सभापती महोदय, मी सांगितल्याप्रमाणे एसआरएच्या दोन इमारतींमध्ये किती जागा सोडावी हे त्या त्या ठिकाणच्या प्लॉटवर अवलंबून असते. ते निकष ठरविण्याचे काम फायर ब्रिगेडच्या अधिकाऱ्यांकडे असते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे नियम बाजूला ठेवून काही केले असेल तर त्याची चौकशी करु. सभापती महोदय, आपल्याला माहिती आहे की, एसआरए योजनेबाबत दोन इमारतींमध्ये 6





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर.....

मीटर किंवा 10 मीटर जागा सोडण्याचे अधिकार प्लॉटनुसार मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांकडे आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांनी काही अयोग्य केले असेल तर चौकशी करु.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझ्या विभागातील हा प्रश्न असल्यामुळे मी मंत्रीमहोदयांना विचारु इच्छितो की, ज्या तक्रारी प्राप्त झाल्या त्यांचा निपटारा करण्यात आला. तरी देखील नियम 93 ची सूचना चर्चेला आली. म्हणजे या प्रकरणात काहीतरी तथ्य आहे की नाही? तेथील स्थानिक रहिवाशांना आपण भेटलात का? आम्ही त्यांची भेट घेतली आहे. आपण सुध्दा त्यांची भेट घ्यावी किंवा आपले अधिकारी पाठवून तेथील जागेची प्रत्यक्ष पाहणी करणार का? इन्स्पेक्शन लावणार का?

श्री.सचिन अहिर : अधिकाऱ्यांना पाठवून इन्स्पेक्शन केले जाईल.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वाशिम जिल्हयाचा विकास आराखडा अंमलात आणणे

**मु. शी.** : वाशिम जिल्हयाचा विकास आराखडा अंमलात आणणे याबाबत सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, दिवाकर रावते, किशनचंद तनवाणी, ॲड.अनिल परब वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, दिवाकर रावते, किशनचंद तनवाणी, ॲड.अनिल परब यांनी "वाशिम जिल्हयाचा विकास आराखडा अंमलात आणणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्र.2....

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, वाशिम जिल्हा आणि शहरामध्ये शासनाने विकास करण्याच्या दृष्टीने विकास आराखडा 20 वर्षापूर्वी तयार केला. त्या विकास आराखडयात समाविष्ट असलेल्या जवळपास सर्वच जमिनींवर अनधिकृत कामे सुरु झाली होती. या संदर्भात शासनाने एमआरटीपी अधिनियम, 1966 च्या कलम 162 अंतर्गत सहाय्यक संचालक, नगररचना यांची नेमणूक करुन त्या शहराचा सर्वंकष विकास आराखडा तयार करावा अशी भूमिका घेतली. तेथे एक कार्यालय थाटले. त्या ठिकाणी सहाय्यक संचालक, नगररचना अधिकारी वगैरेंची नेमणूक केली. सर्वंकष विकास आराखडा तयार व्हावा म्हणून ही भूमिका घेण्यात आली.

(नंतर 2बी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया........

परंतु मध्यंतरी नगरपालिकेने कलम 127, कलम 37 प्रमाणे आणि कलम 37 च्या नियम 49 च्या नोटीस नुसार गुंठेवारीची सर्व कामे सध्या सुरु आहेत व विकास आराखड्याची ऐशी-तैशी करुन टाकली. शासनाने यासंदर्भात कलम 162 अन्वये अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे. माननीय मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, महाराष्ट्र नगररचना अधिनियम, 1976 च्या कलम 162 अन्वये ज्या अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे त्यातून ही 37 ची प्रोसेस चालू आहे. म्हणून ही चौकशी पूर्ण होत नाही तोपर्यंत हे काम थांबविणार काय ? त्याचप्रमाणे प्रोसिडींग बूक सुध्दा गहाळ झाले होते व त्यानंतर गैरप्रकारासंबंधीचा ठराव घेऊन ही 127 ची नोटीस दिलेली आहे व आरक्षण लॅप्स झालेले आहे किंवा 37 अन्वये ठराव घेऊन जो गैरप्रकार गुंठेवारीमध्ये चालू आहे त्यासंदर्भात नगरपालिकेने कबूल सुध्दा केले आणि पोलीस स्टेशनमध्ये तशी तक्रार केलेली आहे. म्हणून तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांना निलंबित करण्याची कारवाई मंत्री महोदय करतील काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, कलम 127 प्रमाणे एक आणि कलम 37 खाली 5 असे एकंदरित 6 ठराव घेण्यात आले आहेत. त्यापैकी एक ठराव शासनाकडे येऊन तो मान्य करण्यात आला. उर्वरित 5 ठराव 37 खाली करण्यात आलेले आहेत. नगररचना अधिनियम, 1976 च्या कलम 162 अन्वये जो विशेष अधिकारी या सर्व प्रकरणांमध्ये नेमलेला असताना अशा प्रकारे ठराव करणे उचित नाही ही सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना ग्राह्य धरुन यापुढील कलम 37 अन्वये केलेले ठराव मंजूर करण्यात येणार नाहीत.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांनी प्रोसिडिंग बुक गहाळ केल्याचे कबूल केले तसेच गैरप्रकार केलेला आहे हे खरे आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, अशा सर्व अधिकाऱ्यांवर कारवाई करणे किंवा सस्पेंड करणे अवघड काम आहे. नगरपालिकेतील रजिस्टर गहाळ झाले आहे हे वस्तुस्थिती आहे त्यामुळे ही बाब अत्यंत संशयास्पद आहे असे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले आहे म्हणूनच ही चौकशी सुरु आहे. ही चौकशी पूर्ण करुन लवकरात लवकर दोषी असणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : महोदय, सन 2005 ते 2006 हे प्रोसिडिंग बुक गहाळ झाले असे कधी लक्षात आले ? तसेच यासंबंधीची तक्रार अथवा माहिती पोलीस स्टेशन आणि जिल्हाधिकारी यांच्याकडे केव्हा देण्यात आली ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : महोदय, प्रोसिडिंग बूक गहाळ झाले ही वस्तुस्थिती खरी आहे.......

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपले रेकॉर्ड गहाळ करणे हा खरे तर फौजदारी गुन्हा आहे. माननीय मंत्री महोदय म्हणतात की, अशा प्रकारे अधिकाऱ्यांना निलंबित करणे अथवा कारवाई करणे हे अवघड काम आहे. माझी अशी मागणी आहे की, रेकॉर्ड गहाळ करणारे अधिकारी नसले तरी चालतील, अधिकारी कमी असले तरी चालतील परंतु असे अधिकारी नकोत. म्हणून मंत्री महोदय अशा बेजबाबदार अधिकाऱ्यांना निलंबित करणार काय ?

श्री. दिवाकर रावते : महोदय, मी एवढेच विचारले आहे की, दि. 18/10/2005 ते डिसेंबर, 2006 या कालावधीत जे प्रोसिडिंग बूक गहाळ झाले ते केव्हा लक्षात आले ? यासंदर्भात पोलीस स्टेशन आणि जिल्हाधिकारी वाशिम यांना केव्हा माहिती देण्यात आली ? त्याचबरोबर हा फौजदारी गुन्हा असल्याने पोलीस स्टेशन आणि जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधी कोणती कारवाई केली ? यासंबंधीची माहिती देऊन आजच संबंधित मुख्याधिकाऱ्याला निलंबित केल्याची घोषणा मंत्री महोदय सभागृहात करतील काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भातील गुन्हा पोलीस स्टेशनमध्ये दि. 30.12.2009 रोजी नोंदवण्यात आला होता. गुन्हा दाखल करण्यास विलंब झाला ही वस्तुस्थिती आहे. जिल्हाधिका-यांनी चौकशी करुन अहवाल द्यावा याबाबतीत त्यांना स्मरणपत्रही पाठविण्यात आली होती परंतु अद्याप त्यांच्याकडून अहवाल मिळालेला नाही. त्यामुळे सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन ज्यांच्या कस्टडीमध्ये प्रोसीडींग ठेवण्याची जबाबदारी होती त्यांना सस्पेंड करण्यात येईल.

--------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : देवगड (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यातील मिठमुंबरी बागवाडी भागात समुद्र व खाडी किनारी धुपप्रतिबंधक बंधारा बांधणे.

**मु. शी.** : देवगड (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यातील मिठमुंबरी बागवाडी भागात समुद्र व खाडी किनारी धुपप्रतिबंधक बंधारा बांधणे यासंबंधी सर्वश्री संजय केळकर, श्री रामनाथ मोते, श्री विनोद तावडे वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने बंदरे विभागाच्या सन्माननीय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"देवगड (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील मिठमुंबरी बागवाडी या संपूर्ण वालुकामय व बेटसदृष्य गावाची समुद्र व खाडीच्या काही भागात संरक्षणाची कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे दिवसेंदिवस समुद्राच्या व खाडीच्या वाढत्या अतिक्रमणामुळे गावातील जमिन पाण्याखाली जात असल्याने गंभीर समस्या निर्माण होणे, गावाचे व जमिनीचे संरक्षण व्हावे व समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणामुळे जमिनीची होत असलेली धुप थांबविण्यासाठी तेथील गावकऱ्यांनी समुद्र व खाडीकिनारी सुमारे १३५० मीटर्स लांबीचा धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्याची गत २५ वर्षापासून सातत्याने मागणी करणे, धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची आवश्यकता असताना शासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष व टाळाटाळ करणे, बंधाऱ्याच्या कामास रु.३५ लाख रुपये रक्कम शासनाने माहे मार्च, २००२ पूर्वी मान्य केलेली असणे, तथापि अर्थसंकल्पात तरतूद केलेली नसल्यामुळे आजमितीस सदरचे काम बंद असणे, पावसाळयात तसेच संभाव्य सुनामी लाटांमुळे मिठमुंबरी बागवाडी गाव वाहून जाण्याची गंभीर परिस्थिती निर्माण होणे, सबब शासनाने सत्वर धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम हाती घेऊन सुमारे १३५० मीटर्स लांबीचा धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्याची आवश्यकता याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. भास्कर जाधव (बंदरे विभाग, राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, खाडी किनारी राहणा-या लोकांच्या जिव्हाळयाचा हा प्रश्न आहे. या ठिकाणी धूप प्रतिबंधक बंधारा बांधला जावा यासाठी त्या ठिकाणच्या लोकांची अनेक वर्षापासूनची मागणी होती. परंतु संबंधित खात्याने याकडे दुर्लक्ष केले, टाळाटाळ केलेली आहे. हा प्रश्न केवळ येथेच आहे असे नसून सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीमध्ये सुध्दा अशीच परिस्थिती आहे. या ठिकाणी पूर्वी जे बंधारे बांधले आहेत त्या बंधा-यांची कामे निकृष्ट झालेली असल्यामुळे या बंधा-यांना भगदाड पडून शेकडो एकर जमीन नापीकी झालेली आहे. देवगड तालुक्यातील मिठमुंबरी बागवाडी येथे धुपप्रतिबंधक बांधला होता परंतु या बंधा-याला भगदाड पडल्यामुळे या ठिकाणची 200 एकर जमीन नापिकी झालेली आहे. तसेच मिठमुंबरी या भागात 1300 मिटरच्या बंधा-यापैकी 1070 मीटरचे काम पूर्ण झाले परंतु 300 मीटरचे काम अजूनही अपूर्ण आहे. त्यामुळे यासंदर्भात माझे तीन प्रश्न आहेत. या ठिकाणच्या 1070 मीटरच्या धूप प्रतिबंधक बंधा-याचे जे काम झालेले आहे ते अतिशय निकृष्ट पध्दतीचे झालेले आहे. आज सुध्दा या बंधा-याला भगदाड पडलेले असल्यामुळे खाडी किनारी राहणा-या लोकांच्या शेतात पाणी शिरुन नुकसान होऊ शकते. ज्याने निकृष्ट पध्दतीचे काम केलेले आहे त्याची चौकशी करुन कारवाई केली जाईल काय ? 300 मीटरचे जे काम अपूर्ण आहे ते काम केव्हा पूर्ण होईल ? तसेच जिल्हयात धूपप्रतिबंधक बंधारे किती मंजूर आहेत ? त्यातील किती बंधा-यांचे काम पूर्ण झाले व किती बंधा-याचे काम अपूर्ण आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, जिल्हयात किती बंधारे मंजूर झाले होते व त्यातील किती बंधा-याचे काम पूर्ण झाले व किती बंधा-याचे काम अपूर्ण आहे यासंदर्भातील माहिती आता माझ्याकडे नाही परंतु ही माहिती घेऊन सन्माननीय सदस्यांना ती देण्यात येईल. सदर बंधारा चांगल्या स्थितीत आहे अशी माझी माहिती आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, बंधारे निकृष्ट असल्यामुळे शेतात पाणी शिरते आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, धूप प्रतिबंधक बंधारे हे दगडानेच बांधलेले असतात. 1350 मिटरपैकी 1070 मीटरचे काम पूर्ण झालेले आहे व उर्वरित काम कधी पूर्ण होईल असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, बंधारा

...4..



SGJ/ SBT/ MMP/ प्रथम श्री.खर्चे.... 14:30

श्री. भास्कर जाधव...

बांधण्याचे आणि त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचे काम हे जिल्हा नियोजन समितीचे आहे. या कामांसाठी 1 कोटी रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. या कामांसाठी जिल्हा नियोजन समिती लवकरच निधी उपलब्ध करुन देणार असल्यामुळे या बंधा-याचे जे काम अपूर्ण राहिलेले आहे ते लवकरच पूर्ण केले जाईल. या कामासाठी डीपीडीसीने पैसे उपलब्ध करुन दिल्यानंतर हे काम पूर्ण करण्यात येईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, या विभागात जवळ जवळ 22 पदे मंजूर असून त्यापैकी केवळ दोनच पदे कार्यरत आहेत व 20 पदे रिक्त आहेत. त्यामुळे रिक्त पदे कधी भरली जाणार आहेत ? कोकण पॅकेज अंतर्गत मागील वर्षी 50 कोटी व पुढील वर्षी 50 कोटी रुपये...

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर ..

अशा प्रकारची तरतूद असतांना सुध्दा या जिल्हयासाठी मात्र कोणत्याही प्रकारची तरतूद केली नाही हे खरे आहे काय ? चालू कामासाठी 6 कोटी रुपये, अद्याप सुरु न झालेल्या कामासाठी साडेसात कोटी रुपये आणि प्रस्तावित कामासाठी 26 कोटी रुपये ठेवण्यात आलेले आहेत तेव्हा कोकण पॅकेजच्या अंतर्गत हे पैसे देण्यात येणार आहेत काय ?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न हा लक्षवेधी सूचनेशी संबंधित नाही. त्याचबरोबर 22 पैकी 2 कर्मचारी कामावर हजर आहेत आणि बाकीची पदे रिक्त आहेत असे सन्माननीय सदस्यांनी सागितले आहे तेव्हा या सबंधीची खात्री करुन घेण्यात येईल आणि ही पदे रिक्त राहणार नाहीत याची काळजी घेण्यात येईल.

------

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या नगर अभियंत्यास लाच घेतांना पकडणे

**मु.शी** .: कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या नगर अभियंत्यास लाच घेतांना पकडणे यासंबंधी सर्वश्री किरण पावसकर, डॉ.दीपक सावंत,सर्वश्री परशुराम उपरकर,ॲड.अनिल परब,श्री. दिवाकर रावते, डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. किरण पावसकर ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेतील नगर अभियंता श्री.सुनील जोशी यांना लाचलुचपत प्रतिबंध विभागाने लाच घेतांना रंगेहाथ पकडणे, त्यांच्या घराची झडती घेतांना लाखो रुपये रोख रक्कम, लाखो रुपये किंमतीची विदेशी मद्य सापडणे, तसेच सांगली जिल्हयातील एका अभियंत्याला लाच घेतांना पकडणे, त्यांच्या घरीसुध्दा प्रचंड प्रमाणात संपत्ती आढळून येणे, सदरहू घटना राज्यात विविध ठिकाणी राजरोसपणे घडत असणे, शासनाला गैरव्यवहार रोखण्यास आलेले अपयश, परिणामी राज्यातील जनतेमध्ये पसरलेले तीव्र चिंतेचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने घ्यावयाची दक्षता याबाबत करावयाची कार्यवाही आणि शासनाची भूमिका "

श्री. रमेश बागवे ( गृह राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदना नंतर -

श्री.किरण पावसकर :सभापती महोदय, या पूर्वी देखील भ्रष्टाचाराच्या केसेस झाल्या होत्या. परंतु श्री.जोशी यांनी केलेला भ्रष्टाचार हा शासनाला लागलेला मोठा कलंक आहे.या प्रकरणातील श्री. सुरेश जोशी यांना सरकारने शोधलेले नाही उलट सरकारने या अभियंत्याला पाठीशी घातले आहे. निवेदनात असे म्हटले आहे की ,"त्यांच्यावर तीन पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत . कल्याण पोलीस स्टेशनमध्ये त्यांच्याविरुध्द गुन्हा नोदविला आहे डोबिवलीच्या मानपाडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविला आहे.व चतु:श्रुंगी पोलीस स्टेशनमध्ये देखील गुन्हा नोंदविला आहे. श्री. जोशी हा अब्जाधीश आहे. परंतु निवेदनात असे म्हटले आहे की त्यांच्याकडील मालमत्ता 60 लाख रुपयापर्यत गेली आहे. मुलुंड, महाबळेश्वर, पुणे, मुरबाड इत्यादी ठिकाणची त्याची मालमत्ता अजूनही जप्त करण्यात आली नाही.कल्याण,डोंबिवली महानगरपालिकेतील उप आयुक्त श्री.सुरेश पवार यांना दिनांक 24 जून 2009 रोजी अडीच लाख रुपयांची लाच घेतांना पकडले होते. त्याचबरोबर श्री सुनील जोशी यांना देखील 15 लाख रुपयांची लाच घ्ेतांना पकडण्यात आले होते. सरकार ज्याप्रमाणे बीओटी तत्वावर कामे सुरु करते त्याप्रमाणे या प्रकरणातील आरोपीना "पकडा, चौकशी करा आणि पुन्हा कामावर घ्या"अशा प्रकारचे धोरण शासनाने स्वीकारलेले आहे काय ? श्री सुनील जोशी यांना या पूर्वी देखील अटक करण्यात आली होती आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने त्याना निलंबित केले होते काय ?

श्री.रमेश बागवे :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जो प्रश्न विचारला आहे त्या अनुषंगाने मी त्यांना सांगू इच्छितो की, श्री.सुनील जोशी यांचे डोबिवली आणि पुणे येथे घर असून दोन्ही घरांची झडती घेण्यात आली होती आणि ती मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी असे सागितले की, मानपाडा आणि चतु:श्रृगी पोलीस स्टेशनमध्ये श्री.जोशी यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, श्री.जोशी यंच्या घरातून विदेशी मद्यांच्या बाटल्या मिळाल्या असून त्या अनुषंगाने मानपाडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविला आहे.....

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचनेचे निवेदन वितरीत केले असून ते मी वाचले आहे. माझा प्रश्न असा आहे की,या बाबतीत त्यांच्याविरुध्द अशा

4..



श्री.किरण पावसकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रकारची कारवाई झाली होती यासंबंधी आपल्याकडे माहिती आहे काय जर आपल्याकडे माहिती नसेल तर मी आपल्याला सांगू इच्छितो की ,दिनांक 20 नोव्हेंबर 1997 रोजी श्री. सुनील जोशी यांनी त्यांच्या कार्यालयातच 28 हजार रुपयांची लाच घेतल्यामुळे त्यांना बेडया घालण्यात आल्या होत्या आणि 15 डिसेंबर 1997 रोजी त्यांना निलंबित करण्यात आले हाते.शिवसेनेच्या नगर सेविका श्रीमती मधुमती शिसोदे यांनी या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांना एक पत्र दिले होते आणि त्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्र्यांनी एक बैठकसुध्दा घेतली होती . त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी श्री सिंह व श्री कवळे यांची त्या ठिकाणी नियुक्त केली होती परंतु त्यांनी श्री सिंह यांना त्या पदावर रुजू होऊ दिले नाही .सरकारी यंत्रणेनेसुध्दा याबाबतीत दुर्लक्ष केले होते.श्री.अण्णा हजारे यांनी दिनांक 15 जानेवारी 2010 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र दिले होते त्याही पत्राकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. त्यानंतर फेब्रुवारी महिन्यात लाच घेतांना त्यांना पुन्हा पकडण्यात आले होते. एखाद्या मोठया यशस्वी उद्योजकाकडेसुध्दा संपत्ती नसेल एवढी संपती श्री सुनील जोशी यांच्याकडे आहे आणि अशा प्रकारे त्याला वारंवार पकडले असतांना देखील पुन्हा त्याच पदावर आणले जात आहे..................

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर.....

आणि आपण त्याला 1997 मध्ये पकडल्यानंतर कोणती खाती दिली? सर्वात महत्वाचे असलेल्या नगररचना खात्याचे ते सहाय्यक संचालक बनले. त्याचप्रमाणे डोंबिवलीमधील सावित्रीबाई कलामंदिर या प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता म्हणून त्यांची नियुक्ती केली. म्हणजे एखाद्या व्यक्तिकडे डिग्री नसतांना, डिप्लोमा होल्डर असतांना त्याला दोन-दोन पदे देण्यात आली. एकदा त्यांना पकडल्यानंतर पुन्हा पद देण्यात आले. ते ज्या ठिकाणी काम करीत आहेत त्यांच्या बाजूला येणारे अभियंता त्यांच्याबरोबर काम करु शकतील असे मला वाटत नाही. त्यांना दोन-तीन वेळा पाठिशी घालण्याएवढे सरकारचे त्यांच्याशी काय नाते आहे? त्याबाबत वरुन कुणाचा तरी दबाव आहे काय? ज्यांच्याकडे मालमत्ता मिळाली त्यांच्यावर तुम्ही कारवाई करीत आहात? त्याबाबत माझा प्रश्न असा की, सुनील जोशी यांनी ज्या टेबल व खुर्चीवर बसून काम केले आहे आणि मालमत्ता जमविली. असे कितीतरी प्रकल्प आहेत, त्या प्रकल्पांना मान्यता मिळता कामा नये. ज्या लोकांनी त्यांना पैसे दिले आहेत, त्यांच्यावरही आपण कारवाई करणार आहात काय? त्याचप्रमाणे सरकारी कर्मचारी 48 तासापेक्षा अधिक काळ तुरुंगामध्ये राहिला तर त्याला निलंबित करण्यात येते अशी माझी माहिती आहे. आजपर्यंत आपण सुनील जोशी यांना निलंबित कां केले नाही?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, याठिकाणी पहिला प्रश्न विचारण्यात आला की, यापूर्वी त्यांच्यावर कारवाई केली होती काय? दिनांक 20.11.97 रोजी एक निनावी तक्रार करण्यात आली होती. ज्यावेळी पैसे घेतांना त्यांना ट्रॅप करण्यात आले होते, त्यावेळी त्यांच्याकडे 28 हजार 800 रुपयांची रक्कम मिळाली होती. त्यावेळी पुरेसा पुरावा उपलब्ध झाला नाही म्हणून कोर्टाने त्यांना निर्दोष सोडले. आपल्या सिस्टीममध्ये कोर्टाने एकदा निर्दोष सोडल्यानंतर आपण त्याला पुन्हा कामावर घेत असतो. या सर्व घटनेमध्ये पोलिसांनी जप्त केलेली मालमत्ता पाहिली तर ती निश्चितपणे खूप मोठी व धक्कादायक आहे.जवळ जवळ सुमारे 3 कोटी 9 लाख 77 हजार 669 रुपयांची मालमत्ता मिळाली आहे. या दोन अधिकाऱ्यांविरोधात पोलिसांनी धाड टाकून त्यांना पकडण्यात आले. त्यांना लवकर जामीन मिळू नये यासाठी पोलिसांनी प्रयत्न केले असता त्यामध्ये त्यांना यश आले. ते खूप दिवस पोलीस कस्टडीमध्ये होते. शक्यतोवर इतके दिवस पोलीस कस्टडी कुणाला मिळत नाही. मी या निमित्ताने लोकांना आवाहन करतो की, या मालमत्तेच्या संदर्भात लोकांना काही माहिती असेल तर त्यांनी ती पोलिसांकडे सादर करावी. आता आपण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

श्री. आर. आर. पाटील...

महाबळेश्वरची माहिती सांगितली आहे तिचा तपास करण्यात येईल. त्याशिवाय या दोघांच्या मालमत्ता आणखी कुठे असतील तर त्यांचाही शोध घेतला जाईल. यामध्ये दोन अधिकाऱ्यांना पकडण्यात आले आहे, हे केवळ हिमनगाच्या वरच्या भागाचे टोक आहे. परंतु भ्रष्टाचाराची व्याप्ती फार मोठी आहे. यामध्ये डिसप्रपोर्शनेट मालमत्ता सापडली आहे. कोणत्या प्रकारचे बेकायदेशीर काम करण्यासाठी या अधिकाऱ्यांना पैसे देण्यात आले. या अधिकाऱ्यांना पैसे देऊन त्यांच्याकडून कुणी आणि कोणत्या प्रकारची कामे करुन घेतली? याबाबत या दोन अधिकाऱ्यांची निश्चितपणे व्यापक चौकशी केली जाईल. त्यांना सोडण्याची कोणतीही शासनाची भूमिका नाही. याबाबत नगर विकास विभागाला सूचना देण्यात आल्या आहेत. हे अधिकारी पोलिसांच्या अटकेमध्ये होते, त्यांच्याकडे इतक्या मोठया प्रमाणात मालमत्ता सापडल्या असल्यामुळे या अधिकाऱ्यांना ताबडतोब निलंबित केले पाहिजे अशाप्रकारच्या सूचना माझ्या खात्याच्या वतीने देण्यात आल्या आहेत. त्यांच्या मालमत्तेसंदर्भात आणखी काही माहिती असेल तर ती आपण द्यावी. मुळामध्ये अशाप्रकारची तक्रार करण्यासाठी फारसे कुणी पुढे येत नाहीत. याचे कारण या प्रकरणामध्ये ट्रॅप करण्यासाठी ज्यांनी 15 लाख रुपये दिले त्यांचे संपूर्ण पैसे या केसचा निकाल लागल्यानंतर परत मिळतील. त्यामुळे कोर्टाच्या परवानगीशिवाय हे 15 लाख रुपये देता येत नाहीत, ते पोलिसांकडे पडून आहेत. आणि म्हणून डी.जी.(अँटीकरप्शन) यांच्या नावावर एक वेगळे हेड करुन त्यामध्ये सरकारच्या वतीने दरवर्षी या कामासाठी लागणारी रक्कम ठेवली जाईल. आणि जर कुणीही ट्रॅपसाठी आपले पैसे गुंतविले तर त्या माणसाचे पैसे ताबडतोब डी.जी. (अँटीकरप्शन) यांच्या खात्यामधून त्या व्यक्तिला परत मिळतील. त्यामुळे मागितलेली लाच देण्यासाठी गुंतविलेले पैसे 5-6 वर्षे मिळत नाहीत या उद्देशाने अनेक लोक तक्रार करण्यास पुढे येत नाहीत. एकंदरीत भ्रष्टाचाराचे वाढलेले प्रमाण लक्षात घेऊन अँटीकरप्शन ब्यूरो सक्षम करणे, त्यामधील पदे रिक्त करणे, भ्रष्टाचाराच्या विरोधात लोकांमध्ये अवेरनेस वाढविणे, आणि लोकांनी पुढे येऊन माहिती देण्यासाठी काही बक्षिस योजना सुध्दा करणे या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करुन हे भ्रष्टाचाराचे वाढत असलेले प्रकार रोखण्याचा प्रयत्न करु.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:45

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सदनासमोर अतिशय चांगली गोष्ट सांगितली की, आपण डी.जी.यांच्या हेडखाली या पैशासाठी तरतूद करु. परंतु त्यांनी असे सांगितले की, याबाबतीत लोक पुढे येत नाहीत. कारण लोकांना अशी भीती वाटते की, ज्याप्रमाणे लाच घेणे हा गुन्हा आहे, त्याप्रमाणे लाच देणे हा सुध्दा गुन्हा आहे. म्हणून जर आपण पुढे गेलो तर आपल्यावर देखील कारवाई होईल काय ? म्हणून आपण याबाबतीत संरक्षण देण्याचे जाहीर केले तर बरेच लोक माहिती देण्यासाठी पुढे येतील. मघाशी असे सांगण्यात आले की, हे हिमनगाचे एक टोक आहे. याच्या पाठिमागे कमिशनर पासून सगळेजण आहेत. याच्या पाठीशी कोण-कोण आहेत या सगळयांची चौकशी होणे गरजेचे आहे. कारण हे एकट्या अभियंत्याचे काम नाही. हा तर एक साधारण असा अभियंता होता.रि-टेंडरींगच्या बाबतीत लोकांना अशी उत्तरे दिली जातात की, हे रि-टेंडरींग आहे, येथे भ्रष्टाचार होऊ शकत नाही आणि मग तेच लोक पेन ड्राईव्हरवर टेंडर काढून संध्याकाळी कॉन्ट्रॅक्टरनां, लोकांना दाखविले जाते. अशा प्रकारची याची ख्याती होती. म्हणून याबाबतीत आपण सखोल चौकशी करुन, सी.आय.डी.मार्फत चौकशी करुन या प्रकरणामध्ये याच्या व्यतिरिक्त मोठे अधिकारी गुंतलेले आहे काय ? याबाबत आपण चौकशी करणार आहात काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी मघाशी हे देखील सांगितले की, आतापर्यात आपण एखाद्या अधिकाऱ्याकडे अधिकची मालमत्ता सापडली तर ती जप्त करीत होतो आणि त्या अधिकाऱ्यावर कारवाई करत होतो. परंतु त्याच्याकडे ही जास्त मालमत्ता कुठून आली, ती त्याला कोणी दिली ? कोणत्या कामासाठी दिली आहे ? याचा देखील आम्ही खोलामध्ये जाऊन तपास करु.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या केसच्या बाबतीत सांगत असताना, यापुढे भ्रष्टाचार कशा प्रकारे रोखता येईल हे सांगितले आहे. पण यामध्ये माननीय मंत्री महोदय, एक महत्वाचा प्रश्न राहून गेला आहे. भ्रष्टाचार करणारे अधिकारी पकडले जातात आणि कोर्टामध्ये कायद्याने ते सुटतात असे आपण सांगितले. अशा प्रकारचे अधिकारी कोर्टामधून सुटतात, तेव्हा त्यांना रि-इन्स्टेट करताना सरकार पुन्हा महत्वाची पदे कशी देते ? नगररचना खात्याचा सहाय्यक संचालक होण्याची संधी मेरिटवर पास झालेल्या माणसाला सुध्दा मिळणार नाही. पण याठिकाणी सदरहू व्यक्तीला 1997 मध्ये पकडण्यात आले, त्यानंतर तुरुंगातून

. . . .2 एफ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर . . ..

बाहेर आला, तो कायद्याने सुटला असेल, परंतु तुरुंगातून सुटल्यानंतर पुन्हा त्या व्यक्तीला ते पद कसे दिले जाते ? तसेच एक पद नसताना, त्याला पुन्हा दोन-दोन पदे कशी बहाल करण्यात येतात. तेव्हा याबाबतीत काही कायदा तयार करण्यात येणार आहे काय ? कारण आम्ही म्हाडा मधील असे अधिकारी पाहिलेले आहेत की, ज्यांना लाचलुचपत घेताना पकडण्यात आले, आपण त्यांना निलंबित केले. कायद्यानुसार ते कोर्टातून सुटून बाहेर आले आणि मग त्यांना पुन्हा चांगल्या पदावर ठेवण्यात आले. तेव्हा शासनाचे अशा प्रकारचे धोरण आहे काय ? तेव्हा सरकारने अशी बाजू मांडलेली आहे की, लोक घरामध्ये बसून पगार घेण्यापेक्षा त्यांच्याकडून काम करुन घ्यावे. पण त्यांना घरामध्ये बसविण्याऐवजी तुम्ही त्यांना प्राईम ठिकाणी पोस्टींग का देत आहात ? अशा प्रकारचे धोरण आखलेले आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, संबंधित व्यक्ती महानगरपालिकेचा कर्मचारी आहे आणि त्यामुळे त्याला सरकारने पोस्टींग दिलेले नाही. या व्यक्तीला सदर पोस्टींग देण्यामध्ये कोणाचा हात होता हे सुध्दा आम्ही तपासून पाहू.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, अधिकाऱ्यांकडे एवढी संपत्ती मिळते. मग तो अभियंता असू दे, दुय्यम अभियंता असू दे, परंतु या अधिकाऱ्यांनी त्यांची संपत्ती, प्रॉपर्टी दाखवावी अशा प्रकारचा नियम करणार आहात काय ? They should declare their property.

श्री.आर.आर.पाटील (खाली बसून) : तसा नियम आहेच.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, तसा नियम असला तरी आपण तो अधिकाऱ्यांना कटाक्षाने पाळावयास सांगणार आहात काय ? आपण त्याची नोंद घेणार काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागामार्फत यावर नियंत्रण ठेवले जाते. अलिकडच्या काळामध्ये लोकप्रतिनिधींना सुध्दा निवडणुकीला उभे रहाताना आपल्या प्रॉपर्टीबाबत ॲफीडेव्हीट करुन, त्या दाखवाव्या लागतात. पण याठिकाणी एक गोष्ट स्पष्ट आहे की, त्यांनी आपली प्रॉपर्टी दाखविलेली नाही. त्यांनी सरकारला योग्य पध्दतीने माहिती दिली नाही म्हणून यासंदर्भात जरी एखादा गुन्हा होत असेल तर तो सुध्दा यांच्या विरोधात नोंदविण्याचा आम्ही प्रयत्न करु.

. . . .2 एफ-3



APR/ MMP/ SBT/ 14:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सरकारी कर्मचाऱ्यांनी आपली मालमत्ता जाहीर केली पाहिजे हा नियम आहे. तशी कायद्यात तरतूद आहे असे माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सांगितले. मग आता असा प्रश्न आहे की, निलंबन वगैरे या भानगडी कशासाठी पाहिजेत ? मला वाटते की, सांगलीतील गृहस्थ श्री.अशोक भालकर, कार्यकारी अभियंता हे कदाचित तुमच्या माहितीतील असतील. अगोदर ते कोल्हापूरला होते, नंतर ते सांगली येथे गेले आणि त्यांच्या घरामध्ये 2,39,916 इतके सापडले. अगोदरच्या प्रकरणामध्ये दहा कोटी रुपये दिले होते, याठिकाणी दोन कोटी रुपये दिले आहेत आणि संबंधितांना 5 लाखाची लाच घेताना पकडण्यात आले आहे. तेव्हा जर कायद्यामध्ये अधिकाऱ्यांनी आपली संपत्ती, प्रॉपर्टी जाहीर करावी अशा प्रकारची तरतूद असेल तर तसे केले पाहिजे. आता आमदारांना तर यासंबंधातील सर्व गोष्टी जाहीरच कराव्या लागतात आणि कोणाकडे काय-काय आहे ? याबाबतची माहिती ऑन लाईन मिळते आणि दुर्दैव असे आहे की, यामध्ये थोडी जरी चूक राहिली आणि जर संबंधितांवर गुन्हा दाखल केला तर त्यांची आमदारकी जाते. त्यामुळे आमदारांच्या दृष्टीने हे सोपे राहिलेले नाही. परंतु आपण अधिकाऱ्यांना संरक्षण कशासाठी देता ? हा माझा प्रश्न आहे. जर अशा प्रकारे अधिकाऱ्यांनी आपली मालमत्ता जाहीर करण्याचे ठरलेले आहे. परंतु त्यांनी जाहीर केलेल्या मालमत्तेपेक्षाही जर प्रचंड बेहिशोबी मालमत्ता असल्याचे दिसून आले तर संबंधितांना निलंबित नाही तर सस्पेंड करावे, त्यांना कार्यमुक्त करावे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MMP/ प्रथम सौ. रणदिवे.... 14:50

श्री. दिवाकर रावते...

निलंबन काळात त्यांना 75 टक्के पगार मिळतो 25 टक्के पगार मिळत नाही. सहा महिन्यामध्ये निलंबनाची चौकशी झाली नाही तर त्याला पुन्हा कायद्याने री-इन्स्टिेट करावे लागते, त्याला ते अरिअर्स देखील मिळतात. म्हणजे बदमाशी करायची, चोरीही करायची, लबाडीही करायची आणि पध्दतशीर पचवायची हा निलंबनाचा मार्ग आहे म्हणून निलंबन हा विषय नकोच. असा प्रकार होणार असेल तर त्याला नोकरीमधूनच काढून टाकण्यात यावे, आणि न्याय मिळाल्यानतर काय ते बघावे. म्हणून या प्रकरणाच्या बाबतीत कायद्यातील तरतुदीचा वापर करुन निलंबन नाही तर त्यांना बढतर्फ करणार काय? असा माझा प्रश्न आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, प्रत्येकाला एक नैसर्गिक न्याय मिळाला पाहिजे ही सिस्टिम आपण स्वीकारलेली आहे. दहा गुन्हेगार सुटले तरी चालतील पण एक निरापराध माणसाला शिक्षा होऊ नये अशी न्याय संकल्पना आपण स्वीकारलेली आहे. आज व्यवहारात असे होत आहे की, दहा गुन्हेगार तर सुटतातच पण निरनराध माणसाला शिक्षा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सभापती माहेदय, शेवटी या सगळया गोष्टी पुराव्यावर अवलंबून आहेत. सभापती महोदय, कोणावर चुकून कारवाई होऊ नये. जी न्यायिक प्रक्रिया सुरु आहे ती पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे हे दोषी आढळले तर निश्चितच यांना नोकरीतून कायमचे बढतर्फ केले जाईल. निलंबित केलेल्या माणसाला 75 टक्के पगार मिळतो ही वस्तुस्थिती आहे. पण अशी माणसे सेवेत ठेवणे हे आणखी धोकादायक आहे. त्यामुळे 75 टक्के पगार गेलेला परवडला पण यांना कामावर ठेवून आणखी जनतेची लूट नको. पगारासाठी पैसे द्यावे लागतात म्हणून त्यांना सेवत घेणेही बरोबर नाही. निकाल होईपर्यंत निर्णय होईपर्यंत निलंबित राहतील निकालात जर दोषी आढळले तर त्यांना सेवेतून बढतर्फ करण्यात येईल.

सभापती महोदय, ॲन्टी करप्शनच्या केसेसमध्ये दोषी सापडल्यावर सुध्दा माणसे निरापराध सुटत आहेत याचे प्रमुख कारण असे की, ज्या लोकांनी तक्रारी केलेल्या असतात त्यामध्ये बऱ्याचवेळा पुढे तडजोडी करण्याची शक्यता निर्माण होते आणि कोर्टात जबाब फिरविले जातात त्यामुळे सुध्दा अशा भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना पाठबळ मिळते आणि ते निरापराध सुटण्यास मदत होते. खूप वेळ गेला तर तक्रार कर्त्यांनाही असे वाटते की, त्यांच्या बायका मुलांच्या अन्नाच्या

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

प्रश्नात आपण यायला नको अशी सहानुभूती निर्माण होते. या ॲन्टी करप्शनच्या ट्रॅपच्या ज्या केसेस आहेत या केसेसचे लवकर निकाल लागण्यासाठी काही उपाययोजना विधी व न्याय विभागाच्या वतीने निश्चितपणाने करण्यात येतील. सभापती महोदय,पाच-पाच वर्षे, दहा-दहा वर्षे हे लोक सस्पेंड राहणार आणि पुन्हा निकाल लागला तर घरात बसून पूर्ण पगार घेणार किंवा बडतर्फ झाले तरीसुध्दा निलंबनाच्या कालावधीतील पगार त्यांना मिळणार म्हणून सरकारचे हे नुकसान होऊ नये यासाठी लवकरात लवकर निकाल लागण्यासाठी याबाबतीतील न्यायालयांची संख्या वाढवणे किंवा ज्या काही गोष्टी कराव्या लागतील त्या अभ्यास करुन करण्यात येतील पण ॲन्टी करप्शनच्या केसेस लवकरात लवकर निकालात निघतील यादृष्टीने शासनामार्फत उपाययोजना करण्यात येतील.

----

...3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जकाती ऐवजी स्थानिकसंस्था कर लागू करणेबाबत

**मु.शी.**: जकाती ऐवजी स्थानिकसंस्था कर लागू करण्यासंबंधी माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री. भास्करराव जाधव ( नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील निवेदन करतो :-

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे )

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अधिवेशन चालू असताना याबाबत आम्ही आधी साडेनऊच्या बातम्यात ऐकले आणि आता सभागृहात निवेदन करण्यात येत आहे.

श्री. भास्कर जाधव : मी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की, आपण माझे असे काहीही ऐकलेले नाही. मी असे बोललोच नाही. उगाच आपण काही तरी काय सांगत आहात ?

डॉ. नीलम गोऱ्हे : आम्ही साडेनऊच्या बातम्यात ऐकले.

श्री. भास्कर जाधव : असे अजिबात होऊच शकत नाही. आपण माझ्याविरुध्द हक्कभंग आणावा. सभागृह चालू असताना मी असे कसे काय बोलीन ? मला सभागृहाचा 25 वर्षाचा अनुभव आहे. सभागृह चालू असताना सभागृहात घोषणा करण्याऐवजी जर मी बाहेर घोषणा केली असेल तर आपण माझ्याविरुध्द हक्कभंग आणावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही घोषणा करण्याचा यांना अधिकारच नाही. माननीय मंत्रिमहोदय श्री. भास्कर जाधव यांना माहीत असेल की, ज्यावेळी यासंदर्भातील विधेयक या ठिकाणी आणले होते ते विधेयक वाचत असताना मी एकट्याने त्याला विरोध केला होता आणि हे करु नका, हे कोणी स्वीकारणार नाही असे सांगितले होते. जकात रद्द केली त्याबाबत तत्कालीन मुख्यमंत्री यांनी त्याचे कसे स्वागत केले हे सर्व मी मांडले होते. त्यावेळेला माननीय मंत्री म्हणून श्री. भास्कर जाधव यांनी ठणकावून सांगितले होते की, आम्ही ते योग्य पध्दतीने अंमलात आणणारच. काही झाले तरी आम्ही मागे हटणार नाही. सर्व प्रोसिडींग या ठिकाणी आहे. मग आता माघार का घेत आहात ? त्यावेळी ते विधेयक थांबवा अशी विनंती मी करीत होतो पण त्यावेळी आपण ऐकले नाही आणि आता सरकारला माघार घ्यावी लागत आहे. प्रत्येक विधेयकाच्या बाबतीत असे व्हावयास लागले तर ते चालणार नाही.

**उपसभापती** : जकातीच्या संदर्भामध्ये खरे तर त्यावेळी आपल्या मताशी सहमत होताना मलाही या आसनावरुन काही बोलावयाचे होते परंतु या ठिकाणी बसल्यानंतर यासंदर्भात बोलावयाचे की नाही याचा मला विचार करावा लागला. त्यामुळे त्यावेळी मी माझे भाष्य केले नाही. परंतु एक गोष्ट निश्चित आहे की, जकातीच्या संदर्भात जे सलग धोरण पाहिजे होते ते

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ......

राज्य शासनाने या ठिकाणी घेतलेले नाही. मला असे वाटते की, आदरणीय श्री. मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना त्यांनी पहिल्यांदा जकात रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर दीड-दोन वर्षाच्या काळातच श्री. नारायण राणे साहेब जेव्हा मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांनी हा निर्णय मागे घेतला. मी आज माझे मतप्रदर्शन एकाच गोष्टीसाठी करीत आहे की, मी स्वत: स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून निवडून येतो. मी स्वत: महापौर राहिलेलो आहे. मी 12 वर्षे नगरसेवक होतो. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शंकररावजी चव्हाण यांनी जी कसबेकर समिती स्थापन केली होती त्यामध्ये सुध्दा मी काम केलेले आहे. त्यामुळे महापालिकांमधील जकात जर काढली तर महापालिकेतील जवळपास सर्व कामे ठप्प होऊ शकतात, हा जिवंत अनुभव आहे. महापालिका जकात देण्याच्या संदर्भात काही ठेकेदार नेमतात तर काही महापालिका स्वत: ते काम करतात. तो महापालिकेचा हक्क आहे. त्यामध्ये काही अडचणी आल्या तर राज्य शासन निश्चितपणे आपला अंकुश ठेऊ शकते. पण मुळात महानगरपालिकांमधून जकातच काढावयाची आणि त्यांना अपंग करावयाचे हे धोरण मात्र बरोबर नाही. याचा पुढे तरी पुनर्विचार केला पाहिजे. आपण अनेक वेळा कायदे करतो आणि ते कायदे बदलतो सुध्दा. व्यापाऱ्यांना त्रास होऊ नये हे मान्य आहे पण महापालिका असो किंवा नगरपरिषदा असो त्यांना ही जकात हवी आहे. राज्य शासनाने त्यांना पर्याय म्हणून काही तरी देण्याचे कबूल केले होते ते देखील कधीही नियमितपणे पार पाडले नाही. आज आपण मिरा-भाईंदर महापालिकेच्या संदर्भात या ठिकाणी घोषणा केली. परंतु या मिरा-भाईंदरमध्ये अशा प्रकारचा कर स्थानिक लोकांच्या मागणीवरुन रद्द करण्यात आल्यानंतर कोणीही सेस रुपाने भरावयाचे रिटर्न्स कधीही महापालिकेकडे भरलेले नाहीत. एवढेच नव्हे तर त्या काळातील देणे सुध्दा व्यापाऱ्यांनी महापालिकेकडे भरलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे आपण विधिमंडळात आल्यानंतर खाली ज्या स्थानिक स्वराज्य संस्था आहेत त्या ठिकाणी आपले जे लोकप्रतिनिधी काम करीत असतात त्याच्याशी देखील विचारविनिमय करुन अशा प्रकारचे निर्णय घ्यावेत. आजच्या या घोषणेच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी जो विचार प्रकट केला की, जकातीच्या बाबतीतील धोरणाचा आपण पुन्हा एकदा पुनर्विचार करावा

..3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ MMP/ KTG

**उपसभापती** .....

आणि यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी. कारण यासंदर्भात आपल्याला सर्वच महापालिकांच्या सर्व पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन पुन्हा एकदा त्यांना हवा तो न्याय देणे क्रमप्राप्त आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी आपली अत्यंत आभारी आहे. आम्हाला सन्माननीय मंत्रिमहोदयांनी विचारले की, आपल्याला विषय कळला का ? सभापती महोदय, आपण एका अत्यंत दुर्लक्षित विषयाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे त्याबदल मी आपले आभार मानते. सभापती महोदय, आतापर्यंत महापालिकांच्या प्रतिनिधींना बोलवून सरकारने बैठका घेतल्या. त्यांचे काय म्हणणे आहे हे पुरेसे ऐकून न घेता निर्णय लादला. त्याबद्दल आम्ही महानगरपालिकांना पैसे देऊ असे सांगितले परंतु ते पैसे अजूनही दिलेले नाहीत आणि परत निर्णय बदललेला आहे. म्हणून मला अशी विनंती करावयाची आहे की, आपल्या उपस्थितीमध्ये यासंदर्भामध्ये सरकारने बैठक बोलवून त्याबद्दल महापालिकांना विश्वासात घेऊन त्यांना जो पर्याय योग्य वाटेल तो स्वीकारण्याच्या संदर्भात निर्णय केला पाहिजे, असे आपण संरक्षण द्यावे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, हा जकातीचा प्रश्न आहे. हा प्रश्न या राज्यापुरता मर्यादित नाही. अन्य राज्यामध्ये सुध्दा महानगरपालिका व नगरपरिषदा आहेत. अनेक राज्यांनी जकात बंद केलेली आहे. त्याला फक्त महाराष्ट्र राज्य अपवाद आहे. नगरपरिषदा व नगरपालिकांनी जकात घेता कामा नये, त्यांना राज्य शासनाच्यावतीने अनुदान दिले जाईल ही भूमिका शासनाने घेतली होती. आता मंत्री महोदयांनी क व ड महानगरपालिकांबाबत शासनाची भूमिका सांगितली आहे. परंतु मुख्य प्रश्न मुंबई महानगरपालिकेचा आहे. बाकीच्या महानगरपालिकांचा प्रश्न वेगळा आहे. मुंबई महानगरपालिकेचे जकात हे मुख्य उत्पन्नाचे साधन आहे. त्या महानगरपालिकेला जकातीपासून 4500 ते 5000 कोटी रुपये उत्पन्न मिळते. शासनाने जकातीसंबंधी धोरण निश्चित करीत असताना महाराष्ट्र हे स्वतंत्र राज्य आहे अशी भूमिका घेता येणार नाही. महाराष्ट्र राज्य सुध्दा देशातील एक राज्य आहे, अशी भूमिका सरकारला घ्यावी लागेल असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी विनम्रपणे सांगतो. यामध्ये थोडासा गैरसमज झ ाला आहे असे मला वाटते. शासनाने जकात वसुली रद्द केलेली नाही. नाका विरहित व लेखेविरहित याच्यातील कंसेप्ट बदलेली आहे. नाक्यावर वजनावर आधारित कर वसूल केला जात होता, त्यासंबंधी येथे चर्चा झाली आहे. आता लेखेविरहित वसुली करणार आहे. त्यावेळी जकातीसंबंधी बोलले गेले ते रेकॉर्डवर आहे. त्याचा आदर करुन दिनांक 1.1.10 पासून जकात सुरु करण्याची घोषणा केली होती. त्यानंतर महानगरपालिकांच्या महापौरांबरोबर नागपूर अधिवेशन काळात चर्चा केली आहे. त्या सगळयांनी 3 महिन्यांची मुदत द्यावी, तोपर्यंत कर्मचा-यांना प्रशिक्षण देऊ, त्याबाबतची कार्यपध्दती समजून घेऊ आणि इतरांना समजावून सांगू असे म्हटले होते. परंतु याबाबत वेगवेगळे मतप्रवाह असल्यामुळे शासनाने हा दृष्टीकोन ठेवला आहे. त्यानुसार राज्यातील केवळ 3 महानगरपालिकांमध्ये या निर्णयाची अंमलबजावणी करुन त्याच्यातून येणा-या अनुभवातून पुढील निर्णय घेतला जाईल, असे सामंजस्याचे धोरण शासनाने घेतले आहे, हे सन्माननीय सदस्यांनी लक्षात घेतले पाहिजे.

-------

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गुळाच्या उत्पादन वाढीमुळे गुळाचे भाव कमी झाल्याने गुळ उत्पादकांचे होत असलेले नुकसान

**मु. शी.** : गुळाच्या उत्पादन वाढीमुळे गुळाचे भाव कमी झाल्याने गुळ उत्पादकांचे होत असलेले नुकसान यासंबंधी सर्वश्री हेमंत टकले, विक्रम काळे, श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पणन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यामध्ये गूळाची आवक वाढणे, तथापि, गुळाचा भाव दिनांक 8 मार्च, 2010 रोजी वा त्यासुमारास क्विंटल मागे 300 रुपयांनी कमी होणे, त्यामुळे गूळ उत्पादकांचे लाखो रुपयांचे नुकसान होणे, तसेच राज्यात यावर्षी अतिरिक्त ऊस उत्पादन झाल्याचे जाहीर करण्यात आल्यामुळे बहुतांशी साखर कारखान्यांकडील ऊस गुऱ्हाळाकडे येणे त्यामुळे गुळाच्या उत्पादनात वाढ होणे, परिणामी गुळाचे दर कमी होणे, व गूळ उत्पादकांना योग्य भाव न मिळाल्यामुळे गूळ उत्पादकांमध्ये निर्माण झालेले तीव्र चिंतेचे व निराशेचे वातावरण याप्रकरणी शासनाने गूळ उत्पादकांना योग्य भाव मिळावा यासाठी केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.हर्षवर्धन पाटील ( पणन मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या देशातील कृषी उत्पादनापैकी ऊसापासून तयार होणारा हा महत्वाचा पदार्थ आहे. साखरेप्रमाणे गुळाला सुध्दा मोठया प्रमाणावर मागणी असते. ब-याच ठिकाणी गुळाचा वापर मोठया प्रमाणात करण्यास सुरुवात झाली आहे. जशी शेती मालाला हमी भाव मिळण्यासाठी उपाययोजना केली जाते त्याप्रमाणे गुळाच्या संदर्भात केली जात नाही, त्यामुळे गूळ उत्पादकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. गुळ उत्पादकांचा प्रश्न 3 जिल्हयापुरता मर्यादित असला तरी हा केंद्र शासनाचा विषय आहे असे सांगून न थांबता त्यांना सुध्दा सोयी सुविधा मिळाल्या पाहिजेत. कोल्ड स्टोरेज वगैरे सोयी निर्माण करुन दिल्या तर गूळ उत्पादकांना दिलासा मिळेल. त्यांच्या उत्पादनाला निश्चित भाव मिळण्यासाठी शासन नवीन योजना हाती घेणार आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : राज्यामध्ये आता मोठया प्रमाणात गुळाचे उत्पादन घेतले जात आहे. मी लेखी निवेदनामध्ये असे नमूद केले आहे. त्यासंदर्भात एखादा ॲग्रीकल्चर एक्सपर्ट झोन निर्माण केला जातो तसा गुळाच्या संदर्भात करण्याची आवश्यकता आहे. कोल्हापूर व सांगली या दोनच जिल्हयामध्ये प्रायोगिक प्रस्ताव तयार करुन तो केंद्राकडे पाठविलेला आहे. परंतु त्यामध्ये त्रुटी असल्यामुळे त्याबाबत अंतिम कार्यवाही होऊ शकली नाही. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी म्हटले आहे की, गुळाच्या भावासंबंधी एखादी समिती असावी.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. हर्षवर्धन पाटील....

कोल्ड स्टोरेज, ग्रेडिंग अशा प्रकारच्या सुविधा निर्माण करीत आहोत. आता आर्ग्यानिक फार्मिगमधील गुळ मोठया प्रमाणात बाजारात यावयास लागला आहे. तेव्हा अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत राज्य सरकार पुढकार घेईल.

श्री. अरुण गुजराथी : निवेदनामध्ये साठवणुकीच्या संदर्भात माहिती दिलेली आहे. गोडाऊन्स केले जातील, आधुनिक कोल्ड स्टोअरेज केली जातील असे सांगितलेले आहे. तातडीची उपाययोजना म्हणून मार्केटिंग फेडरेशन, नाफेड किंवा मार्केट इण्टरप्शन या माध्यमातून गुळाला योग्य भाव देण्याची कारवाई शासन करणार आहे काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : मार्केट इण्टरव्हेन्शनच्या माध्यमातून एमएसपीच्या माध्यमातून भाव देण्याच्या संदर्भात अशी अडचण आहे की, गुळाला हमी भाव देण्याच्या संदर्भात अद्यापपर्यन्त कोणताही निर्णय झालेला नाही. तातडीची उपाययोजना करण्याच्या संदर्भात लातूर मार्केट कमिटी असेल, सांगली मार्केट कमिटी असेल किंवा कोल्हापूरची मार्केट कमिटी असेल, जेथे जेथे गुळाची आवक मोठया प्रमाणात आहे त्या मार्केट कमिटयांच्या बैठका ताबडतोबीने बोलाविल्या जातील. आता डीएमआय नावाची स्कीम केन्द्र शासनाने घोषित केलेली आहे. त्या माध्यमातून अशा प्रकारच्या सुविधा संपूर्ण मार्केट कमिट्यामध्ये सुरु करण्यासाठी पणन मंडळ निश्चितपणे पुढाकार घेईल.

श्री. जयंत प्र. पाटील : गुळाचे दोन प्रकार असतात हे माननीय मंत्री महोदयांना माहीत आहे काय ? काळ्या गुळाला सरकार संरक्षण देणार आहे काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : गुळाच्या एका प्रकाराबद्दल मला माहिती आहे आणि त्यासंबंधी मी उत्तर दिलेले आहे. दुस-या प्रकारच्या गुळाची माहिती घेण्यासाठी माननीय गृह मंत्र्यांची मदत घेण्यात येईल.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : जळगाव जिल्ह्यातील सावदा येथील बंद असलेले केळी प्रक्रिया केन्द्र

**मु.शी.** : जळगाव जिल्ह्यातील सावदा येथील बंद असलेले केळी प्रक्रिया केन्द्र यासंबंधी श्रीमती मधु जैन, सर्वश्री चरणसिंग सप्रा व संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती मधु जैन (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पणन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"जळगाव जिल्हयातील सावदा येथे असलेले केळी प्रक्रिया केंद्र माहे नोव्हेंबर, २००९ पासून बंद असणे, त्यामुळे केळी प्रक्रिया व निर्यातही बंद असल्याचे दिनांक २८ फेब्रुवारी, २०१० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, सुमारे पाच कोटीं रुपये निधी खर्च करुन बांधण्यात आलेल्या केळी निर्यात सुविधा केंद्रातून वर्षभरात केवळ पाच कंटेनर परदेशात रवाना झाले असणे, सावदा शहर परिसरातील असलेल्या बाजारपेठेद्वारे १०० टन केळींवर प्रक्रिया करण्याची क्षमता असणे, त्याठिकाणी दररोज मालट्रक व आठवडयातून दोन ते तीन वेळा रेल्वेवॅगनद्वारे केळीचा व्यापार देशांतर्गत होत असणे, खानदेशातील केळीला परदेशात स्थान मिळावे यादृष्टीने कृषि, पणन मंडळाने सावदा येथे प्रक्रिया केंद्र चालू करणे, परंतु संस्थाचालकांच्या इच्छाशक्तीच्या अभावामुळे कोणत्याही केळी व्यापारावर परिणाम होणे, याबाबत केळी उत्पादकांचे होत असलेले नुकसान थांबवून सदर केंद्रावर सक्षम अधिकारी नेमण्याची आवश्यकता, तसेच सदरहू केंद्र सुरु करण्याकरीता केलेली वा करावयाची कार्यवाही, व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. हर्षवर्धन पाटील (पणन मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मधु जैन : सभापति महोदय, जलगांव जिले के सावदा में केला प्रक्रिया केन्द्र शुरु हुआ था, ताकि वहां पर केले की प्रक्रिया होकर उसका निर्यात किया जाए और शेतकरी को अच्छा भाव मिले. यह केन्द्र नवम्बर से बंद है. मैंने प्रश्न पूछा था कि इस केन्द्र को शुरु कने के लिए सरकार ने क्या कार्रवाई की है या क्या कार्रवाई करने वाले हैं. मंत्री महोदय ने जबाब में लिखा है "सुविधेचा अधिक वापर होण्यासाठी व या भागातील निर्यातक्षम केळीच्या उत्पादनात वाढ होण्यासाठी केळी उत्पादांसाठी विशेष मार्गदर्शन शिबीर वेळोवेळी घेण्यात येत असून केळी निर्यातीमध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्नशील आहे." माझा प्रश्न असा आहे की, केळी प्रक्रिया केन्द्र बंद असताना मार्गदर्शन शिबीराचा काय उपायोग होणार आहे ? हे बंद असलेले केन्द्र सुरु करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे ? तसेच तेथे तातडीने सक्षम अधिकारी नियुक्त करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे ? करपा रोगाचा प्रादुर्भाव सहा महिन्यासून सुरु झालेला आहे. त्या रोगावर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : आपण उभी केलेली सेंटर्स् काही संस्थांना चालविण्यासाठी देण्यात आली. अशा प्रकारे अेएफझेड 11-12 ठिकाणी राज्यात सुरु केले. सुविधा निर्माण करण्याचे काम सरकारने करावे आणि स्थानिक संस्थांनी ते सेंटर चालविण्यासाठी पुढाकार घ्यावा असे शासनाचे धोरण होते. त्यानुसार स्थानिक संस्थांना केन्द्र चालविण्यासाठी दिले. परंतु ते सतत चालत नाही, हे खरे आहे. हे सेंटर कायमस्वरुपी चालविण्यासाठी पणन मंडळ पुढाकार घेईल. शेतक-यांना केळी पिकविण्याचे प्रशिक्षण देणे आणि केन्द्र चालविण्याकरिता प्रशिक्षित स्टाफ उपलब्ध करुन देणे या दोन गोष्टी आहेत. याबाबतीत दक्षता घेण्यात येईल. त्याठिकाणी सेपरेट अधिकारी असावा अशी सन्माननीय सदस्यांनी केलेली मागणी मान्य करता येईल.

श्री. अरुण गुजराथी : एक चांगल्या प्रकारची योजना केल्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. या संस्थेकडे 5 कंटेनर आणि 192 टन केळी आहेत. रोज रेक भरली जाते. एवढया मोठ्या प्रमाणात केळी उत्पादन होते. भारतात इतर ठिकाणी ही केळी जातात.

...नंतर श्री. भोगले....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ KGS/ 15:10

लक्षवेधी सूचना क्र.4....... श्री.अरुण गुजराथी....

त्याला प्रोत्साहन देण्याची गरज आहे. त्या संदर्भात शासनाने विचार करावा. शासन केळी हे फळ म्हणून त्या संदर्भातील धोरण जाहीर करेल काय? केळी हे फळ आहे. त्या फळाला विमा उतरविण्याच्या संदर्भात शासनाने परवानगी दिली तर विमा कंपन्या विमा घेऊ शकतील.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या केंद्रामध्ये अपेक्षेप्रमाणे माल वितरीत करण्यात आलेला नाही ही गोष्ट खरी आहे. आता युनिफ्रिटी नावाची कंपनी आहे जी कंपनी 2-2 मे.टनपेक्षा अधिक माल निर्यात करते. परदेशात सुध्दा आपल्या केळीबाबत मागणी वाढू लागली आहे. या कंपनीशी विचारविनिमय करु आणि हे केंद्र सुरु करण्यासाठी टॉप प्रायॉरिटीने मार्ग काढू. केळी हे फळ जाहीर करण्याची मागणी केली आहे. या संदर्भातील फ्रूट नोटिफिकेशन काढण्याचा अधिकार केंद्र शासनाचा आहे. आपण वारंवार या संदर्भात केंद्र सरकारकडे मागणी केली. ती मंजूर होण्यात अडचण वाटत नाही. केळी हे फळ म्हणून घोषित करण्यास काही अडचण नाही. शासन पुढाकार घेऊन केळी हे फळ आहे या संदर्भातील नोटिफिकेशन केंद्र शासनाने काढावे या संदर्भात राज्य सरकार निश्चितपणे पाठपुरावा करेल. केंद्रीय कृषिमंत्री महोदयांना प्रस्ताव दिलेला आहे. त्याबाबत सुध्दा पाठपुरावा करुन घोषित करण्यासाठी पुढाकार राहील. विम्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला आहे. निश्चितपणे कृषि विभाग आणि पणन विभागाकडून एकत्रितपणे विमा पॉलिसीमध्ये केळी पिकाचा अंतर्भाव व्हावा अशा प्रकारची भूमिका मांडण्यात येईल.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक-5 पुढे ढकलण्यासंबंधी**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय पर्यावरण मंत्री किंवा राज्यमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात यावी.

**उपसभापती** : ठीक आहे. आजच्या कामकाजपत्रिकेतील लक्षवेधी सूचना क्रमांक-5 नंतर घेण्यात येईल.

---

..3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**विशेष उल्लेख**</u>

**पृ. शी.** : शालेय पोषण आहार योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून स्वयंपाक गृहाचे बांधकाम करण्यासाठी प्राप्त झालेला निधी अखर्चित असणे

**मु. शी.** : शालेय पोषण आहार योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून स्वयंपाक गृहाचे बांधकाम करण्यासाठी प्राप्त झालेला निधी अखर्चित असणे याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

केंद्र सरकारच्या शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात येणारे अन्न शिजविण्यासाठी केंद्र सरकारकडून 2008-09 या सालात राज्यातील 38,048 शाळांच्या स्वयंपाकगृहासाठी 228 कोटी 28 लाख 80 हजार इतका निधी उपलब्ध झालेला आहे. मात्र या स्वयंपाकगृहाच्या बांधकामासाठी निविदाधारक मिळत नसल्यानेच हा निधी वापराविना पडून आहे.

नव्याने निविदा मागविण्यासाठी राज्यस्तरीय समितीची स्थापना करुन या स्वयंपाकगृहाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी शिक्षण संचालक यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करुन या निधीचा वापर तात्काळ करण्यासाठी राज्य शासनाने एक अध्यादेश जारी केला आहे.

स्वयंपाकगृहासाठी प्रत्येक शाळेला 60 हजार रुपयांचे अनुदान देण्यात येते. स्वयंपाकगृह बांधकामासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेला निधी ग्रामशिक्षण समितीस हस्तांतर करुन स्वयंपाकगृहे बांधण्याचा शासनाने निर्णय घेतला होता. मात्र ही बांधकामे ग्रामशिक्षण समितीमार्फत वेळेत पूर्ण न झाल्याने केंद्र शासनाने मंजूर केलेल्या निधीतील एक छदामही वापरला नाही. याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

-------

नंतर 2एल.1.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मौजे धामापूर (जि. सिंधुदुर्ग) येथील शिवकालीन तलावामध्ये पाण्याचा साठा न होणे

**मु. शी.** : मौजे धामापूर (जि. सिंधुदुर्ग) येथील शिवकालीन तलावामध्ये पाण्याचा साठा न होणे याबाबत श्री. सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

मौजे धामापूर (ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग) येथे असलेल्या शिवकालीन तलावाला शासनाने शासन निर्णय क्र. एस-95/104001/आय(4), दि. 17.4.1975 अन्वये अधिसूचित करण्यात आले असून, या तलावाची 2.44 द.ल.घ.मी. पाणी साठवण क्षमता असूनही मालवण शहर, धामापूर, काळसे व इतर गावांना फक्त 0.22 द.ल.घ.मी. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याचे नुकतेच आढळून आले. हा तलाव सांडवा जांभा दगडांनी बांधलेला असल्याने सांडव्याच्या बांधकामातून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती सुरु होत आहे. सध्या राज्यात सर्वत्र पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झालेली असताना या तलावातून अनेक लिटर पाण्याची गळती होऊन पाणी वाया जात आहे. प्रणालीमध्ये माती व गाळ साचल्याने लाभार्थी शेतकऱ्यांना हा तलाव पूर्णपणे भरुन देखील सिंचनासाठी पाणी पुरवठा होत नसल्याचे आढळून आले आहे. कोकणात भरपूर पाऊस पडूनही पाणी साठा करण्याबाबत योग्य ती उपाययोजना नाही. यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई होणे, पीके सुकून जात असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी दाहीदिशा फिरावे लागत आहे. तसेच धामापूर हे गांव पर्यटन स्थळ असून हा तलाव शिवकालीन असल्याने पर्यटकांची येथे नेहमी गर्दी असते. त्यांनाही पिण्याच्या पाणी टंचाईला सामोरे जावे लागणे, म्हणूनच स्थानिक लोकप्रतिनिधींनी व ग्रामस्थांनी सदर तलावाची त्वरित दुरुस्ती करण्याबाबत संबंधितांकडे वारंवार मागणी करुनही विभागाकडून संबंधित बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळूनही याकडे विशेषत:

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ......

नियोजन व जलसंपदा विभागाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे तेथील ग्रामस्थांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, सबब सदर तलावाची दुरुस्ती व कालव्याचे बांधकाम त्वरित करण्याची आवश्यकता, याकरिता मी हा विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे.

--------

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शासनाने साहित्य सम्मेलनातील ठरावांप्रमाणे पाठपुरावा व कृती करणे

**मु. शी.** : शासनाने साहित्य सम्मेलनातील ठरावांप्रमाणे पाठपुरावा व कृती करणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

83 वे अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलनात सात महत्वपूर्ण ठराव करण्यात आले. महाराष्ट्रातील साहित्यप्रेमी व ऐतिहासिक सम्मेलनातील या सातही ठरावांची अमलबजावणी शासनाने करावी व त्यावर लवकरात लवकर निर्णय तसेच आवश्यक ती तरतूद करण्यात यावी, याकडे लक्ष या विशेष उल्लेखाद्वारे वेधत या ठरावांचा उल्लेख करताना खंत व्यक्त करणे गरजेचे वाटते की, जर्मन बेकरी बॉम्बस्फोटातील दिवंगतांना श्रध्दांजली वाहिली गेली नाही. त्यासोबत निमंत्रित करुनही माननीय मुख्यमंत्री नामदार श्री. अशोक चव्हाण तर निमंत्रितच न गेल्याने उपमुख्यमंत्री नामदार श्री. छगन भुजबळ हे उपस्थित राहिले नाहीत. या सम्मेलनात पुढीलप्रमाणे ठराव करण्यात आले :--

1. दिवंगत व्यक्तिंना श्रध्दांजली अर्पण करणे,
2. सीमावर्ती भागातील मराठी भाषिकांना न्याय मिळवून देण्यासाठी सतर्क रहावे,
3. परदेशातील मराठी माणसांना शिक्षणाची सोय करण्यासाठी अंबेजोगाई येथे आद्यकवी "मुकुंदराज" यांच्या नावाने मराठी विद्यापीठाची स्थापना करावी.
4. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी मार्सिलेस बंदरातून उडी मारली त्या ठिकाणी त्यांच्या नावाचे स्मारक होण्यासाठी राज्यशासनाने पुढाकार घ्यावा.
5. वाचन संस्कृतीच्या विकासासाठी ग्रंथालयातील ग्रंथसेवकांना सेवा, शाळेत ग्रंथपालांची नियुक्ती करावी.

....4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

6. पुणे विद्यापीठाला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव द्यावे.

7. मराठी साहित्य संस्थांना सरकारने आर्थिक मदत करावी.

अशा ठरावांचा पाठपुरावा व कृती शासनाने त्वरित करुन तशी प्रत मला व साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष मा. श्री. द.भि.कुळकर्णी यांना पाठविण्यात यावी, अशी मी विनंती करीत आहे.

त्याचबरोबर माझी अशी विनंती आहे की, माननीय गृह मंत्र्यांनी या ठरावांच्या संदर्भात तातडीने कृती करावी व आवश्यक तो पाठपुरावा करावा.

श्री. आर.आर.पाटील : महोदय, राज्यातील विचारवंत, साहित्यिक जी मते व्यक्त करतात त्यासंबंधी शासन नेहमीच गांभीर्याने कार्यवाही करीत असते. तसेच आता देखील या ठिकाणी झ ालेल्या ठरावांच्या माध्यमातून जे निर्णय घेतले आहेत........

श्री. दिवाकर रावते : महोदय, माननीय गृह मंत्र्यांनी अत्यंत गांभीर्याने सांगितले की अशा प्रकारे जे ठराव घेण्यात येतात किंवा मते व्यक्त केली जातात त्यांचा ते नेहमीच आदर करीत आहेत. मग माझी या अनुषंगाने अशी मागणी आहे की, गेल्या 10 वर्षातील जे जे ठराव साहित्य सम्मेलनांच्या माध्यमातून घेण्यात आले आहेत त्यांच्या बाबतीत कोणती भूमिका शासनाने घेतली त्यांची यादी त्यांनी मला द्यावी.

श्री. आर.आर.पाटील : ठीक आहे, ती यादी सन्माननीय सदस्यांना खाजगीत देण्यात येईल. महोदय, साहित्यिकांनी जे जे ठराव केले त्यांचा शासन गांभीर्याने विचार करीत असून त्यांच्या संदर्भात तातडीने कृती करणे शक्य असेल ते ते करण्याचा प्रयत्न केला जाईल.

-------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मागासवर्गीयांची सहयाद्री महामंडळाच्या कर्जाची थकबाकी माफ करणे

**मु. शी.** : मागासवर्गीयांची सहयाद्री महामंडळाच्या कर्जाची थकबाकी माफ करणे याबाबत श्री. विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्य श्री. विनोद तावडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. विनोद तावडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

महोदय, 86 लाख मागासर्गीयांच्या सहयाद्री महामंडळाच्या कर्जाची थकबाकी माफ करण्याच्या निर्णयाबाबत मला विशेष उल्लेख मांडण्यास परवानगी द्यावी ही विनंती.

सभापती महोदय, 86 लाख मागासवर्गीयांची थकबाकीच्या संदर्भातील निर्णय 19 जुलै, 2009 रोजी कॅबिनेटच्या बैठकीत घेण्यात आला होता. यामध्ये जवळ जवळ 1195 कोटी रुपयांची थकबाकी माफ करण्याचा निर्णय त्यावेळी सरकारने केला होता. 19 जुलै, 2009 रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मागासवर्गीयांची थकबाकी माफ करण्याबाबत जो काही निर्णय झाला तो पुढील 15 दिवसात अंमलात आणला जाईल असे आदेश माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले होते. राष्ट्रीय महामंडळाशी एक रकमी तडजोड करण्यासाठी प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली 7 सचिवांची समिती सुध्दा स्थापन करण्यात आली होती. निवडणूक झाली, सरकारने मते घेतली परंतु त्यानंतर या समितीची एक सुध्दा बैठक झाली नाही. त्यामुळे 31 मार्च ,2008 रोजीच्या थकबाकीत 86,45,065 मागासवर्गीय लाभार्थी अडकून पडलेले आहेत. मागासवर्गीयांची थकबाकी माफ करण्याचा जो निर्णय शासनाने घेतलेला आहे त्याची शासनाने त्वरित अंमलबजावणी करावी कारण यावर्षी 3461 कोटी रुपये समाज कल्याण खात्याला मिळालेले आहेत. हे पैसे वेळेत मिळाले नाही तर शेवटच्या तीन महिन्यात दादागिरीने दादांच्या खात्यात पैसे जात असतात. त्यामुळे वर्षाच्या सुरुवातीलाच मागासवर्गीयांची थकबाकी माफ झाली पाहिजे. मागासवर्गीयांची थकबाकी माफ करण्याच्या संदर्भात शासनाने जो काही निर्णय घेतलेला आहे तो त्वरित लागू करावा. नाही तर शाहू, फुले आणि आंबेडकराचे नाव घेऊन सरकार चालते त्या शब्दाला आपण जागलो असे आम्हाला वाटेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

**पृ. शी.** : आंबा,काजू बी, काजू बोंड पिकाला हमी भाव मिळण्याबाबत.

**मु. शी.** : आंबा, काजू बी, काजू बोंड पिकाला हमी भाव मिळणे याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

कोकणातील प्रमुख फळ, जगप्रसिद असलेला आंबा, या आंब्यावरती बदलत्या हवामानामुळे येणारे कमी पीक, त्याप्रमाणे अवेळी किंवा उशिरा येणारा आंबा, आंब्याची आवक ज्या काळात मोठया प्रमाणात होते त्यावेळी आंबा बागायतदार आंबा कॅनिंग किंवा फळप्रक्रियेला किलोवर विकला जातो. त्यावेळी हमी भाव मिळण्याकरिता तसेच काजू बी व काजू बोंडांना हमी भाव मिळण्याकरिता कृषी विभागाने ठोस पावले उचलण्याबाबत शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे.

सभापती महोदय, कोकणातील जगप्रसिध्द असलेल्या आंब्याला बदलत्या हवामानामुळे कमी जास्त पीक येते. आंब्याची जेव्हा जास्त आवक होते त्यावेळी आंबा कॅनिंगला जातो व त्यामुळे आंब्याला फार कमी भाव मिळतो. त्यामुळे आंब्याला कापूस आणि ऊसाप्रमाणे हमी भाव मिळावा यासाठी शासनाने उपाययोजना करावी यासाठी मी विशेष उल्लेख मांडीत आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.00 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 3.22 ते 4.00 मध्यंतर )

----

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( मध्यंतरा नंतर )

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ. शी.** : राज्य सुरक्षा महामंडळ विधेयक.

**मु. शी.** : L.C. BILL NO. III OF 2010

(A BILL TO PROVIDE FOR THE ESTABLISHMENT AND REGULATION OF THE MAHARASHTRA STATE SECURITY CORPORATION IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO)

श्री.रमेश बागवे( गृह राज्य मंत्री ) :सभापती महोदय, सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 3 - महाराष्ट्र राज्यात, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची स्थापना करण्यासाठी आणि त्याचे विनियमन करण्यासाठी तसेच तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 3 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ SBT/ MMP/ KTG/

**पृ.शी. : कामगारांचा किमान घरभाडे भत्ता ( सुधारणा ) विधेयक**

**मु. शी.** : L. C. BILL NO. IV OF 2010

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA WORKMEN'S MINIMUM HOUSE-RENT ALLOWANCE ACT, 1983)

श्री. पद्माकर वळवी (कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 4 महाराष्ट्र कामगारांचा किमान घरभाडे भत्ता अधिनियम, 1983 यात सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 4 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील बिघडलेली कायदा व सुव्यवस्था

**मु.शी.**: राज्यातील बिघडलेली कायदा व सुव्यवस्था या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, श्री. केशवराव मानकर, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर, पाशा पटेल, किरण पावसकर, अनिल परब यांचा प्रस्ताव

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो. :

"गेल्या काही महिन्यांपासून राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे धोक्यात येणे, दिनांक २६ नोव्हेंबर रोजी मुंबईवरील हल्ल्याची घटना घडलेली असताना दिनांक १३ फेब्रुवारी, २०१० रोजी पुणे येथील जर्मन बेकरी बॉम्बस्फोटामध्ये १७ नागरिकांचा बळी जाणे, सदर बॉम्बस्फोटामध्ये सहभागी असलेल्या एकाही सूत्रधाराचा पोलीसांना अद्यापही शोध न लागणे, दिल्लीमध्ये झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणी इंडियन मुजाहिद्दीन संघटनेचा प्रमुख संशयित आरोपी शहजाद आणि जुनेद यांना आपल्या राज्यातील लोकप्रतिनीधींकडून आर्थिक मदत मिळणे, कुख्यात गुन्हेगारांचा तपास करण्यास पोलीस अधिकाऱ्यांमध्ये एकवाक्यता नसणे, पोलीस अधिकाऱ्यांमध्ये गटबाजी असणे, घातपात घडवून आणणाऱ्या गुन्हेगारांना अटक करण्यासाठी व घातपाती कारवायांवर आळा घालण्याऐवजी पोलीस वसई-विरारमधील जनआंदोलन, मिरज - सांगलीमधील हिंदुत्ववाद्यांचे आंदोलन,मुंबईतील चित्रपट प्रदर्शना विरोधात झालेले उस्फूर्त आंदोलन अशी विविध जनआंदोलने दंडुकेशाहीने दडपण्यासाठी आपली कार्यक्षमता वापरणे, वसई-विरार महा□रपालि□तू ५३ □ांवे व□ळ□यासाठी लो□शाही मार्गाने उपोष□ □र□ाऱ्या विवे□ पंडितांच्या □ुटुंबियांना तसेच त्यांच्या □ार्य□र्त्यांना पोलीसांनी अमानुष मारहा□ □र□, वाघोली, मर्देस या □ावात घुसून पोलीसांनी निरपराध महिलांना मारहा□ □र□, निरपराधांना संर□□ दे□याऐवजी त्यांची सुर□तता धोक्यात आ□□, लोकशाही पध्दतीने केली गेलेली आंदोलने पोलीस बळाचा वापर करुन चिरडण्याच्या घटनांमुळे राज्यातील सामान्य जनतेमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची व संतप्तेची भावना, लोकशाहीचे रक्षण करण्यात व कायदा-सुव्यवस्था राखण्यात शासनास आलेले अपयश याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, विधीमंडळाच्या प्रत्येक अधिवेशनामध्ये या राज्यातील बिघडलेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नासंबंधी चर्चा करण्यासाठी प्रस्ताव मांडण्याची पाळी आमच्यावर येते हे आमचे दुर्दैव आहे. याचे कारण असे की, विधीमंडळाच्या दोन अधिवेशनाच्या मधल्या कालावधीत या राज्यामध्ये काही ना काही कारणांनी घटना घडत असतात. हे अधिवेशन सुरु झाल्यानंतर या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या इतिहासामध्ये कधीही घडले नसेल इतकी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली. मी गेल्या 30 वर्षापासून या विधीमंडळामध्ये येत आहे. आतापर्यंत एवढी कडक सुरक्षा व्यवस्था मी कधीही पाहिलेली नव्हती. या विधान भवनाला, या लोकशाहीच्या मंदिराला पोलिसांच्या छावणीचे स्वरुप देण्याची पाळी या राज्यकर्त्यांवर यावी ही खऱ्या अर्थाने नामुष्कीची आणि दुर्दैवाची गोष्ट आहे. याचे कारण असे की, हे अधिवेशन सुरु होण्याअगोदर अतिरेक्यांकडून अनेक प्रकारच्या धमक्या देण्यात आल्या. मंत्रालय उडवून देऊ, विधानभवन उडवून देऊ, येथील प्रकल्प उडवून देऊ अशाप्रकारच्या धमक्या सतत या राज्यामध्ये सुरु आहेत. दि.26.11 च्या मुंबईवरील हल्ल्यानंतर हे राज्य सतत दहशतीच्या वातावरणामध्ये वावरत आहे. दि.26.11. ची घटना घडल्यानंतर या राज्य सरकारने आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार केला असे मला वाटले. परंतु हा आराखडा तयार करण्याचे नाटक या राज्य सरकारच्या वतीने करण्यात आले. त्यामुळे हे राज्य सुरक्षित झाले असे वाटले होते. परंतु मध्यंतरी केंद्रीय गृह सचिवांनी राज्य सरकारला तंबी दिल्याची बातमी वर्तमानपत्रामध्ये छापून आली. दि.26.11 चा मुंबईवरील हल्ला झाल्यानंतर आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करुन तो सादर करण्याचे निर्देश केंद्र सरकारने महाराष्ट्राच्या गृह विभागाला दिले होते. परंतु तब्बल तीन वर्षे गृह विभागाने हा आराखडा सादर केला नाही. ही बातमी दै. नवशक्ती या वर्तमानपत्रामध्ये छापून आली. केंद्रीय गृह सचिवांनी वारंवार पाठपुरावा करुन सुध्दा महाराष्ट्राचा गृह विभाग ढिम्म बसून आहे. त्यामुळे येत्या चार दिवसात हा अहवाल सादर न केल्यास त्याचे गंभीर परिणाम या देशाला सोसावे लागतील असा इशारा केंद्र सरकारने महाराष्ट्राला दिला.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे . . ..  16:10

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

सभापती महोदय, असा इशारा दिल्यानंतरही त्याची अंमलबजावणी झाली नाही आणि मग त्याचा परिणाम असा झाला की, दि.13 फेब्रुवारी 2010 रोजी पुण्यातील जर्मन बेकरीमध्ये बॉम्ब स्फोट झाला. केंद्रीय गुप्तचर विभागाने राज्य गुप्तचर वार्ता व एटीएस यांनी पुण्याचे पोलीस आयुक्त श्री.सत्यपाल सिंग यांना जानेवारी 2009 मध्ये व त्यानंतर वेळोवेळी आतंगवादी हल्ला होणार असल्याची कल्पना दिलेली होती. कोरेगाव पार्क, छाबडा हाऊस, पोलीस आयुक्त कार्यालय, ओशो आश्रम व लाल देऊळ जे ज्युईस लोकांचे प्रार्थनास्थळ आहे, ही सर्व ठिकाणे अतिरेक्यांच्या हिट लिस्टवर आहेत असे या पत्रामध्ये नमूद केले होते आणि त्याठिकाणी त्यांनी असेही सांगितले होते की, अतिरेकी डेव्हीड हेडली याने मुंबईच्या पाठोपाठ पुण्यातील वरील ठिकाणांची पहाणी सुध्दा केलेली आहे याचीही सूचना पोलिसांना दिलेली होती. केंद्रीय गुप्तचर यंत्रणेने डेव्हीड हेडली हा पुण्यातील "सूर्यव्हीला" या हॉटेलमध्ये थांबल्याचे सांगितले होते म्हणजे तो कुठे थांबला होता तेही नमूद केले होते. पुण्यातील "सूर्यव्हीला" या हॉटेलमध्ये थांबून त्याने जर्मन बेकरी मधून जेवणही घेतले होते असाही उल्लेख केला होता.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : नशीब तो आमदार निवासामध्ये थांबला नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, पुणे पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यांकडे ही शक्यता व्यक्त केली. डेव्हीड हेडली ज्या "सूर्यव्हीला" हॉटेलमध्ये थांबला होता, तेथून जर्मन बेकरी जवळ आहे आणि या जर्मन बेकरीमध्ये विदेशी नागरीक सतत येत असतात. याचे कारण असे की, त्या ठिकाणी कोरेगाव पार्क, छाबडा हाऊस, ओशो आश्रम, लाल देऊळ जवळ आहे आणि मघाशी सांगितल्याप्रमाणे ही सर्व ठिकाणे अतिरेक्यांच्या हिट लिस्टवर असल्यामुळे तेथे तपासणी करणे गरजेचे असतानाही तेथील पोलीस आयुक्तांनी याची गंभीर दखल घेतल्याचे दिसत नाही. त्यामुळेच पुण्यातील या बॉम्ब स्फोटामध्ये 17 निरपराध नागरीक मरण पावले आहेत आणि 80 हून अधिक नागरीक जखमी झाले आहेत. यामध्ये सर्वात महत्वाची आणि खेदजनक बाब अशी आहे की, पुणे पोलीस आयुक्त डॉ.सत्यपाल सिंग यांनी आपल्या स्वत:च्या संरक्षणासाठी म्हणजे आता पोलीस आयुक्तांना स्वत:चे संरक्षण करण्याची वेळ यावी हे आश्चर्य आहे. त्यांनी आपल्या स्वत:च्या संरक्षणा साठी आपल्या कार्यालयाबाहेर 4 अधिकारी, 50 पोलीस आणि 10 एके-47 रायफल, 20 एसएलआर आणि अधिक 500 राऊंड एवढा प्रचंड पोलीस बंदोबस्त त्यांनी आपल्या कार्यालयाच्या

. . . .2 पी-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

भोवती लावला होता. पुण्यातील जी-जी ठिकाणी अतिरेक्यांच्या हिट लिस्टवर आहेत, त्या-त्या ठिकाणी जर हा बंदोबस्त लावला असता तर कदाचित ही घटना घडली नसती आणि पुणेकरांना जे भोगावे लागले ते भोगण्याची पाळी त्यांच्यावर आली नसती. पण माननीय गृहमंत्री श्री.आर.आर. पाटीलसाहेब मी सांगू इच्छितो की, डॉ.सत्यपाल सिंग यांनी याकडे दुर्लक्ष केले. पुण्यातील बॉम्ब स्फोटापूर्वी दिल्लीमध्ये बॉम्ब स्फोट झाला होता. या स्फोटामध्ये तेथील आरोपी हा "बाटला हाऊस" मध्ये लपलेला आहे अशी बातमी समजताच दिल्लीच्या पोलिसांचे ताबडतोब तेथे पथक घेतले आणि त्याचा शोध घेतला. त्यावेळी तेथे पोलिसांबरोबर चकमक झाली. त्यामध्ये दोन आरोपी ठार झाले आणि दोन आरोपी फरार झाले व ते दि.11 ऑक्टोबर 2008 रोजी लखनौ मार्गे मुंबईमध्ये आले आणि दि.12 ऑक्टोबर 2008 रोजी ते मुंबईतील कुलाबा येथे एका व्यक्तीला भेटले. ही व्यक्ती कोण आहे ? त्या व्यक्तीने त्यांना पैसे दिले. त्यांच्या निवासाची व्यवस्था केली. हे सर्व पोलिसांच्या तपासामध्ये आढळून आलेले नाही तर वर्तमानपत्रामध्ये सुध्दा ही बातमी प्रसिध्द केली. ज्या व्यक्तीच्या घरी आतंगवादी गेले, ती व्यक्ती कोण होती याचा तपास माननीय गृहमंत्री श्री.आर.आर. पाटीलसाहेब, आपण लावला असेल. ही व्यक्ती कोण आहे हे सदनाला समजले पाहिजे. ज्या व्यक्तीशी श्री.शहजाद व श्री.जुनैद यांचे संबंध कधीपासून होते ? हे संबंध कसे जुळले ? याचा आपण तपास केला असेल किंवा जर तपास केला नसेल तर तो तपास झाला पाहिजे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SMT/ MMP/ SBT/ प्रथम सौ. रणदिवे... 16:15

श्री पांडुरंग फुंडकर.....

सभापती महोदय, नेतेपदाच्या बुरख्यात लपून जर कोणी असे कृत्य करणार असेल तर ते घातक आहे. संशयीत आरोपीच्या कुटुंबियांना माणुसकीच्या दृष्टिकोनातून भेटलो असे समाजवादी पार्टीचे नेते श्री. आबु आझमी यांनी जाहीर केले होते त्याबाबतची बातमी वर्तमानपत्रात आली होती. सभापती महोदय, किती हिंमत? त्यांनी असे म्हटलेले आहे की, "बटाला हाऊस चकमकीतील संशयीत आरोपी शहजाद्याला आपण पाहिलेले नाही वा भेटलेलो नाही," पण असा दावा करतांनाच "ओएनजीसीच्या बाबतीत तहशतवादी हल्लयाचा कट रचल्याचा आरोप असलेल्या एका संशयीत आरोपीच्या कुटुंबियांना आपण मानवतेच्या दृष्टिकोनातून भेटलो"असे म्हटले आहे. सभापती महोदय, राक्षसालाही लाजवेल अशा प्रकारचे कृत्य करणारी ही अतिरेकी संघटना आहे आणि त्याला मानवतेच्या दृष्टीकोनातून आपल्या राज्यातील एक आमदार भेटतो? माननीय मंत्रिमहोदय, आपण त्यावेळी उत्तर देताना असे म्हटले होते की, मी याची चौकशी करीन. त्याप्रमाणे याची चौकशी केली आहे काय?केली असेल तर त्याबाबतीत काय कारवाई करणार? सभापती महोदय, या सन्माननीय सदस्यांनी बेशरमपणाने पुढे असेही म्हटलेले आहे की, "वांद्रे (प.) येथील माझ्या पक्षाच्या नगरसेवकाच्या विनंतीवरुन आपण या ओएनजीसी प्रकरणातील एका आरोपीच्या कुटुंबियांना भेटलो. मी लोकप्रतिनिधी आहे. लोकप्रतिनिधी कुणालाही भेटू शकतो आणि मी त्यात काहीही गैर केले नाही". इतकी उद्दामपणाची भाषा या आमदाराने वापरलेली आहे. माननीय मंत्रिमहोदय, आपण याठिकाणी कबूल केले होते की, मी याची चौकशी करीन. त्याप्रमाणे याची चौकशी केली असेल तर यातील सत्य सभागृहाला सांगावे.

सभापती महोदय, मुंबई बॉम्बसफोटातील आरोपींना राज्याच्या गृहमंत्र्यांच्या भेटीला नेण्याचा प्रयत्न झाला. तसेच भिवंडीतील पोलीस ठाण्यावरुन पेटलेल्या वादात तीन पोलिसांचे मुडदे पाडणाऱ्या धर्मांधांचे पाठीराखे व त्यांच्याच पाठिंब्याने निवडून येणारे नेते, व्होट बँकेसाठी कितीही उपयोगी पडत असले तरी आपण त्यांची गय करु नका. अन्यथा या घटना घडत राहाणार आहेत. व्होट बँकेसाठी आपण त्यांची गय केली तर यापुढे अनेक लोकांचे असे मुडदे या राज्यात पडल्याशिवाय रहाणार नाहीत. आपण असे वागलात तर आपला आदर्श आपले पोलीस खातेही घेणार आहे. आपला आदर्श घेऊन पोलीस खात्यतील अधिकारी अतिरेक्यांशी दोस्ती करण्यामध्ये

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ SBT/

श्री. पांडुरंग फुंडकर....

आता अपराध मानत नाहीत. कारण त्यांना माहीत आहे की, सत्ताधारीच जर अतिरेक्यांशी संबंध ठेवत असतील तर आपण फक्त भेटलो तर आपला त्यात काही अपराध नाही. सभापती महोदय, काय घटना घडली? याच राज्यात घटना घडतात. ख्रिसमसच्या पूर्व संध्येला चेंबूर येथील एका जिमखान्यावर डी.के.राव या कुविख्यात गुन्हेगाराने एक पार्टी दिली. हा राव एरवडयाच्या जेलमधून दीड महिन्यापूर्वीच सुटून आलेला होता आणि त्याने एका पार्टीचे आयोजन केले होते. खून, खुनाचा प्रयत्न, खंडणी वसुली इत्यादी गंभीर स्वरुपाचे तीस गुन्हे या राववर आहेत. नाशिक जेलमध्ये असताना छोटा शकील टोळीतील ओ.पी.सिंग याच्या हत्या प्रकरणातील राव हा एक प्रमुख आरोपी आहे. सभापती महोदय, 13 वर्षे जेलमध्ये असलेला हा राव सुटून बाहेर आल्यानंतर त्याच्या हालचालीवर लक्ष ठेवणे हे पोलिसांचे काम होते. तो काय करतो, कुठे जातो, कोणाला भेटतो आणि पुन्हा जनतेशी खेळतो काय? हे पहावयास पाहिजे होते. जनतेच्या रक्षणाची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ज्यांना गुन्हेगारी रोखण्यासाठी कायद्याने अधिकार दिलेले आहेत तेच गुंडांबरोबर दारु पिऊन नाच-धिंगाणा करीत असतील तर त्या अधिकाऱ्यांचे केवळ निलंबन करुन चालणार नाही. पण त्याचे फक्त निंलबन करण्यात आलेले आहे. त्यांच्यावर अतिरेक्यांप्रमाणे ठोस कारवाई करावयास पाहिजे होती. सभापती महोदय, या ठिकाणी खेदाची आणि आश्चर्याची बाब आहे की, या पार्टीत सामील झ ाालेला कोणी साधा पोलीस नाही. हेड कॉन्स्टेबल नाही, कॉन्स्टेबल नाही. त्यांना तर कोणीही वेठीस धरतात. ए.सी.पी.,डी.सी.पी. आणि खंडणी विरोधी पथकातील वरिष्ठ अधिकारी त्या पार्टीत होते. माननीय मंत्रिमहोदय, या सारखी कुठलीही नामुश्कीची गोष्ट असू शकत नाही. माननीय मंत्रिमहोदय, श्री. आर.आर.पाटील सारख्या एका चांगल्या माणसाकडे हे खाते आहे आणि त्या खात्यामध्ये "आंधळ दळत आणि कुत्र पीठ खात" अशी स्थिती झाली असेल, "दिव्या खाली अंधार" असेल तर श्री. आर.आर.पाटील आपला दिवा कितीही तेवत राहिला तरी आपल्या दिव्याखाली जर अंधार असेल तर आपल्या सारख्याला ही शोभनीय अशी गोष्ट नाही. माननीय मंत्रिमहोदय, श्री. आर.आर.पाटील यांच्याबद्दल आम्हाला आदर आहे परंतु तुमचे खाते यापध्दततीने तुम्हाला बदनाम करण्याचा प्रयत्न करणार असेल तर आपण याबाबातीत कुठोर भूमिका घेणार की नाही? याबाबतचा खुलासा झाला पाहिजे.

यानंतर श्री. बरवड...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .......

आबासाहेब आपण गाडगेबाबांची भूमिका सोडा. गाडगेबाबांच्या भूमिकेतून आपण बाहेर या. महाराष्ट्राला वाचवावयाचे असेल तर आपल्याला निश्चितपणे त्या भूमिकेतून बाहेर यावे लागणार आहे. केवळ आधुनिक शस्त्रास्त्रे, जीप, स्वयंचलित बंदुका, सागरी बोटी व आधुनिक तंत्रज्ञान देऊन पोलीस यंत्रणा सुधारणार नाही तर त्यासाठी पोलिसांचे मनोबल आणि मानसिक स्थितीमध्ये सुधारणा आपल्याला निश्चितपणे करावी लागणार आहे.

सभापती महोदय, पोलिसांनी आता दडपशाहीचेही धोरण स्वीकारले आहे. मी त्याच्या फार खोलात जाणार नाही. मी माझा वेळ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना देणार आहे. वसई-विरारमध्ये काय घडले ? वसई-विरारमधील नागरिकांचा काय दोष होता ? 53 गावे महापालिकेमध्ये घेऊ नये यासाठी अहिंसात्मक मार्गाने आंदोलन झाले. एका सन्माननीय आमदाराच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाले. त्या आंदोलनाला पोलिसांनी दडपण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मोर्चा काढला म्हणून त्यांना दडपण्याचा प्रयत्न केला. त्यांनी उपोषण केले म्हणून त्यांना दडपण्याचा प्रयत्न केला. अशा पध्दतीने आमदार श्री. विवेक पंडित यांचे आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न झाला. मी त्या विषयाच्या खोलात जाणार नाही. आता ती 53 गावे मुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

सभापती महोदय, मिरजची जी दंगल झाली त्याबाबत सांगू इच्छितो की, माननीय गृहमंत्र्यांच्या जिल्ह्यात झालेली ही दंगल आहे. त्या ठिकाणी स्वागत कमानीवर अफझलखान वधाचा देखावा लावला यामध्ये काय चूक केली ? हे राज्य अफझलखानाचे आहे काय ? छत्रपती शिवरायांच्या या राज्यामध्ये अफझलखान वधाचे पोस्टर लावणे हा गुन्हा असेल तर छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेण्याचा आम्हाला अधिकार नाही. त्या ठिकाणी पोस्टर लावले आणि त्यावरुन त्या ठिकाणी दंगल झाली. त्या दंगलीच्या संदर्भात आपला त्या ठिकाणी जो एस.पी. आहे तो ज्या पध्दतीने वागला ते पाहता एखाद्या राक्षसालाही लाजवील इतक्या वाईट पध्दतीने तो वागला. ब्रिटीशांनी तर खूप अत्याचार केले पण त्यापेक्षाही हा पुढे गेला आहे आणि तो आबासाहेबांचा लाडका आहे. आबासाहेब, आपण त्यांचे का लाड करता ? मागच्या वेळी आपण

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

गृहमंत्री असताना सुध्दा तो आपला लाडकाच होता. आताही तो लाडकाच आहे. त्या ठिकाणी त्यांना तीन वर्षे पूर्ण झालेली आहेत. आता त्यांना जनता कंटाळलेली आहे. त्याला तेथून काढून कोठेही द्यावे. पण किमान त्याला सांगलीतून तरी बाहेर काढा. श्री. कृष्णप्रसादवर आपले एवढे काय प्रेम आहे ? तो त्या ठिकाणी किती वाईट पध्दतीने वागत आहे ?आपण जाऊन बघा. तो काँग्रेसचे काम करतो असे काही सन्माननीय सदस्य म्हणत आहेत. तो काँग्रेसचेही काम करत नाही.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. बुलढाण्यातून बदलल्यानंतर सगळ्यात मोठे शिष्टमंडळ मला भारतीय जनता पार्टीचे भेटले होते. अगदी महिलांचे शिष्टमंडळ भेटले होते. त्यांची निवेदने काढून मी सदनाला देण्यास तयार आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : आपण ते द्यावे. असे होऊच शकत नाही. मी बुलढाणा जिल्ह्यात राहणारा आहे. बुलढाणा जिल्ह्यातील भारतीय जनता पार्टी असे म्हणूच शकत नाही. आपण प्रेम करा. आपल्या प्रेमाच्या आड आम्ही कधी येणार नाही. पण ते प्रेम जनतेवर अन्याय, अत्याचार करण्यापर्यंत जाऊ देऊ नका. ते प्रेम आपल्या आणि त्यांच्या ऑफीसमध्येच राहू द्या. आम्ही त्यावर काही ऑब्जेक्शन घेणार नाही. परंतु जनता आता त्यांना कंटाळलेली आहे. त्यांना त्या ठिकाणी तीन वर्षे पूर्ण झालेली आहेत. त्यांचे तेथील टेन्यूअर संपले आहे. अजूनही त्याचे अत्याचार चालूच आहत. खाजगीत तो काय धमक्या देतो ? आता आम्ही खाली जेवत असताना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब माझ्या बाजूला बसले होते. सात आमदारांचे आमदारपद मी रद्द करुन दाखवीन असे तो म्हणतो असे तेथील आमदार सांगत होते. आमदारांचे आमदार पद रद्द करणारा हा कोण ? तो खाजगीमध्ये धमक्या देतो. स्टेटमेंट करतो. अशा पध्दतीने वागणारा हा अधिकारी असताना कशासाठी प्रेम करता ? मिरज-सांगली मधील लोकांचे काय चुकले होते ? दंगल संपल्यानंतर अजूनही निरपराध लोकांवर अन्याय आणि अत्याचार चालू आहेत. दंगलखोर आरोपी पकडला गेला पण आता तेथील हिंदूंना त्रास देणे सुरु आहे. नार्को टेस्ट, ब्रेन मॅपिंग कशासाठी ? आबासाहेब, आता सांगली शांत झालेले आहे. आता पुन्हा उचकविण्याचे धंदे आपल्या एस.पी.ने

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

श्री. पांडुरंग फुंडकर ....

सुरु केलेले आहेत. आपण तेथील लोकांच्या सहनशीलतेचा फार काळ अंत पाहू नका. अन्याय अत्याचार थांबले पाहिजेत. आबासाहेब, आपणच त्या गावात गेलात आणि मी आता निरपराध लोकांवर खटले भरणार नाही, खटले मागे घेतले जातील असे जाहीरपणे सांगितले. परंतु तो एस.पी. आपले ऐकत नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/ यापूर्वी श्री.बरवड 16:25

श्री.पांडुरंग फुंडकर....

त्याला माहीत आहे की, आपण कसेही वागलो तरी आबा आपल्याला माफ करणार आहेत. सांगली-मिरज भागातील लोकांची डोकी थंड झालेली आहेत, पण ती पुन्हा भडकवण्याचे उद्योग त्या एस.पीं.नी सुरु केले आहेत ते थांबविण्यात यावे.

सभापती महोदय, मी बाकीच्या विषयावर बोलणार नाही कारण अनेक वक्ते बोलणार आहेत. परंतु मी एक विषय येथे जरुर मांडीन. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पोलीस उपनिरीक्षकाच्या पदावरील पदोन्नतीसाठी दिनांक 24.8.2000 व दिनांक 25.8.2000 रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस हवालदार यांची चाचणी परीक्षा घेतली होती. या परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांपैकी 731 उमेदवार उत्तीर्ण झाले होते. दिनांक 3.4.2000 रोजी पोलीस विभागात पोलीस उपनिरीक्षकांची 601 पदे रिक्त होती. उत्तीर्ण झालेल्या 731 उमेदवारांपैकी रिक्त असलेल्या 601 पदांवर गुणवत्तेनुसार जागा भरणे आवश्यक असताना त्यानुसार पदांची भरती झाली नाही. हा चौकशीचा भाग आहे. गृह विभागातील पोलीस अधिका-यांवर हा अन्याय झालेला आहे. या परीक्षेत 159 उमेदवार अनुत्तीर्ण झाले होते. परंतु त्यांना एक टक्का ग्रेस मार्क देण्यात आला. म्हणजे 3 टक्के मार्कस् देऊन त्यांना उत्तीर्ण करण्यात आले. त्यांची नियुक्ती या 601 मध्ये करण्यात आली. जे 284 उमेदवार उत्तीर्ण झाले होते त्यांची वेगळी यादी तयार करुन त्यांना अस्थायी स्वरुपाचे आदेश देण्यात आले. मुंबई पोलीस अधिनियमन भाग 1, क/1, 2, एबीसीनुसार एकाच वेळी परीक्षा उत्तीर्ण होणा-या अर्हताधारक पोलीस हवालदाराला ज्येष्ठता चाचणी परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारे बंधनकारक आहे. पण पहिल्याच प्रयत्नात यशस्वी झालेल्या 284 उमेदवारांचा समावेश 601 रिक्त पदांमध्ये झाला नाही. त्यांना बाजूला टाकण्यात आले. पोलीस उपनिरीक्षकाच्या पदोन्नतीसाठी घेण्यात आलेल्या चाचणी परीक्षेत जे नापास झाले होते त्यांना ग्रेस मार्क देऊन पास करण्यात आले त्यांचा समावेश रिक्त असलेल्या 601 पदावर करण्यात आला. त्या पदोन्नतीचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालामुळे दिनांक 11.8.2009 रोजीच्या पोलीस महासंचालक/4710/पदोन्नती/14.1.2009 रोजीच्या आदेशान्वये रद्द केले. हायकोर्टाने आदेश दिल्यानंतर त्या लोकांची आदेश रद्द करण्यात

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

श्री.पांडुरंग फुंडकर....

आले. 2000 साली यशस्वीरित्या पास झालेले जे 284 उमेदवार होते, ज्यांनी पोलीस उपनिरीक्षक पदाची परीक्षा उत्तीर्ण केली होती त्यांना नेमणूक दिली जाणार आहे काय, त्यांच्यावर अन्याय झालेला आहे. जे पास झाले त्यांना बाजूला काढले गेले आणि नापास झाले त्यांना घेतले गेले. पण हायकोर्टाने त्यांना काढण्याचे आदेश दिले. त्यामुळे आता त्या जागा रिक्त आहेत. त्या जागेवर उत्तीर्ण झालेल्या लोकांची पदोन्नती करणार काय त्याचे उत्तर दिले पाहिजे. सध्या पोलीस विभागात भरती सुरु आहे. त्याबाबत मी बोलण्याची गरज नव्हती. पारदर्शक पध्दतीने सर्व ठिकाणी पोलिसांची भरती केली जाईल असे घोषित केले होते. माननीय गृहमंत्र्यांनी असे आदेश दिले की, भरतीच्या वेळी संबंधितांना मोबाईल फोन घेऊ नका, कोणाचेही फोन घेऊ नका. फोन बंद असतात, परंतु आतमध्ये काय चालू आहे ? मी माझ्या जिल्हयातील एक उदाहरण मी सांगणार आहे. सन 2008 मध्ये एस.पी.बुलढाणा यांच्या कार्यालयामार्फत पोलीस भरती झाली त्यावेळी श्री.पंढरीनाथ गजानन शिंदे नावाचा गरीब मुलगा आहे. तो परवा मला भेटला तेव्हा रडत होता. हा श्री.शिंदे नावाचा मुलगा रा.हाकरखेड, पो.कवळा, ता.चिखलदरा, जि.बुलढाणा. तो शारीरिक पात्रतेमध्ये पात्र ठरला. त्याची उंची 165 सें.मी., छाती न फुगवता 83 सें.मी. व फुगवून 89 सें.मी.भरली. त्यामुळे तो पात्र ठरला. त्यावेळी त्याला घेण्यात आले नाही. आता 2009 मध्ये पुन्हा भरती सुरु झाली त्यावेळी तो पुन्हा भरतीसाठी गेला. परंतु त्याला पोलीस अधीक्षकाचे आलेले पत्र मी वाचून दाखवितो. त्याला भरतीमध्ये नापास करण्याचे असे कारण सांगितले की, "आपल्या उंचीचे मोजमाप केले असता आपली उंची विहित मर्यादेपेक्षा कमी असल्यामुळे आपल्याला अपात्र ठरविण्यात आलेले आहे."

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...

एक वर्षापूर्वी त्यांची 165 सेमी उंची बरोबर होती. एक वर्षानंतर उंची बरोबर नाही, असे त्याला पत्र पाठविण्यात आले. पोलीस भरतीसाठी उंची प्रत्यक्षात किती पाहिजे, हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. मागील वर्षी पेक्षा उंची कमी झाली म्हणून त्या उमेदवाराला अपात्र ठरविले. अशा प्रकारे गैरप्रकार चालू आहेत. आपणास दुसरे उदाहरण परभणी जिल्ह्यातील देतो. दिनांक 8मार्च 2010 रोजी कुमारी भारती दत्तात्रय दळवे,राहाणार शांतीसेना नगर, परभणी हीने पोलीस भरतीमध्ये सहभाग घेतला. ही मुलगी गरीब आहे. तिला 1606 चेस्टनंबर देण्यात आला. दिनांक 1 मार्च 2010 रोजी घेण्यात आलेल्या ग्राउंड परीक्षेत तिला 85 गुण मिळाले आणि लेखी परीक्षेत 39 गुण मिळाले. सर्व मुलींमध्ये ही मुलगी प्रथम आली. परंतु तोंडी परीक्षा घेताना एनसीअेचे नूतनीकरण झालेले नसल्यामुळे तिची योग्यता असतानाही तिला डावलण्यात आले. कुमारी भारती दळवे ही जेव्हा पोलीस भरतीसाठी दाखल झाली त्यावेळी तिचे एनसीअेचे नुतनीकरण केलेले प्रमाणपत्र प्राप्त झालेले होते. तिच्याकडे आवश्यक ती अर्हता असताना, प्रमाणपत्र असताना तोंडी परीक्षेच्या वेळी तिला डावलण्यात आले. या प्रकरणी माननीय मंत्री महोदय चौकशी करणार आहेत काय ? मी माननीय मंत्री महोदयांना आणखीन एक उदाहरण देतो. पोलीस भरतीसाठी आलेल्या उमेदवारास मामाला लाथ मारण्यास एस.पी.ने सांगितले. हे उदाहरण सोलापूर जिल्हयातील आहे. वर्तमानपत्रामध्ये ही बातमी छापून आलेली आहे. या गरीब मुलाचा मामा हातातून डबा घेऊन आला. मुलगा ग्रामीण भागातील होता. सकाळी 6.00 वाजता घरातून बाहेर पडला होता. मुलगा उपाशी घराच्या बाहेर पडला म्हणून त्याचा मामा मागून डबा घेऊन केन्द्रावर गेला. केन्द्रावर मामा आपल्या भाच्याला डबा द्यायला लागला. हा डबा देताना एस.पी.ने पाहिले. मला वाटते सुरेशकुमार मेखला नावाचा एस.पी. तेथे होता. त्याने त्या मुलाला जवळ बोलावून त्याच्या मुस्काटात मारली आणि सांगितले की, तुला जर पोलीसमध्ये भरती व्हायचे असेल तर मामाच्या पेकाटात लाथ मार. सभापती महोदय, मामाच्या पेकाटात लाथ मारणे हे पोलीस भरतीचे निकष आहेत काय ? गरीब मुलांना अशा पध्दतीने वागविणा-या या एस.पी.ची माननीय मंत्री महोदय चौकशी करणार आहेत काय ? दुसरीकडे माननीय मंत्री महोदय सांगत असतात की, पोलीस भरती पारदर्शीपणे चालू आहे. आठ गुन्हेगार पोलीस कोठडीतून पळून जातात 6 मार्च, 2010 रोजी अंजली जयस्वाल या

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...

मुलीवर बलात्कार करुन तिचा खून करण्यात आल्याची घटना पोलीस वसाहतीमध्ये घडलेली आहे. औरंगाबाद शहरामध्ये फेब्रुवारी 2010 मध्ये एका आठवड्यात 10 सराफाची दुकाने लुटण्यात आली. 16 मार्च 2010 रोजी वडाळा येथील सोन्याचे व्यापारी मंजीलाल कुमावत याच्या घरावर दरोडा घालून त्यांची हत्त्या करण्यात आली. दक्षिण मुंबईतील मलबार हिल परिसरात राहाणा-या 85 वर्षाच्या वयोवृध्द विमलाबेन यांच्या घरात घुसून 12 लाख रुपयाचे सोन्याचे दागिणे चोरले. राज्यात बनावट नोटांचा सुळसुळाट झालेला आहे. इतक्या घटना घडत आहेत की त्याची गणती करु शकत नाही. रेल्वे स्थानकावर गुन्हेगारीच्या घटना घडत आहेत, चोरीच्या घटना वाढत आहेत. दादर, वांद्रे, सीएसटी या रेल्वे स्थानकांवर सी.सी.टी.व्ही कॅमेरे असताना सुध्दा घटना घडत आहेत. महिलांवरील अत्याचारात वाढ झालेली आहे. पुरोगामी आणि प्रगतिशील महाराष्ट्रामध्ये अल्पवयीन मुलींवर बलात्कार होण्याच्या घटना वाढत आहेत, आप्तस्वकीयांचे नातेवाईकाकडून खून होण्याच्या घटनामध्ये वाढ झाली आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 16:35

श्री.पांडुरंग फुंडकर......

2006 मध्ये राज्यात 16047 तर 2007 मध्ये 17510 महिलांवर अत्याचार झाले. ही अत्याचाराची मालिका आणि बलात्काराच्या घटना तर इतक्या वाढल्या की बिहार राज्याशी तुलना करावी की नाही अशा प्रकारची स्थिती या राज्यामध्ये निर्माण झाली आहे. लैंगिक अत्याचाराच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. सर्वसामान्यांचे संरक्षण हा एक महत्वाचा विषय आहे. परंतु शासन कोणाकोणाला संरक्षण देते? माझ्याकडे आजचा दैनिक सामना या वृत्तपत्राचा अंक आहे. सुरक्षा कोणासाठी? वृत्तपत्रात म्हटले आहे की, फक्त ह्यांच्याच साठी. शाहरुख खान यांच्या मन्नत बंगल्यावर 24 तास 1400 सशस्त्र पोलिसांचा पहारा. कोणासाठी हे राज्य चालविले जात आहे? सर्वसामान्य गोरगरीब माणूस आहे त्याच्यासाठी हे राज्य आहे की, अत्याचाराला बळी पडलेल्या महिलांसाठी हे राज्य आहे? अतिरेक्यांचे हल्ले होणाऱ्या नागरिकांसाठी? कोणासाठी पोलीस खाते आहे? 1400 सशस्त्र पोलीस खडा पहारा, वायरलेस मोबाईल व्हॅन, दंगलग्रस्त नियंत्रण पथकाची व्हॅन सज्ज आहे. मुंबईतील थिएटरमध्ये माय नेम इज खान या चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या वेळी प्रत्येक थिएटरवर 100 सशस्त्र बुलेटप्रूफ जॅकेटसह पोलीस आणि वायरलेस मोबाईल व्हॅन सज्ज ठेवण्याची वेळ का आली? श्री.राहुल गांधी यांचा मुंबई शहरामध्ये दौरा झाला. काय असे घडले होते? 22500 सशस्त्र पोलिसांची फौज पहाऱ्यासाठी ठेवण्यात आली. 22 हजार पोलीस तैनातीला लावले. या पोलिसांचा वापर खऱ्याअर्थाने दहशतवादाच्या विरोधात केला असता तर महाराष्ट्रामध्ये कोणाची हिंमत होणार नाही अशा स्थितीमध्ये हे राज्य येईल. आम्हाला कधीकधी आबा तुमचाही विचार करावासा वाटतो. तुम्ही राज्यामध्ये कितीही पोलिसांची भरती केली तरी मुंबईची काय स्थिती आहे? 4 हजार मुंबईकरांमागे फक्त एक पोलीस आहे. कसे चालेल? बाबा आदमच्या जमान्यापासून ग्रामीण भागात हीच स्थिती आहे. 100 गावांचा एक तालुका असताना तेथील पोलीस ठाण्यामध्ये 70 ते 80 पोलीस आहेत. 70 पोलीसांमार्फत 100 गावांच्या तालुक्याचे संरक्षण कसे करणार आहात? गुन्हेगारी कशी थोपविणार आहात? चाललेले गैर धंदे कसे थांबविणार आहात? पोलिसांच्या संख्येमध्ये वाढ करण्याची गरज आहे. पोलिसांच्या सोयी सुविधांसाठी 14 कोटी रुपये दिल्याचे काल सदनात सांगण्यात आले. सहा महिन्यांपासून पोलिसांचा भत्ता रोखून ठेवण्यात आला आहे. त्यांनी काम कसे करावे? जर त्यांचे भत्ते वेळेवर मिळत नसतील, त्यांची वैद्यकीय बिले मंजूर होत नसतील, त्यांना रजा मंजूर होत नसेल तर चांगल्या मानसिकतेमध्ये ते

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 16:35

श्री.पांडुरंग फुंडकर......

काम कसे करणार? आपण या सिस्टीममध्ये बदल झाला पाहिजे. देशाच्या संसदेमध्ये पहा. देशाच्या संसदेमध्ये सर्वात जास्त बजेट डिफेन्सवर असते. आम्ही या राज्यात पाहतो की, सर्वात कमी बजेट गृह खात्यावर असते. यामध्ये बदल करता येणार नाही का? पोलिसांच्या संख्येत वाढ झाली पाहिजे. त्यांना नियमित आठ तासाची डयुटी दिली पाहिजे. त्यांना निवासस्थाने उपलब्ध करुन दिली पाहिजेत. शेवटी तो देखील माणूस आहे.

सभापती महोदय, आमची सन्माननीय गृहमंत्र्यांकडून एकच अपेक्षा आहे. त्यांनी असा चमत्कार करुन दाखववा की, या छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रावर कोणाही अतिरेक्याची तिरपी नजर पडणार नाही. महाराष्ट्राच्या हद्दीमध्ये पाऊल टाकावे की नाही इतका जबरदस्त महाराष्ट्र उभा करुन दाखववा. इतकी दहशत महाराष्ट्राच्या प्रशासनाने अतिरेक्यांपर्यंत पोहोचवावी अशी अपेक्षा करतो आणि माझे बोलणे पुरे करतो.

''''''''''''''''''''

2व्ही.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : महोदय, नियम 260 अन्वये जो कायदा व सुव्यवस्थेसंबंधीचा प्रस्ताव सभागृहात चर्चेसाठी आलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, मला कल्पना आहे की असे प्रस्ताव सभागृहात नेहमी येतात आणि त्यावर विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आपले विचार व्यक्त करतात आणिमाननीय गृहमंत्र्यांचे उत्तर ठरलेले असते तसेच ते देणार. परंतु या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, सन 1993 मध्ये मुंबईत जी बॉम्बस्फोट मालिका झाली त्यानंतर दि. 26 नोव्हेंबर, 2008 या दरम्यान जवळजवळ 25 हल्ले या मुंबईत झाले. त्यात 12 मार्च, 1993 मध्ये जी बॉम्बस्फोटाची साखळी झाली त्यात 257 व्यक्ती मृत झाल्या आणि 700 लोक मृत पावले होते. 13 मार्च, 2003 रोजी रेल्वेत झालेल्या बॉम्बस्फोटात एकूण 11 लोकांचा बळी गेला होता. दि. 25 ऑगस्ट 2003 रोजी झवेरी बाजार व गेट-वे-ऑफ इंडिया येथे झालेल्या स्फोटात 53 लोकांना आपला जीव गमवावा लागला होता. 11 जानेवारी, 2006 रोजी पश्चिम उपनगरीय रेल्वेत 11 मिनिटात 7 गाड्यांमध्ये स्फोट होऊन 200 च्या वर लोकांचा बळी गेला व शेकडो जखमी झाले होते. त्यानंतर छत्रपती शिवाजी टर्मिनस, ताज हॉटेल, ओबेरॉय हॉटेल, कॅफे लिओपोल्ड येथे झालेल्या अतिरेक्यांच्या हल्ल्यात 170 लोकांना आपले प्राण गमवावे लागले आणि अलिकडेच पुण्यात झालेल्या जर्मन बेकरी स्फोटात 17 लोक प्राणास मुकले. इतके होऊन देखील पाकिस्तानचे पंतप्रधान अब्दुल रझा गिलानी हे आजही जाहीरपणे सांगत आहेत की, भारतामध्ये पुन्हा 26/11 होणार नाही याची हमी पाकिस्तान देऊ शकत नाही. अशा परिस्थितीत देखील आम्ही चोख उत्तर देणार की नाही, याचा अंत करणार की नाही ? की आम्ही हातात बांगड्या घातलेल्या आहेत ? कधी येणार आम्ही शेवटच्या निर्णयापर्यंत यासंबंधी शासनाची भूमिका माननीय राज्यमंत्र्यांकडून नव्हे तर माननीय गृह मंत्र्यांकडूनच स्पष्ट व्हावी अशी आमची अपेक्षा आहे. तसेच एका गोष्टीचा खुलासाही माननीय गृहमंत्र्यांकडून सभागृहाला हवा आहे की, सन 1990 ते 1993 या काळात शहीद विजय साळसकर यांनी दाऊदच्या गुंडांचे मोठ्या प्रमाणात एनकाऊंटर केले म्हणून त्यांना नार्को टेररिस्टकडून धोका असल्याचा अहवाल इंटेलिजन्स ब्युरोकडून शासनाला प्राप्त झाला होता. अशा परिस्थितीत सन 1993 मध्ये शहीद साळसकरांच्या संरक्षणासाठी त्यांना एके-47 हे अत्याधुनिक शस्त्र दिले होते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ........

ही वस्तुस्थिती स्वत: शहीद विजय साळसकर यांनी मला भेटून सांगितलेली आहे. नंतरच्या काळात असे काय झाले की ज्या विजय साळसकरांना त्यांच्या संरक्षणासाठी, त्यांच्या जिवाला धोका आहे म्हणून एके-47 देण्यात आली परंतु नंतरच्या काळात ती काढून घेण्यात आली. यासंबंधी मला प्राप्त झालेल्या माहितीनुसार गोवा गुटख्याचे मालक श्री. जगदीश जोशी ज्याने दाऊदसाठी गुटखा बनवायला त्याची गुटखा यंत्रणाच पाकिस्तानात पाठविली होती. यामध्ये जगदीश जोशी हा दोषी आहे म्हणून त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करुन त्याला मोका लावण्याची प्रक्रिया याच शहीद साळसकरांनी चालू केली होती.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. अनील परब )

श्री. रामदास कदम ...

त्यावेळेला मीरा बोरवणकर आणि अनामी रॉय म्हणजे आताचे पोलीस महानिरीक्षक यांनी विजय साळसकर यांच्यावर दबाव आणला होता. कै. विजय साळसकर यांनी या दोघांचे ऐकले नाही म्हणून कै.विजय साळसकर यांच्या स्वत:च्या संरक्षणासाठी जी ए.के.47 दिली होती ती काढून घेण्यात आली अशी माझ्याकडे माहिती आहे. जर कै.साळसकर यांच्याकडे ए.के.47 असती तर विजय साळसकर, कामठे, करकरे आमच्यातून गेले नसते ते वाचले असते. आपण ज्या अतिरेक्याला पकडले आहे तो अतिरेकी कै. साळसकरांच्या रिव्हॉल्व्हरनेच जखमी झालेला होता हे आता सिध्द इ ाालेले आहे. कै. साळसकर यांच्याकडे ए.के.47 असती तर आपल्याला वेगळेच चित्र पहावयास मिळाले असते. त्यामुळे या सर्व गोष्टींची चौकशी झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. साळसकर शहीद झाले त्याला जबाबदार अनामी रॉय आणि मीरा बोरवणकर हेच आहेत ही वस्तुस्थिती खरी असेल तर या दोघांवर मोक्का लावून, त्यांना साळसकरांच्या मृत्यूच्या संदर्भात त्यांच्यावर कलम 302 लावून अटक झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. देश द्रोही, गुटखा मालक जगदीश जोशी याला सीबीआयने अटक केली परंतु या जोशीने त्यावेळेला कै. साळसकर यांच्यावर प्रचंड दडपण आणले होते. आज साळसकर हयात नसल्यामुळे अधिक माहिती या ठिकाणी मी देणार नाही.

सभापती महोदय, ख्वाजा युनूसच्या बाबतीत गृहविभागाचे उपसचिव श्री. गौड यांनी प्रतिइ ाापत्र दिलेले आहे त्यामध्ये त्यांनी स्पष्ट म्हटलेले आहे तसेच न्यायालयाने सुध्दा स्पष्ट म्हटलेले आहे. ज्यांना राष्ट्रपती पदक मिळालेले आहे ते प्रफुल्ल भोसले यांच्यावर आपण अजून किती वर्षे अन्याय करणार आहात ? यासंदर्भात मी आपल्याला दोन वेळा आठवन करुन दिली होती परंतु त्यासंदर्भात आपण माझ्याशी वेगळया पध्दतीने बोलला होता. ज्या अधिका-याला राष्ट्रपती पदक मिळाले त्याचा आपण बळी का देता ? ख्वाजा युनूस सारखा अतिरेकी, गुंडांसाठी चांगल्या अधिका-यांचा बळी आपण का देता ? गृह विभागाच्या उपसचिवाचे प्रतिज्ञापत्र माझ्या हातात आहे त्यांच्या म्हणण्यानुसार प्रफुल्ल भोसलेंचा यामध्ये काडीचाही संबंध नाही. ख-या अर्थाने जे गुंड आहेत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ...

अशांना आपण संरक्षण कशासाठी देता ? प्रफुल्ल भोसले यांना आपण दूर का ठेवले ? त्यामुळे यासंदर्भात आपण आपल्या भाषणात काही तरी माहिती द्यावी अशी माझी आपल्याकडून अपेक्षा आहे.

सभापती महोदय, ज्या वेळेला मी खालच्या सभागृहात प्रदीप शर्माचे प्रकरण काढले होते त्यावेळेला आपण माझे म्हणणे ऐकले नव्हते. परंतु ज्यावेळेला सर्व पुरावे मी आपल्याला दिले, आपल्या अधिका-यांना दिले तेव्हा आपल्याला ते खरे वाटले. प्रदीप शर्मा याने 120-130 एनकाऊंटर केले होते तो आता जेलमध्ये आहे. सुरुवातीला माझे म्हणणे आपल्याला पटले नव्हते. आपले अधिकारी कशा प्रकारे दाऊदशी संबंध ठेवतात हे मी आपल्याला सांगितले होते. एसीपी श्री. पाडवी यांच्या बाबत श्री. हसन गफ्फूर यांनी जो गोपनीय अहवाल लिहिलेला आहे तो माझ्या हातात आहे. या पाडवींचे संबंध डायरेक्ट दाऊदशी आहेत असे श्री. गफ्फूर म्हणतात. म्हणजे कुंपणच शेत खाते अशी परिस्थिती असेल तर आम्ही न्याय तरी कोणाकडे मागावयाचा ?

सभापती महोदय, मी खालच्या सभागृहात एकदा नाही तर दोनदा सांगितले होते की, दोषी कोणीही असू देत, मग ते अनामी रॉय असू दे, हसन गफ्फूर असे दे. सभापती महोदय, 26.11 रोजी जी घटना घडली त्यासंदर्भात आपल्याला सर्व माहिती आहे. मी सुध्दा ताज हॉटेलजवळ 48 तास उभा होतो. आपण रात्री 2.30 वाजता त्या ठिकाणी आला होता त्यावेळी सुध्दा मी तेथेच उभा होतो. हेमंत करकरे, कामठे, साळसकर आपल्यातून गेले तेव्हा पहिल्यांदा मीच तेथे गेलो होतो. मीच आपल्याला कळवले होते की, हेमंत करकरे, कामठे, साळसकर आपल्यातून निघून गेले. आम्हाला त्यावेळी फार दु:ख झाले होते कारण त्यावेळी गृहविभागाचा एकही अधिकारी त्या ठिकाणी गेला नव्हता. यासंदर्भातील वेदना मी व्यक्तही केल्या होत्या. काल परवा पुण्यात जी घटना घडली त्यावेळी मी आपला राजीनामा मागितला नाही कारण मला कल्पना होती की, सत्यपाल सिंग त्या ठिकाणावरुन जाणार नाही म्हणून मी आपला राजीनामा मागितला नाही. या सर्व घटनांना केवळ लोकप्रतिनिधीच जबाबदार आहेत, प्रशासन मुळीच जबाबदार नाही ? कितीही माणसे मेली, कितीही बॉम्बस्फोट झाले तरी त्याला जबाबदार लोकप्रतिनधीच, प्रशासन मुळीच नाही ?

, यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

त्याला फक्त लोकप्रतिनिधीच जबाबदार आहेत, प्रशासन मात्र त्याला जबाबदार नाही. जोपर्यत प्रशासनावर शासन वचक ठेवणार नाही तोपर्यत या गोष्टी कधीही थांबणार नाहीत असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मघाशी अफजल खानाच्या वधाच्या पोस्टर्ससंबंधी येथे उल्लेख करण्यात आला होता. या देशाचे हिंदुस्थान व पाकिस्तान असे दोन भाग कसे झाले ? याबाबत सन्माननीय गृह मंत्र्यांनी मला सांगावे . धर्माच्या नावाखाली या देशाचे दोन भाग पडलेले आहेत परंतु आज सुध्दा हिंदुच्या हिंदुस्थानामध्ये ....

श्री.भाई जगताप :सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. देशाची फाळणी हा दुर्देवी निर्णय होता व आज आपण दोन वेगवेगळे देश म्हणून वावरत आहोत परंतु धर्माच्या आधारावर देशाची फाळणी झालेली नाही. रेकॉर्डवर चुकीचे राहू नये याकरिता मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे.....

श्री रामदास कदम : मी पुन्हा सांगतो की, या देशाची फाळणी धर्माच्या नावाखाली झाली होती. मुस्लिमांचे पाकिस्तान आणि हिंदुचे हिंदुस्थान अशा प्रकारे धर्माच्या नावाखाली या देशाची फाळणी झाली होती . जर धर्माच्या नावाखाली फाळणी झाली नसेल तर कशाच्या नावाखाली देशाची फाळणी झाली आहे हे आपण मला सांगावे.

श्री.भाई जगताप : सन्माननीय सदस्यांचे म्हणणे मी ऐकून घेतलेले आहे तेव्हा माझे म्हणणे देखील त्यांनी ऐकून घ्यावे. या देशाची फाळणी धर्माच्या आधारावर झाली नाही. सर्व धर्म सम भाव याच्या आधारावरच या देशाला स्वातंत्र्य मिळाले होते आणि जगामधील सर्वात मोठा सार्वभौम आणि सर्वात मोठी लोकशाही असलेला हा देश असून 2020 साली जगात महासत्ता होण्याचे स्वप्न पहात आहे आणि हे स्वप्न धर्माच्या आधारावर नाही ही वस्तुस्थिती असून ती सर्वाना स्वीकारावीच लागेल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी माझ्या म्हणण्यावर अजूनही ठाम आहे.मी स्पष्टपणे सांगतो की, मुसलमानांसाठीच त्यावेळी पाकिस्तान दिला गेला होता व पाकिस्तान मधील सगळया हिंदुना भारतात आणले गेले. त्यावेळची घटना आपण डोळयासमोर आणा. त्यावेळी

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम......

खचाखच भरलेल्या रेल्वे गाडयातून लोक पाकिस्तानातून भारतात आले होते. ही गोष्ट आम्ही कधीही विसरु शकणार नाही. मतांच्या लाचारीसाठी कोणी काहीही सांगत असले तरी शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या महाराष्ट्रामध्ये अफजलखानाच्या वधाचे पोस्टर्स लावल्यानंतर जर कोणाच्या भावना दुखावल्या जात असतील तर त्यांनी पाकिस्तानमध्ये चालते व्हावे असे जर मी म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. या देशामध्ये मतांसाठी आज काय चालले आहे ? महाराष्ट्रामध्ये आम्ही अफजलखानाच्या वधाचे पोस्टर्स लावावयाचे नाहीत काय ? अफजलख्ांनाच्या वधाचा धडा पुस्तकातून काढून टाकावयाचा काय ? जर तो धडा पुस्तकातून काढून टाकला तर मुलांना इतिहास काय सांगावयाचा ? मध्यतरी मिरज येथे दंगल घडवून आणली आणि तेथे गणपतीची मूर्ती पायाखाली चेचून चेचून तुडवली गेली. पोलिसांच्या जीपवर हिरवा झेंडा लावून काहीजण नाचले . अशा प्रकारे कृत्य करणा-यांची हिंमत कशी होते ? ते देशद्रोही कोण आहेत ? त्यांची हिंमत कशी होती ? मी काय बोलत आहे हे आपण लक्षात घ्यावे . सभापती महोदय, आज सुध्दा महाराष्ट्रातील मालेगावमध्ये आम्ही गणपती उत्सव साजरा करु शकत नाही, सोलापूरला नवरात्रीची मिरवणूक काढू शकत नाही, गणपतीच्या आणि नवरात्रीच्या उत्सवाच्या वेळी राज्यात अनेक ठिकाणी ंदगली होत असतात .त्यावेळी दगडफेक केली जाते. या उत्सवाच्या वेळीच दंगली कशासाठी घडविल्या जातात ? शिवशाहीच्या साडेचार वर्षाच्या काळात महाराष्ट्रात एकही दंगल झाली नव्हती. त्यावेळी दंगल का झाली नव्हती ? आताच या दंगली का घडतात ? या दंगली करणारे कोण आहेत ? अतिरेक्यांना आणि अतिरेक्यांच्या कुटुबियांना भेटणारे नेमके कोण आहेत ? त्यांची एवढी हिंमत कशी होते ? लोकप्रतिनिधी म्हणून निवडून यावयाचे आणि पोलिसासह आणि प्रोटेक्शनसह ते अतिरेक्यांच्या कुटुबियांना जाऊन भेटतात.

सभापती महोदय, आमदार निवासातील कोणाच्या रुममध्ये अतिरेकी थांबले होते हे आज सुध्दा शासनाला शोधता आले नाही ? हे कोण आहेत, हे कोण लोकप्रतिनिधी आहेत ? ते आमदार आहेत की मंत्री आहेत ? महाराष्ट्रामध्ये आज काय चालले आहे ? महाराष्ट्रामध्ये कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे काढण्याचे काम चालू आहे. त्यामध्ये हे शासनच आहे.....

नंतर श्री.सरफरे

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

आणि म्हणून मी माझ्या मुस्लिम बांधवांच्या विरुध्द कधीही बोललो नाही. माझ्या खेडच्या नगरपालिकेमध्ये शिवसेनेची सत्ता असून त्या नगरपालिकेची नगराध्यक्षा मुस्लिम आहे. मी खेड पंचायत समितीचा सभापती मुस्लिम केला होता. यामागील माझी भावना आपण लक्षात घेतली पाहिजे. आपण याठिकाणी मते मिळविण्यासाठी बोलत आहात. परंतु तुम्ही मते घेत असतांना एक दिवस तुम्ही शिल्लक राहणार नाही, तुमची खुर्चीही शिल्लक राहणार नाही. आणि म्हणून हे कुठेतरी थांबणे अत्यंत गरजेचे आहे. या शहरामधून पाकिस्तानामध्ये तरुण जातात, त्याठिकाणी प्रशिक्षण घेतात, आणि या शहरामध्ये आरडीएक्स आणून त्याचा स्फोट घडवितात. हे लोक कोण आहेत? त्यांना या शहरामध्ये थांबविण्याकरिता कोण आसरा देत आहे? याबाबत मी माननीय गृहमंत्री श्री. आर.आर. पाटील साहेबांना गोपनीय माहिती दिली होती. काही मालेगावचे लोक मस्जिदमध्ये येऊन थांबतात त्यांची नावे दिली होती, मशिदींची नावे सुध्दा दिली होती. त्यांच्या नावांचे लेखी पत्र दिले होते. तेथील एका मुस्लिम माणसाने मला येऊन सांगितले होते. हे लोक तरुण मुलांना हेरतात आणि त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी पाकिस्तानमध्ये घेऊन जातात. त्या अनुषंगाने देखील हे शासन काही पावले उचलणार आहे की नाही? ए.सी.पी. श्री.पाडवी यांच्या बाबतीत असलेला पोलीस आयुक्त श्री. हसन गफूर यांचा गोपनीय अहवाल माझ्याकडे आहे. त्यामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, त्यांचा दाऊदशी डायरेक्ट संबंध आहे. मी आपणामार्फत तो अहवाल शासनाकडे पाठवून देतो. सभापती महोदय, मी ज्यावेळी श्री. प्रदीप शर्मा याच्या बाबतीत या सभागृहामध्ये सांगितले होते त्यावेळी आपण सुरुवातीला नाही म्हटले होते. त्यावेळी त्यांच्याविरुध्द असलेले सर्व पुरावे दिले होते. आज आपल्याला श्री.प्रदीप शर्मा पोलीस कस्टडीमध्ये असलेले पहावयास मिळत आहेत. त्याचप्रमाणे श्री. राजेश शिसवे या पोलीस शिपायाचे अबू सालेम याच्याशी थेट संबंध असल्याचे उघड झाले त्यावेळी तो चकमकीमध्ये मारला गेला. अस्लम मोमीन याचा दाऊदशी संबंध आहे म्हणून त्याला निलंबित केले गेले. अशाप्रकारे तुमचे पोलीस जर दाऊदशी संबंध ठेवत असतील तर आम्ही कुणाकडे न्याय मागावयाचा? यासंबंधी आपण काही कारवाई करणार आहात की नाही? दि.26/11 च्या मुंबईवरील हल्ल्यानंतर 100 कोटी रुपये शासनाने दिले, नक्षलवाद्याविरुध्द लढण्यासाठी 190 कोटी रुपये दिले. ते कुणाच्या खिशामध्ये गेले, कुणाच्या घश्यामध्ये गेले? आपण फक्त 89 कोटी रुपये खर्च केले, बाकीचे पैसे कुठे गेले?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/ SBT/ KTG/

श्री. रामदास कदम....

माननीय राज्यमंत्री श्री. बागवे साहेब आपण नवीन आहात. हैद्राबाद राज्य सरकारने 8 लाखाचे स्कॅनिंग मशीन्स रिजेक्ट केले ते आपल्या राज्य शासनाने घेतले. हैद्राबाद सरकारकडील मशीन्स रिजेक्ट केलेली सर्व कागदपत्रे मी आपणामार्फत मंत्रिमहोदयांक्डे पाठविली. सभापती महोदय, 720 कि.मी. लांबीच्या समुद्र किनाऱ्यावर गस्त घालण्यासाठी आणि या समद्र किनाऱ्याचे संरक्षण करण्यासाठी आपण 40 स्पीड बोटी खरेदी करणार होता. परंतु 26/11 च्या घटनेला दीड वर्ष होऊन गेले तरी या बोटी खरेदी करण्यासाठी आपल्याला मुहूर्त मिळत नाही काय? 1 लाख 30 हजाराची स्पीड बोट आपण कितीला खरेदी केली? हे मी विधानसभागृहामध्ये मांडले त्यावेळी आपण मागविलेल्या सर्व निविदा थांबविल्या. आज देखील त्या बोटी घेण्यात आल्या नाहीत.

सभापती महोदय, याठिकाणी प्रत्येक खरेदीमध्ये भ्रष्टाचार करणार काय? मी आफ्रिकेमधून बुलेट प्रुफ जॅकीट मागविले. ते मी माननीय मुख्यमंत्र्यांना भेट देण्यासाठी गेलो असता त्यांनी ते घेतले नाही. त्या बुलेट प्रुफ जॅकेटचा टेस्ट रिपोर्ट मी आफ्रिकेमधून आणला आहे. बुलेट प्रुफ जॅकेट कशापध्दतीचे पाहिजे? एके-47 ची गोळी सुध्दा त्यामध्ये जाऊ शकत नाही अशाप्रकारचा टेस्ट रिपोर्ट माझ्याकडे आहे. मी जेव्हा शासनाकडील बुलेट प्रुफ जॅकेट खरेदीची माहिती मागितली तेव्हा त्याची फाईल सापडत नाही असे मला सांगण्यात आले. आणि आता फाईल मिळाली असता त्यामधील काही पाने गहाळ झाली आहेत. सभापती महोदय, शहीद हेमंत करकरे यांचे त्या रात्रीचे दृश्य आम्ही दूरदर्शनवर पाहिले. त्यांनी घातलेले बुलेट प्रुफ जॅकेट हे कमरेपासून खाली आणि मानेपासून वर मोकळे होते. अशा जॅकेटचा उपयोग काय? ते शहीद झाल्यानंतर मी पहिल्यांदा हॉस्पिटलमध्ये जाऊन त्यांचे प्रेत पाहिले. त्यांच्या मानेखाली सर्व गोळया लागल्या होत्या. अजून सुध्दा ते जॅकेट आपल्याला मिळू शकले नाही. कुणी म्हणते ते भंगारमध्ये गेले, कुणी म्हणते ते कचऱ्यामध्ये टाकण्यात आले. याबाबत या सरकारला काहीतरी वाटले पाहिजे. मी याबाबत आणखी काही बोलणार नाही. सभापती महोदय, शहीद हेमंत करकरे यांना देण्यात आलेल्या जॅकेटच्या खरेदीमध्ये भ्रष्टाचार झाला नसता तर आमचे हेमंत करकरे आज वाचले असते. त्यांचा सरकारने खून केला, तुम्ही खूनी आहात. शहीद हेमंत करकरे यांच्या पत्नीचे कुंकू तुम्ही पुसले असे मी म्हटले तर ते चुकीचे आहे असे मला वाटणार नाही. अशाप्रकारे या जॅकेटच्या खरेदीमध्ये भ्रष्टाचार झाला आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम . . ..

तसेच स्पीड बोट खरेदी करण्यामध्ये देखील भ्रष्टाचार झाला आहे, हैद्राबाद सरकारने रिजेक्ट केलेल्या स्कॅनिंग मशीन खरेदी केल्या आहेत आणि त्यामध्ये देखील भ्रष्टाचार झालेला आहे. तुम्ही सरकार चालवत आहात की काय चालवत आहात ? तुम्ही कशा-कशा मध्ये पैसे खाणार आहात ? कुठे-कुठे शेण खाणार ? म्हणून शस्त्र खरेदीसाठी दिलेल्या निधीचे काय झाले ? ही खरेदी का थांबलेली आहे ? याबाबतीत पावणेदोन वर्षामध्ये का खरेदी होऊ शकत नाही ? गडचिरोली मध्ये अतिरेक्यांच्या माध्यमातून अजून किती पोलिसांना कंठस्थान घालणार आहात ? किती पोलिसांचा खून पाडणार आहात ? आम्ही 10 पोलीस, 15 पोलीस, 20 पोलीस मेले अशा बातम्या ऐकावयाच्या, त्यांना अतिरेक्यांनी मारले. हे काय चालले आहे ? हे प्रकार कधी थांबणार आहेत ? माझ्याकडे गुन्हेगारीच्या बाबतीत सगळा आलेखच आहे. त्यानुसार बनावट नोटा चलनामध्ये आणल्या जातात आणि यामध्ये 50 टक्के वाढ झाली आहे.आपण त्यावर नियंत्रण आणू शकत नाही. दंगलीच्या प्रमाणात 17.5 टक्के वाढ झाली आहे. फसवणुकीच्या प्रकारामध्ये 17 टक्के वाढ झाली आहे. लोकांची हत्त्या करण्याचे जे प्रकार घडतात, त्यामध्येही 13.7 टक्क्यांनी वाढ झाली आहे. चोरीमध्ये 10.9 टक्के वाढ झाली आहे. हुंडाबळीमध्ये 1.6 टक्क्यांनी वाढ झाली आहे आणि सदोष मनुष्यवधाच्या गुन्ह्यामध्ये 1.8 टक्क्यांनी वाढ झाली आहे, अशा प्रकारे या सगळया गुन्ह्यांमध्ये वाढ झ ाालेली आहे. मग राज्यामधील सरकार कुठे आहे ?

सभापती महोदय, संपूर्ण दहा वर्षामध्ये महाराष्ट्रात 251 पोलीस भ्रष्टाचारामध्ये पकडले गेले. या अगोदर महसूल विभागाचा नंबर 1 होता, पण आता तुमच्या विभागाचा, पोलिसांचा नंबर 1 लागलेला आहे. मागच्या वेळी बातमी वाचली की, माजी गृह राज्यमंत्र्यांचे पी.ए. हे अजून देखील स्वत:च कुठेतरी हप्ते गोळा करीत आहेत. सभापती महोदय, हे काय चालले आहे ? म्हणून माझी आपल्या माध्यमातून सरकारकडे आज मागणी आहे की, पोलीस अधिकारी आणि त्यांचे नातेवाईक यांच्या नावावर असलेली संपत्ती, त्यांचे व्यवसाय यासंबंधीची माहिती पोलीस दलामध्येच विशेष विभाग तयार करुन संकलित व्हावयास पाहिजे अशी माझी शासनाकडे मागणी आहे.

सभापती महोदय, गेल्या नऊ वर्षामध्ये संपूर्ण देशामध्ये तुरुंगामध्ये 1184 जणांचा मृत्यू झ ाला आणि महाराष्ट्रामध्ये 192 जणांचा मृत्यू झाला आणि यांना कोणीही वाली नाही, मात्र महाराष्ट्र नंबर 1 आहे. आापण नक्षलवांच्या बाबतीत नेमकी कोणती भूमिका घेणार आहात आणि ...

. . . .2 झेड-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम . . ..

यापुढे महाराष्ट्रामध्ये नक्षलवाद्याकडून एकाही पोलिसांची हत्या होणार नाही याबाबतीत आपण जबाबदारी घेणार आहात की नाही ? याचे मला आपल्याकडून निश्चितपणे उत्तर मिळेल अशी मी आशा बाळगतो.

सभापती महोदय, मला आणखी एक बाब सांगावयाची आहे की, आपण वरिष्ठ पोलिसांचे निलंबन केलेले आहे. परंतु आज स्थिती अशी आहे की, जवळजवळ 100 च्यावर वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना आणि अधिकाऱ्यांना निलंबित केल्यामुळे घरी बसून पगार देत आहोत. त्या सर्वांची 8-10 वर्षापासून चौकशी सुरु आहे आणि दुसरीकडे त्यांना घरी बसून पगार मिळत आहे. माझे असे म्हणणे आहे की, याबाबतीत ताबडतोब काहीतरी निर्णय घ्यावयास पाहिजे. या अधिकाऱ्यांची चौकशी पूर्ण करुन विषय संपवून टाकावा आणि त्यांना कायमचे घरी बसवावे. पण मघाशी म्हटल्या- प्रमाणे 100 च्या वर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना घरी बसवून आपण त्यांना दहा-दहा वर्षे 75 टक्के पगार देत आहोत. हे प्रकार थांबवावेत. तसे झाले तर शासनाचे पैसे वाचतील. त्यामुळे त्यांच्या बाबतीत लवकरात लवकर निर्णय घ्यावा. तसेच वायरलेस वरील पोलीस हे पोलीसच नाहीत आणि त्यांना अन्य पोलिसांप्रमाणे वेतनवाढ नाही असा आता एक नवीन शोध पोलीस आयुक्तांनी काढलेला आहे. तेव्हा वायरलेस वरील पोलिसांना देखील अन्य पोलिसांप्रमाणे वेतनवाढ मिळेल अशा प्रकारचा आपण ताबडतोब निर्णय घ्यावा. तसेच मी ऐकलेले आहे की, आता केंद्र शासन नवीन निर्णय घेत असून प्रत्येक तक्रार ही एफ.आय.आर.असेल. तेव्हा आपण आता काय ते पहावे, कुठेतरी हे प्रकार थांबवावेत. नाहीतर उद्या श्री.आर.आर.पाटील यांनी माझा विनयभंग केला म्हणून कोणीही जाऊन तक्रार देईल आणि मग माननीय श्री.आर.आर.पाटील यांच्याविरुध्द तुम्हाला एफ.आर.आय.दाखल करावा लागेल. होय, मी जबाबदारीने बोलत आहे. मी उदाहरण देत आहे. उद्या सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी आमचा विनयभंग केला म्हणून कोणीतरी तक्रार देईल आणि मग सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांच्याविरुध्द एफ.आय.आर.दाखल करावा लागेल. एखादी महिला एखाद्या पुढाऱ्याच्या बाबतीत अशा पध्दतीने एफ.आर.आय.दाखल करील.

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

यानंतर कु.थोरात . . ..

श्री. रामदास कदम .......

तक्रार देईल मग ही बाब (अडथळा) सभापती महोदय, यांना महीत नसेल तर मी असेही सांगतो की, मुख्यमंत्र्यांवर किंवा अन्य पुढाऱ्यावर कोणीही जाऊन खोटी तक्रार दाखल करील आणि मग त्यांच्या विरुध्द एफआयआर दाखल करावा लागेल. सभापती महोदय, माझा बोलण्याचा आशय समजून घ्यावा. उद्या सगळे लोकप्रतिनिधी अडचणीत येऊ शकतात. याचा दुरुपयोग होता कामा नये, याची दक्षता शासनाने घ्यावी.

सभापती महोदय, आपल्या मार्फत मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, 75 हजार पोलिसांना आज देखील आहार भत्ता दिला गेला नाही. पोलिसांना उपाशी ठेवायचे, त्यांच्या पोटात काही घालायचे नाही आणि त्यांना काम करा असे सांगायचे. आपण पोलिसांकडून कामाची अपेक्षा कशी ठेवायची? सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी या बाबतीत ताबडतोब निर्णय घ्यावा अशी माझी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, फाशी देण्याच्या बाबतीत मी या सभागृहात अनेक वेळा बोललो आहे. आज देखील या महाराष्ट्रात 16 कैदी फाशीच्या प्रतिक्षेत आहेत. आपण कां थांबलो आहोत. कशासाठी थांबलो आहोत. कुणाची वाट पहात आहोत. ब्राम्हणाकडून मुहुर्त काढून घ्यावयाचा आहे काय? सभापती महोदय, जे 16 कैदी फाशीच्या प्रतिक्षेत आहेत त्याबाबतीत शासनाने तात्काळ निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, आज मुबईमध्ये मोठया प्रमाणात लोंढेच्या लोंढे येत आहेत. मुंबई तेवढीच आहे फक्त बाहेरुन येणाऱ्या लोकांसाठी गाडया वाढविल्या जात आहेत. पण येथे अपघात होऊ नयेत म्हणून कुठलीही दक्षता बाळगली जात नाही. परमिटच्या संदर्भात तुमच्या सरकारच्या मुख्यमंत्री श्रीमती शिला दिक्षित यांनी जो निर्याय घेतला आहे तसा मर्दानी निर्णय मुख्यमंत्री घेतील काय? कायदा व सुव्यवस्था सांभाळावयाची असेल तर कुठल्याही परिस्थितीत श्रीमती शिला दिक्षित यांनी परमिटच्या संदर्भात जो निर्णय घेतलेला आहे तसा निर्णय या महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी तात्काळ घ्यावा अशी प्रकारची मागणी मी याठिकाणी करतो.तरच ही मुंबई आणि महाराष्ट्र आपल्याला सुरक्षित पहायला मिळेल. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी अधिक वेळ दिला त्याबद्दल मी आपले आभार मानतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

---

...2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद मुझफ्फर हुसेन ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकरसाहेबांनी या ठिकाणी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे मत मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या अशा राज्याच्या कारभाराच्या दृष्टिकोनातून आणि कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून हा प्रस्ताव या सभागृहामध्ये चर्चेसाठी आलेला आहे. सभापती महोदय, निश्चितपणे 26/11, 13 फेब्रुवारी व त्याच्या आधी घडलेल्या ब-याच प्रकरणांनी कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत प्रश्नचिन्ह निर्माण केलेले आहे. सभापती महोदय, या चर्चेच्या माध्यमातून मी एक गोष्ट या सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याची जबाबदारी निश्चितपणे आपल्या गृह खात्यावर आहे. पोलीसदलावर आहे पण त्याचप्रमाणे राज्यामध्ये झालेले शहरीकरण आणि ग्रामीण भाग व दोन्ही बाजूला असलेले प्रश्न यावर अवलंबून आहे. एका बाजुला उग्रवाद्यांचे हल्ले् तर दुसऱ्या बाजूला वाढत्या शहरीकरणामुळे वाढलेले प्रश्न आहे.

यानंतर श्री. बरवड...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसैन ....

त्याचबरोबर ग्रामीण भागातील प्रश्न आहेत. बेरोजगारीमुळे निर्माण होणारे कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न आहेत. सामाजिक असमतोलपणामुळे निर्माण होणारे प्रश्न आहेत. शेवटी हा सर्व भार आपल्या पोलीस खात्यावर येतो. आपल्याकडे नगरविकास विभाग आहे, महसूल विभाग आहे, रोजगार हमी योजना आहे, शिक्षण विभाग आहे. हे सर्व विभाग असले तरी सर्वात जास्त जबाबदारी शेवटी गृह विभागावर येते. समजा सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिक्षकांचा मोर्चा काढला तर पोलिसांनाच त्यांना सामोरे जावे लागते. दाऊद, छोटा राजन यांची चर्चा झाली की, वर्तमानपत्रामध्ये हेडलाईनला पोलीस खात्याचीच बातमी असते. सांगण्याचा मुद्दा एवढाच आहे की, राज्यातील कोणत्याही खात्याचा जनतेशी संबंधित मुद्दा आला तरी शेवटी गृह खात्याची जबाबदारी वाढते. हे सर्व असताना एक गोष्ट या सभागृहामध्ये निश्चितपणे वेळोवेळी सर्वांनी मांडलेली आहे की, गृह खात्याला पाहिजे तेवढ्या निधीचे वाटप होत नाही. त्या खात्याला निधीचे वाटप होण्याची गरज आहे. त्यावर मी आणखी सविस्तर बोलणार आहे.

सभापती महोदय, पोलिसांमध्ये होणाऱ्या भरतीच्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सोलापूर आणि बाकीच्या ठिकाणी झालेल्या प्रकारांचा उल्लेख केला. अशा घटना निश्चितपणे त्या ठिकाणी घडत असतात हे कोणीही नाकारु शकत नाही. त्याच्याही पुढे जाऊन ही भरती, भरतीची पध्दत आणि एकदा नोकरीवर आल्यानंतरची जी प्रथा आपल्याकडे आहे त्याबाबत मी बोलणार आहे. इंग्रजांनी जे नियम आपल्या बॉम्बे पोलीस ॲक्टमध्ये बनविले त्यामध्ये थोडाफार बदल करुन आतापर्यंत आपले पोलीस प्रशासन चालले आहे. परंतु त्याचे बेसिक आज सुध्दा तसेच आहे. एखाद्या पोलीस स्टेशनमध्ये गेल्यानंतर नव्याने भरती झालेला जो कॉन्स्टेबल असतो त्याला पोलीस निरीक्षकाने जर केस नोंदवावयास सांगितले तर ती केस कोणत्या कायद्यान्वये नोंदवावयाची याची त्याला माहिती नसते. मग त्या ठिकाणी त्याच्यापेक्षा जो सिनियर कारकुन असतो त्याला तो बोलावतो आणि केस नोंदवतो. नव्याने भरती झालेले जे पोलीस उपनिरीक्षक किंवा पोलीस निरीक्षक असतात यांना सुध्दा केस नोंदविता येत नाही. एवढेच नव्हे तर नव्याने भरती झालेले जे पोलीस उपअधिक्षक असतात त्यांनाही केस नोंदविता येत नाही.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. मुझफ्फर हुसैन .....

कोणते सेक्शन लावावयास पाहिजे याची त्यांना माहिती नसते. ही केस जेव्हा कोर्टात उभी राहील तेव्हा काय परिणाम होईल याबाबत त्यांच्याकडे काही दृष्टीकोन नसतो. यामुळे आरोपी सुटेल काय, तो बरी होईल काय याची माहिती त्यांना नसते. एक तर आपली लॉ ॲण्ड ज्युडिशिअरी कमकुवत आहे. देशामध्ये 3 कोटीपेक्षा जास्त प्रकरणांचा निकाल लागलेला नाही. लॉ ॲण्ड ज्युडिशिअरीच्या आस्थापनेमध्ये निश्चितपणे कमतरता आहे. त्याच्याही पुढे जाऊन मी असे सांगेन की, आज जर आपण कोणाला आरोपी म्हणून पकडले आणि उद्या तो कोर्टामध्ये सुटला तर आपली केस कमजोर होते. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न वाढतात तसेच गुन्हेगारीकरण वाढते. काल मुंबईमध्ये जो छोटा गुंड होता त्याला आज इंटरपोलची एजंसी शोधत आहे. शिवसेना-भारतीय जनता पक्षाच्या शासनाने सांगितले होते की, आम्ही त्यांना पकडून आणू परंतु पकडून आणू शकले नाही. आज सुध्दा राज्य सरकार आणि केंद्र सरकार अशा प्रकारच्या गुंडांना पकडून आणू शकत नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसैन....

त्यांच्यावर तशी कारवाई करु शकले नाही ही गोष्ट सत्य आहे. दाऊद, छोटा राजन याला पकडले जाईल असे सांगून तुम्ही सत्तेवर आला होता.

सभापती महोदय, मी मूळ मुद्यावर लक्ष केंद्रीत करीत आहे. पोलिसांची भरती होत असताना त्यांना नियमितपणे प्रशिक्षण देण्याची गरज आहे. त्याच्यामध्ये कमतरता आहे. यासंबंधी केंद्र सरकारचे मानव संसाधन विभाग कार्यरत आहे. परंतु राज्यामध्ये तशी व्यवस्था नाही. पोलीस विभागामध्ये प्रशिक्षण देण्याचा एक ठराविक पॅटर्न आहे, त्यानुसार पोलिसांना प्रशिक्षण दिले जाते. (अडथळा) त्यांना हप्त्याचा रेट माहीत असतो असे नाही. परंतु त्यांना भ्रष्टाचाराचे प्रशिक्षण मिळत नसले तरी त्याचे रेट कळणार नाही. केंद्रात अपग्रेडेशन ऑफ ह्यूमन रिसोर्सेस डेव्हलपमेंट डिपार्टमेंट आहे तसा राज्यामध्ये नाही. त्यांची एकदा भरती झाली की, मग ते कोणत्याही प्रवर्गातील असोत मग ओबीसी असोत, एसी, एसटी वा सर्वसाधारण प्रवर्गातील असोत त्यांची बदली होत असते किंवा त्यांना पदोन्नती मिळत असते. त्यासाठी कोणत्याही मेरिटचा किंवा परफॉर्मन्स नियम नाही. त्याबाबतचे प्रशिक्षण नसल्यामुळे प्रत्येक ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेबाबत आपण कमी पडत आहोत. याठिकाणी दिनांक 26 नोव्हेंबरच्या घटनेचा उल्लेख झाला आहे. या विषयाच्या निमित्ताने मी सांगेन की, आपल्याकडे 720 कि.मी.चा समुद्र किनारा आहे. त्यामुळे आमच्या जिल्हयासाठी कोस्टल कमिशनरची नेमणूक करावी असे मी मागील 20 वर्षांपासून बोलत आहे. परंतु 26/11 ची घटना घटल्यानंतरही कोणालाही या गोष्टीचे गांभीर्य वाटत नाही. एवढया मोठया समुद्र किना-यासाठी कोस्टल कमिशनरची नेमणूक केली पाहिजे असे वाटत नाही. तेथील पोलिसांचे बळकटीकरण होणे आवश्यक आहे. मी ठाण्यापासून ते सिंधुदुर्ग पर्यंतच्या समुद्र किना-यासंबंधी बोलत आहे. हे का घडत आहे ? त्यांना त्या प्रकारचे प्रशिक्षण दिले जात नाही. ठाण्याचे एस.पी.असोत की सिंधुदुर्ग जिल्हयाचे एस.पी.असोत, त्यांना त्याठिकाणी दोन वर्षे काम करावयाचे असते. त्यांना असे वाटते की, सुरक्षेविषयी आपले काही देणे घेणे नाही. आपण बदली होऊन औरंगाबाद किंवा नागपूर येथे जाणारच आहोत. त्यांची ही मानसिकता बदलावयाची असेल तर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसैन....

त्यांना तशा प्रकारचे प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे, प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्यांना जबाबदारीची जाणीव होऊ शकते. पोलिसांना नियुक्तीच्या वेळी शपथ दिली जाते. त्या शपथेमध्ये त्यांना कशा प्रकारची कारकीर्द पार पाडावयाची आहे हे सांगणे आवश्यक आहे. तसे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. पण तशी व्यवस्था नसल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, याठिकाणी मशीद व मदरशांचा उल्लेख झाला आहे. मी यावर बोलताना असे म्हणेन की, एक ही छडी से सब को हांका नहीं जाता. या देशामध्ये प्रत्येक मुसलमान इमानदारीने व इतबारीने राहत आहे. प्रत्येक समाजामध्ये दुष्ट प्रवृत्ती असतात हे कोणी नाकारु शकत नाही. म्हणून सर्व समाज दोषी आहे असे बोलणे योग्य नाही. मशीद हे धार्मिक स्थळ आहे आणि मदरशा ही शाळा आहे. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये मदरशामध्ये कोणालाही प्रशिक्षण देताना वा आतंकवाद्याला पकडल्याचे माझ्या ऐकिवात नाही. मी ठाणे जिल्हयातील पोलीस रेकॉर्ड आणलेले आहे. पण या दोन्ही ठिकाणांचा वेळोवेळी उल्लेख होत असतो म्हणून मी यावर बोललो.

सभापती महोदय, पोलिसांच्या घरांचा मोठा प्रश्न आहे. मुंबई सारख्या ठिकाणी तर मोठाच प्रश्न आहे. पोलीस विभागातील जवळपास 25 ते 30 टक्के कर्मचारी दररोज सुट्टीवर असतात, त्यामुळे उपस्थित असलेल्या कर्मचा-यांना सतत 2-3 पाळया कराव्या लागतात. त्यामुळे कधी 48 तास, कधी 60 तास डयूटी करावी लागते. यामध्ये पोलीस विभागातील डीवायएसपी, एसपी यांची सुध्दा सुटका होत नाही. सभापती महोदय, परमेश्वराने 12 तासाची रात्र व 12 तासांचा दिवस केलेला आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मुझफ्फर हुसेन....

परमेश्वराने 12 तास रात्र आणि 12 तास दिवस असे सृष्टीचक्र माणसाचा जीवनक्रम नीट चालण्यासाठीच केलेले आहे.मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण जर 24 तास काम केले तर आपल्या प्रवृत्तीतही घसरण होते, आपणही मुद्याला सोडून वेगळे भाषण करायला लागतो, ही वस्तुस्थिती आहे. सभापती महोदय, स्कॉटलंड यार्ड, लंडन, अमेरिका येथील पोलिसांचे डयुटी अवर्स ठरलेले आहेत. त्यापलीकडे ते काम करत नाहीत. ज्यावेळी 9 सप्टेंबरला वर्ल्ड ट्रेड सेंटर उडविले गेले त्यावेळीही 12 तासांनी पोलिसांची डयुटी बदलली. एवढी भंयकर घटना घल्यानंतर देखील 12 तासानंतर दुस-या शिफ्टमधील पोलिसांनी कामास सुरुवात केली. 27 जुलैला इंग्लडमध्ये घातपाताचा प्रकार घडला त्यावेळी देखील पोलिसांची शिफ्ट बदलली. आपल्याकडे 26/11ची घटना घडल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितल्याप्रमाणे रात्री आणि सकाळीही तेच पोलीस अधिकारी डयुटीवर होते. सांगण्याचे तात्पर्य एवढेच की, शेवटी माणसाची काम करण्याची काही ठराविक क्षमता असते. त्या क्षमतेपलीकडे माणूसाकडून काम करुन घेण्याचा प्रयत्न केला तर त्याची कार्यक्षमता खालावते.

सभापती महोदय, आंध्रप्रदेश सरकारने पोलीस डिपार्टमेंटसाठी एक स्वतंत्र फंड निर्माण केलेला आहे. पोलिसांसाठी इन्शुरन्स पॉलिसी तयार केलेली आहे. मला वाटते आपल्या राज्याने पोलिसांसाठी अशी इन्शुरन्स पॉलिसी तयार केलेली नाही. म्हणून महाराष्ट्र सरकारने देखील आंध्रप्रदेशने केलेल्या पॉलिसीच्या धर्तीवर राज्यातील पोलिसांसाठी विशेष इन्शुरस योजना तयार करावी अशी मी माननीय मंत्री महोदयांना या निमित्ताने विनंती करतो. 26/11च्या घटनेनंतर आपल्याला आर्म्स अम्युनेशन, लॉजिस्टिक सपोर्ट केन्द्रकडून मिळायला लागलेला आहे. कमांडो ट्रेनिंग सेंटर सुरु झालेली आहेत.

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये रोज निरनिराळया प्रांतातून,परदेशातून माणसे येत असतात. त्यांची तपासणी करण्याची कोणतीही व्यवस्था आपल्याकडे नाही. म्हणून आपले इण्टेलिजन्स खाते अधिकाधिक बळकट करण्याची गरज आहे. राज्यामध्ये बाहेरुन म्हणजे विदेशातून लोंढे येत असतात. त्यांच्या इमिग्रेशन बाबत कडक धोरण घेण्याची गरज आहे. काही देशांमध्ये फ्री ऑफ चार्ज इमिग्रेशन असते. म्हणजे त्या देशामध्ये एकदा गेल्यानंतर तुम्हाला जेवढे महिने अथवा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

जेवढे वर्षे रहावयाचे असेल तेवढे महिने आणि वर्षे रहाता येते. आपल्या देशामध्ये अशा प्रकारचा नियम असेल तर त्याबाबतीत राज्य सरकारने केन्द्राकडे आवाज उठवला पाहिजे. अन्य देशामध्ये गेल्यानंतर जितके दिवस परवानगी मिळालेली असेल तितकेच दिवस त्या देशात रहाता येते. त्यानंतर पुन्हा राहाण्याची परवानगी पाहिजे असेल तर त्या व्यक्तीला 24 तास त्या देशाच्या बाहेर जावे लागते आणि त्यानंतर त्याला इमिग्रेशन दिले जाते. अशा प्रकारचा नियम आपल्या देशामध्ये व्हायला पाहिजे. साऊथ आफ्रिकन कण्ट्रीज, बांगला देश, नेपाळ या देशातून लोक आपल्या राज्यामध्ये आणि देशामध्ये येऊन वाटेल तेवढे दिवस आणि महिने किंवा वर्षे राहातात. शेवटी त्यांच्या आरोग्याचा, त्यांच्या सुरक्षेचा ताण राज्यावर पडतो, परिणामी देशाच्या आणि राज्याच्या बजेटमध्ये वाढ होते. पोलिसांना देखील त्यांच्यावर कंट्रोल करणे अशक्य होते. हे परदेशातून शैक्षणिक आणि अन्य विविध कारणांनी येणारे लोक ड्रग्जच्या अवैध धंद्यामध्ये गुंतलेले असतात. नार्कोटिक्स डिपार्टमेट त्यांच्यासाठी कार्यरत असते. तेव्हा परदेशातून येणा-या लोकांच्या येथील वास्तव्याच्या संदर्भात राज्य सरकारने केन्द्राला सांगण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, टेररिझम ॲक्टिव्हिटिज ह्या केवळ आपल्या देशापुरत्या मर्यादित नाहीत. या टेररिझमला अफगाणिस्तानातून सुरुवात झाली. रशिया, अमेरिका, पाकिस्तान या देशातून त्यांना हुसकावून लावण्याचे प्रयत्न झाले आणि त्याचे परिणाम साऊथ इस्ट एशियावर झालेले आहेत. त्यातून हिन्दुस्थान आणि महाराष्ट्र वाचला पाहिजे आणि हे कधी तरी व्हायला पाहिजे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन.....

पण आपल्याला आपली सज्जता ठेवणे गरजेचे आहे. म्हणून मला असे वाटते की, पोलीस दलाला चांगल्या प्रशिक्षणाची आणि ह्युमन रिसोर्सेस प्रशिक्षणाची गरज आहे. कायदा आणि सुव्यवस्था अधिक मजबूत करण्याची गरज आहे. कोणताही गुन्हा करण्यापूर्वी गुन्हेगाराने विचार केला पाहिजे की, मी जर गुन्हा गेला तर मला 24 तासाच्या आत शिक्षा होऊ शकते. नाही तर आज मर्डर केल्यानंतर सुध्दा बेल मिळते, पॅरोल दिला जातो. या गोष्टी थांबविल्याशिवाय कायदा आणि सुव्यवस्थेमध्ये चांगले काम करता येणार नाही. एवढे बोलून आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर मी काही मोजके मुद्दे मांडणार आहे. माननीय गृह राज्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. ते या मुद्यांची नोंद घेऊन उत्तर देतील अशी अपेक्षा गृहित धरुन या विषयाची मांडणी करतो. सभापती महोदय, 26.11.09 रोजी जो दहशतवादी हल्ला झ ाला, ट्रेनमध्ये जे बॉम्बस्फोट झाले, जर्मन बेकरीमध्ये जो स्फोट झाला त्याचा विचार करता मुंबई, महाराष्ट्र आणि देशावर दहशतवादाचे सावट नक्की आहे. 26.11 च्या घटनेनंतर शासनाने प्रधान समिती नेमली. या समितीने योग्य तो तपास करुन, विभागीय चौकशी करुन शासनाला आपला अहवाल सादर केला. आता मुंबई पोलीस दलामध्ये विशेष करुन एटीएस मध्ये माझे टेबल क्लिअर पाहिजे अशा दृष्टीकोनातून माझ्याकडे इंटेलिजन्सचा अहवाल आला की मी काय कारवाई केली हे नमूद करण्यामध्ये तो तो अधिकारी धन्यता मानतो. कारण काही झाले आणि नंतर चौकशी झाली तर माझ्याकडे आलेल्या कागदावर मी नीट होतो हे सिध्द करता येईल. हे खरे आहे की, त्या त्या अधिकाऱ्याकडील कागदावर वेळच्या वेळी नोंद झाली तर तो अधिकारी निर्दोष ठरतो. हे भारतातील सगळ्यात मोठ्या दहशतवादाच्या घटनेत म्हणजे स्व.इंदिरा गांधी यांची हत्या झाली त्यापूर्वी त्यांचे सुरक्षा अधिकारी राममूर्ती यांनी स्पेसिफिक सूचना केली होती की, या या प्रकारचे लोक सिक्युरिटीमध्ये असता कामा नयेत. ती सूचना इंदिराजींनी नाकारली. राममूर्ती यांनी लेखी कागद पुढे केला. तो लेखी कागद नाकारण्यात आला. परंतु हत्या झाल्यानंतर जी चौकशी झाली त्यामध्ये राममूर्ती हे दोषी आढळले नाहीत हे खरे आहे. आता काय होते? माननीय गृहमंत्र्यांचे वक्तव्य आहे की, गेल्या वर्षभरात 372 इंटेलिजन्स रिपोर्ट आले. म्हणजे दरदिवशी एकापेक्षा जास्त. असे असे होण्याची शक्यता आहे. असे होण्याची शक्यता आहे म्हटल्यानंतर लगेच पुढचे सगळे सुरु झाले. कारण एकदा दुधाने तोंड पोळल्यानंतर ताक देखील फुंकून प्यायले जाते. ते केलेच पाहिजे. यात चुकीचे काही नाही. 23 मार्चला इंटेलिजन्स रिपोर्ट आला तो काय होता? त्यामध्ये पुढील चार ठिकाणी दहशतवादाचा हल्ला होण्याची शक्यता आहे. क्रमांक एक- गेटवे ऑफ इंडिया. स्पेसिफिक आहे. क्रमांक दोन- अंधेरी.

3एफ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .......

अंधेरी हे उपनगर म्हणजे खूप मोठे आहे. त्यानंतर तिसरे ठिकाण म्हणजे बॉम्बे स्टॉक एक्सचेंज आणि चौथे आहे ते मुंबईतील गर्दीची ठिकाणे. त्यात बस स्टॉप, रेल्वे स्टेशन्स वगैरे संपूर्ण मुंबईतच गर्दी असते. अशा प्रकारचा रिपोर्ट आल्यानंतर त्या त्या ठिकाणच्या पोलिसांनी कशा प्रकारे सुरक्षा करु शकतील हा प्रश्नच होता. गेट ऑफ इंडिया असे स्पेसिफिक ठिकाण समजू शकतो. अशा प्रकारचा रिपोर्ट आल्यानंतर त्या त्या ठिकाणच्या डीसीपी, एसीपी किंवा सिनियर पी.आय अथवा पी.आय. दर्जाच्या अधिकाऱ्यांनी आपापली कागदपत्रे तयार केली आणि अमुक ठिकाणी नाकाबंदी केली, अमुक ठिकाणी सुरक्षेची अशी अशी व्यवस्था केली अशा प्रकारे लेखी रिपोर्ट तयार केले. अशा प्रकारे आपले संपूर्ण पोलीस दलच या दहशतवाद्यांच्या भोवती फिरायला लागले. हा भाग वगळताही काही क्राईम कंट्रोल करण्याची गरज असते आणि ते आता प्रामुख्याने जाणवायला लागले आहे. अशा प्रकारे इतक्या प्रमाणात म्हणजे वर्षातून 372 इंटेलिजन्स रिपोर्ट प्राप्त झाल्यानंतर स्थानिक मोड्युस असतात ते काय आहे याचाही शासनाने विचार करावा. कारण आपण त्यांच्यापर्यंत जात नाही, कुठेतरी कमी पडतो ही वस्तुस्थिती आहे. त्यावर कसे लक्ष केंद्रित करता येईल हे प्रथम लक्षात घेणे आवश्यक आहे. आपल्याकडे इंटेलिजन्स सिस्टम काय आहे याचाही प्रथम विचार करावा लागेल. म्हणजे टेलिफोन्सवरील बोलणे इंटरसेट करणे, इंटरनेटवरुन होणारे कम्युनिकेशन इंटरसेट करणे वगैरे गोष्टी आपल्या इंटेलिजन्सला येत नाही. अशा गोष्टींसाठी आपली ताकद जास्तीत जास्त कशी दाखविता येईल याचाही विचार करणे आवश्यक आहे. आज आपले पोलीस दल कशा प्रकारे अतिरेकी व दहशतवादाभोवती फिरायला लागले याकडे मी नंतर येणार आहे. पण यामध्ये बऱ्याच गोष्टींचा अंतर्भाव असतो. जे.जे. रुग्णालयामध्ये आतंकवाद्यांची प्रेते ठेवली आहेत ते ठीक आहे. कारण आंतरराष्ट्रीय कारणामुळे ते करावे लागत असेल पण आता सायन्स इतके पुढे गेले आहे की, त्यांची डीएनए टेस्ट करुन ठेवली तर त्याच्या आधारे हे प्रुव्ह करु शकतो आणि सध्याच्या परिस्थितीत या सिक्युरिटीवर जो खर्च होत आहे तो टाळता येईल काय याचाही विचार करण्याची गरज आहे. सन 2008 च्या नोव्हेंबर महिन्यात इंडियन मुजाहिद्दीनच्या अतिरेक्यांना काही पोलीस अधिकाऱ्यांनी पकडले होते. त्या अधिकाऱ्यांना माननीय गृहमंत्र्यांनी 5-5 लाखाचे बक्षिस देण्याची घोषणा सुध्दा केली होती. परंतु

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

अद्यापही त्या अधिकाऱ्यांच्या हातात यापैकी काहीही रक्कम लागली नाही. आज राज्यात सुरक्षेसंबंधी काय वातावरण आहे याची माननीय मंत्री महोदयांना जाण आहेच. आम्हाला जी माहिती मिळते त्यावरुन आम्ही हे मांडत असतो, त्यातील स्पिरिट मी आपल्यापर्यंत पोहचवित आहे. त्यात काही अडचणी असतील त्याच आपल्यासमोर मांडल्या पाहिजे म्हणून मी हे मांडत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

सभापती महोदय, दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी आपण बरीच अत्याधुनिक साधने विकत घेतलेली आहेत. कोकणातील रत्नागिरी येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल घोषित करण्यात आल्यामुळे या ठिकाणी अनेक नवीन नवीन अत्याधुनिक उपकरणे आली परंतु ही उपकरणे चालविण्यासाठी त्या पध्दतीचे टेक्निकल स्टाफ शासनाने न दिल्यामुळे या उपकरणांचा काही एक उपयोग होत नाही .या हॉस्पिटलला किती जरी अत्याधुनिक उपकरणे मिळाली तरी सुध्दा ती उपकरणे चालविण्यासाठी त्या दर्जाचे लोक त्या ठिकाणी न दिल्यामुळे या अत्याधुनिक यंत्राचा काही एक उपयोग झालेला नाही. तसाच प्रकार आपल्या पोलीस दलाच्या बाबतीत सुध्दा झालेला आहे. पोलीस दलामध्ये अनेक अत्याधुनिक साधने आली परंतु ती हँडल करण्यासाठी त्या दर्जाचे पोलीस दल नसल्यामुळे या उपकरणांचा काही एक उपयोग झालेला नाही. आपण कॉम्बॅ्ट व्हेईकल घेतले परंतु ते चालविण्यासाठी, हँडल करण्यासाठी त्या दर्जाचे ज्ञान असणारे लोक मिळालेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. आपण बघतो आहोत की, एकदा फिदायीन हल्ला ज्या पध्दतीने झाला त्याच पध्दतीने दुसरा हल्ला होत नसतो परंतु तरी सुध्दा तसे प्रकार होऊ नये यासाठी आपण काळजी घेतलेली आहे. पोलीस दलासाठी आपण टोटल कन्टेन्मेंट व्हेईकल घेतलेले आहे. यामध्ये बॉम्ब टाकला की, त्याचा स्फोट होत असतो परंतु ते मशीन हँडल करण्यासाठी आपल्याकडे पुरेसे तज्ज्ञ लोक नाहीत. सीएसटीवर अतिरेक्यानी हल्ला केला होता त्यावेळी आपल्याला तेथे बॉम्ब आढळून आला होता तो बॉम्ब टोटल कन्टेन्मेंट व्हेईकलमध्ये टाकून त्याचा स्फोट करण्यात आला होता. पुण्यातील जर्मन बेकरीमध्ये जो बॉम्बस्फोट झाला त्या ठिकाणी आपल्याला बॉम्ब सापडला नाही त्यामुळे या मशीनचा उपयोग होऊ शकला नाही. पोलीस दलाला अजून अत्याधुनिक करण्यासाठी मध्यंतरी टेंडर काढले गेले, सर्व काही पास झाले, मुख्य पोलीस अधिका-यांकडून ते पास होऊन आले, सगळे काही सँक्शन झाले, कंसाईनमेंट आली परंतु माशी कोठे शिंकली हे काही समजले नाही. कंसाईनमेंट येऊन पडली परंतु उपकरणे आली नाहीत. त्यामुळे जो काही निर्णय आपल्याला घ्यावयाचा आहे तो आपण पटकन घेतला तरच त्याचा उपयोग होऊ शकतो. पटकन निर्णय घेतले नाही तर यामध्ये दहशतवाद्यांचेच फावते हे आपण विसरु नये.

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

सभापती महोदय, आज पोलीस स्टेशनमध्ये काय परिस्थिती आहे याची आपल्याला कल्पना असेलच. आता केवळ सामान्य क्राईम होतात. मुळात पोलीस स्टेशनमध्ये गेलो तर एफआयआरच घेतला जात नाही. मुळात एफआयआर घेतला जाऊ नये यासाठी अधिका-यांची मानसिकता झालेली आहे. क्राईम लो दिसावा म्हणून ते एफआयआर घेत नसावेत. जसे तंटामुक्त गाव योजना आहे तसेच क्राईम मुक्त पोलीस स्टेशन असावे असे अधिका-यांना किंवा सरकारला वाटत असावे. क्राईम लो दाखविला म्हणजे राज्याचा परफॉर्मन्स चांगला व्हावा म्हणूनच पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर घेतला जात नसावा. आपण जर पोलीस स्टेशनमध्ये गेलो तर बाहेर म्हतारी बाई आणि तीचा मुलगा दिसतो परंतु आत मध्ये मात्र व्यापा-यांबरोबर, बिल्डरांबरोबर मोठे पोलीस अधिकारी चर्चा करीत असल्याचे दिसून येते. आज आपण कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये जा आपल्याला हेच दिसून येईल. आज वरिष्ठ पोलीस अधिका-यांची पार्टनरशिप बिल्डर आणि डेव्हलपर बरोबर असल्याचे आपल्याला दिसून येते. हे वरिष्ठ पोलीस अधिकारी पोलीस स्टेशनमध्ये बिल्डर, व्यापारी आणि डेव्हलपर बरोबर चर्चा करीत असल्याचे दिसून येते आणि गरीब माणूस मात्र तासनतास पोलीस स्टेशनच्या बाहेर बसलेला असल्याचे आपल्याला दिसून येते.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...

सभापती महोदय,राज्यातील कायदा व सुव्यवस्थेसंबंधी बोलत असतांना मला हे सांगावयाचे आहे की, श्री.अजय गांडा नावाचा एक बुकी आहे. अनेक डी.सी.पी आणि ॲडिशनल सी.पी.चा कलेक्टर म्हणून तो काम करतो हे मी या ठिकाणी अत्यंत जबाबदारीने सांगत आहे. मागच्या सहका-यांचा श्री.चेतन देसाई नावाचा ज्याप्रमाणे कलेक्टर होता त्याप्रमाणे आताच्या सहका-यांचा श्री अजय गांडा नावाचा कलेक्टर आहे. आपल्याला समजावयाला सोपे जावे म्हणून मी त्यांच्या नावाचा उल्लेख केला आहे.त्या व्यतिरिक्त मला कोणताही आरोप करावयाचा नाही.सर्रासपणे हे काम चालू आहे तेव्हा आपल्या विभागातील उच्च अधिकारी जर अशा पध्दतीने काम करीत असतील तर गृह मंत्र्यांचे कोठे तरी चालते हे दाखविण्याची गरज आहे.असे मला आपल्याला सांगावयाचे आहे. काही ना काही तरी करुन आपण आपल्या पदावर टिकून राहू यासाठी अधिकारी नेहमीच प्रयत्न करीत असतात .जॉईन्ट सी.पी. (क्राईम) या पदावर जर कोणाची नेमणूक करण्यात आली तर ते तिकडचे आहेत. तों अमुक अधिकारी यांचा आहे. अशा प्रकारच्या चर्चा विभागामध्ये चालू असतात त्यातून ख-या आणि खोटया अशा दोन्हीही चर्चा बाहेर जातात तेव्हा अधिका-यांवर पूर्णपणे होल्ड आहे आणि अधिका-यांवर वचक आहे यासंबंधीचा मेसेज त्यांच्या पर्यत जावयास पाहिजे परंतु दुर्देवाने असा मेसेज जातांना दिसत नाही.शाहरुख खानच्या चित्रपटाच्या संदर्भात आंदोलन झाले होते. हे आंदोलन करावे किंवा न करावे हा त्या पक्षाचा आणि सरकारचा विषय आहे.त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही परंतु अशा प्रकारचे आंदोलन झाल्यानंतर मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी मल्टीप्लेक्सवाल्यांबरोबर चर्चा करण्यासाठी एक बैठक घेतली . त्या बैठकीत त्यांनी असे सागितले की,आम्ही आपल्याला सुरक्षा देऊ आंदोलन होत असल्यामुळे मल्टीप्लेक्सवाले घाबरले होते.

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

सभापती महोदय, मला एवढेच सांगावयाचे आहे की, शाहरुखानच्या चित्रपटाच्या संदर्भात मुबईच्या पोलीस आयुक्तांनी बैठक घेतली होती. त्यांनी सुरक्षा विषयाच्या संदर्भात बैठक घेण्यास काहीच हरकत नाही परंतु मल्टीप्लेक्समध्ये अमुक सिनेमा लावला नाही तर तुमचे लायसन्स रद्द करु या पध्दतीचे वक्तव्य पोलीस आयुक्त करणार असतील तर ते बरोबर नाही त्या विषयासंबंधी आपली भूमिका, तसेच आपल्या नेत्यांची भूमिका स्पष्टपणे दिली जात असतांना देखील मुंबईचे पोलीस

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...

आयुक्त या विषयासबंधी विशिष्ट प्रकारच्या नेतृत्वाला खूश करण्यासाठी जादा पुढचे पाऊल टाकतात तेव्हा याचा देखील विचार होण्याची गरज आहे.

सभापती महोदय, महमंदअली नावाचा एक डॉकयार्डचा किंग आहे हे माननीय गृह मंत्र्यांना माहीत आहे. जवळजवळ दोन हजार बोटी डिझेलचे स्मगलीग करीत असतात त्यातून आर्थिक नुकसान मोठया प्रमाणावर होत असते ते एक वेळ मी समजू शकतो .कस्टम विभागाने देखील गृह विभागाला यासंबंधी स्पष्टपणे माहिती पाठवली होती तरीसुध्दा पोलीस विभाग त्याच्याविरुध्द कोणतीही कारवाई करीत नाही. आज त्या ठिकाणी डिझेलचे स्मगलीग होत आहे उद्या आरडीएक्ससुध्दा बाहेरुन येथे येईल तरी सुध्दा पोलिसांकडून कोणतीही कारवाई केली जात नसेल तर ते बरोबर होणार नाही. महमंदअली नावाच्या गृहस्थाची दादागिरी तेथे मोठया प्रमाणावर असून त्याचे नेट वर्कीग देखील मोठे आहे. त्या व्यक्तिने आता कोणाच्या तरी कृपेमुळे एका पक्षात प्रवेश केला आहे................

श्री.भाई जगताप : नाव सांगा

श्री.विनोद तावडे : श्री.कृपाशंकर सिंह यांच्या कृपेमुळे त्यांनी कॉग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

श्री.भाई जगताप : त्यांना कॉग्रेस पक्षात प्रवेश देण्यात आलेला नाही या संबधी टी.व्ही.च्या वाहिन्यांवर श्री.कृपाशंकर सिंह यांनीच खुलासा केला होता.

श्री..विनोद तावडे : आपल्या पक्षाच्या बॅनर्सवर त्यांचे फोटो आहेत.

श्री.भाई जगताप : आपल्या पक्षाच्या बॅनर्सवर देखील अनेकांचे फोटो असतात हे मी देखील आपल्याला सांगू शकेल .कॉग्रेस पक्षात त्यांना प्रवेश देण्यात आला होता असे आपण म्हणाला असल्यामुळे पक्षाचा जबाबदार पदाधिकारी म्हणून मी आपल्याला सांगतो की, ते कॉग्रेस पक्षात नाहीत .याबाबतीत यापूर्वी देखील खुलासा करण्यात आला होता.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझ्याकडे त्या पक्षाच्या अध्यक्षांसोबत कॉंग्रेस पक्षामध्ये प्रवेश करीत असतांना काढलेले फोटो आहेत. आसिफ दाढीवर फायरींग झाले आहे, तो दाऊदचा पक्का हस्तक आहे. तो कॉंग्रेस पक्षाच्या मायनॉरिटी सेलचा प्रमुख आहे. तो कॉंग्रेस पक्षाच्या स्थानिक खासदारांच्या घरी जाऊन चहा पित असल्याचे फोटो उर्दू वर्तमानपत्रामध्ये छापून आले आहेत. हे या सत्ताधारी पक्षाला शोभते काय? त्यामुळे माननीय गृहमंत्री श्री. आर.आर. पाटील यांच्याकडे जरी हे खाते असले तरी दिल्लीतील मंत्री, येथील खासदार किंवा त्यांच्या जवळचा मंत्री, उद्योजकांच्या जवळचा मंत्री असल्यानंतर त्यांच्यावर माननीय गृहमंत्री तुम्ही कारवाई करु शकत नाही. तुम्ही या आसीफ दाढीला हात लावून दाखवा. तुमच्याकडे गृह खाते आहे, तुम्ही ते सिध्द करुन दाखवा.

**उपसभापती** : त्या दाढीला हात लावायचे आपण सोडून द्या. आपल्याकडे भरपूर वेळ नाही. कुणाकुणाच्या दाढीला आपण हात लावणार?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, जर माननीय गृहमंत्र्यांनी आसिफ दाढीला हात लावला तर त्यांचा सरकारमध्ये वचक निर्माण होईल. आणि त्यामधून बऱ्याच पक्षांतर्गत गोष्टी स्पष्ट होतील. आपण दाऊदच्या 12 मालमत्ता जप्त करुन त्यांचा लिलाव करण्यात आला. पहिल्या आणि दुसऱ्यावेळी केलेल्या लिलावाला कुणीही प्रतिसाद दिला नाही. परंतु त्यानंतर लोखंडवाला यांनी ती मालमत्ता पडेल किंमतीला विकत घेतली. आपल्याला वाटले की, त्यांनी कमी किंमतीला ही मालमत्ता विकत घेतली. शासकीय अधिकृत किंमत आपल्याला दिली, परंतु नंतर दाऊदला भेटून त्या मालमत्तेची उरलली किंमत त्यांनी दिली. सभापती महोदय, आपल्या एन.आय.ए. चे कार्यालय वरळीच्या मेसमध्ये चालते. दाऊदच्या मालमत्तेचा लिलाव करण्याऐवजी शासकीय कार्यालये त्या दाऊदच्या जागेमध्ये सुरु होतील असे हिंमत करुन कां सांगत नाही? त्या मालमत्ता विकत घेण्यासाठी कुणीही प्रतिसाद दिला नसतांना त्या जागेवर शासकीय कार्यालये सुरु करण्याची शासनाची हिंमत कां झाली नाही? यामध्ये आपल्याला कुठेतरी जरब बसविता आली पाहिजे. परंतु यामध्ये बिल्डरांशी लागेबांधे केले जातात. त्याठिकाणी एकमेकांमध्ये अंडरस्टँडींग होते. या मुंबई शहरामध्ये कायद्याचे राज्य अस्तित्वात आहे, सरकार अस्तित्वात आहे हे दाखविण्याची आज गरज आहे.आज आपल्याकडे भरपूर जागा असतांना एन.आय.ए.च्या कार्यालयासाठी ज्याठिकाणी जेवण तयार होते त्या मेसच्या जागेवर कोपऱ्यात आपण कार्यालय थाटले आहे. एन.आय.ए. ही एक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

नॅशनल लेव्हलवरील एजन्सी असतांना तुमच्या हातामध्ये आलेल्या जागेवर त्यांचे कार्यालय कां सुरु करीत नाही? हा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, आपण नेहमी पहातो की, आय.ए.एस. आणि आय.पी.एस. लॉबीमध्ये आज नेहमी भांडणे सुरु असतात. त्यांच्यामध्ये ग्रुप्स तयार झाले असल्यामुळे एक वेळ राज्यातील जातियता जाईल परंतु आय.ए.एस. आणि आय.पी.एस. मधील बॅच नावाची जात कधीही जाणार नाही. त्यांच्यामध्ये रिजनल लेव्हलवर जाती झाल्या आहेत,त्याशिवाय बॅच नावाची एक जात झाली आहे. त्यामुळे ते एकमेकांविरुध्द काम करीत आहेत. आणि म्हणून पोलीस दलामध्ये आय.पी.एस. अधिकारी म्हणून त्यांचा वचक निर्माण झाला पाहिजे, परंतु तो उभा रहात नाही, उभा राहू शकत नाही. सभापती महोदय, मी याबाबत एक उदाहरण देतो. माझ्याकडे पोलीस महासंचालकांना लिहिलेले एक अर्धशासकीय पत्र आहे. पत्राचा क्रमांक 1/2009, पोलीस अधिक्षक, गुन्हे शाखा,नाष्था सेल, (अतिरिक्त कार्यभार) सायबर सेल, गुन्हा अन्वेषण विभाग आहे. या पत्रामध्ये एका प्रकरणामध्ये सी.आय.डी. चा कौशल्यपूर्ण तपास करणे, पुस्तकाचे प्रकाशन होणे, त्याचे पेमेंट देणे, त्यामधून सर्व प्रकरण बाहेर निघाले. त्यामुळे त्यांनी पोलीस महासंचालकांना कळविले आहे. त्यांनी म्हटले आहे की, कशा भाषेमध्ये बोलले जाते. ती भाषा रेकॉर्डवर आणू नये म्हणून मी ते वाक्य याठिकाणी उच्चारीत नाही. यामध्ये जे अधिकारी आहेत ते मोठे आहेत, त्यांचा रेकॉर्ड निगेटीव्ह आहे असे माझे मत नाही. परंतु कधी कधी अशा अधिकाऱ्यांच्या डोक्यामध्ये मस्ती चढते. याबाबत आपण काहीतरी कारवाई केली तर त्यामुळे कुठेतरी चांगला मेसेज जाईल. मी सिनियॉरिटीने वरिष्ठ अधिकारी आहे म्हणून माझ्या खालच्या अधिकाऱ्याला शिव्यांच्या भाषेमध्ये बोलले तरी चालेल,असे होऊ शकत नाही. अशाप्रकारचा मेसेज देण्याची गरज आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . .. .

आणि अशा अधिकाऱ्यांच्या एक-दोन केसेस पडून असल्या तर माननीय गृहमंत्री महोदय, अडचण अशी असते की, मॉरल कॉन्फीडन्स् बिल्ट करावा लागतो, तो होत नाही. म्हणून अशा विषयामध्ये त्या-त्या अधिकाऱ्याचा परफॉर्मन्स् बघता आपण त्यामध्ये योग्य काय ते करावे. श्री.के.पी.रघुवंशी यांच्या बदलीच्या विषयाबाबत माझे वेगळे मत आहे, म्हणजे त्यांनी प्रेसमध्ये काही सांगितले नसते तर चाच्याचे काही कळले नसते असे नाही, ते कळलेच असते. पण केंद्र शासनाने तो प्रेस्टीज इश्यु केला आणि इतका दबाव आणला आणि त्यावर आपण इतकी जोरामध्ये कारवाई केली. पण ठीक आहे. आपला प्रशासकीय निर्णय असतो. परंतु त्या अधिकाऱ्याचा मागील परफॉर्मन्स् पहाण्याची गरज असते, नाहीतर ऊठसूट कर कारवाई असे होता कामा नये. अशी खोटी प्रकरणे आणि आमच्यासारख्या आमदारांकडे आणून देण्यास लोक उत्सुकच असतात. परंतु त्या-त्या अधिकाऱ्यांचा परफॉर्मन्स् पाहिला पाहिजे आणि त्याच्या आधारे ठरविले पाहिजे. श्री.मारिया यांची सुध्दा बदली झाली, ते सुध्दा चांगले आहेत. मला त्यांच्याविषयी काही म्हणावयाचे नाही. पण पुढच्या वेळी तो हिंमत करीत नाही, म्हणजे ते चाच्या वगैरे पाकिस्तानामध्ये बसलेले लोक प्रेसमधून येणाऱ्या माहितीची वाट पहात नाहीत. त्यांना माहिती कळलेलीच असते आणि समजा जर मायनर चूक झाली तर आपण त्याचे इतके करतो, मग त्याची कारणे काय आहेत ती आपल्याला कळतात आणि अधिकाऱ्यांमध्ये त्या कारणांची चर्चा होते आणि मग पुढच्या वेळेस त्याची तशी हिंमत होत नाही. मग आपले टिकवा. अशा वेळेला जर खऱ्या अर्थाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी गृह विभागाची काही पकड निर्माण करावयाची असेल तर या सर्व विषयामध्ये काहीतरी ठोस असे माननीय गृह मंत्री करतील एवढीच खरे म्हणजे अपेक्षा आहे आणि महाराष्ट्रात, मुंबईमध्ये कायदा आणि सुव्यवस्था अस्तित्वात आहे. केवळ दहशतवाद नाही तर बाकी सुध्दा आहे हे कुठेतरी जाणवून देण्याची गरज आहे एवढेच मला सांगावयाचे आहे.

------

. . . .3 जे-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : अजून या विषयावर किती सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे ? कारण 6.30 पूर्वी माननीय मंत्री महोदयांचे उत्तर व्हावयास पाहिजे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, शिवसेना पक्षाच्या वतीने फक्त सन्माननीय सदस्य श्री.रामदासभाई कदम यांनी भाषण केलेले आहे.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : उद्या ही चर्चा पुढे सुरु ठेवावी.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, उद्या सकाळी माननीय मंत्री महोदयांनी उत्तराचे भाषण करावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मागच्या आठवड्यामध्ये सुध्दा एक प्रस्ताव चर्चेसाठी होता, परंतु तो चर्चेसाठी सदनासमोर आलेला नाही.

श्री.आर.आर.पाटील (खाली बसून) : सभापती महोदय, उद्या गडचिरोलीच्या संदर्भातील प्रस्ताव आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी भाषण सुरु करावे.

. . . .3 जे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये विरोधी पक्षनेते आदरणीय श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब यांनी जी चर्चा उपस्थित केली आहे, त्या विषयावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, आपण गेल्या अनेक दिवसापासून, अनेक वर्षापासून कायदा आणि सुव्यवस्थेच्या सगळया चर्चा आणि त्यावरील भाषणे ऐकली तर अलिकडे होत असलेले आतंकवादी हल्ले असतील किंवा गुन्ह्यांमध्ये झालेली वाढ असेल तर या सगळ्या गोष्टींचा येथे उल्लेख होत असतो आणि तसा तो होणे गरजेचे आहे. परंतु हे समजणेही गरजेचे आहे की, 26-11 ला मुंबई मध्ये झालेल्या आतंगवादी हल्ल्यानंतर प्रामुख्याने काही गोष्टी तुमच्या-आमच्या सर्वांच्या लक्षात आल्या आहेत. परंतु आम्ही त्याकडे लक्ष देणार आहोत की नाही हा त्यातील महत्वाचा प्रश्न आहे. 26-11 च्या दुर्दैवी आतंगवादी हल्ल्याच्या वेळी ज्यापध्दतीने मुंबईतील पोलीस लढले, ज्या पध्दतीने त्यांनी हौतात्म्य स्विकारले आहे, त्याची नोंद जगाच्या इतिहासामध्ये सुध्दा घेतली जाईल. ही गोष्ट नाकारता येणार नाही. कोणत्याही राज्याचे, कोणत्याही शहरातील पोलीस दल एवढया मोठया प्रमाणात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय टेररिझमच्या विरोधात लढण्यासाठी सक्षम आहे का ? हा महत्वाचा प्रश्न रहाणार आहे. सन्माननीय सदस्य आणि माझे मित्र श्री.मुझफ्फर हुसैन यांनी सांगितले आणि या बाजूने सुध्दा तशा प्रकारच्या सूचना आल्या की, मुळामध्ये आमच्या पोलिसांना काही ट्रेनिंग द्यावे लागेल काय ? हा महत्वाचा प्रश्न यामधून निर्माण झालेला आहे. आपल्याला ही गोष्ट नाकारता येणार नाही की, तुम्ही-आम्ही एवढया मोठया प्रमाणात दारुगोळा घेऊन आलेले सर्व आतंकवादी टी.व्ही.वर पहात होतो आणि आम्ही स्वत: पार्कच्या ठिकाणी हजर होतो.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ KGS/ KTG/ MMP/ प्रथम सौ.रणदिवे.... 17:55

श्री. भाई जगताप...

मागच्या वेळेला माझा मतदारसंघच त्या बाजूला होता. एका पिस्तुलाच्या जोरावर विश्वास नांगरे-पाटील सारख्या डीसीपीचे शेवटचा श्वास असेपर्यंत आम्ही त्यांना अडवून ठेवू अशा प्रकारचे संभाषण आम्ही चित्रफितीवर पाहिलेले आहे. मिडियामध्ये सगळयांनी पाहिलेले आहे. सभापती महोदय, खऱ्या अर्थाने त्यांचे कौतुक केले पाहिजे. त्यांची पाठ थोपटली पाहिजे. एका पिस्तुलाच्या आधारावर समोरच्या आतंकवाद्याकडे असलेले अत्याधुनिक शस्त्रास्त्र, प्रचंड प्रमाणात विध्वंसक दारुगोळा, या सगळयाला सामोरे जात असताना कुठच्याही पोलिसाने असे सांगितले नाही की, नाही नाही, मी घरी जातो किंवा येथून पळून जातो. सभापती महोदय, पोलिसांच्या बाबतीतील काही गोष्टी आपल्याला बोलल्याच पाहिजेत. कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत ज्या ज्या ठिकाणी उणिवा आहेत त्यावर आपल्याला बोलायला पाहिजे नव्हे त्यावर आघात करावयास पाहिजे. परंतु त्याचबरोबर 26/11 नंतर झालेला मूलभूत बदल समजून घेणे गरजेचे आहे. माननीय मंत्रिमहोदय, मी आपल्याला याठिकाणी नम्रपणे सांगतो की, आपण अतिशय मनापासून, पोटतीडिकेने, प्रामाणिकपणे काही गोष्टी करीत आहात आणि तुम्ही त्या करीत राहाणार याबद्दल आमच्या मनामध्ये शंका नाही. परंतु तुम्हाला आणि आम्हाला हे समजणे गरजेचे आहे. ज्यांचा उल्लेख याठिकाणी झाला त्याचा उल्लेख मला परत एकदा करावासा वाटतो. सगळे जुने कायदे मग मुंबई पोलीस ॲक्ट असेल,(अडथळा) मी राज्याच्या कायद्याच्या बाबतीत बोलत आहे. केंद्राच्या कायद्याबाबत बोलत नाही. या सगळ्या कायद्यामध्ये आमूलाग्र बदल करण्याची गरज आहे आणि ते आपल्या हातामध्ये आहे. आपण या सार्वभौम सभागृहामध्ये या सगळया गोष्टींचा विचार करुन,त्यामध्ये बदल घडवून आणू शकतो आणि हे करणे अतिशय महत्वाचे आहे. याबाबतीतील एक साधे उदाहरण मी या ठिकाणी देतो. आजचा टाईम्स ऑफ इंडिया आपण वाचला असेल. इंडियन मुजाहिदीनचे जे आतंकवादी पकडलेले आहेत या आतंकवाद्यानी बेडया घालून तिकडे घेऊन जातात याबाबतीत न्यायालयाकडे याचिका केलेली आहे. अशा प्रकारच्या आतंकवाद्यांना जर पोलीसस्टेशनमध्ये बेडया घालून ठेवले नाही आणि उद्या जर आणखी काही घडले तर त्याला कोण जबाबदार रहाणार? हे कायदे आपल्या राज्याचे आहेत. आपल्याला या कायद्यामध्ये काही मूलभूत बदल करावे लागतील. तो अधिकार आपला आहे. संसदेवर हल्ला झाल्यानंतर या देशामध्ये जे भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे ते जगभर आहे. ते या देशामध्येच आहे असे म्हणता येणार नाही. कारण आतंकवादाने सगळया

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

जगालाच ग्रासलेले आहे. म्हणून राज्याच्या कायद्यामध्ये काही बदल करण्याची आवश्यकता आहे. मुंबई पोलीस ॲक्ट असेल किंवा बेडया घालण्याचा कायदा असेल त्यामध्ये सुधारणा करुन या सगळया हार्ड कोअर क्रिमिनलला बेडया घालूनच पोलीस कोठडीमध्ये राहू द्यावे. नाही तर त्यांच्या हातून अशा अनेक घटना घडलेल्या आहेत. ते पळून गेलेले आहेत, म्हणून या गोष्टीचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे..

सभापती महोदय, जेव्हा आम्ही पोलिसांच्या बाबतीत बोलतो, तावातावाने बोलतो. आमचा तेथे मान राखला गेला नाही याबद्दल बोलतो. लोकप्रतिनिधींचा मान राखला गेला पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे काही कारण नाही. परंतु त्याचबरोबर आम्हाला ही गोष्ट देखील समजली पाहिजे की, आज आपल्याकडे तुटपुंजे पोलीसदल आहे. मला वाटते कालच या विषयावर यासंबंधात चर्चा झाली आहे. मी माननीय मंत्रिमहोदयांचे अभिनंदनही केले की, आज जवळ जवळ 55 हजार पोलीस भरती करण्यात येत आहेत त्या प्रक्रियेच्या बाबतीत श्री. फुंडकरसाहेब बोलले तसेच इतर माझे सहकरी बोलले. परंतु आम्हाला ही गो्ष्ट नाकारता येणार नाही. दीड-दीड वर्षे त्यांचा साधा भत्तासुध्दा त्यांना देण्यात आलेला नव्हता. माझ्या वडिलांनी 37 वर्षे पोलीस वर्दी घातली मी स्वत: या पोलीसलाईनमध्ये राहिलो आहे. तेथे काय वेदना असातात,काय परिस्थिती असते हे मी स्वत: भोगले आहे. आज या मुंबईमध्येच 60 लाख लोकांना मोफत घरे देण्यात येत आहेत. पोलिसांनी या शासनाचे काय बिघडले आहे? या पोलिसांनी आपले संरक्षण करावे, चोरांना पकडावे, खुन्यांना पकडावे, तुमचे आणि माझे संरक्षक म्हणून मागे-पुढे फिरावे आणि तो सेवानिवृत्त झाला की जसे विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर असते त्याप्रमाणे आपले बिऱ्हाड घऊन आपल्या गावी जावे, हे कसे चालेल?. त्यांना या मुंबईतच नव्हे तर महाराष्ट्रात घरे देण्यास काय हरकत आहे?

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. भाई जगताप ....

आपल्याकडे जे पोलीस दल आहे त्यात मुंबईमध्ये पोलीस अधिकारी 16,604 असून पोलीस कर्मचारी 1,67,514 आहेत. महाराष्ट्रामध्ये पोलीस अधिकारी 17,801 असून पोलीस कर्मचारी 1,80,279 आहेत. आपण एकूण संख्या पाहिली तर हा आकडा जास्तीत जास्त चार ते साडेचार लाखावर जातो. आपण 60 लाख घरे मोफत देता. ती दिली पाहिजेत. आपण फूटपाथवरील लोकांना मोफत घरे देतो, सरकारी जमिनीवर अतिक्रमण केलेल्या लोकांना मोफत घरे देतो. गरिबांना घरे मिळाली पाहिजेत याबद्दल दुमत नाही. त्यांना घरे मिळतात तर मग यांना का नको ? एक कारण असे सांगितले जाते की, सर्व्हिस क्वॉर्टर्स ठेवले पाहिजेत. ते जरुर ठेवावेत. आज आपण कायद्यामध्ये सुधारणा केली. आपण डी.सी.रुल 33(9) मध्ये सुधारणा केली. आपण क्लस्टर डेव्हलपमेंटला प्रोत्साहन देत आहोत. त्यावर अनेक वेळा चर्चा झाली. नियम 33(9) अंतर्गत आपण 4 एफएसआय देतो. नायगाव पासून कुलाब्यापर्यंत किंवा महाराष्ट्रामध्ये सगळीकडे ज्या पोलीस लाईन्स असतील त्या ठिकाणी क्लस्टर डेव्हलपमेंट करा. कोणतीही पोलीस लाईन 2 एकराच्या आत नाही. हे सगळे कायदे त्या ठिकाणी वापरावेत. दुसरेही कर्मचारी आहेत पण आज पोलिसांचा विषय असल्यामुळे मी पोलिसांबद्दल बोलत आहे. कर्मचाऱ्यांना सुध्दा घरे द्यावयास पाहिजेत. या राज्यातील जे कर्मचारी असतील, पोलीस असतील, त्यांनी 30-40 वर्षे सेवा द्यावयाची मग त्यांना घरे देण्यामध्ये काय अडचण आहे ? बांद्रा येथील शासकीय कर्मचारी वसाहतीच्या बाबतीत डेव्हलपमेंट करण्यात येणार आहे. तेथील कर्मचाऱ्यांचाही प्रश्न आहे. परंतु तो विषय आज नसल्यामुळे मी त्याबाबत बोलणार नाही. परंतु सगळ्यांना ते लागू आहे. जास्त एफएसआय मिळाला पाहिजे यासाठी आपण नियम 33(9) मध्ये बदल केला. पूर्वी दोन ते सव्वादोन पर्यंत एफएसआय मिळत होता पण आता या नियमानुसार 4 पर्यंत एफएसआय दिलेला आहे. तो अजून वाढवा परंतु या पोलिसांना घरे देण्याची भूमिका शासनाने घेतली पाहिजे. मी अनेक पोलिसांशी बोलतो. ते म्हणतात की, आय.पी.एस. अधिकाऱ्यांना, आय.ए.एस. अधिकाऱ्यांना काही चिंता नसते. त्यांना वरळी सीफेसला जागा मिळते. त्यांना बॅकबेला जागा मिळते. त्यांना जुहूला जागा मिळते. त्यांना लोखंडवाला कॉम्प्लेक्सला जागा मिळते. मग आमच्या पोलिसांनी काय बिघडवले आहे ? माझा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ KTG/ MMP/

श्री. भाई जगताप .....

असा प्रस्ताव आहे की, आपण त्यांना मुबईमध्ये कोठेही घरे द्यावीत. ते इमानदार आहेत. त्यंनी सांगितले की, आम्हाला जो घरभाडे भत्ता मिळतो तो कर्जाचा हप्ता समजून ते पैसे वळते करुन घ्या. पोलिसांनी जर घरे मागितली तर त्यांना या पध्दतीने घरे देता येतील. पाहिजे तर 5 वर्षे सेवा झाली असली पाहिजे, 10 वर्षे सेवा झाली असली पाहिजे अशा पध्दतीचा रायडर लावा पण पोलीस आणि इतर कर्मचाऱ्यांना आपण घरे द्यावीत अशा प्रकारची मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, आपण बारबालांच्या बाबतीत, बार बंद करण्याच्या बाबतीत ऐतिहासिक निर्णय घेतला. त्याचे आम्ही साक्षीदार आहोत. आमच्या समितीसमोर त्याची चौकशी झाली. आम्हा कमिटीच्या लोकांना विचारले गेले. त्या माणसाला शासन केले. सुप्रीम कोर्टाने ते उचलून धरले. आज बार बंद झाले असे आपण म्हणतो पण ते बंद झाले नाहीत. लोक बाहेर बसून अशा प्रकारे काही करीत असतील तर आपण त्यामध्ये लक्ष देणे गरजेचे आहे. आपण यासंबंधी अत्यंत धाडसी आणि ऐतिहासिक निर्णय घेतला होता पण दुर्दैवाने त्याला वाटाण्याच्या अक्षता लावण्याचा प्रयत्न काही अधिकारी करीत आहेत हे मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. या ठिकाणी समुद्र किनाऱ्याच्या बाबतीत अलीकडे जेवढे अर्लट आलेले आहेत

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/ यापूर्वी श्री.बरवड 18:05

श्री.भाई जगताप....

त्या ॲलर्टचा विचार करता हवाई मार्गाने किंवा समुद्र मार्गाने हल्ला होण्याची शक्यता आहे. राज्यात 740 कि.मी.समुद्र किनारा आहे, त्याबाबत सर्वच सन्माननीय सदस्यांनी चिंता व्यक्त केली आहे. त्याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. त्यासाठी 6 बोटी आल्या, 7 बोटी आल्या की आणखी किती आल्या त्याच्या संख्येमध्ये मी जाणार नाही. या संपूर्ण किना-यापर्यंत किंवा समुद्राच्या जवळ असलेल्या ठिकाणी पोलीस स्टेशन्स किंवा तत्सम यंत्रणा आपल्याला उभी करावी लागेल. तरच या विभागाचे संरक्षण करु शकू असे मला वाटते.

सभापती महोदय, आतंकवाद्यांसंबंधी मी सांगेन की, आतंकवाद्यांना जात नसते, आतंकवाद्यांना धर्म नसतो, आतंकवादी हा आतंकवादीच असतो. त्याच्या मनामध्ये घाणेरडी कृत्ये करण्याचे षडयंत्र चालू असते. परंतु आतंकवाद्यांच्या विषयावर बोलत असताना एका विशिष्ट धर्माकडे, समूहाकडे पाहण्याचा दृष्टीकोन ठेवू नका. काही लोकांच्या बाबतीत ही गोष्ट लागू आहे ते मी नाकारत नाही. परंतु काही गोष्टींचे आपल्याला समर्थनही करता येणार नाही. काही लोकांना दुश्कृत्य करताना पकडल्यावर त्यांच्यावर फुलांची उधळण केली जाते, हे आश्यर्च आहे. परंतु एक आतंकवादी हातामध्ये शस्त्र घेऊन मानवता उद्ध्वस्त करण्यासाठी आला असेल, येथील माणसांचे अस्तित्व नष्ट करण्याचा प्रयत्न करीत असेल तर तो कोणत्या धर्माचा आहे हे पाहू नका. या चर्चेच्या माध्यमातून मला अनेक गोष्टींवर बोलावयाचे आहे, परंतु माननीय गृह मंत्री चर्चेला उत्तर देण्यासाठी उत्सुक आहेत त्यामुळे मी अधिक बोलणार नाही. काही पोलीस अधिका-यांवर ते सक्षम असताना सुध्दा अन्याय झालेला आहे, मी विशिष्ट अधिका-यांची नावे घेणार नाही. पण त्यांच्यावर अन्याय झाला आहे हे खरे आहे. सभापती महोदय, या राज्यात महाराष्ट्र पोलीस कायदा किंवा मुंबई पोलीस कायदा आहे. हे सगळे कायदे आपल्याला बदलावे लागतील. इंग्रजांच्या काळातील कायद्यामध्ये थातूरमातूर बदल करुन अंमलात आणले आहेत. आतापर्यंत या कायद्यात बदल करण्याची जाणीव झाली नव्हती. हे कायदे आता विद्यमान परिस्थितीमुळे कुचकामी ठरले आहेत. आतंकवाद्यांशी सामना करीत असताना आपले कायदे अतिशय सक्षम करण्यात आले पाहिजेत अशी मी विनंती करतो आणि मला बोलण्यासाठी वेळ दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि आपली रजा घेतो.

------

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सभागृहात चालू असलेल्या विषयाच्या संदर्भात नवीन मुलभूत प्रश्न मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. आपण नागपूरच्या अधिवेशनानंतर आता बोलत आहोत. यानंतर जुलैच्या अधिवेशनात बोलता येईल. परंतु मधल्या काळात काय काय घडते त्यासंबंधी शासनाने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असते म्हणून आम्हाला बोलले पाहिजे. सन्माननीय गृह मंत्री हे संवेदनशील आणि सज्जन आहेत. महाराष्ट्रातील जनतेचा तुमच्या प्रामाणिकपणावर विश्वास असल्यामुळे आम्ही बोलत आहोत. सभागृहात या उडवाउडवी करुन उत्तर देणारे मंत्री असतील तर बोलण्याचा प्रश्न येत नाही. सभापती महोदय, मी माझ्या भाषणामध्ये प्रथम प्रशासकीय बाबींचा उल्लेख करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी पोलिसांच्या घरांचा प्रश्न मांडला आहे, तो प्रश्न मी मांडणारच होतो, परंतु त्यांनी मांडल्यामुळे बरे वाटले. पोलिसांच्या घराच्या विषयाला आमचा पाठिंबाच आहे. त्यामध्ये सुध्दा आमचा स्वार्थ आहे. त्यांना घरे दिली तर मुंबईत जो मराठी टक्का घटला आहे तो टिकून राहील. कारण झोपडीमध्ये काल परवा आलेल्या माणसांना येथे पर्यायी जागा दिली जाते. त्यामुळे या पोलीस कर्मचा-यांना घरे का देऊ नयेत असे मलाही वाटते. हा विषय सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी मांडला आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. प्रशासनातील काही लोकांना कसा न्याय मिळतो आणि काही लोकांवर कसा अन्याय होतो हे ऐकून बरे वाटले.

सभापती महोदय, परभणी जिल्हयामध्ये पोलीस भरती झाली होती, त्या भरतीमध्ये किती भयानक गोंधळ झाला त्याची सन्माननीय गृहमंत्र्यांनी बातमी वाचली नसेल तर ती बातमी आपल्याला वाचण्यासाठी देईन.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 18:10

(श्री. दिवाकर रावते...

भरती प्रक्रियेमध्ये अनेक विद्यार्थ्यांच्या मार्काचा इतका प्रचंड घोळ करण्यात हाला की शेवटी लोकांना निदर्शने करावी लागली. ज्याला 42 मार्क्स मिळाले त्याचे 24 मार्क्स दाखविले, ज्याला 62 मार्क्स मिळाले त्याचे 26 मार्क्स दाखविले. या झालेल्या घोळाबाबत आपण चौकशी लावलेली असून त्या चौकशीस सुरुवात देखील झालेली आहे. त्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. आपण प्रामाणिकपणे भरती करण्याचे ठरविले असले तरी भरतीमध्ये घोळ झालेला आहे. भविष्यामध्ये पोलीस दलात येणारे पोलीस अशा माध्यमातून आलेले असतील तर येताना त्याना झालेला त्रास ते भविष्यामध्ये वसूल करतील.

सभापती महोदय, मी काही प्रशाकीय मुद्दे या ठिकाणी मांडत आहे. पोलिसांचे प्रशासन सुधारले नाही तर आम्ही तरी त्यांच्याकडून अपेक्षा का कराव्यात, असा प्रश्न निर्माण होतो. मुख्यालयातील परिस्थिती अशी आहे की, कायदा व सुव्यवस्थेसाठी अकार्यकारी शाखेतील हत्यारी पोलिसांना तुम्ही पाठविता आणि त्यांच्या जागी कार्यकारी शाखेतील अधिकारी ठेवता, ही त्यांची व्यथा आहे. यामध्ये सुधारणा करणार काय ? हवालदार 120, पोलीस निरीक्षक 175, यांना अतिरिक्त कामासाठी बोलावल्यानंतर फक्त 60 रुपये देण्यात येतात. पोलिसासंना जेव्हा साप्ताहिक सुट्टीच्या वेळी कामावर बोलावले जाते त्यावेळी देखील 60 रुपयेच दिले जातात. किमान त्यांना त्यांच्या दिवसाच्या वेतना ऐवढे तरी वेतन द्या. रोजगार हमी योजनेवरील मजुरीचे दर आता 100 रुपये केलेले आहेत. हे पोलीस वेठबिगार नाहीत. त्यांना युनियन करता येत नाही. कोर्टाने त्यांना आता अधिकार दिलेले आहेत. या छोट्या छोट्या गोष्टी आहेत. राज्याच्या राखीव पोलीस दलामध्ये म्हणजे एसआरपीएफमधील आय.जी. श्री. पवार हे सध्या पुणे येथे कार्यरत असून ते कोठेही जातात. त्यांना पायलट एस्कॉर्ट मिळतो. ते सिक्सक्वॉर्ड वापरतात. राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री श्री.भुजबळसाहेब ते वापरु शकत नाही. माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी एस्कॉर्ट नको म्हणून सांगितले. नक्षलवादी पथकातील किंवा अन्य पथकातील अधिका-यांना एस्क्रॉर्ट नाही. परंतु हे पवारसाहेब जेथे जातात तेथे आणि मुंबईमध्ये देखील एस्कॅार्ट वापरतात. असे कोणते व्ही.आय.पी. पद त्यांच्याकडे आहे ? इतर अधिका-यांना ही जाणीव बोचते. हे जे काही चालले आहे ते बरोबर नाही, असे माझे मत आहे. आपण राज्यकर्ते म्हणून जे करत नाही ते एखादा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.दिवाकर रावते...

अधिकारी करतोय, हे कितपत योग्य आहे ? राखीव पोलीस दलातील राखीव पोलीस निरीक्षकांचे प्रमोशन तुम्ही अद्याप केलेले नाही. या पोलिसांच्या व्यथामध्ये माननीय मंत्री महोदयांनी थोडे जरी लक्ष घातले तरी त्यांच्याकडून काही तरी अपेक्षा आम्हाला करता येईल. त्या ठिकाणी 100 पदे रिक्त आहेत. जिल्ह्यामध्ये पीएसआय, हवालदार, पोलीस उपनिरीक्षक यांच्या पदांच्या बाबतीत आपण कोणता निर्णय घेणार आहात ? राखीव पोलीस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षा 2002नंतर अजून घेतल्या नाहीत. पोलिसांमध्ये हा जो असंतोष खदखदत आहे तो असंतोष आपण संपविला तर आपण त्यांच्याकडून काही तरी अपेक्षा व्यक्त करु शकतो. ते आपला राग कामाने व्यक्त करतात. 100 ते 125 पदे रिक्त आहेत. राज्य राखीव पोलीस दलामध्ये सहाय्यक पोलीस समादेशक, डीवायएसपी, सशस्त्र दल, हे पद कशासाठी रिक्त ठेवलेले आहे ? यामुळे एका पोलीस उपनिरीक्षकाला तीन तीन पदांचा अतिरिक्त भार सांभाळावा लागतो. मुंबईतील एकूण चार मुख्यालयामध्ये ऐसीपीची पदे ही सशस्त्र पोलीस दलातील राखीव पोलीस निरीक्षक पदामधून पदोन्नतीने भरणार काय ? कारण त्यांनाही पदोन्नतीची आशा असते. त्यांनाही त्यांची बढती व्हावी असे वाटते्. नक्षलवादाच्या संदर्भात उद्या चर्चा असल्यामुळे त्यासंदर्भातील विचार आम्ही उद्या नक्कीच मांडू. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविली होती. ती माहिती पोलीस महानिरीक्षक श्री. अनामी रॉय यांनी त्यांना अद्यापपर्यन्त दिलेली नाही. जावेद शेख यांची प्रथम बदली ठाणे येथून सोलापूर ट्रेनिंग सेंटर व नंतर ती बदली रद्द होऊन मुंबई शहरामध्ये प्रमोशन. जावेद शेख यांच्यावर वरदहस्त आहे. माननीय श्री. आर.आर.पाटील हे राज्याचे गृहमंत्री आहेत. पण हे वरुन कुणाच्या तरी आशीर्वादाने तिकडे आपला अधिकार बळकावत आहेत. जावेद शेखच्या बदली संदर्भात माननीय गृह मंत्री त्यांचे अधिकार वापरुन हा वरदहस्त बाजूला करतील काय ? शिवानंद यांची बदली का होत नाही ? प्रमोशन का नाकारले जात आहे ? पोलिस महासंचालक म्हणून बढती नको, असे त्यांनी सांगितले.

...नंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

काय असा त्यांचा इंटरेस्ट आहे पहा. मला पोलीस कारभारातील कमी कळते म्हणून मी त्यांच्या वाटेला जात नाही. म्हाडामध्ये जवाहर सिंग नावाचे अधिकारी किती वर्षे त्याच ठिकाणी आहेत? काल मी स्टॅम्प डयुटीबद्दल बोलताना सांगितले तसेच हे प्रकरण आहे. कायम त्याच पदावर हा अधिकारी बसलेला आहे. डीआयजी म्हाडा. बघा काय आहे ते. इतर विषय मांडायचे असल्यामुळे मी जास्त बोलू इच्छित नाही. सभापती महोदय, सेवायोजन कार्यालयामार्फत पोलीस भरतीसाठी नावे मागविली जातात. आज सेवायोजन कार्यालयामध्ये 42 हजार तरुणांनी पोलीस भरतीसाठी नोंदणी केलेली आहे. इतर मार्गाने नावे न मागविता सेवायोजन कार्यालयामार्फतच भरती करावी. तसा नियम आहे. मी अधिकृतपणे शासनाला पटवून देईन. कायदेशीर पटवून देतो. सुप्रीम कोर्टाचे जज्जमेंट आहे, ते मी तुमच्यापुढे सादर करायला तयार आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांना सांगा. 42 हजार तरुण वाट पहात आहेत. सुप्रीम कोर्टाच्या मान्यतेने तुम्हाला हे करता येईल. हे सर्व तुम्हाला पटवून सांगायला अर्धा पाऊण तास लागेल म्हणून मी ते मांडत नाही. तत्कालीन सेवायोजन विभागाचे राज्यमंत्री श्री.राणा जगजितसिंह पाटील यांना पटले होते. ते सभागृहात या संदर्भात निवेदन करणार होते. परंतु दुर्दैवाने त्यांचे मंत्रीपद गेले. ते स्वत: शासनाला हे समजावून सांगू शकतील. ते या सभागृहाचे सदस्य आहेत. त्यांना मंत्री करा. पोलीस दलात पोलीस अंमलदाराचे अपघातात निधन होते तेव्हा त्यांच्या विधवा पत्नींना त्वरेने शासकीय सेवेत रुजू होण्याची संधी द्या. चार-चार, पाच-पाच वर्षे खेटे मारावे लागतात. मी परिवहन मंत्री असताना एस.टी.महामंडळामध्ये यासंबंधी तरतूद करुन घेतली. पोलीस दलातील सेवेतील पोलीस कर्मचाऱ्यांच्या अपघाती मृत्यूनंतर त्यांच्या विधवांना तात्काळ नोकरी द्यावीच लागेल असा निर्णय करा. राज्यासाठी आपल्या प्राणाची आहुती दिल्यानंतर त्यांच्या कुटुंबाची फरफट होऊ नये. आज सेवेत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना हा अनुभव येत असल्यामुळे त्यांना साधार भीती वाटते की, उद्या माझ्यामागे माझी पत्नी आणि मुले वाऱ्यावर तर पडणार नाही. सन्माननीय गृहमंत्री महोदय त्यांच्या अधिकारात हे नक्की करु शकतात. हे केले तर विधवा तुम्हाला आशीर्वाद देतील, धन्यवाद देतील. सन्माननीय सदस्य श्री.ज़मा याठिकाणी उपस्थित आहेत. मुस्लीम तरुणांची पोलीस दलामध्ये भरती करण्यास हे सरकार पुढे सरसावले आहे. सच्चर समितीचा अहवाल आला. सच्चर समितीचा विषय हा टीका करण्याचा विषय नाही. मुस्लीम

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

तरुणांना पोलीस सेवेत घेऊ नका असा अजिबात विषय नाही. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी विषय मांडला. अस्मीन मोमीन यांचा दाऊदशी संबंध आहे. जे निष्ठावंत आहेत त्यांना जरुर सेवेत घ्या. परंतु मुस्लीम तरुणांना पोलीस सेवेत घेण्यासाठी खास प्रशिक्षण केंद्र उघडण्यात आले. त्याबद्दल आमची तक्रार नाही. हे कोण आहेत? खेडेगावात इतर गरीब मुले नाहीत का? मुस्लीमच आहेत का? तुमच्या भल्यासाठी पाहिजे. घ्या तुम्ही. तुमची सत्ता आहे. तुमचे धोरण आहे. आम्हाला तो अधिकार नाही. तुम्ही दीड हजार रुपये जेवणासाठी अनुदान देत आहात. एक हजार रुपये कपड्यासाठी देत आहात. प्रशिक्षण देणाऱ्यास 30 हजार रुपये देत आहात. एका प्रशिक्षण केंद्रामध्ये 100 विद्यार्थी आहेत. उपक्रम वाईट आहे असे म्हणत नाही. परंतु ज्या संस्थांनी हे काम अंगावर घेतले आहे त्यांच्याकडून नसलेल्या विद्यार्थ्यांच्या नावे अनुदान घेतले जात आहे. उमेदवार मात्र मिळत नाहीत. यामध्ये उद्देश साध्य होत नाही आणि तुम्हाला बोलता येत नाही. तुम्ही शोधून घ्या. माझ्याकडे माहिती आहे म्हणून सांगत आहे....

श्री.आर.आर.पाटील : गृह विभागाची ही योजना नसून अल्पसंख्याक विकास विभागाची योजना आहे.

श्री.दिवाकर रावते : शेवटी पैसा राज्याच्या तिजोरीतून जात आहे. मुस्लीम उमेदवार पोलीस व्हावेत असे तुम्हाला वाटते. संस्था पैसे घेत आहेत पण प्रशिक्षण देऊन पोलीस उमेदवार तयार केले जात नाहीत. भ्रष्टाचार होत असेल तर तो बंद झाला पाहिजे. मुस्लीम म्हटल्यानंतर ताडकन उभे राहणारे तुम्ही.

(नंतर 3पी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

अशा प्रकारे मुसलमान विद्यार्थी पोलीस भरतीकरिता कसा येईल यासाठी काय करणार आहात ? अल्पसंख्यांकांच्या 15 संस्थांना आपण किती अनुदान दिले, त्या संस्थांनी किती उमेदवार पोलीस भरतीसाठी तयार केले आणि किती लोकांना संधी मिळाली हे सांगितले तर बरे होईल. कालपरवाचीच घटना या निमित्ताने मी सांगणार आहे. एखाद्या गुंडाचे नाव अल्पसंख्यांकांपैकी असले तर आपल्या पोलिसांचे हात का थरथर कापतात हेच मला समजत नाही. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सांगितल्यानुसार अतिरेकी हा अतिरेकीच असतो आणि गुंड हा गुंडच असतो. मग चेंबूर येथील शिवाजी नगर परिसरात जेथे महानगरपालिकेचे डंपिंग ग्राऊंड आहे तेथे शानू अन्सारी नावाचा तडीपार गुंड दररोज धुमाकूळ घालतो. वस्तीत येऊन दरवाजे तोडतो, लाथा मारतो, धान्य गटारात फेकतो अशा प्रकारे त्याने दहशतच निर्माण केली आहे. त्याच्याविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये अनेक गुन्हे दाखल झालेले आहेत पण पोलिसांची सुध्दा त्याला हात लावायची हिंमत होत नाही. ही बातमी तरुण भारत दैनिकात जरी आलेली असली तरी मी स्वत: यासंदर्भात माहिती घेतली आणि तीच सभागृहात मांडत आहे. शासन अशा गुंडाच्या बाबतीत काय कारवाई करणार आहे ? का घाबरतात आपले पोलीस त्याला याचा निपटारा करणार की नाही याचे स्पष्टीकरण उत्तरात मिळाले पाहिजे. एखादे वर्तमानपत्र जाहीररित्या अशा प्रकारे त्या गुंडाच्या गुन्ह्याची फाईल समोर आणते तरी सुध्दा या तडीपार गुंडाला आपण हात लावत नाही. दुसरीकडे मात्र शिवसेनेची तडीपारी मात्र फार उत्सुकतेने करता. आपण सांगलीचे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावन भूमीतील आहात. त्यांचे स्वराज्य त्या भागात होते. छत्रपतींचा या राज्यातल्या प्रत्येक नागरिकाला, तुम्हा-आम्हाला अभिमान आहे कारण हे पक्षाच्या पलिकडचे आहे. हा देश हिंदुंचा आहे आणि ज्यावेळेस आपण सर्वधर्मसमभाव म्हणतो त्यावेळेस हिंदू धर्म हा वेगळा नाही. परंतु या छत्रपतींच्या महाराष्ट्रात त्यांचा अवमान होणार असेल तर आपणही आपल्यातील स्वाभिमान जागवा आणि विचार करा काय करायचे ते ? कारण अकोला शहरातील शिवजयंतीची मिरवणूक काढण्यासाठी रितसर परवानगी मागून काढण्यात आली होती. त्यासाठी कोणत्याही मुस्लीमाने किंवा समाजाने अडविले नाही किंवा अमुक वस्तीत जायचे नाही की काय अशा प्रकारे काहीही आडकाठी घातली नाही. दरवर्षी निघते तशी मिरवणूक काढण्यात आली आणि ती मिरवणूक नगर चौकात आल्यानंतर पोलिसांनी अडविली व लाठीमार केला. कारण पाहिले तर

....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

काहीच नाही तरी देखील मिरवणूक अडवून लाठीमान केला आणि छत्रपतींच्या वेषात बसलेल्या मनोज शर्मा नावाच्या युवकाच्या कमरेला तलवार असल्याने त्याच्यावर आर्म ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला. त्यावेळेस पोलिसांना तलवार नकली असल्याचे सांगण्यात आले तरी देखील बेमूर्वतखोरपणाने त्यांनी ऐकले नाही, एवढी मस्ती या पोलिसांना कशाची आली याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. त्यानंतर अकोट येथे शिवसेनेचे आमदार निवडून आलेले आहेत. तेथेही राम नवमीची मिरवणूक काढायची नाही म्हणून पोलिसांनी बंदी घातली. कोणत्या धर्माच्या, कोणत्या समाजाच्या लोकांनी ही मिरवणूक काढण्यासाठी आक्षेप घेतला होता ? असे काहीही नाही तर पोलिसांनीच मिरवणुकीवर बंदी घातली होती. या देशात, रामाच्या देशात त्यांचीच मिरवणूक काढायची नाही, कसला कायदा आपण राबवित आहात, कसली पोलिसांची औलाद निर्माण केली ? या राज्यात छत्रपतींची मिरवणूक अडविणारे, रामनवमीची मिरवणूक अडविणारे पोलीस आहेत.....

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

पोलीस दलाला जी कीड लागलेली आहे ती फार घाणेरडी आहे. पोलीस अधिकारी पोलीस शिपायांना गुलामासारखे वागवतात, त्यांच्याकडून लाद्या पुसून घेतात, भांडी घासून घेतात, पत्नी बरोबर असली तर बाजारातील पिशव्या सुध्दा त्यांच्याकडून उचलून घेतात. अकोल्यामध्ये मोहरमची मिरवणूक निघाली त्यावेळेस ही मिरवणूक सर्व अकोल्यामध्ये फिरली, त्यांना कोणीही अडवले नाही, कोणी आक्षेप घेतला नाही, हिंदूही काही बोलले नाही उलट हिंदूनी नमस्कार केला, अदावत केला. माझा प्रश्न असा आहे की, हा कोण मुस्लीम धार्जिणा, मुस्लीम माईंडेड, त्याच्यावर कोणाचे संस्कार झाले मला माहीत नाही. या मातमच्या मिरवणुकीमध्ये मुस्लिमांच्या हातामध्ये शस्त्रे असतात, ते रक्ताने माखलेले अयतात मग त्यांच्यावर आर्म ॲक्ट का लावला जात नाही? मिरवणुकीतील छत्रपतींच्या वेषात कमोलस तलवार लावली म्हणून तुम्ही आर्म् ॲक्ट कसा काय लावता ? पोलीस खात्याची कामगिरी फार किळसवाणी वाटावयास लागली आहे. हा छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे. खरे म्हणजे सर्वच समाजाने छत्रपती शिवाजी महाराजांना सन्मान दिला पाहिजे. या महाराष्ट्रात राहणारा मग तो हिंदू असेल, मुसलमान असेल, ख्रिश्चन असेल,शिख असेल कोणीही असला तरी त्याने छत्रपती शिवाजी महाराजांकडे वाकडया नजरेने बघण्याची हिंमत केली तर त्याची नजरबंद केली पाहिजे एवढी हिंमत पोलिसांमध्ये असली पाहिजे. काहीही तक्रार नसतांना आमच्या मिरवणुका अडविल्या जातात. रामनवमीची मिरवणुकीला बंदी घातली जाते. त्यामुळे जे अशा मिरवणुकीवर बंदी आणतात त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. कायदा हातात घेतल्यावर तुम्ही आम्हाला बदड बदडता. आम्हाला पोलीस झोड झोड झोडतात. पोलीस का झोडतात तर त्यांना त्यांची बायको भेटत नाही, मुलगा भेटत नाही त्यामुळे पोलीस झोड झोड झोडतात. आमच्या पाठीवर पोलिसांचे जे वळ असतात ते त्यांना तुम्ही राबवल्याचे वळ असतात. पोलीस अक्षरश: चिडून मारतात. याचा अनुभव माननीय भुजबळसाहेबांना आहे. भुजबळ साहेबांबरोबर मला सुध्दा अनुभव आहे. तारुण्यात खाल्लेला मार उतारवयात जाणवत असतो.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्राचे आहेत. महाराजांना कोणीही अपमानित करु नये. माझ्या शिवाजी महाराजांना नांदेड, रायगड येथे पिंज-यात कोंडलेले आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

रायगडमध्ये पिंज-यात कोंडलेले शिवाजी महाराज आहेत. त्यांच्या चारही बाजूने तुरुंग आहे. या ठिकाणी जेल सारखा बारकासा दरवाजा आहे. शिवजयंतीच्या दिवशी हार घालण्यासाठी दोघांनीच गपचूप जायचे, हार घालायचा आणि निघून यायचे. तुमच्या पोलिसात धमक नाही . आम्ही रामनवमीची मिरवणूक काढायची नाही, शिवजयंतीची मिरवणूक काढायची नाही, रस्ता मोकळा असला पाहिजे म्हणून सांगायचे, घराघरात जाऊन झडती घ्यायची असे प्रकार पोलीस करीत असतात. मिरवणूक काढल्यानंतर काही झाले तर दंगल पेटेल म्हणून आम्हाला शिवजयंती, रामनवमीची मिरवणूक सुध्दा काढू दिली जात नाही. ज्या ज्या ठिकाणी शिवाजी महाराजांना पिंज-यात कोंडले आहे त्या ठिकाणच्या सर्व जिल्हाधिका-यांना आपण मोकळे करण्याचे आदेश द्या. छत्रपती शिवाजी महाराज किंवा बाबा साहेबांच्या पुतळयाची जे विटंबना करतील त्यांचा हात कलम केला जाईल अशी ताकद आबा आपण निर्माण केली पाहिजे. अफजलखानाचा कोथळा बाहेर काढल्याचे चित्र आम्ही लावल्याबद्दल तुम्ही आम्हाला प्रत्येक वेळेला झापता, नोटीसेस पाठविता, आमच्या जिल्हा प्रमुखांना पोलीस स्टेशनमध्ये दिवस दिवस बसवून ठेवता. मी आपल्याला सर्व फोटो दाखवलेले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्याबद्दल आमच्या काहीही भावना नाहीत?

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

शासनाने संबंधिताविरुध्द कारवाई करावयास पाहिजे. श्री.नितीन देसाई यांची मालिका टी.व्ही.वर दाखविली जाते आणि सुरुवातीच्या सगळया भागामध्ये अफजलखानाचा कोथळा काढलेला आणि शाहिस्तेखानाची बोटे तोडल्याचे दिसत होते परंतु हा भाग आता पुन्हा दाखविला जात असतांना ही दृश्ये वगळण्यात आली आहेत.भावना दुखावतात म्हणून ही दृश्यें वगळण्यात यावीत यासाठी दबाव आणला जात आहे.छत्रपती शिवाजी महाराजांचा हा इतिहास असतांना त्यामुळे भावना कशा दुखावतात?

सभापती महोदय, माझ्याकडे हिंदुस्थान टाईम्सचा पेपर आहे. त्यात एक फोटो छापून आला होता त्यासंबंधी मी आपल्याला सांगू इच्छितो की, माझ्या भावना तीव्र आहेत तेव्हा तुमच्या भावना देखील तेवढयाच तीव्र असल्या पाहिजेत. शिवजयंतीची मिरवणूक काढण्यात येत होती आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशात एक तरुण बसला होता . छत्रपती शिवाजी महाराज माणूस होते आणि हा तरुण देखील माणूसच आहे.त्यांनाही तहान लागत होती आणि या तरुणालासुध्दा तहान लागली होती. भर उन्हात ही मिरवणूक काढण्यात आली असल्यामुळे या तरुणाला तहान लागली होती त्यामुळे लिम्का की थम्सअप पीत असतांनाचा फोटो या वर्तमानपत्रवाल्यांनी छापला होता . हा नालायकपणा आणि नीचपणा आहे. अशा प्रकारचा फोटो छापावयाचा असतो काय ? इंग्रजी वृत्तपत्रवाल्यांना आमच्याबद्दल वा छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल इतका सूड आहे काय ? हा फोटो छापण्यासारखा आहे काय ? काय छापावे आणि काय छापू नये हे संपादकाला कळावयास पाहिजे होते. अशा प्रकारचा फोटो छापून आल्याबद्दल आम्हाला वाईट वाटते. त्यामुळे आमच्या भावना दुखावल्या जात नाहीत काय ? तेव्हा संबंधिताविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ?छत्रपती शिवाजी महाराजाच्या वेशातील तरुण लिम्का पीत असतांनाचा फोटो वर्तमानपत्रात छापून महाराष्ट्राला अवमानीत करण्याची प्रवृत्ती या इंग्रजी वर्तमानपत्राची आहे.

श्री.जैनुद्दिन जव्हेरी : ते मुस्लिम नाहीत ना ?

श्री.दिवाकर रावते : काही बाटगे असतात व काही अस्सल मुसलमान असतात त्यातील अस्सल मुसलमान हा कुलवंत असतो. त्यानंतर मी संबंधितांना फोन केला होता व तुम्हाला सहन





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

होणार नाही अशा भाषेत मी त्यांना विचारले होते की, प्रत्येकाला आई, पत्नी ,बहिण असते आणि घरामध्ये आपल्या सर्वाचे दैनंदिन जीवन सारखेच असते परंतु त्यांचे स्नानगृहातील फोटो छापाल काय ? छत्रपती शिवाजी महाराजांची एवढी निर्भत्सना आम्ही राज्यात सहन करावयाची काय ? वर्तमानपत्रात फोटो छापून आल्यानंतर राज्य शासनाने त्यांना नोटीस देखील दिली नाही.अफजाल खानाचा कोथळा काढल्याचे पोस्टर्स लावल्यानंतर आम्हाला नोटीसेस देता आणि तुरुंगात टाकता. श्री.कृष्ण प्रसाद हा रोज धमकी देतो . अफजलखानाचा कोथळा काढण्यासबंधीचे पोस्टर्स त्यावेळी लावण्यात आले होते त्यानतर गणपती उत्सव देखील संपला . त्यावेळी आमच्या गणपतीच्या मूर्त्या फोडल्या होत्या .छत्रपतीच्या पोस्टर्सवर ते नाचले, त्यावेळी श्री. कृष्ण प्रसाद यांनी दांडगाई केली होती . त्यांच्या दुर्देवाने त्यांचे नाव देखील देवाचे आहे.अशा प्रकारचे नाव ठेवायला त्याच्या आई वडिलांना कोणती अवदसा आठवली होती. श्री.कृष्ण प्रसादने गणपतीच्या मूर्ती कच-याच्या गाडीत भरल्या होत्या आणि वरुन फेकल्या होत्या. त्यावेळी अनेक भगिनी रडत होत्या. मी अतिरंजित काहीही सांगत नाही.गणपतीच्या मूर्ती कच-यासारख्या फेकावयाच्या आणि हिंदूची निर्भत्सना करावयाची तरी सुध्दा आम्ही ते सहन करावयाचे.? कोणाच्या तरी भावना दुखावतात म्हणून अफजलखानाचा कोथळा काढल्याचे पोस्टर्स लावण्यास आपण बंदी आणता.

सभापती महोदय, यानंतर मी मुंबई मॅराथॉनसबंधीचा दुसरा मुद्दा मांडणार आहे. मॅराथॉन भरविणा-या हरामखोरांच्या तंगडया तोडल्या पाहिजेत.छत्रपती शिवाजी महाराज आणि अफजलखान एकत्र धावतात अशा प्रकारे सर्व धर्म समभाव सांगणारा हा फोटो छापण्यात आला होता तो पाहिल्यानंतर आपल्याला काहीच वाटले नाही काय ? सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांना मी सांगतो की, हे वाचतांना वा पाहतांना तुम्हाला लाज वाटली पाहिजे आणि तुमचे रक्त उसळावयास पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज मॅराथॉनमध्ये धावत असल्याचे फोटो का छापले ? एवढया बेशरमपणे या महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांना तुम्ही धावायला लावत आहात. हे पाहिल्यानंतर तुमचे रक्त उसळावयास पाहिजे होते. ज्या अफजलखानाचा कोथळा शिवाजी महाराजांनी काढला होता त्या अफजलखानाबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांना धावतांना फोटोत दाखविले जात आहे. सन्माननीय गृह मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, अफजलखानाचा कोथळा काढल्यानंतर ज्यांच्या भावना दुखवतात त्या लोकांची तुम्ही काळजी करता तेव्हा छत्रपती शिवाजी

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 18.30

श्री.दिवाकर रावते ...

महाराजांना अफजलखाना बरोबर धावतांना दाखविल्यामुळे आमच्या भावना देखील दुखावल्या गेल्या आहेत तेव्हा सबंधिताविरुध्द तुम्ही कोणती कारवाई करणार आहात ? हे आम्हाला सांगा. विधिमंडळाचे अधिवेशन त्यावेळी चालू नव्हते माननीय शिवसेना प्रमुखांनी छोटया वर्तमानपत्रातील फोटो मला दाखवला आणि मला असे सांगितले की , "दिवाकर, माननीय गृह राज्यमंत्र्यांना जाऊन सांग. "त्यावेळी वर्तमानपत्रात जे छापून आले होते त्याची मी माहिती घेतली व ते सुध्दा मी शोधून आणले आहे.त्यावेळी जे छापून आले होते त्यात असे म्हटले होते की," महाराष्ट्राच्या छाताडावर अजूनही अफजलखान धावतच आहे," "उच्चभ्रू मुंबई धावली " हे सगळे हाय फायवाले तेथे येतात आणि जे लोक कधीही अंगाला व पायाला माती लागू देत नाहीत जे लोक साधे पाणी पीत नाहीत .

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

ते सर्व त्याठिकाणी नाटके करावयास येतात. आणि माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ हे झेंडा दाखवायला जातात. हे अफजलखानाला नाचवितात, शिवाजी महाराजांना मॅरेथॉनमध्ये धावायला लावतात. हे चित्र पाहिल्यानंतर माझ्या काळजामध्ये धस्स झाले. त्या काळात छत्रपती शिवाजी महाराज घोडयावरुन बाहेर पडल्यानंतर पाचही पातशाळा धडधडायच्या. आणि तुम्ही छत्रपतींना अफजलखानाबरोबर नाचायला लावता? तुम्हाला भावना नाहीत, मला भावना नाहीत काय? हे चित्र मी आपणाकडे देतो आपण याबाबत कारवाई करा. त्यांच्यावर गुन्हे दाखल करा. अशाप्रकारचे चाळे करणार असाल तर पुढील वर्षी हे मॅरेथॉन आम्हाला नको. सभापती महोदय, सर्व धर्माचा आदर झाला पाहिजे, सर्वधर्मसमभाव राखला पाहिजे. परंतु त्याचा हा अर्थ आहे काय? हे सर्व प्रकार पाहून मनाला खूप वेदना होत आहेत. आपल्यामध्ये हिंदूपण, मराठीपण असेल तर आपण कृष्णप्रसादाचे प्रताप ऐका. धर्मवीर संभाजी हा छत्रपतींचा छावा, त्यांच्याही पुढे एक पाऊल टाकणारा, त्या छाव्याने धर्मासाठी आपली साल्टी सोलवून घेतली, डोळे काढून घेतले, हाल हाल करुन मृत्यू स्वीकारला, परंतु त्यांनी धर्म सोडला नाही. सांगलीमध्ये संभाजी महाराजांची मिरवणूक काढावयाची ठरली. त्यावेळी तुमच्या कृष्णप्रसादाने 100 रुपयांच्या स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र लिहून घेतले. त्यामध्ये काय म्हटले आहे ? "कोणत्याही जाती धर्माच्या, अगर समूहाच्या भावना दुखावल्या जातील अशाप्रकारचे देखावे अगर पोस्टर लावणार नाही", "या मिरवणुकीच्या दरम्यान आम्ही कोणत्याही विघातक स्फोटकांचा वापर करणार नाही" संभाजी महाराजांसाठी फटाके लावायचे नाहीत. "सायंकाळी 6 ते 10 पर्यंत मारुती चौक, सांगली येथे दिलेल्या स्पीकर परवान्यामधील अटींचा भंग होणार नाही याची दक्षता घ्या" या कृष्णप्रसादाची किती कर्तव्यदक्षता? संभाजी महाराजांच्या नावाने दिवसभर लाऊड स्पीकर लागला असता, त्यांच्या नावाचा जयघोष झाला असता तर तुझी पितरे नरकात गेली असती काय? संभाजी महाराज हे या महाराष्ट्राचे साक्षात शौर्य आहे, हिंदुत्वाचे शौर्य आहे. सांगलीमध्ये ज्या ज्या मशिदींवर भोंगे वाजतात, ते उद्याच्या उद्या आपण उतरवा.. त्यांचा आम्हालाही त्रास होत असल्यामुळे हे भोंगे आपण उतरवा. त्याबाबत हायकोर्टाचे आदेश आहेत, सुप्रीम कोर्टाचे आदेश आहेत. तिकडे नांग्या टाकता, तिकडे लेंडया टाकता, तिकडे तुमचा ड्रेस कामाला येत नाही, तिकडे तुमचे पट्टे आवळले जात नाहीत. संभाजी महाराजांच्या मिरवणुकीमध्ये सकाळी 10 च्या पुढे लाऊड स्पीकर चालला तर त्यासाठी प्रतिज्ञापत्र लिहून घेता? या देशामध्ये हिंदूना आणि छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल स्वाभिमान असलेल्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री. दिवाकर रावते...

संपूर्ण मराठी समाजाला महाराजांची जयंती साजरी करीत असतांना त्यांच्या मिरवणुकीकरिता प्रतिज्ञापत्र लिहून देण्याची पाळी आमच्यावर आली आहे? कसली आपली कायदा व सुव्यवस्था? तुम्ही आम्हाला हिणविता ना? होय, आम्ही छत्रपतींच्या स्वाभिमानाने काम करतो. कदाचित त्यांच्या पुण्याईने आम्ही सत्तेवर आलोही असतो. आम्ही त्यांचे नेहमी नाव घेतो, तुम्हीही घ्या. आपण सर्वांनीच त्यांचे नाव घेतले पाहिजे. जेव्हा यशवंतराव चव्हाण दिल्लीला गेले त्यावेळी सहयाद्री हिमालयाच्या मदतीला धावला. या सहयाद्रीमध्ये आम्हाला पोलिसांच्या दांडक्यावर उंदरासारखे् फिरावयास लावता? धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज बलिदान मासनिमित्त आयोजित केलेल्या पदयात्रेला परवानगी मिळविण्याकरिता केलेल्या अर्जावर परवानगी देतांना 100 रुपयांच्या स्टॅंप पेपरवर प्रतिज्ञापत्र लिहून घेतले. माझे याबाबत आपल्याला आव्हान आहे की, कोणत्याही अल्पसंख्यांकाच्या मिरवणुकीसाठी अशाप्रकारच्या स्टॅंप पेपरवर प्रतिज्ञापत्र लिहून घेतले आहे काय? हे आम्हाला दाखवा. आम्ही कोणत्या देशामध्ये रहात आहोत? आम्ही पाकिस्तानात, तुर्कस्तानात रहात आहोत काय? सभापती महोदय, हा भावनेचा विषय आहे. कालपरवा या शहरामध्ये नाना चुडासामाचा बॅनर लागला. माझ्या शिवसैनिकांना सांगून तो काढायला लावला. त्याला पहिल्यांदा डांबर फासला, तो माणूस एवढा बिलंदर, हट्टी की त्याने तो बॅनर काढला, आणि आम्ही लावलेले काळे पुसून पुन्हा लावला. त्याचे फोटो माझ्याकडे आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

तो बॅनर काय होता ? जनतेची मागणी आहे की, श्री.एम.एफ.हुसेन आणि श्री.सचिन तेंडूलकरला भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा.श्री.सचिन तेंडूलकरला आम्ही सगळे मानतोच,त्याच्याबद्दल प्रश्नच नाही.पण श्री.एम.एफ.हुसैन बाबत सांगावयाचे तर आमच्या सगळया हिंदू देवतांची नग्न चित्रे काढून जगभर वाटणारा तो हरामखोर,ज्याने आपल्या देशाचे नागरिकत्व सोडून दिलेले आहे आणि तुर्कस्थानचे नागरिकत्व स्विकारलेले आहे,त्याचा बॅनर लावला जातो आणि तुम्ही काही कारवाई करीत नाही? आम्ही काही करावयास गेलो,उद्या तोडफोड केली की आमच्यावर तुम्ही गुन्हे दाखल करणार आणि मग कलेक्टर आम्हाला नुकसान भरपाई करण्याच्या बाबतीत नोटीस देणार? सभापती महोदय,हे सर्व पाहिल्यानंतर अंगाचा तीळपापड होतो.मी तुम्हाला फोटो आणून देतो आणि मग तुम्ही श्री.एम.एफ.हुसैन यांच्यावर कारवाई करावी. श्री.नाना चुडासामा येथे श्री.एम.एफ.हुसैनचा बॅनर लावतो.तेव्हा श्री.नाना चुडासामा यांच्यावर कारवाई करावी.श्री.एम.एफ.हुसैन यांना भारतरत्न द्यावयास निघाला आहे.या हिंदूंच्या देशामध्ये हिंदूचा एवढा अपमान करणारा, ज्याच्यावर शेकडो केसेस आहेत आणि काल सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला की, श्री.एम.एफ.हुसैन यांची फाईल फेटाळून लावली, नाही. तो या देशाचा नागरिक नाही आणि त्याच्यावर शेकडो गुन्हे दाखल झालेले आहेत, श्री.चुडासामा त्याचा बॅनर लावतो आणि आमच्या भावना दुखावतात. याबाबत त्यांच्यावर कारवाई कारवाई करणार आहात का ? असा मी तुम्हाला प्रश्न विचारीत आहे.

सभापती महोदय, श्री.शाहरुख खानच्या प्रकरणात माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी येथे भूमिका जाहीर केली होती की, आमची बंदी नाही आणि उच्च न्यायालयाने श्रीमती रंजना पाटील आणि श्रीमती मृदुला भाटकर यांनी सुध्दा तसा निर्णय दिला.हा इतिहास आहे,कोणाला चिडविण्याचा प्रकार नाही.ज्यांना खान सहन होत नाही,त्यांनी कुठे जावे? तर आमचा-तुमचा आवडता खान, त्याचे काय म्हणणे आहे हे मी ब्लॉगवरुन काढलेले आहे.तो काय म्हणतो?मी आपल्याला वाचून दाखवितो, "Shah Rukh Khan feels Pak players should have been picked". त्याने अनेक तारे तोडलेले आहेत, हे एकच वाक्य नाही. श्री.शाहरुख खानचे म्हणणे असे आहे की,"As a perceived snub to Pakistani players by the Indian Premier League spark a spat between the neighbouring countries, Bollywood superstar Shah Rukh Khan, an IPL franchisee himself, believes they should have been picked".



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

सभापती महोदय, त्याने जे म्हटलेले आहे,ते वाचत आहे.मी याचे ट्रान्सलेशन करीत नाही. कारण तुमच्याकडील काही लोकांना हेच मराठी जास्त कळते आणि त्या अनामी रॉयला कळले पाहिजे.त्याने पुढे असे म्हटले आहे की, ""I truly believe they (Pakistan players) should have been chosen," Khan, co-owner of Kolkata Knight Riders, said.". त्याचे पुढे म्हणणे आहे की, "Since "some issues" were involved the matter could have been handled by the IPL "respectfully"."पुढे तो म्हणतो "Pakistan is a good neighbour" म्हणजे त्याला हे प्रेम कशासाठी आलेले आहे."माय नेम इज खान"आपण हा सिनेमा पाहिलात. सिनेमा कसा होता ? सभापती महोदय, तुम्हाला फार मोठे वाटले की, "माय नेम इज खान"आणि हा सिनेमा 263 सिनेमागृहांमध्ये लागणार होता. पण तुम्ही एवढा मोठा मिलिट्रीसारखा फौजफाटा लावला, जसे काही बॉर्डरवर युध्द सुरु आहे. पण आबा, तुम्ही नाईलाजाने सिनेमाला गेलात.तुम्ही गृहमंत्री आहात, पण संपूर्ण फौजदारीचा ठेका, खानाचा ठेका आमच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी घेतला होता.

श्री.मोहन जोशी (खाली बसून) : रावतेसाहेब, आपण सिनेमा पाहिला काय ?

श्री.दिवाकर रावते : नाही, कसा पहाणार ?

श्री.भाई जगताप (खाली बसून) : परंतु सिनेमा पाहिल्याशिवाय ऑब्जेक्शन कसे घेणार ?

श्री.दिवाकर रावते : पिक्चरवर ऑब्जेक्शन नव्हते प्लीज. आपण समजून घ्या. खान हा पाकिस्तान धार्जिणे बोलत असेल तर त्याला या देशातील राष्ट्रवादी नागरिकांनी धडा शिकविला पाहिजे. पण ठीक आहे. खानाच्या साठी तुम्ही निघालात, त्यासाठी पोलीस फौजफाटा ठेवलात. आमच्या शिवसैनिकांना कसे डांबलेत ? कारण मी सगळया पोलीस स्टेशनमध्ये गेलो होतो. आमच्या श्री.कातेचा तर पाय फॅक्चर झालेला आहे, एवढे त्याला मारले. रस्त्यावर तुडवून मारले हे संपूर्ण जगाने टी.व्ही.वर पाहिलेले आहे. त्याने काय केले होते ? त्याच्या हातात शस्त्रे होती की तलवार होती की ढाली होत्या ? तो केवळ निदर्शने करीत होता. पण पोलीस मात्र तुडवतुडव तुडवत होते. तुम्ही एवढा कसला राग काढलात आणि तो खान तुमचा एवढा कोण लागतो की त्याच्यासाठी तुमच्या-माझ्यासारख्या रक्तामासाच्या माणसांना तुडवावयाचे ? मी सगळीकडे गेलो ....

. . . .3 टी-3



श्री.दिवाकर रावते . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होतो. तसेच गोळीबार करु असेही सांगितले आणि अशा प्रकारे तुम्ही सर्वांना तुरुंगामध्ये पाठवत होतात. मग तुम्ही त्या थिएटरमध्ये काय केले ? "माय नेम इज खान" हा पिक्चर बघण्यासाठी यावे तर करफ्यु लागला होता. माझ्याकडे फोटो आहेत. त्यावरुन दिसेल की, अजुबाजूला चिटपाखरु देखील नाही.सगळीकडे पोलीसच. लोकांनी सिनेमा पहाण्यासाठी जावयास पाहिजे ना, आबा, सिनेमा पहाण्यासाठी जावयास पाहिजे. हे फोटोमध्ये काय आहे ?

(सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते सभागृहामध्ये फोटो दाखवतात.)

पोलिसांची फौजच्या फौज आहे. ते आतमध्ये जाणाऱ्याला विचारत होते की कुठे चाललास ?

यानंतर कु.थोरात . . . .

अग्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ SBT/ प्रथम सौ. रणदिवे..... 18:45

दिवाकर रावते....

आबा सिनेमा बघायला गेले.(फोटो दाखवत) हे बघा, त्यांच्या आजुबाजूला कोण नाही. एकटे आबा बसले आहेत. हा बघा त्यांचा फोटो. हा फोटो नकली नाही. ते आपले कर्तव्य बजावत आहेत. खानचा सिनेमा त्यांनी बघितला आणि त्यांनी तो सिनेमा चालवून दाखविला. (अडथळा) हे सिनेमागृहच आहे. हवी असेल तर मी आपल्याला याची सीडी देतो. (फोटोत दाखवत) हे बघा आबा सिनेमागृहात जात आहेत, जसे काय आता आतंकवादी येणार आहेत आणि आबांना उडवणार आहेत. पाचशे पोलीस त्यांच्या आजुबाजूला आहेत आणि एकटे आबा चाललेले आहेत, टुकुक, टुकुक. आबा तुम्ही सिनेमा पाहिला ना? (फोटो दाखवत) हा बघा तुम्ही सिनेमा बघताना काढलेला फोटो. त्यावेळेला तुम्ही मनापासून हसलात. शाहरुख आणि ही नटी कोण आहे बघा. हे बघताना तुम्हाला गुदगुल्या होत होत्या, तो हा फोटो आहे. सभापती महोदय, आपण हा फोटो बघावा. ही तुमची मर्दुमकी आहे काय? सिनेमागृहात पुढच्या दोन-चार लाईनीमध्ये लाठीधारी पोलीस बसविलेले आहेत. कोण् येतय, कोण नाही हे बघण्यासाठी या ठिकाणी पोलिसांना बसविण्यात आलेले आहे. अशा प्रकारे हा "माय नेम ईज खान" सिनेमा दाखविण्यात आला. (फोटो दाखवत ) प्रेक्षक किती आहेत? हे आपण या फोटोमध्ये मोजा. शाहरुख खानचा सिनेमा चालू आहे. तेथे हे पोलीस दांडके घेऊन फिरत आहेत.(फोटो दाखवत) हे बघा. सभापती महोदय, प्रत्येक सिनेगृहाला पोलिसाच्या छावणीचे स्वरुप आले होते. सभापती महोदय, एक प्रेक्षेक असलेले हे सिनेमागृह आहे. त्याठिकाणी खानचा सिनेमा सुरु आहे. हा खान आपला कोण लागतो? तो कसला सिनेमा होता? माननीय मंत्रिमहोदय, श्री. रमेश बागवे तर खूप खुश होते. एरवी मला ब्लॅकने तिकीट घ्यायला लावतात पण पूर्ण कुटुंबासह त्यांनी फुकट तीन शो बघितले. लोकांनी विचारले आपण कंटाळला नाहीत काय? तेव्हा ते म्हणाले मी गृह मंत्री आहे ना? मला सुरक्षा केली पाहिले. त्यांनी पुण्यामध्ये सहकुटुंब तीन शो बघितले. (अडथळा) पुण्यातच बघितले. मी अधिकृत सांगत आहेत.

श्री. आर.आर.पाटील (बसून) मी मुंबईत हा सिनेमा बघितला.

श्री. दिवाकर रावते : पण या सिनेमाचे तिकीट तुम्ही काढले काय? तेथे डी.वाय.एस.पी. वगैरे होते.

श्री. आर.आर.पाटील (बसून) : आपल्या खिशातील पैशाने तिकीट काढून बघितला.

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते :हाही तुम्हाला अभिमान आहे? पाकधार्जिन्या खानचा सिनेमा मी तिकीट काढून पाहिला, काय हा अभिमान? त्याबद्दल आबा तुमचे कौतुक आहे.

सभापती महोदय, मला आनंद आहे की आता एटीएसचे प्रमुख्य श्री. मारियांना केले त्याबद्दल मी माननीय मंत्रिमहोयांना धन्यवाद देतो. खरे म्हणजे या श्री. मारियांना मुंबईचे पोलीस आयुक्त बनवा. आता शासनाने त्यांना एटीएसचे प्रमुख केलेले आहे. त्याठिकाणी श्री. रघुवंशी कोण होते ते वाईट होते असे मी म्हणत नाही. केंद्र शासनाने त्यांना हटविण्याबाबत दांडका मारल्यानंतर आता या शासनाने श्री. मारियांना एटीएसचे प्रमुख बनविले आहे. माझ्या अधिकाऱ्यावर माझा विश्वास आहे, त्यामुळे आम्ही एटीएसच्या अधिकाऱ्यांना हटविणार नाही, असे आपण केंद्र शासनाला सांगितले पाहिजे. आबा गृहमंत्री म्हणून ही तुमची ओळख पाहिजे. पण केंद्र शासनाने सांगितल्यानंतर त्या अधिकाऱ्यांना त्याठिकाणावरुन बदलण्यात आले. त्या पदावरचे व्यक्तिमत्व किती अपमानीत झाले असेल? एटीएसच्या प्रमुखपदी श्री. मारियांना आणलेत त्याबद्दल मला आनंद आहे. या मारियांना मुंबईचे पोलीस आयुक्त बनवा, जास्त चांगले रिझल्टस मिळतील.

सभापती महोदय, गुजराथमध्ये तीन आतंकवादी पकडले. त्या तीन आतंकवाद्यांकडे माय नेम ईज खानच्या तिकीटा मिळाल्या. त्यांनी सांगितले की, माय नेम ईज खान हा जगामध्ये विविध ठिकाण्ी आमच्यावर होणारा अत्याचार दाखविणारा सिनेमा असल्यामुळे आम्ही तो प्रमोट करुन सर्व मुस्लिम कम्युनिटींजना दाखविण्याचा प्रयत्न करतो. हे मी सांगत नाही, तिकडच्या एटीएसच्या चौकशीचा रिपोर्ट सांगतो. मी थोडया वेळापूर्वी माननीय मंत्रिमहोदय, श्री. बागवेंना विचारले की, तुम्ही हा सिनेमा पाहिलेला आहे या सिनेमामध्ये काय आहे हे मला जरा समजून सांगा. सभापती महोदय. "माय नेम ईज खान" हा माझ्या देशामधील मुस्लिम समाजाच्या दुर्धर अवस्थेचा,मुस्लिम समाजावर होणाऱ्या अनेक अन्यायाच्या बाबतीत त्यांनी सिनेमा काढला असता तर कदाचित आमच्या सारख्यांचे काही तरी प्रबोधन झाले असते आणि समाजामध्ये क्रांती झाली असती. पण नाही. अमेरिकेत 9/11 चा जो हल्ला झाला त्यानंतर त्या देशामध्ये मुसलमानांवर कसे अत्याचार हात आहेत हे सांगणारा सिनेमा खानने काढला.

यानंतर श्री. बरवड....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

अमेरिकेमध्ये 9/11 चा हल्ला झाल्यानंतर त्या देशामध्ये मुसलमानांवर कसे अत्याचार होत आहेत हे सांगणारा सिनेमा खान यांनी काढला. काय लॉयल्टी आहे ? माझ्या मातीतल्या मुसलमानांबद्दल त्याला सिनेमा काढला आला नाही. आज आपण सच्चर आयोगाला मान्यता दिली. 35 टक्के गुण मिळाले तरी मुस्लीम मुलाला आय.टी.आय. मध्ये प्रवेश देण्याचे आपण ठरविले आहे. आमच्या मुलांनी घासून घासून 95 टक्के, 96 टक्के गुण मिळविले तरी त्यांना प्रवेश मिळत नाही. त्या 35 टक्के वाल्याला आपल्याला प्रमोट करावयाचे आहे. ही भूमिका मांडणारे सरकार असलेल्या आमच्या देशातील मुसलमानांबद्दल नाही तर अमेरिकेतील मुसलमानांना 9/11 च्या हल्ल्यानंतर किती त्रास होतो हे दाखविणारा सिनेमा त्यांनी काढला आणि मुस्लीम समाजाच्या विरोधामध्ये जगभर कशी परिस्थिती निर्माण होत आहे हे सांगणाऱ्या खानला आपण एवढे प्रोटेक्शन दिले. मला माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील यांना एक प्रश्न विचारावयाचा आहे. मी माझे भाषण संपवत आणले आहे. मी जास्त बोलणार नाही. हे मूलभूत प्रश्न आहेत. आपल्या युवक कॉंग्रेसचे श्री. बिट्टा आहेत त्या माणसाचा मला अभिमान वाटतो. स्वाभिमानाचे सरदारी मनगट आहे, मरणारे आहे. मराठे मगरगट्टे, पण मरणारे जगताप. वेळ आली तर गोळी घालणारे.

सभापती महोदय, 'सिंग इज किंग' सिनेमा निघाला तेव्हा सगळे सरदारजी एकत्र आले. 'लव्ह आजकल' या सिनेमावर त्यांनी ऑब्जेक्शन घेतले. त्या सिनेमातील नट सैफ अली खान याला त्यांनी फरफटत नेले आणि गुरुव्दारापुढे बसवून त्याला माफी मागावयास लावली. तेव्हा दिल्लीतील आपल्या कॉंग्रेसवाल्यांचा सर्वधर्मसमभाव कोठे गेला होता ? आमच्याकडे कोथळा काढल्याचे पोस्टर लावल्यानंतर भावना दुखावल्या म्हणून आपण आम्हाला दांडके दाखवता पण त्या सैफ अली खानला सरदारजींनी फरफटत नेले. बिट्टाने त्यांना सांगितले की, शिख समाजाची ही शेवटची माफी आहे. याच्यापुढे माफी मिळणार नाही, गर्दन कापली जाईल. तुमच्याकडे एक मर्द माणूस आहे. त्याच्यापासून काही तरी शिका. सिंग इज किंग सिनेमातील नट अक्षयकुमार यालाही त्यांनी जेरीस आणले. ते मौजमजा करतात, आपल्याकडे पैसे कमावतात आणि आपण बावळटासारखे जाऊन सिनेमा बघतो. सैफ अली खानच्या बाबतीत बिट्टाने सांगितले की, शिख समाजाची ही शेवटची

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT

श्री. दिवाकर रावते ....

माफी. याच्यापुढे माफी नाही. हे सांगणारा एक बिट्टा आपल्या युवक कॉंग्रेसचा अध्यक्ष असतो. त्याच्यापुढे सर्वधर्मसमभाव कोठे आला नाही. त्याला स्वत:चा स्वाभिमान समजला. मग आपण सगळे मराठे मगरगट्टे आपल्यामध्ये छत्रपतींचा स्वाभिमान जागा होत नाही काय ? मी आपल्याला मॅरथॉनमधील छत्रपती दाखविताना आपण हसलात. आपल्याला गंमत वाटली. आपल्याला चीड यावयास पाहिजे होती. रक्त उसळावयास पाहिजे होते. कोण कोठली हाय फाय करणारी अवलाद आमच्या मुंबईमध्ये आलेली आहे. जे कधी कोणात मिसळत नाहीत, त्यांना कोणाशी काही देणेघेणे नाही ते अशा वेळला नाटके करावयास निघतात. अफझलखान आणि शिवाजी महाराजांना मॅरथॉनमध्ये धावावयास सांगतात. याबाबत आपण काही करणार आहात की, नाही हा प्रश्न निर्माण होतो. मी माननीय गृहमंत्र्यांना विचारु इच्छितो की, एक खासदार आला तर त्याला आपण किती सांभाळावयाचे ? मी सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले साहेबांना सांगतो. माननीय शिवसेना प्रमुखांनी काय सांगितले होते ? जे काही राहूल गांधी प्रकरण होते, ते त्या ठिकाणी जे काही बोलले तो आमचा अपमान होता, महाराष्ट्राचा अपमान होता. हे आमचे मत असेल, आपले नसेल पण बिट्टासारखे आपले मनगट मजबूत नाही. आपले विचार मजबूत नाहीत. आमच्या महाराष्ट्राचे दुर्देव आहे. माननीय शिवसेना प्रमुखांनी काय जाहीर केले होते ? राहूल गांधींचे काळे झेंडे दाखवून स्वागत करा असे त्यांचे शब्द होते. राहूल गांधीला हाकला, येऊ देऊ नका, अमूक करा, असे काही म्हटले नव्हते. पण निदर्शने करा. या ठिकाणी लोंढे येऊ द्या अशा प्रकारच्या आपल्या वक्तव्याने आम्ही व्यथित आहोत. लोकशाहीमध्ये ही पध्दत आहे. हायकोर्टाने आताच पंधरा वीस दिवसांपूर्वी निर्णय दिला आहे की, विरोधी पक्षाला निदर्शने करण्याचा अधिकार आहे. साधी गोष्ट होती. मी फोन करुन विचारले की आपल्याला कोठे उभे राहण्यास परवानगी दिली आहे ते सांगा. परवानगी दिली होती. आम्ही एका ठिकाणी उभे राहतो आणि राहूलजींना आम्ही झेंडे दाखवतो. किमान त्यांना महाराष्ट्राची भावना कळली तर भविष्यामध्ये महाराष्ट्रातही कॉंग्रेस आहे, सरकार आहे या जाणीवेने ते बोलतील ही त्यामागची भावना असते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KTG/ SBT/ KGS/ यापूर्वी श्री.बरवड 18:55

श्री.दिवाकर रावते...

तुमच्या छाताडावर नाचून गेले असे सन्माननीय सदस्य श्री.नवले हे परवाच्या भाषणातून बोलले. आमच्या छाताडावर श्री.राहुल गांधी नाचून गेले त्याचा त्यांना आनंद झाला आहे काय ? त्यांचे वक्तव्य रेकॉर्डवर आहे. मला त्यासंबंधी छेडायचे नव्हते.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते मला उद्देशून असे म्हणाले की, श्री.राहुल गांधी हे तुमच्या छाताडावर नाचून गेले असे तुम्ही म्हणालात. मी 'छाताडावर' असा शब्दप्रयोग केला नाही. श्री.राहुल गांधी हे तुमच्या डोक्यावर पाय देऊन निघून गेले असे म्हणालो होतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझ्या भाषणातील 'छाताडावर नाचून गेले' हे शब्द मागे घेतो आणि डोक्यावर पाय देऊन गेले असे म्हणतो. ही मगरगट्टयांची डोकी आहेत. त्या शब्दांचा यांना काय अभिमान आहे बघा ? राहुल गांधी हयांना लेंडया टाकायला लावतो आणि हे सगळे टमरेल घेऊन धावतात. तुमचे कर्तृत्व सांगितले ते बरे झाले. त्यांनी दिल्लीपुढे गुडघे टेकले आहेत. कालपर्यंत ज्या शिवसैनिकामध्ये स्वाभिमान भरला होता पण पक्ष बदलल्यानंतर गुडघे टेकायला लागला. ही आमची अवनती आम्हाला दिसायला लागली. ठीक आहे, तुमचा मान अपमान तुमच्याकडे आहे. कालपरवापर्यंत आमच्याकडे लढणारा आमचा सुरेश नवले याला गुडघे टेकणा-या काँग्रेसवाल्यांमध्ये बघताना खरोखर आम्हाला दु:ख होते.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी काँग्रेस पक्षाबद्दल बोलू नये. गुडघे टेकणा-या काँग्रेस पक्षामध्ये म्हणजे काय ?

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.सुरेश नवले हे तुमच्या पक्षात नाहीत काय ?

श्री.भाई जगताप : मी तुमच्या पक्षाबद्दल काहीही बोललो नाही.

श्री.दिवाकर रावते : मी श्री.सुरेश नवले यांच्याबद्दल अधिकृतपणे बोललो आहे.

श्री.भाई जगताप : तुम्हाला त्यांच्याबद्दल जे बोलावयाचे आहे ते बोलावे, परंतु काँग्रेस पक्षाबद्दल बोलू नका.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.सुरेश नवले हे कोणत्या पक्षात आहेत ?

श्री.भाई जगताप : गुडघे टेकणा-या कॉंग्रेस पक्षामध्ये असे आपण म्हणलात. आपण चेक करावे.

( दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात. )

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, मेरा पॉइंट ऑफ ऑर्डर है.

श्री.दिवाकर रावते : श्री.राहुल गांधीकरिता मी तेथे होतो.....श्री.सुरेश नवले गुडघे टेकते है, क्या आपको मेरी यह बात बुरी लग रही है ? मै उनके बारे मे बोल रहा हूँ.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, मेरा पॉइंट ऑफ ऑर्डर यह है कि . . .

**उपसभापती** : मी आता सर्व सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या प्रस्तावावर 4 वाजून 5 मिनिटांनी सुरुवात केली होती. या प्रस्तावाची वेळ संध्याकाळी 6.35 वाजता संपलेली आहे. असे असताना देखील आपण प्रस्तावावरील चर्चा सुरु ठेवलेली आहे. या प्रस्तावावर अजून 15 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु ठेवावयाची की थांबवावयाची याबाबत सभागृहाने निर्णय घ्यावयाचा आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मघाशी मगरगट्टे असे बोललो, पण सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना वाईट वाटले असेल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, कॉंग्रेस पक्षाबद्दल बोलू नका. आमच्या पक्षाबद्दल आमच्या भावना आहेत.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, मेरा पॉइंट ऑफ ऑर्डर है. अगर आप हमारी बात नहीं सुनेंगे तो हम भी शोर-गुल करेंगे. हम हर बार यह मांग करते हैं कि बी.ए.सी. में जो आपने तय किया है कि अपोजीशन लीडर और गट नेताओं को कितना समय मिलेगा और सत्ताधारी पक्ष के सदस्यों को कितना समय मिलेगा, चाहे यह समय व्यक्तिगत रुप से हो या ग्रुप के हिसाब से हो, उस पर अमल नहीं होता है. इसका परिणाम यह होता है कि आखिर में बोलने वाले माननीय सदस्यों, खास कर सत्ताधारी पक्ष के सदस्यों को बहुत कम समय मिलता है, इसलिए मेरी आपसे मांग है कि . . .

3....





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : यह विरोधी पक्ष का प्रस्ताव है, इसलिए उनके नेता अधिक समय ले रहे हैं. मैं उनसे कम समय में भाषण पूरा करने की रिक्वेस्ट करता हूँ. उनको बोलने का अधिकार है. मैंने माननीय सदस्य श्री. भाई जगताप को भी बोलते समय डिस्टर्ब नहीं किया. मैं सभी माननीय सदस्यों को बोलने की संधि देता हूँ, परंतु भाषण चालू असताना कोणालाही बसा असे म्हणणे मला योग्य वाटत नाही.

यानंतर श्री.शिगम.....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 19:00

श्री. दिवाकर रावते : माननीय राहुल गांधी ज्यावेळी येथे आले त्यावेळी शिवसेने त्यांचा कोणत्या शब्दाने किंवा वृत्तीने अवमान केला नाही. तर केवळ काळे झेंडे दाखवा आणि निदर्शने करा असे आमच्या नेत्याचे निदेश होते. ते काळे झेंडे दाखवायला सुध्दा तुम्ही दिले नाहीत. त्यासाठी तुम्ही साडेबावीस हजार पोलीस त्यांच्या दिमतीला ठेवलेत. आम्ही तिकडे तलवारी किंवा दगड घेऊन गेलो होतो काय ? असे काहीही नसताना त्या कार्यक्रमाला साडेबावीस हजार पोलीस तैनात केलेत. सभापती महोदय, मी याठिकाणी असे दृश्य सांगू इच्छितो की, ते कुणालाही बघायला वाईट वाटेल. महाराष्ट्रातील कोणत्याही माणसाने ते दृश्य बघितले तर वाईट वाटेल. या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, म्हणजे आमचे सर्वांचे मुख्यमंत्री, कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री. माणिकराव ठाकरे, मुंबई शहर प्रदेशाध्यक्ष श्री. कृपाशंकर सिंह हे जमादार, हवालदार आणि पट्टेवाला या भूमिकेत खुर्चीवर बसून राहुल गांधींची एक दीड तास प्रतिक्षा करीत बसलेले सा-या महाराष्ट्राने आणि देशाने टी.व्ही.वरुन पाहिले. महाराष्ट्राच्या 10 कोटी जनतेचे प्रतिनिधी माननीय मुख्यमंत्री तेथे एक दीड तास वाट पहात बसलेले आहेत. प्रत्येकाने आपल्या नेत्याचा सन्मान करावयाचा असतो. पण सन्मानाची ही कोणती पध्दत आहे ? पट्टेवाला, जमादार आणि हवालदाराची कोणती पध्दत आहे ? ही पध्दत पाडून तुम्ही महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाला देशामध्ये मान खाली घालायला लावलीत. तुम्ही काय मिळविलेत ? मी गृह राज्यमंत्री श्री. रमेश बागवे यांना दोष देणार नाही. आदर व्यक्त करण्याचे प्रत्येकाचे हिशेब असतील. मी त्याबद्दल काहीच बोलत नाही. एका दलित समाजातील माणसाला नेतृत्व मिळालेले आहे. सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री तेथे एक तास प्रतिक्षा करतात. मी कॉंग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांची प्रतिक्षा समजू शकतो. मुंबई शहर अध्यक्षांची प्रतिक्षा समजू शकतो. परंतु राज्याचे माननीय मुख्यमंत्री हे एक-दीड तास वाट पहात बसलेले आहेत असे जेव्हा टी.व्ही.वरुन दाखविण्यात आले त्यावेळी फार वाईट वाटले. साडेबावीस हजार पोलीस तुम्ही तैनात केलेत. या महाराष्ट्राचे गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील हे हतबल झालेले आहेत. त्यांच्या हातात गृहखात्याचे अधिकार नाहीत. गृह खाते मुख्यमंत्री चालवतात आणि गृहमंत्री हतबलतेने पाहातात. या महाराष्ट्राचे गृहमंत्री हतबल झाले तर कुठला आतंकवाद निपटून काढला जाणार आहे ? या आमच्या व्यथा आहेत. असे अनेक विषय आहेत. तरीही छत्रपती शिवाजी महाराजांचा सन्मान, अवमान या सर्व गोष्टींची तुम्ही दखल घ्या आणि पुनश्च कधी या महाराष्ट्रामध्ये असे घडू देऊ नका. मी कॉंग्रेस पक्षाच्या सदस्यांना सांगू इच्छितो की, तुम्ही सत्तेमध्ये

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

आहात,सत्तारुढ आहात. सरकार वेगळे असते, काँग्रेस पक्षाचे सदस्य हे त्या पक्षाचे सदस्य असतात. या देशामध्ये विरोधी पक्षाला सुध्दा योग्य पध्दतीने आणि योग्य मार्गाने निदर्शने करण्याचा अधिकार आहे याचे भान त्यांनी ठेवा, त्याची टिंगलटवाळी करु नका, तुम्ही जेवढी टिंगलटवाळी कराल तेवढ्या तुमच्या झिंज्या, तुमचे केस उपटण्याचे सामर्थ्य विरोधी पक्षाच्या मनगटात आहे हे विसरु नका आणि तेही वैधानिक सामर्थ्य आम्हाला मिळालेले आहे हे आज मी तुम्हाला ठणकावून सांगत आहे. पुन्हा निर्भत्सना करण्याचा प्रयत्न करु नका. ज्या दिवशी ती होईल त्या दिवशी तुम्हाला तसे उत्तर दिल्याशिवाय स्वस्त बसणार नाही. आम्ही नेहमी कायदा खांद्यावर घेऊन खेळत असतो, फटके घेण्याची आमची तयारी असते हेही मी सांगतो आणि यापुढे अशा प्रकारचे अवमान या महाराष्ट्रामध्ये सहन करणार नाही. रामनवमीची मिरवणूक कोणत्या परिस्थितीत अडवली त्यासंबंधीचा निर्णय आम्हाला मिळाला पाहिजे, अकोल्यामध्ये जो लाठीमार झाला त्याचा निर्णय आम्हाला मिळाला पाहिजे. या देशामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, रामनवमी या सणांना जर बंदी येणार असेल तर इतर कोणत्याही संणाना अडथळा निर्माण झाला तर इतरांना दोष देऊ नका, हे सुध्दा आज तुम्हाला जाहीररीत्या सांगतो. धन्यवाद. जयहिंद ! जय महाराष्ट्र !!

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ KGS/ KTG/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 19:00

**उपसभापती** : सभागृहाची बैठक पुढे चालू ठेवायची काय ? माननीय गृहमंत्री आणि सभागृहाने तसे सांगितले तर मी बैठक पुढे चालू ठेवतो.

श्री. आर.आर.पाटील : ज्या नियमाने आपण ही चर्चा आणली त्या नियमाप्रमाणे अडीच तासात उत्तरासह हा विषय संपायला पाहिजे होता. आपण नियमाचे पुस्तक काढू पहावे. सभागृहाचे कामकाज कुठे तरी नियमाने चालले पाहिजे. या विषयावर विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना बोलायचे होते. सत्तारुढ आणि विरोधी पक्षातील किती सदस्य किती वेळ बोलले ते आपण पहावे. विरोधी पक्षातील सदस्यांना जास्तीत जास्त वेळ मिळालेला आहे. उद्या उत्तरासह हा विषय संपवावा. उद्या पुन्हा गडचिरोलीचा विषय आहे. त्या विषयावरही आपणाला बोलता येईल.

**उपसभापती** : कॉंग्रेस पक्षातर्फे सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप आणि सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन हे बोलले आहेत. शिवसेना पक्षातर्फे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि रामदास कदम हे बोलले आहेत.

...नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**.......

भारतीय जनता पक्षाचे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर व सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे बोलले आहेत. विरोधी पक्षाने घेतलेली वेळ निश्चितपणे जास्त आहे. विरोधी पक्षाचा प्रस्ताव असल्यामुळे ती न्याय आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, प्रत्येक आठवड्यात सत्तारुढ पक्ष आणि विरोधी पक्षाकडून देण्यात येणाऱ्या प्रस्तावांवर चर्चा घेणे, किती प्रस्ताव आणायचे याचा निर्णय कामकाज सल्लागार समितीमध्ये होत असतो. एक प्रस्ताव विरोधी पक्षाचा आणि एक प्रस्ताव सत्ताधारी पक्षाकडून येतो. विरोधी बाजूच्या दोन्ही पक्षांना वेळ दिल्यानंतर आता सत्ताधारी बाजूकडील सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी. उद्या पुन्हा गडचिरोली जिल्हयातील नक्षलवादी घटनांबद्दलचा प्रस्ताव चर्चेला येणार आहे. आजचा प्रस्ताव आणि उद्या चर्चेला येणारा प्रस्ताव क्लब करावा. दोन्ही विषय गृह विभागाशी संबंधित असल्यामुळे दोन्ही प्रस्तावावरील चर्चेला एकत्रित उत्तर देता येईल. या आठवड्यात सर्व प्रस्ताव विरोधी पक्षाचे घ्यायचे आहेत का? चर्चा करण्याची वेळ नियमाप्रमाणे निश्चित केली पाहिजे.

डॉ.नीलम गो-हे : हा विषय मोठा आहे.

श्री.आर.आर.पाटील : विषय मोठा असला तरी सभागृहाचे कामकाज नियमाने चालले पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, गडचिरोलीच्या विषयासंबंधी माननीय सभापतींना नागपूरच्या अधिवेशनामध्ये विनंती केली असता त्या विषयावर चर्चा करण्यासाठी पुढील अधिवेशनामध्ये खास वेळ दिला जाईल असे सांगितले होते. नागपूरच्या अधिवेशनात आम्ही तो प्रस्ताव मांडणार होतो. परंतु माननीय सभापतींनी आम्हाला विनंती केली म्हणून तो विषय स्वतंत्रपणे चर्चेला येणार आहे. तो विषय महाराष्ट्राच्या दृष्टीने हिताचा आहे.

**उपसभापती** : उद्या या प्रस्तावावरील उर्वरित चर्चेसाठी विशेष बैठक घ्यायची का?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आज रात्रौ 8.00 वाजेपर्यंत चर्चा घेण्यात यावी, उर्वरित चर्चा उद्या विशेष बैठकीत घेण्यात यावी.

श्री.आर.आर.पाटील : लक्षवेधी सूचनेनंतर ही चर्चा घेण्यात यावी.

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. सन्माननीय गृहमंत्र्यांनी मी येण्यापूर्वी जी वस्तुस्थिती सांगितली ती खरी आहे. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी अडीच तासाची वेळ दिली जाते ही वस्तुस्थिती आहे. हा प्रस्ताव विरोधी पक्षाकडून आलेला असल्यामुळे विरोधी पक्षाला थोडा अधिक वेळ देण्याची प्रथा पाळली जाते. परंतु प्रत्येक वेळेला चर्चा करीत असताना वेळेची मर्यादा पाळली नाही तर चर्चेला कितीही वेळ देऊन उपयोग होणार नाही. मी याठिकाणी असे सांगेन की, ही चर्चा आजच संपविण्यात यावी. यापुढे अशा पध्दतीचा प्रस्ताव चर्चेसाठी आल्यानंतर प्रस्तावाच्या सुरुवातीला पीठासीन अधिकारी याठिकाणी वेळेबाबत सांगतील. संबंधित मंत्रीमहोदयांच्या उत्तराच्या भाषणासाठी आवश्यक असणारा 30 ते 40 मिनिटांचा वेळ वगळता उर्वरित वेळ सत्ताधारी आणि विरोधी पक्षासाठी निम्मा निम्मा वाटून देण्याची पध्दत आहे, त्याप्रमाणे वेळेचे नियोजन केल्यानंतर भारतीय जनता पक्ष, शिवसेना पक्ष यांना त्यांच्या संख्याबळाप्रमाणे वेळ देण्याची प्रथा आणि पध्दत आहे. असे असताना आपण वेळेची मर्यादा पाळायची नाही असे ठरविले तर ते योग्य होणार नाही. सन्माननीय गृहमंत्र्यांच्या उत्तरासह ही चर्चा आजच आपण संपवू या. खरे म्हणजे कोकणाच्या प्रश्नासंबंधीचा प्रस्ताव काल सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी मागे घेतला. अन्यथा आज एकंदरीत तीन प्रस्ताव चर्चेला येणार होते. उद्या एक प्रस्ताव चर्चेला येणार आहे. आज या प्रस्तावावरील चर्चा याठिकाणी थांबविण्याचा निर्णय घेतला तर उद्याच्या कामकाजामध्ये नियम 260 चा प्रस्ताव, लक्षवेधी सूचना व शासकीय विधेयके आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी एक विनंती करु इच्छितो. कायदा व सुव्यवस्था या विषयावरील चर्चा प्रत्येक अधिवेशनात एकदा घेण्यात येते. आपण नेहमीच या सदनातील सर्वच सन्माननीय सदस्यांच्या भावनांचा आदर करीत आला आहात. आपण सर्वांना मदत करीत असता.

(नंतर 3झेड.1...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

आमची अशी तक्रार सुध्दा नाही. पण आमची विनंती आहे की, ही चर्चा आता 8.00 वाजेपर्यंत घ्यावी आणि उर्वरित चर्चा सकाळी विशेष बैठक घेऊन पूर्ण करावी आणि दुपारी 12 वाजेच्या आत उत्तर देखील पूर्ण करावे.

श्री. आर.आर.पाटील : महोदय, सभागृहात आपण कुठल्याही व्हिजीटर्सना प्रवेश पत्र देत नाहीत. खेड्यापाड्यातून लोक भेटण्यासाठी मुंबईत आलेले असतात. अशा परिस्थितीत सकाळी सारखे सारखे स्पेशल सिटींग घेत राहिलो तर त्या दिवशीच्या विषयांची तयारी म्हणून विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत ब्रिफ्रिंग सुध्दा करणे शक्य होत नाही. म्हणून अशा चर्चेवर मर्यादा आणली पाहिजे. माझी अशी विनंती आहे की, आजच ही चर्चा उत्तरासह संपवावी अन्यथा सकाळी विशेष बैठक न घेता लक्षवेधी सूचनेनंतर उत्तर घ्यावे.

**सभापती** : सकाळी 10.00 वाजता विशेष बैठक घेण्याऐवजी 11.00 वाजता घ्यावी आणि दुपारी 12.30 वाजेपर्यंत सदस्यांची भाषणे पूर्ण करावीत. दुपारी 12.45 वाजता सभागृहाची नियमित बैठक होईल.

श्री. आर.आर.पाटील : उद्या लक्षवेधी सूचनेनंतर उत्तर घ्यावे अशी मी विनंती करतो.

**सभापती** : ठीक आहे, उर्वरित भाषणे आता संपवून घेऊ आणि उत्तर उद्या घेऊ.

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, सभागृहाची बैठक आताच संपवावी असे मला सुचवावयाचे आहे.

**सभापती** : आता काही सन्माननीय सदस्यांची भाषणे होतील. रात्रौ 8.00 वाजेपर्यंत ही भाषणे होतील आणि उद्या सकाळी 11.00 ते दुपारी 12.30 पर्यंत उर्वरित सदस्यांची भाषणे पूर्ण करण्यात येतील व लक्षवेधी सूचनेनंतर माननीय मंत्री महोदयांचे उत्तर घेण्यात येईल असे एकंदर ठरलेले आहे. आता सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांचे भाषण सुरु होईल.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : महोदय, सभागृहाचे ज्येष्ठ नेते तसेच माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव चर्चेसाठी आणलेला आहे त्यावर माझे विचार मांडणार आहे.

महोदय, मी यासंदर्भात फक्त दोन तीन मुद्यांचाच परामर्श घेणार आहे. प्रथम पुण्यामध्ये जर्मन बेकरीत झालेल्या स्फोटाच्या संदर्भात मला सांगावयाचे आहे की, ही घटना घडल्यानंतर मला दोन मृतांच्या पालकांना भेटण्याचा योग आला होता. मी त्यांना भेटल्यानंतर त्यांचे जे करुण उद्गार होते ते पहिल्यांदा मी सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यांनी मला सांगितले होते की, "आपण शासनाची माणसे, आम्हाला भेटायला आलात, आम्हाला पैसेही द्याल, सांत्वन कराल पण माझ्या मुलाचे पाय गेले ते तुम्ही आणून देणार का" हे ज्यावेळी ती माता सांगते त्यावेळेस मात्र माझ्यासारख्या मातेच्या डोळ्यात अश्रू आल्याशिवाय राहत नाहीत. आतंकवाद्यांचा हल्ला पुण्यात होणार आहे असे केंद्राकडून कळविण्यात आले होते परंतु महाराष्ट्र सरकार त्याबाबतीत का गाफिल राहिले हेच मला समजत नाही. हे जरी माहीत नसले तरी पोलीस कमिशनर मात्र दुसरीकडे म्हणतात की, प्रत्येक नागरिकाने आपल्या संरक्षणाची जबाबदारी स्वत:वर घेतली पाहिजे. एक पोलीस अधिकारी म्हणून हे त्यांचे वक्तव्य निषेधार्ह आहे असेच मी म्हणेन. मी मुंबईच्या हल्ल्याच्या संदर्भात जास्त बोलणार नाही पण थोडक्यात काही बाबी नजरेसमोर आणण्याचा प्रयत्न करणार आहे. कारण मुंबई शहरात सर्व काही आलबेल आहे असे समजण्याची गरज नाही.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ....

कुर्ल्यामध्ये ज्या इमामरतीत पोलीस अधिकारी राहतात त्या इमारतीमधील मुलीवर बलात्कार झाला आणि त्या मुलीचे प्रेत ज्या इमारतीत पोलीस अधिकारी राहतात त्या इमारतीच्या गच्चीवर आढळून आले होते त्यामुळे यासारखे दुर्दैव आम्हा भगिनीवर दुसरे कोणतेही नसेल असे मला येथे अत्यंत खेदाने नमूद करावेसे वाटते.

सभापती महोदय, आज आपल्यावर टी.व्ही.चे आणि फिल्म्सचे आक्रमण झालेले आहे. यामुळे पूर्ण समाजामध्ये वेगळया प्रकारचे शैथिल्य आलेले आहे. जसे आम्ही पोलिसांना जबाबदार धरतो तसे टी.व्ही. आणि मुव्हीजना सुध्दा जबाबदार धरले पाहिजे. त्यांनी काय दाखवावे आणि काय दाखवू नये यासंदर्भात देखील या ठिकाणी विवेचन होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मी माननीय गृहमंत्र्यांना सांगू इच्छिते की, या विषयाच्या संदर्भात प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, मी अजून दोन मुद्दे मांडणार आहे. मी ज्या मुलुंडमधून आमदारकीची निवडणूक लढले त्या मुलुंड मतदारसंघातील एका मुलाची व्यथा आपल्या समोर मांडणार आहे. त्या ठिकाणच्या पोलीस अधिका-यावर कर्तव्यदक्ष आबा काय ॲक्शन घेणार हा माझा खरा सवाल आहे. मुलुंडच्या नवघर पोलीस स्टेशनमध्ये एका 14 वर्षाच्या म्हणजे कपिल चैत्राम पाटील या मुलाला पोलीस स्टेशनमध्ये पकडून ठेवले गेले. चैत्राम पाटील यांना मी व्यक्तिगत ओळखते. कपिल पाटील या मुलाला अटक करण्यात आली आहे म्हणून त्याच्या घरी कळवण्याचे सौजन्य या पोलीस स्टेशनच्या अधिका-याने दाखवले नाही. कपिल पाटील हा सज्जन मुलगा होता, कुटुंब वत्सल घरातील हा मुलगा होता. यासंदर्भातील सर्व माहिती मी वर्तमान पत्रात सुध्दा दिलेली आहे. या मुलाने मुलीची छेड काढली म्हणून कपिल पाटील याला पोलीस स्टेशनमध्ये ठेवण्यात आले होते. कोणत्या मुलीची छेड काढली म्हणून पोलिसांनी या मुलाला पोलीस स्टेशमध्ये डांबून ठेवले ? या मुलाला साधा घरी फोन सुध्दा का करु दिला नाही ? जेव्हा या मुलाला सोडले तेव्हा या मुलाने आपल्या आईला एक चिठ्ठी लिहिली व ही चिठ्ठी आईला कशी मिळेल याची देखील त्याने खबरदारी घतली होती. हुले नावाच्या पोलीस अधिका-याने कपिल पाटीलला घरी जायचे नाही असे सांगितले होते. या सर्व गोष्टीला कंटाळून, घरच्या मंडळींचा अपमान होतो आहे, समाजामध्ये

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ....

आपली इज्जत जाते, आपले नाव जाते आहे म्हणून या मुलाने रेल्वेखाली आत्महत्या केली. हुले नावाच्या पोलीस अधिका-याने तसेच पोलीस स्टेशनच्या तीन पोलीस अधिका-यांनी कपिल पाटीलला जलील केले. त्यामुळे या ठिकाणच्या संबंधित पोलीस अधिका-यांवर गृह विभाग काय कारवाई करणार आहे ?

सभापती महोदय, समाजामध्ये, जाती जातीमध्ये, धर्मा-धर्मामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. मग महाराष्ट्र राज्य असू दे किंवा भारत देश असू दे. सर्व जाती धर्माची लोकं आम्ही गुण्या गोविंदाने राहणार. खरे म्हणजे सर्वांनी गुण्यागोविंदाने राहिले पाहिजे असे माझे प्रामाणिक मत आहे. कृष्णा देसाई हे आमदार होते याची आपल्याला कल्पना आहे. कृष्णा देसाई यांना "वाघ" म्हणून संपूर्ण महाराष्ट्र ओळखत होता. कृष्णा देसाई हे केवळ कागदावरील वाघ नव्हते. आमदार कृष्णा देसाई यांचा खून एका हिंदू संघटनेने केलेला आहे याचे उत्तर आपल्यालाच शोधावे लागणार आहे. यासंदर्भातील उत्तर शोधले नाही तर आपणच कुठे तरी कमी पडू आणि धर्मा-धर्मात व जाती-जातीतील दरी अजून वाढविण्याचा प्रयत्न होईल. ही दरी कमी करावयाची असेल...

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, कृष्णा देसाई यांचा खून कधी झाला आणि कायदा व सुव्यवस्थेची चर्चा कोणत्या सालावर होत आहे ?

**सभापती** : परब साहेब आज कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा होत आहे. सर्व वक्त्यांनी यादृष्टीने तारतम्य पाळणे गरजेचे आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, हे सर्व होत असतांना आपण विचार पूर्वक वागणार आहोत काय ? स्वप्न पैसे देऊन विकत घ्यावी लागत नाहीत तर ती प्रत्यक्षात अंमलात आणावी लागतात. आपण जर हे सर्वांनी प्रत्यक्षात अंमलात आणले नाही तर कायदा आणि सुव्यवस्थेचे काय होते याचे चित्र आपण मुंबई शहरात पाहिलेलेच आहे. त्यामुळे आपण सर्वांनी बरोबर चालूया एवढेच या निमित्ताने सांगून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

------

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुडकर यांनी नियम 260 अन्वये, कायदा व सुव्यवस्थेसंबंधी मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आपणा सर्वांना खरोखर अंतर्मुख होऊन विचार करावा लागेल की, मुंबई आणि महाराष्ट्रामध्ये सर्वसामान्य व्यक्ती सुरक्षित आहे काय ? लोकलने प्रवास करणारी व्यक्ती सुरक्षित आहे काय ? रस्त्यावर फिरणारी व्यक्ती सुरक्षित आहे की सकाळी उठून डबा घेऊन कामावर जाणारा माणूस सुरक्षित आहे ? सकाळी कामावर गेलेला माणूस जोपर्यंत संध्याकाळी घरी सुरक्षित परत येत नाही, तोपर्यंत त्याच्या सुरक्षेची हमी देता येणार नाही . सभापती महोदय, विधान भवन तरी सुरक्षित आहे काय ? हे सुरक्षित नसल्यामुळे, आपल्याला तसेच माननीय मुख्यमंत्र्यासह इतरांना येथे पायी चालत यावे लागत आहे.

सभापती महोदय, मुंबईवर 26/11 रोजी दहशतवादी हल्ला झाला होता. त्यामुळे आपण सर्वजण हादरुन गेलो असून त्या धक्यातून आपण अजूनही सावरलो नाही. 26/11 च्या घटनंनंतर पुण्यातील जर्मन बेकरीत बॉम्ब स्फोट झाला होता. 26/11 च्या घटनेनंतर राम प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती आणि त्या समितीचा अहवाल शासनाला सादर करण्यात आला होता. काही गुप्त गोष्टी बाहेर समजू शकतील म्हणून या अहवालावर या सभागृहात चर्चा होणे उचित नाही, असे आपण सागितले होते व विरोधी पक्षाने देखील मोठया मनाने ते मान्य केले. त्यामुळे या अहवालासंबंधी इनडोअर चर्चा झाली होती. राम प्रधान समितीच्या अहवालानंतर काही गोष्टीची अंमलबजावणी झाली आहे काय ? कालच मी अशी बाजमी वाचली की, अजूनही पोलिसांना बुलेट प्रुफ जॅकेट दिलेले नाही. तेव्हा अमुक इतकी जॅकेट घेतली आहेत, ती चिनी बनावटीची होती, यु.के.बनावटीची होती की, ऑस्ट्रेलियन बनावटीची होती यासबंधी माननीय गृह मंत्र्यांनी उत्तर द्यावे, अशी मी त्यांना विनती करतो. 26/11 रोजी जो मुंबईवर हल्ला झाला होता तशा प्रकारचा हल्ला पुन्हा होऊ नये, अशी सर्वाची इच्छा आहे परंतु दुर्देवाने जर अशा प्रकारचा हल्ला झाला तर त्याच्याशी सामना करण्यासाठी पोलीस समर्थ असले पाहिजेत.

..2...

डॉ.दीपक सावंत ......

सभापती महोदय, 26/11 च्या हल्ल्याच्या वेळी 8 अधिकारी आणि 48 पोलिसांसाठी फक्त 24 बुलेट प्रुफ हेल्मेटस व जॅकेटस होती. मध्यंतरी गृह मंत्र्यांनी उत्तर देत असतांना असे सागितले की, 365 दिवसापैकी 360 वेळा अलर्टस देण्यात येतात. मुंबई, महाराष्ट्र हिटलीस्टवर आहे, हे आपणा सर्वानाच माहीत आहे. पुण्यातील जर्मन बेकरीमध्ये बॉम्ब स्फोट झाला असून तो होण्यापूर्वी आपल्याला अलर्ट देण्यात आला होता. त्याचबरोबर छाबडा हाऊसच्या संदर्भात देखील अलर्ट देण्यात आला होता. जर्मन बेकरी आणि छाबडा हाऊस यामध्ये कमी अंतर आहे. परंतु या अलर्टकडे शासनाने लक्ष दिले नाही. त्यावेळी शासनाला 'माय नेम इज खान' डोळया समोर होता व सर्व पोलीस फोर्स त्यावेळी हा चित्रपट दाखविणाऱ्या चित्रपटगृहाच्या संरक्षणासाठी सर्व पोलीस फोर्स वापरण्यात आला होता. त्यावेळी शिवसेनेच्या आदोलकांना कसे झोडपून काढावयाचे आणि त्यांचे आदोलन कसे चिरडून टाकावयाचे यासाठी पोलीस फोर्स वापरला गेला होता. काठया घेतलेले पोलीस फक्त आंदोलकांना झोडपून काढू शकतात. परंतु अतिरेक्यांशी सामना करु शकत नाही, ही बाब पुन्हा एकदा सिध्द झालेली आहे.

सभापती महोदय, मध्यंतरी श्री.राहूल गांधी मुंबईला आले होते आणि त्यावेळी सुध्दा आपण हेच पाहिले होते. सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते या विषयावर बोलले असल्यामुळे, त्यासबंधी मी आता फारसे बोलणार नाही. श्री.राहूल गांधी यांचा प्रोटोकॉल विचारात घेऊन त्यांच्या सुरक्षिततेसाठी प्लॅन ए आणि प्लॅन बी ठरविण्यात आला होता. परंतु श्री. राहूल गांधी यांनी हा प्लॅन बदलून प्लॅन सी तयार केला होता. त्यावेळी दुर्देवाने त्यांच्या जीवाला जर काही धोका निर्माण झाला असता तर त्यास कोण जबाबदार होते ? आमच्या कार्यकर्त्याना सोडविण्यासाठी आम्ही जेव्हा पोलीस स्टेशनमध्ये गेलो होतो तेव्हा तेथील पोलीस अधिकारी आमच्याशी श्री.राहूल गांधी यांच्या सुरक्षिततेच्या जबाबदारीसबंधी बोलत होते. त्यांचे म्हणणे देखील बरोबरच होते. श्री.राहूल गांधी यांना झेड डबल प्लस सुरक्षा दिलेली असतांना ए आणि बी असे दोन प्लॅन तयार केलेले असतांना त्या प्लॅनचे व्हायोलेशन करुन त्यांनी तिसरा प्लॅन तयार केला होता. अशा वेळी जर काही झाले असते तर त्यास कोण जबाबदार राहील ? त्या गोष्टीस पोलीस जबाबदार राहतील की निर्णय बदलणारे जबाबदार राहतील ?

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

सभापती महोदय, त्यांनी पहिल्या वर्गाचे तिकिट घेतले आणि रेल्वेमधून सर्वसामान्य माणूस कशाप्रकारे प्रवास करतो ते पाहिले. आपल्याला आमदार आणि खासदारांकरिता पास दिला जातो, ओळखपत्र दिले जाते. ते दाखविल्यानंतर आपण रेल्वेने कुठेही प्रवास करु शकतो. त्यामुळे हा वादाचा मुद्दा असल्यामुळे मी त्यावर जास्त बोलू इच्छित नाही.

सभापती महोदय, आज सुध्दा जर्मन बेकरीमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात सहभागी असलेले अतिरेकी आपल्याला सापडत नाहीत. हे पोलीस अधिकारी विधानसभा, विधानपरिषदेच्या आमदारांशी, लोकप्रतिनिधींशी कसे वागतात याचा आपल्याला अनुभव आहे. "माय नेम इज खान आणि "राहुल गांधींची मुंबई भेट" या दोन प्रकरणामध्ये त्यांचा आपल्याला अनुभव आला आहे. माझ्या शिवसेना पक्षाच्या, भाजपच्या किंवा कॉग्रेस पक्षाच्या आमदारांची त्यांनी किंमत केली आहे. आपल्याला ज्या पध्दतीची वागणूक पोलिसांकडून दिली जाते त्याबाबत कुठेतरी आपला प्रोटोकॉल संभाळला गेला पाहिजे याची आपण नोंद घेतली पाहिजे. सभापती महोदय, 26.11 च्या मुंबईवरील हल्ल्यातील अतिरेकी कसाब आपल्या कस्टडीमध्ये आहे. परंतु त्या हल्ल्यामध्ये सामील असलेल्या 9 अतिरेक्यांची प्रेते आजही जे.जे. हॉस्पिटल आणि ग्रँट मेडिकल कॉलेजच्या शवागारामध्ये ठेवण्यात आली आहेत. त्या प्रेतांबरोबर इतरही लोकांची प्रेते ठेवण्यात आली आहेत. माझा आपल्याला प्रश्न आहे की, आपण त्याठिकाणी किती दिवस ही प्रेते ठेवणार आहात? माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी मघाशी सांगितले की, याबाबत आंतरराष्ट्रीय दबाव येत असला तरी या मृत अतिरेक्यांच्या प्रेताचे चोचले किती दिवस पुरविणार आहात याचे उत्तर मिळणे आवश्यक आहे. शास्त्रीय दृष्टया नियम असा आहे की, एकदा मृत व्यक्तीचे प्रेत शवागारामध्ये आणल्यानंतर त्याची 90 दिवसाच्या आत विल्हेवाट लावली पाहिजे. त्यानंतर कोणतेही प्रेत ठेवले जात नाही. परंतु आज सव्वा ते दीड वर्ष झाले असून अजूनपर्यंत ती प्रेते पडून आहेत. त्यांची विल्हेवाट कधी आणि केव्हा लावणार आहात?

सभापती महोदय, आपल्याकडे योजनांवर खर्च करण्यासाठी पैसे नसतांना आपण 1 कोटी रुपये कसाबच्या कोणत्या कामासाठी खर्च केले? जे.जे. हॉस्पिटलमध्ये कसाबसाठी बुलेटप्रुफ जेल वॉर्ड बांधण्यासाठी हे पैसे खर्च केले. एकीकडे ऑर्थर रोड जेलच्या ठिकाणी रस्ते बंद केल्यामुळे ट्रॅफिक जॅममुळे लोकांची फार गैरसोय होत आहे. आणि दुसऱ्या बाजूला जे.जे. हॉस्पिटलच्या पहिल्या मजल्यावर आपण बुलेट प्रुफ जेल वॉर्ड बांधीत आहात. तळमजल्यावर ऑप्थोमॅलॉजी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

डिपार्टमेंट आहे. उद्या जर त्या जे.जे. हॉस्पिटलच्या पूलावरुन कसाबला मारण्यासाठी कुणी तरी बॉम्ब टाकलातर त्यामध्ये कसाब मरणार नाही. कारण तो बुलेटप्रुफ जेल वॉर्डमध्ये आहे. परंतु गरीब बिच्चारे रुग्ण त्यामध्ये मरतील.

सभापती महोदय, यानिमित्ताने मला हे देखील सांगितले पाहिजे की, अतिरेक्यांना जात नसते, कोणत्याही धर्माचे असले तरी ते अतिरेकी आहेत. आपण एकीकडे कसाबचे लाड पुरविता तर मग साध्वी प्रज्ञासिंगला त्रास कां देता? याचा कुठेतरी अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. त्या साध्वीचा गुन्हा अजून शाबीत झालेला नसतांना तिला अतिरेक्यांची वागणूक दिली जात असेल तर आपले काहीही म्हणणे नाही. परंतु कसाबला बिर्याणी खायला देत असाल तर तिने काय गुन्हा केला आहे? तिला शाकाहारी बिर्याणी खायला द्या. तिचे हाल कां करता? तिला कसाबसारखी वागणूक कां देत नाही? या सरकारकडून स्त्री दाक्षिण्य अपेक्षित आहे. मघाशी आहार भत्त्याचा प्रश्न उपस्थित करण्यात आला.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

याठिकाणी पोलिसांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. पोलिसांना आहार भत्ता किती मिळतो हे आपण सांगू शकाल काय ? त्यांना किती पैसे मिळतात ? मग पोलीस हॉटेलवाल्यांना पॅकेट पाठवून दे असे का सांगणार नाहीत. अहो, तुम्हीच त्यांचे पोट भरण्यासाठी त्यांना वेळेवर पगार देत नाही, त्यांना बाकीच्या सुविधा देत नाही. मग ते एका हॉटेलच्या बाहेर गाडी उभी करताता आणि हॉटेलवाल्यांना सांगतात की,अरे, पॅकेट पाठवून दे.हे सगळे आपणच करीत आहोत की नाही. त्यांना अशा गोष्टी करण्यासाठी प्रोव्होक कोण करीत आहे ? जर शासनाने त्यांना व्यवस्थित पगार दिला, रजा दिली तर असे होणार नाही. तुम्ही त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. पोलीस हा देखील एक माणूस आहे. त्यालाही आपले कर्तव्य समजते. तुम्ही त्याच्याकडून 24-24 तास काम करुन घेता, त्याला रजा देत नाही. जरा कुठे काही झाले की पोलिसांना अलर्ट केले जाते आणि एका फोनमध्ये त्याच्या सर्व रजा रद्द केल्या जातात. त्यांना फॅमिली लाईफ नाही काय ? त्यांना त्यांच्या मुलांना शिकवावयाचे नाही काय ? मग या सर्व गोष्टींमुळे तो बाकीच्या लोकांना छळतो आणि त्याचा राग इतरांच्या पाठिच्या वळावरुन दिसतो. म्हणून माझी मागणी आहे की, पोलिसांना देखील माणसासारखे वागावावे. त्याला मन आहे, त्याच्या घरी कुटुंब आहे. तो देखील आपल्यासारखाच आहे.तो काही यांत्रिक मानव नाही.त्यामुळे त्यांच्या भावनाचीही कदर करा. तसेच ज्याप्रमाणे इतरांना आरक्षण दिले जाते, स्वातंत्र्य सैनिकांना आरक्षण दिले जाते त्याप्रमाणे पोलिसांची मुले शिकण्यायोग्य असतील तर त्यांच्यासाठी देखील उच्च शिक्षणामध्ये आरक्षण ठेवण्यात यावे,जेणेकरुन त्यांची मुले चांगल्या प्रकारे शिक्षण घेऊ शकतील अशी मी या प्रस्तावा वरील चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

-----

. . . .4 डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांचे भाषण झाल्यानंतर आता सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनाही भाषण करण्याची संधी द्यावी असे संकेत आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी संकेताच्या बाबतीत जे म्हणणे मांडलेले आहे, ते बरोबर आहे आणि आपल्याला जरुर उद्यापासून हे संकेत पाळावयाचे आहेत. आता सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी भाषणास सुरुवात करावी.

----

. . . .4 डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय,सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर,सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आज "लोकमत" या वर्तमानपत्रामध्ये जी बातमी आलेली आहे, ती अत्यंत दुर्दैवी आहे. त्यामध्ये म्हटलेले आहे की, पोलिसांना यंदाही बुलेटप्रुफ जॅकेट उपलब्ध होणार नाही. वर्तमानपत्रामध्ये याबाबतीत छोटीशी बातमी आलेली आहे, ती मी वाचून दाखवतो आणि माननीय गृहमंत्र्यांकडून अपेक्षा व्यक्त करतो की, ते याबाबतीत नक्की उत्तर देतील. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की,"यावर्षी पोलिसांना अद्ययावत बुलेटप्रुफ जॅकेट व हेलमेट मिळत नसल्याचे स्पष्ट झाले आहे.खरेदी करावयाचे जॅकेट व हेलमेटचे वजन आणि दर्जा अद्याप निश्चित केला नसल्याने, त्याच्या खरेदीची प्रक्रिया आणखी वर्षभर चालणार आहे. त्यासाठी ग्लोबल ट्रेडींग पध्दत राबविण्यात येणार असल्याची माहिती गृह विभागाच्या सूत्रांनी दिली आहे.मुंबईतील दहशतवाद्यांच्या हल्ल्यानंतर राज्य सरकारने पोलिसांच्या सक्षमीकरणासाठी 126 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मात्र आर्थिक वर्ष संपत आले तरी त्यातील निम्मी खरेदीही अद्याप झालेला नाही, तसेच याची खरेदी प्रक्रिया सुरु झालेली नाही. बुलेटप्रुफ जॅकेट व हेलमेटच्या खरेदीसाठी गेल्या वर्षभरात स्वतंत्रपणे चार वेळा टेंडर काढण्यात आले. त्यासाठी ठराविक 7 ते 8 उत्पादक कंपन्यांनी निविदा भरल्या होत्या.परंतु त्या कंपन्यांचे जॅकेट हे चंदिगड येथील ग्वाल्हेर येथील टेस्टींग ब्लस्टींग रिसर्च लॅबमध्ये दर्जेदार असल्याचे सिध्द न झाल्याने खरेदीची प्रक्रिया थांबविण्यात आलेली आहे." आपण वारंवार सदनामध्ये सांगतो की, पोलिसांना जे साहित्य मिळावयास पाहिजे, ते दुर्दैवाने मिळत नाही ही शोकांतिका आहे. म्हणून याबाबतीत वर्तमानपत्रात पहिल्या पानावर अगदी कोपऱ्यामध्ये ही बातमी छापण्यात आलेली आहे. विधानसभा सुरु असताना विभागातर्फे अशा प्रकारची बातमी प्रकाशित होणे ही गोष्ट अत्यंत दु:खदायक आहे. शेवटी हा महाराष्ट्र राज्याच्या सुरक्षेचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, 26-11 च्या घटनेचा शेवट झालेला नाही, अजूनपर्यंत कसाबला फाशी झालेली नाही. परंतु आपल्या राज्याचे माननीय मुख्यमंत्री, माननीय गृहमंत्री, श्री.अनामी रॉय हे "माय नेम इज खान" हा सिनेमा पहाण्यासाठी गेले होते. 26-11 च्या घटनेच्या संबंधात कोर्टाचा निकाल येण्यापूर्वी राज्यामध्ये लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका झाल्या आणि माजी माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख हे केंद्र शासनामध्ये प्रस्थापित झाले. माननीय गृहमंत्री परत आले.

. . . .4 डी-4

श्री.अनामी रॉय पोलीस विभागामध्ये वरिष्ठ पदावर कार्यरत आहेत, म्हणज हा 26-11 च्या घटनेचा न्याय आहे काय ? कायदा व सुव्यवस्था संभाळणाऱ्यांसाठी पुन्हा त्याच घटनेची पुनरावृत्ती होईल काय ? हा खरा प्रश्न आहे. राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था ठेवत असताना, अधिवेशन सुरु असताना गोंदिया जिल्ह्यात 4 ट्रक चोरीला गेले आहेत, ते गहाळ झालेले आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ KGS/ प्रथम सौ. रणदिवे....... 19:35

श्री. केशवराव मानकर....

ज्यांनी ज्यांनी खासगी कंपन्याकडून कर्ज घेऊन ट्रक घेतले होते ते ट्रक चोरीला गेलेले आहेत. या घटना अधिवेशन काळामध्ये झालेल्या आहेत म्हणून मी माननीय गृहमंत्र्यांना विनंती करतो की, नक्षलग्रस्त असलेला असा हा गोंदिया जिल्हा आहे. या जिल्हयामध्ये त्यांचे एक रॅकेट आहे. त्या रॅकेटचा तपास लावण्याची गरज आहे. याबाबतीत आंतरराष्ट्रीय टोळया कार्यरत आहेत अशा प्रकारच्या बातम्या आहेत. जबलपूर, बिहार, उत्तरप्रदेश याठिकाणी ट्रक नेऊन त्याचे सर्व पार्ट्स वेगवेगळे करुन विकले जात आहेत अशी दुर्दैवी घटना आमच्या गोंदिया जिल्हयात घडलेली आहे. म्हणून माननीय गृह मंत्र्यांना मी विनंती करतो की, यासंदर्भात चौकशी करुन तात्काळ निर्णय करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, यासंदर्भात मी एक लक्षवेधी सूचना दिलेली आहे. आज वेळ कमी असल्यामुळे मी त्यावर जास्त बोलणार नाही. पण हा जिल्हा नक्षलवादी असून या ठिकाणी ट्रक चोरीला जातात ही खेदाची बाब आहे.

सभापती महोदय, वाहतुकीच्या संबंधात काळया-पिवळया या प्रवाशी वाहनांच्या संबंधात आमच्या जिल्हयामध्ये दुर्घटनेच्या अनेक घटना झालेल्या आहेत. सरकारने त्या प्रवाशी वाहनांना लायसन्स दिलेले आहेत, परवाने दिलेले आहेत. या प्रवाशी वाहनांच्या दुर्घटनेत अनेक लोकांचे हात-पाय तुटले आहेत तर अनेक लोक मृत्यू पावलेले आहेत पण या वाहनांवर कुठलेही निर्बंध नाहीत. पोलिसांना याबाबतीत अधिकार दिलेले आहेत पण या वाहनांमध्ये क्षमतेपक्षा जास्त प्रवाशी घेतले जातात. सभापती महोदय, आश्चर्याची गोष्ट म्हणजे 10 प्रवासी वाहन क्षमता असलेल्या या वाहनामध्ये 25-25 प्रवासी बसविले जातात त्यामुळे अनेक दुर्घटना घडतात यासंबंधात शासन कुठलाही निर्णय घेत नाही ही खेदाची बाब आहे.

सभापती महोदय,सार्वजनिक जीवनावश्यक वस्तुंच्या प्रश्नावर बोलू इच्छितो.गरीब माणसाला मिळणाऱ्या मातीतेलाचा आज सर्रासपणे वाहनामध्ये वापर केला जात आहे. परंतु मी अमरावतीच्या एस.पीं.चे अभिनदन करेन . खऱ्या अर्थाने कायदा व सुव्यस्था कोणी ठेवली असेल तर ती अमरावतीच्या एस.पी.ने ठेवलेली आहे. आज या ठिकणी मातीतेलाचे हॉकर्स गल्लीबोळात जातात त्यामुळे गरीब माणसाला मातीतेल मिळते पण अन्य जिल्हयामध्ये गरीब माणसाला हे मातीतेल का मिळत नाही हे मला कळत नाही. केंद्र शासन यासाठी करोडो रुपयाची सबसिडी देते आहे. हे तेल प्रत्यक्षात स्वंपाकासाठी, दिव्यासाठी वापरले गेले पाहिजे पण त्यासाठी ते वापरले न जाता सर्रास

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर....

ट्रॅक्टर आणि या काळया-पिवळया वाहनांमध्ये आणि ट्रकमध्ये वापरले जाते त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलवर जो 25 टक्के महसूल मिळावयास पाहिजे तो मिळत नाही. उलट सबसिडीचा पैसा खर्च होते म्हणून कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत पोलीस विभागाने यावर निर्बंध घालण्याची आवश्यकता आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये यासंबंधीची यंत्रणा करणे आवश्यक आहे. सभापती महोदय,अनेक प्रश्न मला याठिकाणी मांडावयचे आहेत पण वेळे अभावी मला ते मांडता येत नाहीत. पण नक्षलवाद्याच्या प्रश्नावर याठिकाणी चर्चा करण्यात येणार आहे त्यावेळी मला वेळ देण्यात यावा, अशी विनंती आहे.

सभापती महोदय, मी याठिकाणी पोलीस विभागाच्या संदर्भात एक तारांकित प्रश्न दिलेला होता. तसेच 'गो'हत्येच्या संदर्भात नियम 93 अन्वयेच्या सूचनेला अनुलक्षून सभापती महोदय, आपण जे निर्देश दिलेले आहेत त्याबाबतीत तत्कालीन गृहराज्यमंत्री श्री. नितीन राऊत यांनी आश्वासन दिले होते की, गोहत्येच्या संदर्भात शिवसेनेच्या, विश्वहिंदूपरिषदेच्या, मनसेच्या, तसेच भाजपाच्या आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांवर ज्या कसेस आहेत त्या केसेस परत घेण्यात येतील. पण पोलिसांच्या निष्काळजीपणाने एक वर्षापासून तो अहवाल आलेला नाही आणि त्या केसेस परत घेण्यात आलेल्या नाहीत. सभापती महोदय, यासंदर्भात आश्वासन देण्यात आलेले होते. ही 'गो'हत्या थांबवू असे म्हटले होते. ट्रकमधून नेण्यात येणाऱ्या जनावरांच्या बाबतीत निर्बंध घालण्यात आलेले आहेत. पण यासंदर्भातील कुठल्याही प्रकारच्या कार्यवाहीमध्ये यश प्राप्त झालेले नाही. म्हणून या राज्याची कायदा व सुव्यवस्था अत्यंत विष्कळीत झालेली आहे. सभापती महोदय, मी याठिकाणी मांडलेल्या सर्व मुद्यांचे निराकरण व्हावे अशी अपेक्षा करुन वेळ कमी असल्यामुळे मी येथेच थांबतो. जय विदर्भ. जय महाराष्ट्र.

----

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव सभागृहात मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. या देशात जेवढी राज्ये आहेत त्या सर्व राज्यांमधील कायदा व सुव्यवस्थेपेक्षा महाराष्ट्राची कायदा व सुव्यवस्था निश्चितपणे सरस आहे. हा देश आणि संपूर्ण जग आज हिंसेच्या उंबरठ्यावर उभे आहे. साथीचे रोग आणि अतिरेकी या दोघांचाही संपूर्ण जगाला धोका आहे. साथीचा रोग कधी उद्‌भवेल आणि अतिरेकी कधी थैमान घालतील याचा नेम नाही. त्यामुळे या दोन्ही बाबतीत एकच उपाययोजना करावी लागेल आणि ती अशी की, साथीचा रोग येऊ नये म्हणून प्रयत्नशील राहणे आणि अतिरेकी येऊ नयेत म्हणून पूर्व काळजी घेणे. या दोन गोष्टी शासनाला या निमित्ताने करता येऊ शकतात.

सभापती महोदय, महाराष्ट्र हे प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणारे राज्य आहे. या राज्याच्या लोकांचे दरडोई उत्पन्न 1 लाख रुपयांपर्यंत वाढवू असा संकल्प शासनाने सोडलेला आहे. माझी राज्य शासनाला विनंती आहे की, आपण अधिक काळजी घेण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने राज्य शासनाने निश्चितपणे प्रयत्नशील राहावे. तुकाराम ओंबळे सारखे हजारो सैनिक आणि शिपाई या पोलीस खात्यामध्ये आहेत. माझी राज्य शासनाला विनंती राहील की, अशा कर्तव्यनिष्ठ पोलिसांना जर आपण संधी दिली तर त्या संधीचे सोने करण्याची क्षमता त्यांच्या अंगामध्ये निश्चितपणे आहे. त्यादृष्टीने राज्य शासनाने प्रयत्नशील राहावे अशी मी विनंती करणार आहे. आमचे माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील हे अतिशय निगर्वी आहेत. नि:स्वार्थी आहेत तसेच निष्कलंक आहेत. त्यांनी या खात्यामध्ये पारदर्शकता आणलेली आहे. नागपूरच्या अधिवेशनामध्ये नव्याने नियुक्त झालेल्या काही महिला पोलीस अधिकाऱ्यांना तसेच काही पुरुष अधिकाऱ्यांना मी भेटलो आणि त्यांना विचारले की, आपण पी.एस.आय.झाला आहात त्यासाठी आपल्याला काही द्यावे लागले काय ? त्या पोलीस अधिकाऱ्यांनी डोळ्यामध्ये पाणी आणून सांगितले की, मला पोलीस खात्यामध्ये एक नया पैसाही द्यावा लागला नाही. अतिशय पारदर्शकतेने या पोलीस खात्यामध्ये आम्हाला नोकरी मिळाली आणि त्याचे सर्व श्रेय माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील यांना जाते. आमच्या राज्यमंत्र्यांचा कारभार सुध्दा पारदर्शक आहे. त्यांना मी मनापासून धन्यवाद देतो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

प्रा. सुरेश नवले ....

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये अनेक प्रकारची आंदोलने होत असताना काही आंदोलने कल्पक असतात तर काही आंदोलने सवंग लोकप्रियतेसाठी निर्माण केलेली असतात. मध्यंतरी एक आंदोलन झाले. मुंडन करुन डोक्यावरील सगळे केस पोस्टामार्फत माननीय मुख्यमंत्र्यांना पाठविले. त्या केसांचे माननीय मुख्यमंत्र्यांनी काय करावयाचे ? त्या आंदोलकांनी कोणत्या प्रकारचे आंदोलन करावयाचे, कसे करावयाचे हा त्यांचा अधिकार आहे पण ही केस वेगळी आहे. तिरुपती बालाजीला केस कापतात. त्या ठिकाणी केस कापले असते तर निश्तिचपणे त्याचा उपयोग झाला असता. सभापती महोदय, आमच्या ग्रामीण भागामध्ये महिलांचे जे केस गळतात ते वाड्याच्या फटीत किंवा भिंतीच्या फटीत ठेवतात आणि बाजाराच्या दिवशी जेव्हा गारेगारवाला किंवा आईस्क्रीमवाला येतो तो ते केस घेतो आणि त्याच्या मोबदल्यात आईस्क्रीम किंवा गारेगार देतो. परंतु या आंदोलकाने माननीय मुख्यमंत्र्यांना केस पाठविल्यानंतर त्यांची काय अपेक्षा होती ? आंदोलन कसे करावयाचे यालाही काही अर्थ आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

मी श्री.राहुल गांधी यांच्याबद्दल उद्‌गार काढले होते. मी त्यावेळी असे म्हणालो होतो की, श्री.राहुल गांधी येथे आले आणि तुमच्या डोक्यावर पाय ठेवून निघून गेले. मराठीमध्ये अनेक म्हणी आहेत. जशी हातावर तुरी देणे अशी एक म्हण आहे. छत्रपती शिवाजी महाराज औरंगजेबच्या हातावर तुरी देऊन परत आले. या म्हणीचा उपयोग केला असेल तर त्यामध्ये अप्रस्तुत, अनाठायी असे काही नाही. कसले गुडघे टेकले, कोणासमोर टेकले ? तुम्ही हिंदुत्वाकडून मानवतेकडे गेलात असा माझ्‌ यावर आक्षेप आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताईंचा आदर्श माझ्या डोळयासमोर आहे. ताईंचा असा आदर्श आहे की, त्या मानवतेकडून हिंदुत्वाकडे गेल्या आहेत. मी हिंदुत्वाकडून मानवतेकडे आलो आहे. ज्ञानेश्वर माऊलींचे पसायदान माझ्या डोळयासमोर आहे. दुरितांचे तिमीर जावो, विश्व स्वधर्म सूर्ये पाहो, जो जे वांच्छील तो ते लाहो प्राणी जात. ताई, आपलाच आदर्श आहे. मी पक्षांतर केले असले तरी चांगल्याच गोष्टींसाठी केलेले आहे. स्वामी विवेकानंदांनी अमेरिकेमध्ये सर्व धर्म परिषद गाजवली आणि मानवतेची पूजा केली. आम्ही कॉँग्रेसमध्ये मानवतेची पूजा करण्यासाठी आलो. आपण सांगितले होते की, श्री.राहुल गांधींना पाय ठेवू देणार नाही. आपला गनिमी कावा होता असा पोलीस यंत्रणेकडे रिपोर्ट आहे. त्यामुळे श्री.राहुल गांधी मुंबईत आले आणि त्यांचे जे कार्यक्रम होते ते करुन गेले. तुमचे हे शल्य आणि दु:ख आहे. श्री.राहुल गांधी हे येथे येऊन दिल्लीला निर्विवादपणे गेले हे तुमचे दु:ख आहे. (अडथळा) गांधी कुटुंबांनी या देशासाठी बलिदान दिलेले आहे. महात्मा गांधींनी बलिदान दिले, राजीव गांधींनी बलिदान दिले आणि इंदिरा गांधींनी बलिदान दिले. परंतु आपल्याकडे बलिदान देण्याची क्षमता असणारा एकही नेता नाही. याचे दु:ख तुम्हाला आहे.

सभापती महोदय, संयुक्त राष्ट्राच्या निर्बंधानुसार 1 लाख लोकसंख्येमागे 222 पोलीस असावेत अशी अपेक्षा आहे. मला वाटते की, त्यादृष्टीकोनातून महाराष्ट्र शासनाने पोलिसांची भरती करण्यासाठी प्रयत्न करावेत. कारण राज्यातील पोलिसांची संख्या आजही कमी आहे. पोलिसांचे मनुष्यबळ वाढविले तर सध्या कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचा-यांवरील कामाचा ताण कमी होईल. त्यांच्यावरील ताण कमी झाला तर त्याचा चांगला परिणाम दिसेल. परंतु काही वेळेला

2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

प्रा.सुरेश नवले....

आंदोलनकर्त्यांवर पोलिसांकडून लाठीमार केला जातो, कोणाला चांगली वागणूक मिळत नाही हा त्याचा परिणाम आहे. हा ताण कमी करण्यासाठी शासनाने प्रयत्न केला तर त्याचा निश्चितपणे फायदा होईल. सभापती महोदय, पोलीस दलामध्ये महिलांची मोठया प्रमाणावर भरती होत आहे. अनेक महिला पोलीस अधिकारी आहेत. या महिला अधिका-यांचे काही पुरुष अधिकारी शोषण करीत आहेत अशी कुजबूज आहे, तक्रार आहे. त्यासंबंधी सन्माननीय गृहमंत्र्यांनी लक्ष द्यावे आणि महिला पोलीस अधिका-यांची प्रतिष्ठा वाढण्यासाठी प्रयत्न करावेत. मुंबई, पुणे आणि राज्यातील विविध भागामध्ये लहान लहान मुलांकडून भीक मागण्याचे काम करवून घेतले जाते. त्यांचे आर्थिक, मानसिक शोषण केले जाते. स्लमडॉग मिलेनियम या चित्रपटामध्ये लहान मुलाचे चित्रीकरण केलेले आहे. त्या चित्रपटाला ऑस्कर पुरस्कार मिळाला आहे. आमच्या समाजातील विदारक चित्राबाबत ऑस्कर पुरस्कार मिळत असेल तर हे विदारक चित्र सुधारण्यासाठी शासनाने निश्चितपणे प्रयत्न केले पाहिजेत. अशा परिस्थितीचा बाजार मांडण्याचा काही लोक प्रयत्न करीत असतील तर या लोकांना गजाआड केले पाहिजे अशी मी विनंती करणार आहे.

सभापती महोदय, कर्नाटक राज्यामध्ये होमगार्डस् आहेत.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. सुरेश नवले....

त्या होमगार्डस्ना त्या राज्य शासनाने कायमस्वरुपी सेवेमध्ये सामावून घेतलेले आहे. माझी राज्य शासनाला विनंती आहे की, महाराष्ट्रातील होमगार्ड्सना सुध्दा पोलीस दलामध्ये सामावून घ्यावे. आज 5 टक्के होमगार्डस्ना पोलीस दलामध्ये सामावून घेतले जाते. परंतु हे प्रमाण 25 टक्क्यापर्यन्त वाढविले तर त्यांना ख-या अर्थाने न्याय मिळाल्या शिवाय राहाणार नाही. महाराष्ट्रातील काही खेळाडूंसाठी पोलीस खात्यामध्ये राखीव जागा ठेवून त्यांना पोलीस दलामध्ये सामावून घ्यावे अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो. महाराष्ट्रामध्ये कबड्डी, खो-खो असे देशी खेळ खेळणारे 25 टक्के खेळाडू पोलीस खात्यामध्ये भरती केले तर सेवानिवृत्त होईपर्यन्त ते शारीरिकदृष्ट्या सक्षम राहातील, काटक राहातील आणि त्यामुळे पोलीस दलाची प्रतिमा उज्ज्वल करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहातील, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. राज्य शासनाच्या कणखरपणाचे दोन प्रसंग माझ्या निदर्शनास आले. "माय नेम इज खान" हा चित्रपट प्रदर्शित करण्याच्या वेळी आणि राहुल गांधी जेव्हा मुंबईत आले त्यावेळी राज्य शासनाने चांगली कामगिरी केली, कायदा आणि सुव्यवस्था चांगल्या प्रकारे राखली. त्याबद्दल मी राज्य शासनाला मनापासून धन्यवाद देतो. या राज्यामध्ये गुंडगिरीच्या बळावर लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रयत्न काही शक्ती करत असतील तर त्यांचा आम्ही मुलाहिजा ठेवणार नाही, या देशामध्ये आणि राज्यामध्ये विष पेरण्याचे काम कोणी करत असतील तर त्यांचाही मुलाहिजा आम्ही ठेवणार नाही. त्यांचा विरोध ठोकरुन या राज्यामध्ये शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे काम राज्य शासन करील अशी खात्री महाराष्ट्रातील जनतेला दिलेली आहे त्याबद्दल मी राज्य शासनाचे मनापासून आभार मानतो. अशा पध्दतीने लोकशाही मार्गाने राज्य शासन कठोरपणे वागले तर मला खात्री आहे की, महाराष्ट्रातील जनता आणखी पुढील पाच वर्षे आपल्या सोबत राहील एवढे बोलून आणि या चर्चेमध्ये सहभागी होण्याची संधी दिल्याबद्दल सभापती महोदय, आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

---

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भातील चर्चा आपण नेहमी करीत असतो. परंतु आज सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विस्ताराने हा प्रश्न मांडलेला असल्यामुळे मी काही महत्वाच्या प्रश्नावर बोलणार आहे.

सभापती महोदय, मुंबईतील कायदा आणि सुव्यवस्थेसंबंधी मी प्रामुख्याने बोलत आहे. या ठिकाणी दहशतवादी हल्ल्यावर चर्चा झाली, पोलिसांच्या गुंडगिरीवर चर्चा झाली, पोलिसांच्या सामाजिक प्रश्नावर चर्चा झाली. परंतु सर्वात महत्वाचा प्रश्न हा आहे की, हे पोलीस दल सक्षम बनविण्यासाठी आपण कोणती उपाययोजना करणार आहात ? पोलिस खात्याला निधी उपलब्ध करुन दिला, पोलिसांना बुलेटप्रूफ जॅकेट दिले, अद्ययावत यंत्रसामग्री दिली, चांगली शस्त्रास्त्रे दिली. परंतु सर्वात महत्वाची कोणती गोष्ट करणे आवश्यक असेल तर पोलिसांचे तुटलेले मनोबल मजबूत करणे ही होय. पोलिस दलाचे दोन तुकडे पडलेले आहेत. अर्ध्या पोलिसांना वाटते की, आपण कशासाठी काम करीत आहोत ? काम करुन काय मिळणार आहे ? अर्ध्या पोलिसांना वाटते की, आपण जेवढा काळ आहोत तेवढा काळ कमावून घेऊ, पोलीस दलाबाहेर गेल्यानंतर आपल्याकडे हे शासन बघणार नाही, कुत्रा देखील बघणार नाही.

....नंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब......

त्यामुळे पोलीस दल दोन गटामध्ये, दोन तटामध्ये विभागले गेले आहे. एक दल जो दिवसभर काम करतो, कष्ट करतो आणि लोकांच्या सुरक्षिततेसाठी स्वत:च्या प्राणाची बाजी लावतो. त्यांच्याकडे कोणी पहात नाही. दुसरे पोलीस दलातील अधिकारी सकाळी दुकान उघडल्याप्रमाणे सकाळी कार्यालयात येतात, अगरबत्ती लावतात, संध्याकाळी गल्ला 25-50 जमा होतो की नाही हे बघतात आणि निघून जातात. खरे म्हणजे पोलीस दल सक्षम करावयाचे असेल तर त्यांचे मानसिक बल वाढविले पाहिजे, मानसिक बल मजबूत केले पाहिजे. सगळ्या उपाययोजना केल्या तरी जोपर्यंत त्यांचे मनोधैर्य मजबूत होत नाही, त्यांच्या हे लक्षात येत नाही की शासन आमच्या पाठीशी मजबूतपणे उभे आहे, प्रत्येक गरजांकडे, प्रत्येक गोष्टीकडे शासन बघत आहे हे जोपर्यंत त्यांच्या लक्षात येत नाही तोपर्यंत पोलीस तुमच्यासाठी लढतील यावर आमचा विश्वास नाही.

सभापती महोदय, सायन प्रतिक्षानगर येथे 620 घरे पोलिसांसाठी देण्याचे शासनाने जाहीर केले. पोलिसांनी आयुष्यभर कष्ट केले, स्वत:चे घर मिळावे यासाठी कर्ज काढले. पोलीस आयुक्तांनी नावे मागविल्यानंतर त्यांनी आयुक्त कार्यालयात आपले नाव नोंदविले. पैशाची जमवाजमव केली. ज्यावेळी पोलीस आयुक्त कार्यालयात त्यांनी विचारणा केली की, पैसे कुठे भरायचे त्यावेळी फक्त 300 घरे ही पोलीस सेवा निवासस्थाने म्हणून वितरीत केली. उर्वरित घरे दुसऱ्यांना देण्यात आली. ही अतिशय छोटी गोष्ट होती. परंतु आज पोलिसांना रहावयास स्वत:चे घर नाही. पोलीस क्वार्टर्समध्ये जे आज रहात आहेत त्या संदर्भात सन्माननीय गृहराज्यमंत्री यांनी माझ्याबरोबर यावे. 180 चौ.फुटाच्या घरामध्ये सात-सात, आठ-आठ लोक कसे रहात आहेत ते मी दाखवून देतो. ते तुमची सेवा करणार, दिवसभर काम करणार, रात्री टेकायला घरी जाणार. त्यांच्या घरातील स्वच्छतागृहे बघा. किती घाणेरडी आहेत. अशा तुटलेल्या मनस्थितीत काय त्यांच्याकडून अपेक्षा करता? सभापती महोदय, पोलीस दलातील अधिकाऱ्यांची मी नावे देतो. मुंबईमध्ये त्यांचे स्वत:च्या मालकीचे 20-20 फ्लॅट आहेत. घरात माणसे पाच नसतील परंतु 20-20 फ्लॅट आहेत. दुसऱ्या बाजूला पोलीस दलातील कणा समजले जाणारे जे शिपाई आहेत त्यांच्या कुटुंबातील दहा-दहा माणसे 180 चौ.फुटाच्या घरात रहात आहेत. आम्ही सातत्याने शासनाकडे मागणी करीत आहोत की, पोलीस कर्मचाऱ्यांना मुंबई शहरामध्ये घरे उपलब्ध करुन द्या. 25-30 वर्षे शासनाची इमानेइतबारे सेवा करतात, सातत्याने तुमच्या मागेपुढे असतात,त्यांच्यासाठी तुमच्याकडे वेळ नाही, त्यांच्यासाठी तुमच्याकडे पैसा नाही,मात्र शासन पोलीस



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब......

दलाचा परफॉर्मन्स चांगला पाहिजे अशी अपेक्षा करते. हे शक्य आहे का? अजिबात शक्य नाही. त्यामुळे पोलिसांची मानसिकता अशी होते की, सेवेत आहोत तोपर्यंत कमावता येतील तेवढे पैसे कमवून घ्यायचे. पैसा कमावला नाही तर उद्या माझ्या मुलांना रहायला घर नाही, उद्या पोलीस सेवेत माझ्या मुलाला सामावून घेतील की नाही अशी त्यांना साधार भीती वाटते. अनुकंपा तत्वावर तरतूद केलेली असली तरी आता तसे होण्याची शक्यता नाही. पोलीस दलामध्ये नोकरी पाहिजे असेल तर रेटकार्ड ठरले आहे. खरोखर सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या कार्यकाळात पोलीस भरतीसाठी कदाचित पैसे द्यावे लागत नसतील. परंतु मी खात्रीलायक सांगू इच्छितो की, पोलीस दलामध्ये रेटकार्ड लावले आहे. कोणत्या पोलीस स्टेशनला काय रेट, कोणत्या भरतीचा काय रेट हे ठरलेले आहे. या राज्यातील पोलीस खात्यामध्ये दलाली अजूनही सुरु आहे. पोलीस स्टेशनअंतर्गत ट्रान्सफरसाठी किती पैसे द्यावे लागतात हे सर्वांना माहित आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी दलालांच्या संदर्भात माहिती दिली आहे. मी सांगतो, कोणते दलाल पोलीस अधिकाऱ्यांच्या आसपास राजरोस फिरत असतात. त्यांचे काम अव्याहतपणे सुरु आहे. सन्माननीय गृहमंत्र्यांनी त्या विरोधात जरब दाखविण्याची, ताकद दाखविण्याची गरज आहे. शासनाने प्रथम आपली प्रायॉरिटी निश्चित करावी. लोकांची सुरक्षितता ही प्रायॉरिटी असली पाहिजे. शासनाची प्रायॉरिटी ही राहुल गांधी, माय नेम इज खान यांना संरक्षण देण्याची आहे. ही प्रायॉरिटी चुकल्यामुळे लोकांना आपले प्राण गमवावे लागत आहेत. मी स्वत: शिवसेना पक्षाचा कार्यकर्ता म्हणून आंदोलनामध्ये सहभागी झालो तेव्हा मला पकडायला 50 पोलीस तैनात केले गेले. ही शासनाची प्रायॉरिटी. एका कार्यकर्त्याला पकडण्यासाठी 50 पोलीस पाठविता. मी विचारले, एवढे पोलीस मला पकडायला? ते म्हणाले, हो. तुम्हाला ताब्यात घेणे अशी पोलीस आयुक्तांची ऑर्डर आहे. 151 कलमाखाली मला अटक करण्याचे आदेश दिले गेले. हे 151 कलम कोणाला लावले जाते? जे समाजविघातक आहेत, अँटी सोशल एलिमेंट्स आहेत त्यांच्याविरुध्द हे कलम लावले जाते. परंतु शासन आमदारांना 151 कलम लावते. त्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये डायरी करण्यात आली. बांद्रा पोलीस स्टेशन अंतर्गत कलम 151 खाली अटक करण्यात येत आहे. त्याच्या पुढे लिहिले की, आमदार असल्यामुळे सोडून देण्यात येत आहे. पुढे लिहिले आहे की, पोलीस आयुक्तांचे आदेश असल्यामुळे तुम्हाला परत अटक करण्यात येत आहे.

नंतर 4जे.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब .......

एक सी.पी., त्यांची प्रॅयॉरिटी एका कार्यकर्त्याला पकडण्याची ? सी.पी. नी पोलीस प्रोटेक्शनसाठी कुठे जावे याचे नॉर्म्स आहेत. एखादी मोठी घटना असेल किंवा मोठे संकट येणार असेल अशा ठिकाणी सी.पी. नी जावे असे तयात म्हटले आहे. एक खासदार, ज्याच्याकडे खासदारकीचे एकच पद आहे, अशा खासदाराच्या संरक्षणासाठी सी.पी. नी जावे ? तसे पाहिले तर मुंबईत बरेच खासदार फिरत असतात. ठीक आहे आपल्या पक्षाचे राहुल गांधी महासचिव असतील परंतु त्यांच्या संरक्षणासाठी सी.पी. नी जावे ? त्याबद्दलही आमचे म्हणणे नाही. परंतु आमच्या शिवसैनिकांना, 2200 लोकांना अटक केली, त्यांना 151 खाली अटक करण्यात आले होते. असा काय गुन्हा होता या कार्यकर्त्यांचा की त्यांच्यावर 151 च्या केसेस दाखल केल्या ? प्रिव्हेंटिव्ह ॲक्ट कोणाला लावावयाचा त्याचे नॉर्म्स आहेत. ते न पाळता जे मिळतील त्यांना अटक करावयाचे हेच पोलिसांनी केले. कोणाला या कायद्याअंतर्गत पकडले जाते, कोणाला पकडले पाहिजे या सर्व गोष्टी नॉर्म्समध्ये दिलेल्या आहेत. शासनाची वेगवेगळी सर्क्युलर्स सुध्दा माझ्याकडे आहेत. या राज्यात परप्रांतीय नागरिक येतात, राहतात व त्यामुळे मुंबईच एक प्रकारे बकाल होत चालली आहे, त्याला हे परप्रांतीय कारणीभूत ठरली आहेत, अशी चर्चा आपण सभागृहात नेहमीच करीत असतो. असे लोक झोपडपट्टयांमध्ये राहतात आणि त्यामुळे झोपडपट्टीची संख्या वाढत आहे. पर्यायाने झोपडी गुंडांची देखील संख्या वाढत चालली आहे. शासनाने एमपीडीए कायदा केला परंतु शासनाने मला सांगावे की, गेल्या दोन वर्षात झोपड्या बांधल्या म्हणून किती लोकांना अटक केली ? सदाशिव पाटील नावाचे संपूर्ण नगरच एक कॉर्पोरेशनचा वॉर्ड म्हणून वसविला आणि तो वसविणाऱ्या झोपडी दादांपैकी किती लोकांना हा कायदा लावला याचेही उत्तर चर्चेच्या निमित्ताने मिळाले पाहिजे. अशा एक नव्हे तर हजारो गोष्टी सांगता येतील परंतु सन्माननीय सदस्यांनी अनेक मुद्दे उपस्थित केल्यामुळे त्यांची पुनरावृत्ती मी करणार नाही. मी या निमित्ताने एवढेच सांगणार आहे की, माननीय गृहमंत्र्यांनी याच सभागृहात व सभागृहाच्या बाहेर सुध्दा असे स्टेटमेंट केले होते की मुंबईतील संपूर्ण डान्स बार शासनाने बंद केले. तसेच ते असेही म्हणाले होते की, यापुढे जे डान्स बार चालू दिसतील त्या भागातील सिनियर पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई करु. शासनाने हा निर्णय घेतल्यानंतर देखील आजही जे डान्स बार चालू आहेत त्यांची यादी मी सभागृहाला

ॲड. अनिल परब ......

वाचून दाखवितो ते मंत्री महोदयांनी लिहून घ्यावी. त्यात मुंबईत चेंबूर येथील "गुरुदेव", गोरेगांव लिंक येथील "कांचा स्नेहा" "ओमाप पॅलेस", मुलुंड, "इंडियाना" ताडदेव, "भावना" सायन, "मानसी" पार्ले, "टाका" मालाड, "साईराज" भायखळा हे डान्स बार रात्री आठ वाजेनंतर सुरु होतात. त्यानंतर मोठ्या मुंबईतील डान्स बार तर अडीच लाख रुपये दर महिन्याला पोलीस स्टेशनला देतात. त्यात "बुलबुल" हा डान्स बार तर संपूर्ण रात्रभर चालू असतो. "टोपाझ" ग्रँट रोड, "कॉर्निव्हल" वरळी, "रत्ना पार्क" अंधेरी, "एम टू यू" दहिसर अशा काही बारच्या पुढे तर पोलिसांच्या गाड्या लागलेल्या असतात आणि पाठीमागून बारमध्ये एंट्री असते, ही पोलिसांची प्रॅयॉरिटी ? या प्रॅयॉरिटीमध्ये पोलीस काम करीत आहेत ? ही प्रॅयॉरिटी पोलिसांची असेल तर कसे संरक्षण करणार मुंबईतील लोकांचे ? आम्ही शिवसैनिकांनी आंदोलन केले त्यावेळेस मी जॉइंट सी.पी. शी बोलत होतो त्यावेळेस मी त्यांना सांगितले की, या देशात पंतप्रधानांना सुध्दा काळे झेंडे दाखविले गेलेत. आम्हाला आमच्या साहेबांनी आदेश दिला म्हणून आम्ही काळे झेंडे दाखवू, आम्हाला एक जागा द्या, तेथे उभे राहून निदर्शने करु व निघून जाऊ. पण ते म्हणाले की असे आपल्याला करता येणार नाही कारण या भागात कलम 144 लागू आहे. मी म्हणालो ठीक आहे, कलम 144 लागू असेल तर ते तोडले म्हणून आमच्यावर कारवाई करा. पण ते म्हणाले की आम्ही तुम्हाला जाऊच देणार नाही. मी म्हटले का ? तर त्यांनी मला सांगितले की तुमच्यापैकी एखाद्याने दगड वगैरे मारला तर सी.एम. ची खुर्ची जाईल. म्हणजे सी.एम. ची खुर्ची वाचविणे ही पोलिसांची प्रॅयॉरिटी आहे काय ? पोलिसांची प्रॅयॉरिटी लॉ अँड ऑर्डर सांभाळणे, लोकांना सुरक्षा देणे, पोलिसांची प्रॅयॉरिटी लोकांच्या बाबतीत विश्वास निर्माण करणे, या राज्यातील जनता सुखी व सुरक्षित आहे की नाही हे पाहणे याला असायला पाहिजे. पण असे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत असेच चालू राहणार. त्याचप्रमाणे अजून माझ्याकडे काही सर्कुलर्स आहेत. त्यात गुन्हेगारांशी दोस्ती करा असेही एक पोलीस कमिशनरचे सर्क्युलर सुध्दा आहे. असे आहे तर डी.के. राव या पोलीस अधिकाऱ्याने काय गुन्हा केला होता ?

**सभापती** : सन्माननीय सदस्यांचे भाषण संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब...

त्यांच्याशी दोस्ती करावी याबाबत तुम्हीच सर्क्यूलर काढले होते, त्यांच्याशी दोस्ती वाढवा, त्यांचे मतपरिवर्तन करा म्हणून तुम्हीच सर्क्यूलर काढले होते ना ? जे पाच अधिकारी सस्पेंड झालेले आहेत ते कदाचित त्यांचे मतपरिवर्तन करण्यासाठी गेले असतीलही. त्यामुळे या पाच अधिका-यांवर आपण कारवाई का करता ? डॉ. दीपक सावंत यांनी या चर्चेवर आपले विचार मांडतांना 26.11 च्या संदर्भात मुंबईवर जो दहशतवादी हल्ला झाला त्यासंदर्भात राम प्रधान समितीने त्रुटी काढलेल्या आहेत असे विचार व्यक्त केलेले आहेत. त्यामुळे राम प्रधान समितीने गृहविभागाच्या संदर्भात ज्या काही त्रुटी दाखविलेल्या आहेत त्या त्रुटींपैकी किती त्रुटी आजपर्यंत दुरुस्त केल्या आहेत याची माहिती या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे. तुम्ही आम्हाला सांगाल की, आम्ही संरक्षण वाढवले, संरक्षणासाठी पैसे आणले. परंतु मी आपल्याला सांगतो की, तुम्ही आता माझ्या बरोबर दादर स्टेशन किंवा चर्चगेट स्टेशनवर या. त्या ठिकाणी एकूण जे चार गेट आहेत त्यापैकी दोन गेटवर मेटल डिटेक्टर लावलेले आहेत व दोन गेटवर मेटल डिटेक्टर लावण्यात आलेले नाहीत. जो माणूस आतमध्ये बॉम्ब घेऊन जाईल तो काय मेटल डीटेक्टरमधून जाईल काय ? तो मेटल डिटेक्टरमधून जाईल एवढा तो मूर्ख असेल काय ? दोन गेटवर मेटल डिटेक्टर लावावयाचे आणि दोन गेटवर मेटल डिटेक्टर लावायचे नाही यापेक्षा मेटल डिटेक्टर लावूच नका ना ? अशा कारणांमुळेच पोलिसांची मानसिकता तुटलेली आहे, पोलीस आपले संरक्षण करतील यावर लोकांचा विश्वास राहिलेला नाही. मुंबईतील भारत नगर, बहिरामपाडा हे जे पॉकेट्स आहेत त्या ठिकाणावरुन काल अतिरेकी पकडला त्यासंदर्भात एटीएसच्या प्रमुखांनी वाच्यता केलेली आहे. त्यामुळे त्या ठिकाणी जाऊन आपण कोम्बींग ऑपरेशन का करीत नाही ? त्या भागात कोम्बींग ऑपरेशन करण्यास आपण का घाबरता ? आज सुध्दा त्या ठिकाणी कित्येक अतिरेकी लपलेले तुम्हाला सापडतील. सिनिअर पोलीस अधिका-याला विचारले तर ते सांगतात की, आम्हाला आदेश नसल्यामुळे आम्ही त्या ठिकाणी जाऊ शकत नाही. खरे म्हणजे त्या ठिकाणी आतमध्ये जाऊन कोम्बींग ऑपरेशन करण्याची आमच्या पोलिसांची मानसिकता देखील राहिलेली नाही. या ठिकाणी धर्माचा प्रश्नच येत नाही. शेवटी गुन्हेगार हा गुन्हेगारच असतो. परंतु उद्या जो मोठा गुन्हा होणार आहे त्याला आज वेळीच रोखले नाही तर त्याचे वाईट परिणाम आपल्याला भोगावे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब...

लागतील. मला प्रिएन्टीव्ह ॲक्शनमध्ये पकडण्यासाठी आपण 50 पोलीस पाठविता? जे टेररीस्ट लपलेले आहेत त्यांना पकडण्याची मात्र तुमची हिंमत होत नाही ? हा कसला तुमचा भेदभाव ? शाहरुख खानच्या बंगल्यावर मी निदर्शन करण्यास गेलो म्हणून त्या ठिकाणच्या डीसीपीला जाब विचारला गेला की, अनिल परब या ठिकाणी कसा काय आला ? माझा त्या ठिकाणीच जन्म झालेला असल्यामुळे मला त्या ठिकाणचे रस्ते माहीत नसणार काय ? शाहरुख खानच्या पी.ए.ला मी स्वत: फोन करुन सांगितले होते की, "शिवसेना पक्षाची अशी,अशी भूमिका असल्यामुळे मी आपल्याकडे निवेदन देण्यासाठी येत आहे". परंतु मला पोलिसांनी सांगितले की,"तुम्ही त्या ठिकाणी जायचे नाही, तिकडे तुम्हाला जाता येणार नाही". त्यावेळेस मी सांगितले त्यांना सांगितले की, "मी निवेदन देण्यास जाणार, मला फक्त शाहरुख खानला निवेदन द्यावयाचे आहे, मी कोणताही गुन्हा करीत नाही". मी निवेदन द्यावयास गेलो म्हणून माझे त्वरित पोलीस प्रोटेक्शन काढण्यात आले परंतु तुमच्या एका राज्य मंत्र्यांने पोलीस प्रोटेक्शनमध्ये एका माणसाला तुडव तुडव तुडवले आणि ते आख्या जगाने बघितले त्यावेळी मात्र आपण त्याचे पोलीस प्रोटेक्शन काढण्याची हिंमत दाखवली का? टी.व्ही.वर चुकीचे दाखवले असेल तर त्याला मी काही करु शकत नाही. ज्याच्यावर बॉम्ब ब्लास्टचे आरोप होते अशा आरोपी व्यक्तीला अबू आझमी पोलीस प्रोटेक्शन घेऊन जातो हे तुम्हाला चालते काय ? या सर्वांनी जे काही केलेले आहे त्यांचे पोलीस प्रोटेक्शन काढण्याची तुम्ही हिंमत दाखविणार आहात काय? माझे पोलीस प्रोटेक्शन काढण्यासाठी तुम्हाला पाच मिनिटे सुध्दा लागली नाही. पोलीस प्रोटेक्शनसाठी एक कमिटी नेमलेली आहे असे आम्हाला सांगितले जाते. ही कमिटी संबंधितांचा संपूर्ण अहवाल तयार करते. या कमिटीमध्ये पोलीस कमिशनर, होम सेक्रेटरी आणि बाकीचे सुध्दा अधिकारी असतात. तुम्हाला पोलीस संरक्षणाची गरज आहे की, नाही हे ते बघतात आणि मगच पोलीस प्रोटेक्शन दिले जाते. पोलीस प्रोटेक्शन देण्यासाठी तुम्हाला पोलीस प्रोटेक्शन कमिटी लागते परंतु पोलीस प्रोटेक्शन काढतांना मात्र तुम्हाला पोलीस प्रोटेक्शन कमिटीची आवश्यकता लागत नाही ? मी शाहरुख खानला निवेदन देण्यासाठी गेल्याबरोबर माझे पोलीस प्रोटेक्शन काढले जाते परंतु ज्यांनी गुन्हे केलेले आहेत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3...

ॲड. अनिल परब...

त्यांच्यावर मात्र या शासनाने कोणतीही कारवाई केलेली नाही. यासंदर्भात राज्य शासनाची दुतोंडी भूमिका आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. आम्ही गुन्हा केला असेल तर तुम्ही आम्हाला जरुर ठोका. जर मला एखादा कायदा लागत असेल तर तो कायदा बाकीच्यांना लागला पाहिजे, तोच कायदा तुमच्या पक्षाच्या आमदारांना सुध्दा लागला पाहिजे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब..

सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेसंबंधी मला अनेक मुद्दे मांडावयाचे होते परंतु शेवटचा एक मुद्दा मी मांडतो की, पोलिसांकडून जर आपल्याला चांगला परफॉर्मन्स हवा असेल तर पोलिसांचे मनोधैर्य वाढवले पाहिजे. आज पोलिसांचे मनोधेर्य कमी कमी होत चालले आहे. काही पोलीस अधिका-यांना आम्ही रात्रं दिवस भेटत असतो त्यातील जे पोलीस अधिकारी खरोखर चांगले काम करु इच्छितात ते खरोखर मनापासून काम करण्याच्या मन:स्थितीत नाहीत.जे पोलीस अधिकारी फक्त दुकान उघडून पैसे कमाविण्यासाठी बसलेले आहेत ते फक्त नोकरी संपेपर्यत काम करतील आणि नंतर निघून जातील. महाराष्ट्राच्या पोलिसांचा जो लौकिक आहे तो जर टिकवावयाचा असेल तर त्यांच्या पाठीवरुन मायेचा हात फिरला पाहिजे, त्यांची काळजी व्यवस्थितपणे घेतली गेली पाहिजे.अशा प्रकारे पोलिसांची जर काळजी घेण्यात आली तरच महाराष्ट्रातील आणि मुंबईतील नागरिक सुरक्षित राहू शकेल एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----

**सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. गुरुवार, दिनांक 1 एप्रिल 2010 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 12.30 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल. या कालावधीत आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविलेल्या म.वि.प. नियम 260 अन्वये प्रस्तावावरील अपूर्ण राहिलेली चर्चा होईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.45 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक रात्रौ 8 वाजून 13 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 1 एप्रिल, 2010 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यत स्थगित झाली )

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही